सभापतीस्थानी - माननीय सभापती

तोंडी उत्तरे

राज्यात केंद्र शासनाप्रमाणे शेतकऱ्यांची कर्जमाफी योजना राबविण्याबाबत

(1) * 50746 श्री. संजय दत्त, श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील, श्री सुभाष चव्हाण, श्री.सय्यद जमा, श्री.जैनुद्दीन जव्हेरी, श्रीमती अलका देसाई, श्री. चरणसिंग सप्रा, श्री. विनोद तावडे, श्री. मधुकर चव्हाण, श्री.संजय केळकर, श्री.रामनाथमोते, श्री.चंद्रकांत पाटील, श्री जयप्रकाश छाजेड, श्री. नितीन गडकरी, श्री. पांडुरंग फुंडकर, श्री अशोक मानकर, डॉ. वसंत पवार, श्री. जितेंद्र आव्हाड, श्री. दिवाकर रावते, श्री. सुरेश जेथलिया, श्री. गोपीकिसन बाजोरिया, श्री. किसनचंद तनवाणी, श्री.परशुराम उपरकर, श्रीमती मधु जैन, डॉ. निलम गोऱ्हे, श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री. अरविंद सावंत, श्री. संजय पाटील : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) केंद्र शासनाने घोषित केलेल्या कर्जमुक्ती पॅकेज अंतर्गत राज्यातील विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, खानदेश व कोकण इत्यादी विभागाअंतर्गत प्रत्येक जिल्ह्यातील किती शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्यात आले आहे व त्यापैकी विशेषत: विदर्भातील सहा आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील शेतकऱ्यांना त्या पॅकेज अंतर्गत किती निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे,
(2) तसेच कर्ज माफीपोटी केंद्र शासनाकडून प्राप्त झालेला रुपये 3100 कोटी एवढा निधी बँकांना न देता राज्य सहकारी बँकेने स्वत:च्याच खात्यात जमा करुन घेतल्याने कर्जमाफी प्रत्यक्षात झाली नसल्याचे व कर्जमाफीसाठी आलेल्या निधीपैकी रुपये 900 कोटी एवढा निधी अद्यापही जिल्हा बँकेमध्ये जमा असून त्याचे वितरण न झाल्याचे माहे जानेवारी, 2009 मध्ये अथवा त्या दरम्यान राज्य शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(3) राज्यातील शेतकऱ्यांचे रुपये 6208 कोटी रकमेचे कर्जमाफ करण्यात येऊनही अद्याप राज्यात 40 लाख शेतकऱ्यांवर 11,000 कोटी रुपयांचे कर्ज असल्याचेही माहे जानेवारी, 2009 मध्ये अथवा त्या दरम्यान शासनाच्या निदर्शनास आले आहे काय,
(4) असल्यास, या एकंदर प्रकरणी आढावा घेण्यात आला आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले आहे व यासंदर्भात कर्जमाफीसह उपरोक्त सर्व बाबीबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे अथवा येत आहे, तसेच पाच एकरांवरील शेतकऱ्यांचे कर्जमाफ करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे कशाप्रकारे पाठपुरावा केला आहे अथवा येत आहे
(5) केंद्र शासनाप्रमाणे कर्जमाफी संदर्भात राज्य शासनाने योजना राबविण्यासंदर्भातील कार्यवाही पूर्ण झाली आहे काय, असल्यास, यासंदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे काय, असल्यास, राज्य शासनाच्या योजनेचे स्वरुप काय आहे व त्याच्या अंमलबजावणीची सद्यस्थिती काय आहे ?

श्री.हर्षवर्धन पाटील : (1) केंद्र शासनाने घोषित केलेल्या कर्जमुक्ती पॅकेज अंतर्गत राज्यातील विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, खानदेश व कोकण या विभागांना मिळालेला कर्जमाफीचा लाभ पुढील प्रमाणे आहे :-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(रु.लाखात)

विभाग	जिमस बँक	भूविकास बँक
विदर्भ	59008.71	4563.54
मराठवाडा	56797.20	14545.78
प. महाराष्ट्र	146594.99	4348.71
खानदेश	11929.27	1113.69
कोकण	8692.87	190.03

भूविकास बँकेच्या 170858 सभासदाचे कर्ज माफ झाले असून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या 1586886 सभासदांचे कर्ज माफ झाले आहे.
(सोबत जिल्हा निहाय तक्ता जोडला आहे)

केंद्र शासन कर्जमाफी व कर्ज सवलत 2008 अंतर्गत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व भूविकास बँकांना केंद्र शासनामार्फत उपलब्ध झालेल्या रक्कमांचा तपशील.

(रु.लाखात)

अ.नं.	जिल्हा	जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका	भूविकास बँका
1.	ठाणे	2190.92	85.29
2.	रायगड	317.43	28.96
3.	रत्नागिरी	5690.43	39.61
4.	सिंधुदूर्ग	494.09	36.17
कोकण विभाग		**8692.87**	**190.03**
5.	नाशिक	28057.71	382.74
6.	धुळे	3093.65	681.73
7.	नंदुरबार	0.00	0.00
8.	जळगांव	8835.62	431.96
9.	अहमदनगर	17461.62	1042.50
नाशिक विभाग		**57448.60**	**2538.93**
10.	पुणे	29321.3	507.47
11.	सोलापूर	30362.36	906.02
पुणे विभाग		**59683.66**	**1413.49**
12.	कोल्हापूर	20327.17	699.38
13.	सांगली	14501.10	400.64
14.	सातारा	6563.73	409.96
कोल्हापूर विभाग		**41392.00**	**1509.98**
15.	औरंगाबाद	17850.17	2866.35
16.	जालना	1804.33	2595.34
17.	परभणी	5398.75	1196.11
18.	हिंगोली	0.00	0.00
औरंगाबाद विभाग		**25053.25**	**6657.80**
19.	लातूर	3680.64	861.20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

20.	उस्मानाबाद	10915.76	1467.57
21.	बीड	10001.16	3848.86
22.	नांदेड	7146.39	1710.35
लातूर विभाग		**31743.95**	**7887.98**
23.	अमरावती	6600.25	680.11
24.	अकोला	6868.12	522.96
25.	वाशिम	0.00	0.00
26.	बुलढाणा	7759.83	382.04
27.	यवतमाळ	9610.14	785.22
अमरावती विभाग		**30838.34**	**2370.33**
28.	नागपूर	5096.23	694.51
29.	वर्धा	3204.25	316.65
30.	चंद्रपूर	9702.76	297.09
31.	भंडारा	3576.09	665.92
32.	गडचिरोली	1530.09	219.04
33.	गोंदीया	5060.95	0.00
नागपूर विभाग		**28170.37**	**2193.21**
महाराष्ट्र राज्य		**283023.04**	**24761.75**

विदर्भातील सहा आत्महत्याग्रस्त जिल्हयातील शेतकऱ्यांना पॅकेज अंतर्गत एकूण रु.36729.57 लाख इतका निधी मिळाला आहे.

(2) नाही.

(3) नाही.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

(5) **"महाराष्ट्र शासन कृषि कर्जमाफी व कर्ज परतफेड सवलत योजना, 2009"** मध्ये पात्रतेच्या प्रमुख अटी व निकष खालील प्रमाणे आहेत :-

योजनेची व्याप्ती : राष्ट्रीयकृत/ व्यापारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, भूविकास बँका, नागरी सहकारी बँका व क्षेत्रीय ग्रामीण बँकांकडून थेट अथवा उपसा जलसिंचन, कुक्कुटपालन. मस्त्यविकास, दुधविकास व इतर सहकारी संस्थानी (नागरी/ ग्रामीण बिगरशेती पतसंस्था वगळून) वित्तीय संस्थामार्फत कृषि कर्ज घेतलेले 1) वंचित थकित शेतकरी, 2) कर्ज परतफेड केलेले वंचित नियमित शेतकरी, 3)कर्ज परतफेड केलेले वंचित थकीत शेतकरी यांना सदरा योजनेचा लाभ मिळणार आहे.

अटी व निकष :-

वंचित थकीत शेतकरी :

1) **1997 पुर्वीचे कृषि कर्ज** : 1 एप्रिल 1997 पुर्वी वाटप केलेले व नंतरच्या कालावधीत पुर्नगठीत न केलेले कृषि कर्ज असलेले थकीत शेतकरी म्हणजे असे कृषि कर्ज जे (अ) 31 मार्च. 1997 पुर्वी वाटप केले असले पाहिजे (ब) त्याचे पुर्नगठण झालेले नसावे (क) 31 डिसेबर,2007 रोजी थकीत असून ते 29 फेब्रुवारी, 2008 पर्यत परतफेड न केलेले असले पाहिजे व कृषि कर्जाची व्याख्या नाबार्डने विहित केल्याप्रमाणे असेल.

अशासकीय प्रत / प्रारूप नोंदी नाही

2) कृषि पूरक व इतर कृषि संलग्न व्यवसायासाठी घेतलेले कर्ज -

कृषि पूरक व इतर कृषि संलग्न व्यवसायासाठी वाटप केलेल्या कृषि कर्ज असलेले थकीत शेतकरी, ज्यांना असे कृषि पुरक कर्ज (अ) 31 मार्च, 2007 पूर्वी वाटप केले असले पाहिजे (ब्) त्याचे पुर्नगठण झालेले नसावे (क) 31 डिसेबर 2007 रोजी थकीत असून ते 29 फ्रेबुवारी, 2008 पर्यत परतफेड न केलेले असले पाहिजे व कृषि व कृषि पुरक कर्ज नाबार्डच्या व्याख्येप्रमाणे असलेले पाहिजे.

3) सहकारी उपसा,कुक्कुट, दुग्ध, मत्स्य व इतर सहकारी संस्थामार्फत वाटप केलेले कर्ज :

सहकारी उपसा जलसिंचन संस्था, कुक्कुटपालन/ मत्स्यविकास सहकारी संस्था, दुग्धविकास संस्था व बॅकेकडून कर्ज धेऊन ज्या इतर सहकारी संस्थानी (नागरी/ ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था वगळून) कृषि कर्ज किंवा कृषि पुरक व्यवसायासाठी शेतकऱ्यांना कर्ज वाटप केलेले आहे, असे थकीत शेतकरी व असे कृषि कर्ज जे (अ) 31 मार्च, 2007 पुर्वी वाटप केले असले पाहिजे (ब) त्याचे पुर्नगठण झालेले असो वा नसो (क) 31 डिसेबर, 2007 रोजी थकीत असलेले व 29 फेब्रुवारी, 2008 पर्यत परतफेड न केलेले असले पाहिजे व (ड) अशा संस्थांनी शेतकऱ्यांना कृषि कर्ज वाटप करण्याची तरतुद त्यांच्या उपविधीत समाविष्ट करण्यात आलेली असली पाहिजे.

कर्जाची परतफेड करणारे वंचित नियमित शेतकरी : 1) सन 2006-07 या वर्षात घेतलेल्या ऊस किंवा तत्सम 1 वर्षापेक्षा जांस्त कालावधी असलेली पीके वगळून कर्जाचे तसेच सन 2005-06 या वर्षात ऊस उत्पादनासाठी किंवा तत्सम 1 वर्षापेक्षा जास्त कालावधी असलेली पीके उत्पादनासाठी घेतलेल्या कर्जाचे दि.29 फेब्रुवारी, 2008 पुर्वी परतफेड करणारे शेतकरी.

2) 1 एप्रिल, 2007 ते 29 फेब्रुवारी, 2008 पर्यंत मध्यम किंवा दिर्घ मुदत कर्जाच्या हप्त्याची परतफेड करणारे नियमित शेतकरी.

कर्जाची परतफेड करणारे वंचित थकित शेतकरी :

1) सन 2006-07 पुर्वी ऊस किंवा तत्सम 1 वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी देण्यात आलेल्या पीकांची कर्जे वगळून इतर पीकांसाठी अल्प मुदतीचे पीक कर्ज असलेले शेतकरी किंवा मध्यम व दिर्घ मुदत कर्जाची दि.1 एप्रिल 2007 ते 29 फेब्रुवारी 2008 पर्यत परतफेड केलेले थकीत शेतकरी.

2) सन 2005-06 पुर्वी उस किंवा तत्सम 1 वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी असणाऱ्या पीकांसाठी देण्यात आलेल्या कर्जाची दि.1 एप्रिल 2007 ते 29 फेब्रुवारी 2008 पर्यत परतफेड केलेली आहे असे थकीत शेतकरी.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, सर्व प्रथम मी शासनाचे आणि माननीय मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री या सर्वांचे अभिनंदन करू इच्छितो. शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याच्या बाबतीत त्यांनी जो पुढाकार घेतला आहे त्याचे निश्चितपणे स्वागत सर्वच ठिकाणी, राज्यात आणि सर्व देशात होत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे. मात्र या शेतकऱ्यांना जो रिलिफ दिलेला आहे त्यापेक्षा आणखी जास्त रिलिफ देण्याची अपेक्षा आहे, तरी त्याबाबत शासन काही विचार करणार आहे काय ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, या सदनामध्ये या पूर्वीही चर्चा झाली होती की, केंद्र सरकारने कर्जमाफी केल्यानंतर त्यापासून आपल्या राज्यातील जे शेतकरी वंचित राहिले आहेत त्यांना राज्य सरकार कडून साडेसहा हजार कोटी रूपयांपेक्षा अधिक रकमेची कर्जमाफी देण्याचा निर्णय आपण घेतला आणि सर्व वर्गांना त्यात समाविष्ट करून घेण्याचा प्रयत्न आपण केलेला आहे. त्यामुळे आता पुन्हा नव्याने याबाबत विचार करण्याचा काही प्रश्न उद्भवत नाही.

डॉ.वसंतराव पवार : सभापती महोदय, केंद्र सरकारच्या कर्जमाफी आणि कर्ज सवलत योजनेंतर्गत 5 एकरापेक्षा जास्त क्षेत्र असलेल्या शेतकऱ्यांना 25 टक्के रकमेच्या सवलतीची मुदत ही 30 जून 2009 पर्यंत म्हणजेच या महिन्याच्या अखेर पर्यंत आहे. तेव्हा ही मुदत आपण एक वर्षाने म्हणजे 30 जून 2010 पर्यंत वाढविणार आहात काय ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी एक चांगला प्रश्न विचारलेला आहे. कारण 25 टक्के ओटीएस साठी म्हणजे वन टाईम सेटलमेंटसाठी केंद्र सरकारची कर्जमाफीतील ही योजना आहे आणि तिची मुदत 30 जून 2009 रोजी संपत आहे. परंतु मध्यंतरी आचार संहिता वगैरेचा काळ लक्षात घेता निश्चितपणे राज्य सरकार केंद्र सरकारला विनंती करील की, ही मुदत एक वर्षाने वाढवावी. ही योजना केंद्र सरकारची असून राज्य सरकारकडे ती केवळ अमलबजावणीसाठी आहे त्यामुळे राज्य सरकार याबाबत केंद्र सरकारला शिफारस करील, शेवटी अंतिम निर्णय हा केंद्र सरकारचा राहील.

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, राज्यातील ज्या विविध कार्यकारी सोसायट्या आहेत त्यातील संचालकांनी कर्जे घेऊन आपल्या नावाने थकबाकी दाखवून त्यावर कर्जमाफी घेतलेली आहे. याची माहिती आपल्याकडे आहे का ? खरे तर संचालकांना अशा प्रकारे थकबाकीदार राहता येत नाही, ते कर्ज घेऊ शकत नाही. तेव्हा त्याबद्दल आपण काय कारवाई संबंधितांवर करणार आहात ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, ही माहिती माझ्याकडे नाही. सन्माननीय सदस्यांनी ती माहिती दिल्यास त्यानुसार जरूर चौकशी करून योग्य ती कारवाई करण्यात येईल.

.... ए 6 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.50746 ...

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, केंद्र सरकारच्या कर्जमाफी योजनेतून ज्यांना सवलत मिळाली आहे त्यांना राज्य सरकारच्या योजनेतून सवलत घेता येत नाही. परंतु केंद्र सरकारच्या कर्जमाफी योजनेतून ज्यांना अत्यल्प प्रमाणात कर्जमाफी झालेली आहे त्यांचाही अंतर्भाव आपण आपल्या योजनेमध्ये करणार काय ? तसेच पाणीपुरवठा सहकारी संस्था आहेत त्यांनादेखील या कर्जमाफी योजनेचा लाभ मिळणार काय ? तसेच गट औद्योगिक संस्थांमार्फत ज्यांनी कर्ज घेतले आहे त्यांचा या योजनेत अंतर्भाव झालेला नाही तेव्हा कालच्या अर्थसंकल्पामध्ये आपण सर्व महामंडळांची कर्ज माफी देऊ केलेली आहे तर त्यात या गट औद्योगिक संस्थादेखील आहेत का ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, केंद्र सरकारच्या अनुदानातून ज्यांना लाभ मिळालेला आहे ते आपल्या राज्य सरकारच्या कर्जमाफी योजनेत बसत नाहीत हे बरोबर आहे. याबाबत वारंवार मागणी होत आहे म्हणून आम्ही या संदर्भातील सगळी माहिती एकत्रित करण्याचा प्रयत्न सुरू केलेला आहे. ती माहिती एकत्रित झाल्यानंतर, उदा. काही इतर अनुदान घेतले गेले असेल, तेल्या रोगामुळे अनुदान मिळाले असेल वगैरेची सगळी माहिती आल्यानंतर याचा निश्चितपणे विचार करण्यात येईल. ....

(यानंतर श्री. सरफरे ....बी 1 ..

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 50746...

श्री. हर्षवर्धन पाटील...

माननीय सदस्यांनी दुसरा मुद्दा उपस्थित केला. शेतीला पाणी पुरवठा करणाऱ्या उपसा सिंचन योजनांसाठी घेतलेले थकित कर्ज माफ करण्याच्या संदर्भात शासन स्तरावर दोन बैठक झाल्या आहेत. अशा संस्थांची माहिती एकत्रित करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. माननीय अर्थमंत्र्यांनी काल आपल्या भाषणामध्ये 12 बलुतेदार किंवा आर्थिक विकास महामंडळाकडून घेतलेल्या कर्जाची माफी करण्यासंदर्भात आपली भूमिका जाहीर केली आहे, तिची अंमलबजावणी होईल.

श्री. सय्यद जामा : सभापति महोदय, मेरा एक प्रश्न माननीय सदस्य श्री जयंत पाटील जी ने पूछ लिया है जो लिफ्ट इरीगेशन से संबंधित है और माननीय मंत्री जी ने भी उसके संबंध में आश्वासन दिया है कि विचार करेंगे. लिफ्ट इरीगेशन की योजना के लिए बहुत से किसानों ने कर्ज लिया है, नागपुर, भंडारा, गोंदिया इत्यादि विदर्भ के जिलों के किसानों ने कर्ज लिया है. मेरा दूसरा प्रश्न यह है कि किसानों के जो 6200 करोड़ रुपये के कर्ज माफ किए गए हैं, उसके बाद अभी भी बहुत से किसानों को जिला सहकारी बैंक से कर्ज नहीं मिल रहा है. किसानों का कहना है कि कर्ज के मामलों के प्रोसेस में बहुत समय लग रहा है. क्या सरकार इस बात की गारंटी देगी कि किसानों को समय पर कर्ज मिलेगा ? मेरा तीसरा प्रश्न यह है कि जिस प्रकार से महिला बचत गट को 4 प्रतिशत की दर से कर्ज उपलब्ध किया जाता है उसी प्रकार से क्या किसानों को 4 प्रतिशत की दर से कर्ज उपलब्ध करवाने के बारे में विचार किया जाएगा ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, यावर्षी जवळपास 78 लाख शेतकऱ्यांना कर्जमाफीचा फायदा झाल्यामुळे नवीन पिक कर्ज घेण्यासाठी ते पात्र झाले आहेत. म्हणून गेल्या महिन्यात या वर्षीच्या खरीप आणि रब्बी हंगामासाठी द्यावयाच्या 13 हजार कोटी रुपयांच्या कर्ज वाटपाचा आराखडा विभागाने तयार केला आहे. त्यापैकी खरीपासाठी 9 हजार कोटींचे कर्जवाटप राज्य सहकारी बँक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, राष्ट्रीयीकृत बँका व राज्यातील लिड बँका मार्फत करण्याचा आम्ही निर्णय घेतला आहे. तसेच, त्यासाठी जिल्हा स्तरावर जिल्हाधिकाऱ्यांची नियंत्रण अधिकारी म्हणून नेमणूक केली आहे. आतापर्यंत 3 ते साडे तीन हजार कोटी रुपयांचे वाटप झाले आहे.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, विदर्भातील ज्या ज्या जिल्हयांमध्ये पॅकेज दिले गेले आहे त्या जिल्हयांमध्ये ज्या सिंचन सोसायटया थकबाकीदार आहेत त्यांच्या संदर्भातील प्रश्न अनेक वर्षापासून प्रलंबित होता. त्याबाबत माननीय महसूलमंत्री श्री. पतंगराव कदम यांच्याबरोबर माननीय जलसंपदा मंत्री श्री. अजितदादा पवार यांच्या उपस्थितीत बैठक झाली होती. त्यानंतर वर्तमानपत्रामध्ये स्टेटमेंट देण्यात आले होते की, आम्ही त्यांची कर्जमाफी करु. त्यावेळी महसूल मंत्र्यांनी सांगितले होते की, आम्ही पॅकेजमध्ये त्याची शिफारस करु व हे कर्ज माफ करु. विदर्भातील अमरावती, वर्धा व यवतमाळ या पॅकेजग्रस्त जिल्हयातील शेतकऱ्यांच्या जमिनी लिलावात निघाल्या आहेत. म्हणून आपल्या निदर्शनास ही बाब आणली. ही कर्जमाफी देण्यासंदर्भात आपण जी घोषणा केली होती तिचे पुढे काय झाले ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महादेय, माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे नागपूरच्या वर्तमानपत्रामध्ये एक स्टेटमेंट दिले होते हे खरे आहे. विशेषकरुन विदर्भातील आत्महत्त्याग्रस्त जे सहा जिल्हे आहेत त्या जिल्हयातील बऱ्याच उपसा सिंचन योजनांसाठी शेतकऱ्यांनी बँकेचे कर्ज घेतले परंतु त्या योजना आता बंद आहेत. ते कर्ज माफ करण्याच्या संदर्भात केंद्र सरकारने एक सिलिंग कमिटी गठीत केली आहे. त्या योजनेमध्ये हा कर्ज माफीचा प्रश्न समाविष्ट करण्याबाबत आमच्या विभागामार्फत शिफारस केली असून त्याबाबत राज्य शासन निश्चितपणे पाठपुरावा करील.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय,शेतकऱ्यांनी बँकाकडून घेतलेले कर्ज कर्जमाफी योजनेंतर्गत माफ झाले आहे. तसेच, अन्य पत संस्थांकडून घेतलेले कर्ज सुध्दा माफ झाले. परंतु शेतकऱ्यांनी अडचणीच्या काळात आपल्या शेतीसाठी बिगर शेती पत संस्थांकडून किंवा नागरी पत संस्थाकडून कर्ज घेतले आहे त्यांना या योजनेतून वगळले आहे. आणि म्हणून अशा पत संस्थांकडून शेतकऱ्यांनी घेतलेले कर्ज आपण कर्जमाफी योजनेमध्ये अंतर्भूत करणार काय? करणार नसाल तर न करण्याची कारणे काय?

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

ता.प्र.क्र.50746 . . . .

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, बिगर ग्रामीण शेती पतसंस्था यांचे रजिस्ट्रेशन हे मुळातच बिगर ग्रामीण कर्जपुरवठा पतसंस्था असे आहे. त्यामुळे त्यांनी शेतीसाठी कर्ज देऊ नये असेच त्यांच्या बायलॉज मध्ये आहे. याबाबतीत अनेक वेळा बैठकी मध्ये विषय उपस्थित झाला होता आणि त्यावर अनेक वेळा चर्चा देखील झाली होती. राज्य शासनाला पतसंस्थांच्या कर्जमाफीचा विचार करता येणार नाही. तसेच केंद्र शासनाने सुध्दा असे ठरविलेले आहे की, याबाबतीत विचार करावयाचा नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. याठिकाणी छापील उत्तरामध्ये प्रश्नाच्या संदर्भात जी माहिती दिलेली आहे, त्यामध्ये औरंगाबाद विभाग आणि लातूर विभाग असा उल्लेख करण्यात आलेला आहे. परंतु अजून स्वतंत्र लातूर कमिशनर विभाग स्थापन झालेला नाही. अजूनही तो विषय माननीय माजी मुख्यमंत्री आणि माननीय सध्याचे मुख्यमंत्री यांच्या वादामध्ये अडकलेला आहे. असे असताना याठिकाणी उत्तरामध्ये "लातूर विभाग" असा उल्लेख कसा करण्यात आला ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, आपल्याकडे रेव्हीन्यू सर्कल विभाग वेगला आहे आणि सहकाराच्या संदर्भातील विभाग वेगळा आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, काही उद्देशाने म्हणजे शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या घटनांमुळे कर्जमाफीचा प्रस्ताव प्रस्ताव पुढे आला होता. तेव्हा कर्जमाफी जाहीर झाल्यानंतरच्या काळामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या घटनांमध्ये कोणता फरक पडलेला आहे, याचा अभ्यास करण्यात आला आहे काय ? जर आत्महत्येच्या घटनांमध्ये फरक पडला नसेल तर त्याची कारणे काय आहेत ? याबाबतीत शासन शोध घेणार आहे काय ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, नुकतीच कर्जमाफीची प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. आता नवीन कर्ज देण्याची प्रक्रिया सुरु झालेली आहे.तेव्हा याबाबतीत ईव्हॅल्युएशन करावे लागणार आहे आणि त्यासाठी राज्य शासन निश्चितपणे प्रयत्न करील.

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, काही शेतकऱ्यांचे नाव 7:12 वर असते आणि काही शेतकऱ्यांचे नाव 7:12 असले तरी त्यापुढे वर्क-2 असे लिहिलेले असते. म्हणजे राज्यामध्ये ज्या शेतकऱ्यांना पुनर्वसनाअंतर्गत शासनाकडून जी जमीन देण्यात आली आहे, ती वर्क-2 म्हणून ..

. . . .सी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

देण्यात आलेली आहे. त्यामुळे त्यांना त्या जमिनीवर कर्ज मिळत नाही, तसेच कर्जमाफी सुध्दा मिळत नाही. तेव्हा अशा शेतकऱ्यांचा या कर्जमाफी योजनेअंतर्गत विचार करणार आहात काय ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, बँकाचे काही नियम आहेत. कर्ज पुरवठा करीत असताना गॅरंटी ही घ्यावीच लागते. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, याबाबत अनेक शेतकऱ्यांच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. त्या जरुर माझ्याकडे देण्यात याव्यात, त्यांची तपासणी केली जाईल आणि बँकेला सूचना दिल्या जातील.

. . . .सी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यानंतर राज्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने रुपये ३६ कोटी खर्च करुन गस्तीसाठी १८ ट्रॉलर्स भाड्याने घेण्याचा निर्णय शासनाने घेतल्याबाबत

(२) *५२६७६ श्री.अरुण गुजराथी , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यानंतर राज्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने रुपये ३६ कोटी खर्च करुन गस्तीसाठी १८ ट्रॉलर्स भाड्याने घेण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयानुसार आतापर्यंत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.नसीम खान, श्री. जयंत पाटील यांच्याकरिता : (१) व (२) राज्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सागरी गस्तीसाठी १८ ट्रॉलर्स भाड्याने घेण्यात आले असून त्यासाठी रु.९९.६६ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. या ट्रॉलर्सने सागरी जिल्ह्यांमध्ये पोलीस व कस्टम विभागामार्फत सागरी गस्त सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, सागरी सुरक्षा अत्यंत महत्वाचा मुद्दा आहे. म्हणून पहिला प्रश्न असा विचारण्यात आला आहे की, "मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यानंतर राज्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने रुपये 36 कोटी खर्च करुन गस्तीसाठी 18 ट्रॉलर्स भाडयाने घेण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे, हे खरे आहे काय ? याबाबतीत असे उत्तर देण्यात आले आहे की, "राज्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सागरी गस्तीसाठी 18 ट्रॉलर्स भाडयाने देण्यात आले असून त्यासाठी रु.99.66 लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे." म्हणजे राज्याच्या सुरक्षिततेच्या संदर्भात शासनाच्या माध्यमातून फक्त 1 कोटी रुपये देण्यात आलेले आहेत. तेव्हा हे ट्रॉलर्स् भाडयाने घेण्याऐवजी ते विकत घेण्याच्या बाबतीत शासन विचार करणार आहे काय ? त्याच प्रमाणे स्पीड बोटींच्या संदर्भात शासन काय कारवाई करणार आहे? तसेच एकंदर सागरी संरक्षणाच्या संदर्भात शासनाच्या भविष्यकालीन योजना कोणत्या आहेत ?

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय,आजच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये अनु.क्र.11, तारांकित प्रश्न क्रमांक 51072 वरील प्रश्नाचा विषय एकच आहे.त्यामुळे तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीमधील अनु.क्र.2 व अनु.क्र.11 वरील प्रश्न क्लब करण्यात यावेत.

श्री.नसीम खान : सभापती महोदय,सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथीसाहेबांनी यांनी प्रश्न विचारलेला आहे की,सागरी किनाऱ्याच्या सुरक्षेसाठी भाडयाने ज्या बोटी घेतलेल्या आहेत, ...

. . . .सी-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नसीम खान . . . .

त्याचे भाडे काय आहे? याबाबतीत सांगावयाचे तर शासनाच्या निर्णयाप्रमाणे ज्या बोटी भाडेपट्टीने घेतलेल्या आहेत, त्यासाठी वेगळी तरतूद करण्यात आली होती आणि याची खरेदी करण्यासाठी सर्व प्रक्रिया सुरु झालेली आहे, त्याचे टेंडर प्रगती पथावर आहे आणि लवकरात लवकर नवीन बोटी घेण्याच्या दृष्टीने आणि सागरी किनाऱ्याच्या सुरक्षेच्यादृष्टीने ज्या-ज्या उपाययोजना करण्याच्या बाबतीत निर्णय घेण्यात आलेला आहे, त्याप्रमाणे करण्यात येईल.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, गस्ती नौका घेतल्या जातात. परंतु प्रत्यक्षात त्यांचा स्पीड नसतो आणि त्याबाबत सदनामध्ये अनेक वेळा चर्चा झालेली आहे. पण अशी स्थिती आहे की, ज्या नौकांना स्पीड नसतो, अशाच गस्ती नौका घेतल्या जातात. त्यामुळे दोन महिन्यापूर्वी देवगड बंदरामध्ये कर्नाटक राज्यातून 200 बोटी आल्या आणि त्यातील 29 बोटी पकडण्यात आल्या. त्यामध्ये 13 लाख रुपयांचा माल मिळाल्यानंतर पासपोर्टच्या बाबतीत 80 लाख रुपयांचा दंड व्हावयास हवा होता, पण प्रत्यक्षात तीन लाख रुपयेच दंड करण्यात आला. अशा प्रकारे स्पीड नसलेल्या बोटी घेण्याच्या बाबतीत शासनाने निर्णय घेतलेला आहे असे दिसते. याबाबतीत शासनाचे काय म्हणणे आहे ? याचे उत्तर देण्यात यावे. त्याचप्रमाणे स्पीड बोटी घेण्यात येणार आहेत, पण त्यासंबंधात कोकणातील श्री.फाटक यांनी सांगितले.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मा.प्र.क्र.52676...

श्री. उपरकर...

माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, 400 लोकांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे ते प्रशिक्षण कधी सुरु करणार?

श्री. नसीम खान :सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी बोटींचा प्रश्न विचारला आहे. या बोटींची स्पीड चांगली असावी यासाठी नवीन स्पिड बोटी घेण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे. स्पीडबोटी घेण्याची प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. त्यानंतर सन्माननीय सदस्यांनी प्रशिक्षणाच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला आहे. स्पीडबोटी आल्यानंतर आवश्यकतेनुसार ज्या उपाययोजनेची गरज लागेल त्याप्रमाणे ती करता येईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, ज्या स्पीड बोटी भाडयाने घेतल्या आहेत त्यांची नॉटिकल स्पीड किती आहे, या भाडयाने घेतलेल्या स्पीड बोटींची सद्य:स्थिती काय आहे आणि (अडथळा) ट्रॉलरला आम्ही मराठीत बोट म्हणतो. सभापती महोदय, प्रत्येक ट्रॉलरच्या भाडयाचा दर ठरवितांना निकष काय ठरविण्यात आले होते? या लाकडी बोटी घेऊन आपण किनाऱ्याचे संरक्षण करु शकतो काय? शासन याबबतीत ॲल्युमिनियमच्या बोटी घेण्याचा विचार करील काय? फायबर आणि लाकडी बोटी घेऊन किनाऱ्याचे संरक्षण करु शकत नाही. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत ज्या प्रमाणे सर्व देशात ॲल्युमिनियमच्या बोटी घेणे बंधनकारक केलेले आहे त्याप्रमाणे शासन या सर्व बोटी ॲल्युमिनियमच्या असतील याचा गंभीरपणे विचार करील काय?

श्री. नसीम खान : सभापती महोदय, पहिल्या प्रश्नाचे उत्तर असे की, काही बोटी तात्पुरत्या भाडयाने घेण्यात आलेल्या आहेत. या बोटींची स्पीड कमी आहे, हे खरे आहे. अंदाजे 5 कि.मी. इतकी त्यांची स्पीड आहे. जास्त स्पीडच्या बोटी मिळाव्यात म्हणूनच नवीन स्पीड बोटी घेण्याचा निर्णय झालेला आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, खरे म्हणजे समुद्रावर संरक्षण करण्याची जबाबदारी ही घटनेप्रमाणे नेव्हीची आहे. विशेषत: आतंकवादी स्लो बोटीतून येत नाहीत. ते सगळया सॉफिस्टिकेटेड बोटी मधून आपल्या सीमेपर्यंत आले होते त्यानंतर आपल्या येथील बोट त्यांनी हायजॅक केली होती. असे असतना महाराष्ट्रातील कमी स्पीडच्या भाडयाच्या बोटींवर खर्च करुन किती संरक्षण होणार आणि किती माहिती मिळेल हा संशयच आहे.या संदर्भात वेळोवेळी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ MAP/

मा.प्र.क्र.52676...

श्री. नितीन गडकरी....

चर्चा झालेली आहे. वर्तमानपत्रातून झाली. मिडियामध्येही झाली आहे. म्हणून या संदर्भात कस्टम विभाग, केंद्र सरकारचे संरक्षण मंत्रालय आणि महाराष्ट्र सरकारचे गृह विभाग यांनी खऱ्या अर्थाने समुद्राच्या सीमावर्ती भागाचे सरंक्षण करण्याकरिता अत्याधुनिक यंत्रणा निर्माण करणे हे संरक्षण दलाचे काम आहे. कारण हा राज्याच्या सीमेपलीकडचा प्रश्न आहे. त्यामुळे या संदर्भात झळ लागते राज्याला आणि केंद्रीय संरक्षण मंत्र्यांनी "आम्ही असे कळविलेले आहे" असे लोकसभेत उत्तर दिलेले आहे. त्याचा पुरावा मी या ठिकाणी सादर करु शकतो. अशा स्थितीत कोणती सीमा कोणी बघाची या संदर्भात तिघांचे को-ऑर्डिनेशन होण्याची आवश्यकता आहे. कारण सीमा अवाढव्य आहेत. त्यातून घेतलेल्या बोटींची स्पीड काही नाही. येणारे आतकंवादी सॉफिस्टिकेटेड बोटीतून येणार. त्यामुळे केवळ हा "थूक पॉलिस" करण्यासारखा प्रकार होईल. यातून काही होणार नही. तेव्हा यासंदर्भात शासनाने गंभीर दखल घेऊन तिघांचेही को-ऑर्डिनेशन करुन नेमके काय केलेले आहे?

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, सागरी सुरक्षिततेच्या प्रश्नावर केंद्र सरकार बरोबर मागच्या सहा महिन्यात वेगवेगळयावेळी अनेक चर्चा झाल्या आहेत. या पूर्वी जे कोस्टलगार्डर्स होते त्यांना आता आता पूर्ण किनाऱ्यापर्यंत सुरक्षिततेसंबंधीची काळजी घेण्याचे अधिकार आणि जबाबदारी केंद्र सरकारने सोपविलेली आहे. त्यामुळे पोलिसांकडून बोटींनी समुदात जाऊन अशा स्वरुपाची सिक्युरिटी करण्याची जबाबदारी जी आपल्याकडे काही काळ होती ती आता कोस्टलगार्डकडे गेली आहे. तथापि महाराष्ट्र सरकारने दि. 26-11-2008 रोजी जी घटना झाल्यानंतर काही जे मूलभूत निर्णय घेतले त्यामध्ये या मुंबई आणि संपूर्णच महाराष्ट्राच्या किनारपट्टीवर आपल्या गस्त घालणाऱ्या नौका असायला पाहिजे यासाठी तात्पुरत्या स्वरुपात ट्रॉलर्स किंवा मिळाले त्या, त्या त्याठिकाणच्या बोटींनी गस्त घालण्यास सुरुवात केली आहे.

यानंतर श्री. बरवड....

अशुधीत प्रत / शीघ्रलेखापी नाही

ता.प्र.क्र. 52676 ..... श्री. जयंत पाटील...

परंतु या बोटींचा स्पीड चांगला नाही. या बोटींचे स्पीड मर्यादित आहे. त्यामुळे अत्याधुनिक आणि अतिशय उत्तम दर्जाच्या व त्यांच्यावर हल्ला झाल्यास प्रोटेक्शन व्हावे अशा प्रोटेक्शनची व्यवस्था ज्या बोटींना असणार आहे अशा बोटी तयार करुन घेण्याचा निर्णय घेतलेला आहे. अशा स्वरुपाच्या 29 बोटी घेण्यासाठी 53 कोटी 55 लाख रुपये खर्च करणार आहोत. या 29 बोटी 12 मीटर लांब आणि 9.5. मीटर रुंदीच्या, खालून पूर्णपणे प्रोटेक्शन तसेच बाहेरुन प्रोटेक्शन असलेल्या आणि आत अत्याधुनिक सर्व यंत्रणा बसविलेल्या अशा बोटी घेण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्या बोटी लवकरच आपल्या दलात सामील होतील.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आता माननीय मंत्रिमहोदयांनी जे उत्तर दिले ते महत्वाचे आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, कोस्टल गार्डकडे ही सर्व जबाबदारी दिलेली आहे. मग आपण या नौका घेऊन काय करणार ? यामुळे त्यांच्या कामामध्ये हस्तक्षेप होणार नाही काय ?

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, या समुद्रामध्ये जरी कोस्टल गार्डकडे जबाबदारी असली तरी मुंबईच्या परिसरामध्ये आणि खासकरुन रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, ठाणे जिल्ह्यातील सर्व किनारपट्टीवर आणि विशेषत: खाडीमधील व्यवस्थेबाबत देखील लक्ष ठेवणे आवश्यक आहे. कोस्टल गार्डकडे जरी जबाबदारी असली तरी किनारपट्टीवर अधिकचे कोणतेही ट्रॅफिकिंग होत असताना त्यावर लक्ष ठेवणे हे महाराष्ट्राच्या आणि मुंबईच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक आहे. त्यामुळे आपण जी यंत्रणा घेण्याचे ठरविले आहे ती घेण्याचा निर्णय कायम आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बुलढाणा जिल्हयातील शेतकऱ्यांना द्यावयाच्या कर्जमाफीबाबत

(३) * ५०३०२ श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. नितीन गडकरी , श्री. जगदीश गुप्ता : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या कृषी कर्जमाफीतून वगळलेल्या व नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी शासनाने कर्जमाफी योजना जाहिर केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेनुसार २० हजारापर्यंत संपूर्ण कर्जमाफी व २० हजारावरील रकमेची परतफेड केल्यानंतर शेतकऱ्यांना २० हजारापर्यंतच्या कर्जांची माफी मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास या योजनेनुसार किती कोटी रुपयांची रक्कम बुलढाणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडे जमा झालेली आहे व त्यातून जिल्हयातील किती शेतकऱ्यांना दिनांक ३१ मार्च, २००९ अखेरीस कर्जमाफीचा लाभ झालेला आहे,

(४) कर्जमाफी मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी कोणती कागदपत्रे बँकेत सादर करणे आवश्यक आहे,

(५) कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतरही कर्जमाफीची रक्कम मिळाली नाही अशा शेतकऱ्यांची संख्या किती आहे व रक्कम न देण्याची कारणे काय आहेत व ती त्यांना केव्हा देण्यात येणार आहे ?

श्री.हर्षवर्धन पाटील : (१) व (२) होय.

(३) बुलढाणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने कृषि कर्ज माफी योजने अंतर्गत सादर केलेल्या क्लेम्स संदर्भात दि.३१ मार्च २००९ ला.रु.२०.०००/- पर्यंत एकूण ३४८४७ इतक्या सभासदांना रु.२९१९.८३ लाख व रु.२०,०००/- चे वरील एकूण २३६६ सभासंदाना रु.४५६.६४ लाख अशी एकूण ३७२१३ सभासदांना रु.३३७६,४७ लाख इतक्या रक्कमेची कर्जमाफी मिळालेली आहे.

(४) नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, बुलढाणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडे कर्जमाफी मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी कोणती कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे असा प्रश्न यामध्ये विचारलेला आहे. त्या प्रश्नाचे उत्तर आलेले नाही. कागदपत्रे सादर करण्याची गरज आहे की नाही हे मला माहीत नाही. पुढचा प्रश्न असा विचारलेला आहे की, कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतरही कर्जमाफीची रक्कम मिळाली नाही अशा शेतकऱ्यांची संख्या किती आहे व रक्कम न देण्याची कारणे काय आहेत व ती त्यांना केव्हा देण्यात येणार आहे ? या प्रश्नाच्या बाबतीत "प्रश्न उद्भवत नाही" असे उत्तर दिलेले आहे. अशा शेतकऱ्यांनी कोणती कागदपत्रे दिली पाहिजेत आणि ज्यांनी कागदपत्रे दिली पण त्यांच्या प्रकरणाच्या बाबतीत अजूनही निर्णय झालेला नाही अशी किती प्रकरणे जिल्हा सहकारी बँकेत आहेत ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 50302 .....

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मूळ कर्जमाफीची जी योजना आहे त्यामध्ये कोणत्याही शेतकऱ्याला कागदपत्रे सादर करा असे सांगितलेले नाही. कारण आपल्याकडे सोसायटी स्तरावर आणि बँकेच्या स्तरावर त्यांची सगळी माहिती प्राप्त झाली होती. ज्यावेळी डिसेंबर महिन्यामध्ये सभागृहामध्ये कर्जमाफीचा निर्णय झाला त्यावेळी या राज्यातील 41 लाख शेतकऱ्यांची माहिती आपल्याकडे उपलब्ध होती आणि त्यादृष्टीने आम्ही निर्णय केला. त्यामुळे शेतकऱ्यांना कागदपत्रे देण्याची आवश्यकता नाही. मी आकडेवारी देऊन वेळ घेणार नाही पण बुलढाणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडे 20 हजार रुपयांच्या आतील जे पात्र शेतकरी होते त्यांना 31 मार्च पूर्वी चेकने रक्कम बँकेच्या अकाऊंटमध्ये जमा केलेली आहे. त्यानंतर 20 हजार रुपयांपर्यंत वन टाईम सेटलमेंट करण्यासाठी वरचे जे कर्ज असेल ते त्यांनी भरावे आणि 20 हजार रुपयांपर्यंतची रक्कम राज्य सरकार देईल अशा प्रकारे कर्जफेड सवलत आणि कर्जमाफी योजना अशा दोन्ही योजनांचा लाभ दिलेला आहे. बुलढाणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून जी माहिती आली त्याप्रमाणे रक्कम देण्यात आलेली आहे. तथापी काही शेतकरी वंचित राहिले असल्याची माहिती सन्माननीय सदस्यांकडे असेल आणि जर ते नियमामध्ये बसत असतील तर जरुर त्यांना सुध्दा लाभ देण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MAP

मुंबई शहरातील प्रमुख रस्ते, उड्डाणपूल आणि आधुनिक वाहतूक प्रकल्पांवर ध्वनिशोषक यंत्रणा बसविण्याबाबत

(४) * ५१६९९ डॉ. वसंत पवार , श्री. जितेंद्र आव्हाड : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरामध्ये दिवसेंदिवस वाढत जाणा-या वाहनांच्या संख्येमुळे असह्य होत असलेले ध्वनिप्रदुषण आणि नवीन वाहतूक प्रकल्पांमुळे त्यात पडणारी भर लक्षात घेता प्रमुख रस्ते, उड्डाणपुल आणि आधुनिक वाहतूक प्रकल्पांवर ध्वनिशोषक यंत्रणा बसविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच उक्त प्रश्नी कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

श्री.अशोक चव्हाण : (१), (२) व (३) शासनाने दिनांक ३.१२.२००८ रोजीच्या परिपत्रकान्वये इलेव्हेटेड रोड व उड्डाणपुलामुळे होणारा ध्वनी कमी राहण्याच्या दृष्टीने सर्व प्राधिकरणाना मार्गदर्शक तत्वे निश्चित करुन दिली आहेत.

मुंबई नागरी पायाभुत सुविधा प्रकल्पांतर्गत अंमलबजावणी होत असलेल्या जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्त्याच्या आयआयटी पवई, मुंबई येथील सुमारे १ कि.मी. संरक्षक भिंतीजवळ ध्वनी प्रतिबंधक यंत्रणा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून बसविण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे वेस्टर्न एक्सप्रेस हायवे ते छत्रपती शिवाजी इंटरनॅशनल एअरपोर्ट टर्मिनल (सहार रोड) या रस्त्यासाठी ध्वनी प्रदूषणाबाबतचा आराखडा तयार करण्याचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून सल्लागारांना सोपविण्यात येत असून आराखड्यातील केलेल्या शिफारशीनुसार योग्य त्या ठिकाणी ध्वनीशोषक प्रतिबंधक यंत्रणा बसविण्याबाबत कार्यवाही करण्यात येणार आहे.

डॉ. वसंत पवार : सभापती महोदय, प्रश्नाला देण्यात आलेल्या उत्तराने माझे समाधान झाले आहे. पण मुंबईसारखे आंतरराष्ट्रीय शहर तसेच आताच मुंबईच्या सागरी किनाऱ्याची चर्चा झाली

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.51699.... डॉ.वसंत पवार...

त्याप्रमाणे याठिकाणी ध्वनी प्रदूषण कमी करण्याच्यादृष्टीने या सर्व प्राधिकरणांना मार्गदर्शक तत्वे करुन दिली आहेत. या मार्गदर्शक तत्वानुसार सायलण्ट फिचर्समध्ये किती डेसिबलपर्यंत आवाज कमी करण्याचे कळविले आहे, त्याचप्रमाणे वेस्टर्न एक्सप्रेस हायवे ते छत्रपती शिवाजी इंटरनॅशनल एअरपोर्ट टर्मिनल, सहार रोड या रस्त्यासाठी ध्वनी प्रदूषणाचा आराखडा तयार करण्याचे काम एमएमआरडीएने सल्लागारांकडे सोपविले आहे. या सल्लागारांकडून केव्हा शिफारशी येण्याची शक्यता आहे आणि त्याची अंमलबजावणी किती दिवसात होण्याची शक्यता आहे ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये वाढणा-या वाहतुकीमुळे ध्वनी प्रदूषण वाढत आहे त्याला आळा घालावा म्हणून दिनांक 3 डिसेंबर, 2008 रोजी शासनाने एक पत्रिपत्रक काढून या सर्व संस्थांना मग ज्या संस्था उड्डाण पूल बांधत आहेत, मोनोरेलचा मार्ग बांधत आहेत त्यांना या सर्व कामांमुळे जे प्रदूषण होणार आहे त्यासंबंधी मार्गदर्शक तत्वे घालून दिलेली आहेत. केंद्र सरकारने सुध्दा 1986 मध्ये कायदा केलेला आहे. सन्माननीय सदस्य डॉ.पवार यांनी मी सांगू इच्छितो की, दिवसा 55 डेसिबल आणि रात्रीच्या वेळी 45 डेसिबलपेक्षा आवाज असता कामा नये अशा सूचना आहेत. ठरवून दिलेल्या क्षमतेचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यावर ते कमी करण्यासाठी ध्वनिशोषक यंत्रणा बसविण्याचे स्पष्टपणे आदेश शासनाने दिलेले आहेत.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, व्ही.टी.स्टेशन ते जे.जे.पर्यंत एलिव्हेटेड फ्लायओव्हर तयार करण्याची संधी मला मिळाली होती. दार कन्सलटण्ट नावाच्या जगातील एका मोठया कंपनीमार्फत या रस्त्याच्या दोन्ही बाजूला ध्वनिशोषक यंत्रणा बसविली होती. या रस्त्यांवर छोटया छोटया छिद्रांची चौकट बसवून त्याद्वारे आवाज शोषणाचे कार्य केले जाते. परंतु या जागेवर जाहिरातीचे फलक लावण्याची शासनाने परवानगी दिली आहे. या कामासाठी कोट्यवधी रुपये खर्च करुन व्ही.टी.पासून जे.जे.पर्यंतच्या पुलावर आवाज शोषण करणारी दोन्ही बाजूला ही यंत्रणा बसविली होती. मी सार्वजनिक बांधकाम मंत्री असताना एमएसआरडीसीचा अध्यक्ष होतो. एमएसआरडीसीने हा पूल बांधला आहे. परंतु आता उलट काम करण्यात येत आहे. हा पूल करीत असताना जे.जे.च्या

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

परिसरात राहणारे नागरिक मला भेटण्यासाठी आले होते. या रस्त्यामुळे होणा-या ध्वनी प्रदुषणामुळे आम्हाला त्रास होणार आहे असे त्यांचे म्हणणे होते. त्या भागात राहणा-या लोकांना त्रास होऊ नये म्हणून करोडो रुपये खर्च करुन आंतरराष्ट्रीय दर्जाची ध्वनिशोषक यंत्रणा बसविली होती. त्याच्यावर आता पोस्टर्स चिकटविली आहेत. आम्ही केलेल्या कामाच्या अगदी उलट कामे चालू आहेत. ध्वनिशोषण करणाऱ्या जागेवर बसविण्यात आलेली पोस्टर्स त्वरित काढून टाकण्यात येतील काय आणि यापुढे अशाप्रकारची पोस्टर्स तेथे लावण्यासाठी परवानगी न देण्याबाबतची कार्यवाही सरकार करणार काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी सांगितल्याप्रमाणे जर या पुलावर जाहिरातीचे फलक लावण्यासाठी एमएसआरडीसीने परवानगी दिली असेल तर ते ताबडतोब काढण्याचे त्यांना आदेश दिले जातील. मुंबई महानगरपालिकेने पोस्टर्स लावण्याची परवानगी दिली असेल तर त्यांना हे पोस्टर्स काढून टाकण्याचे आदेश देऊन ध्वनीशोषक यंत्रणा व्यवस्थित केली जाईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, प्रश्न विचारण्यापूर्वी मला असे विचारावयाचे आहे की, राज्याची राजभाषा मराठी आहे हे अधिका-यांना माहीत नाही काय ? या लेखी उत्तरामध्ये 'वेस्टर्न एक्सप्रेस हायवे ते छत्रपती शिवाजी इंटरनॅशनल एअरपोर्ट टर्मिनल' या शब्दांना मराठी शब्द नाहीत काय, याऐवजी पश्चिम द्रूतगती मार्ग, आंतरराष्ट्रीय विमानतळ हे शब्द वापरता आले नसते काय ? लेखी उत्तरामध्ये अशाप्रकारचा उल्लेख का करण्यात आला याबाबत योग्य तो खुलासा मागविण्यासाठी संबंधितांना पत्र पाठवावे. शासनाच्या 1963 च्या परिपत्रकानुसार माझी ही विनंती आहे.

अशुधारित प्रत / शीघ्रलेखाही नाही

यानंतर श्री.शिगम....

माझा प्रश्न असा आहे की, तत्कालीन बांधकाम मंत्री महोदय श्री. अनिल देशमुख यांचे मंत्रिपद का गेले ते मला माहीत नाही. त्यांनी सांगितले होते की, ज्याला पेडर रोड म्हटले जाते त्या देशमुख मार्गावर जो उड्डाणपूल बांधला जाणार आहे त्याला अशा प्रकारे ध्वनिशोषक पडदे लावले जाणार आहेत काय ? मी चीनमध्ये गेल्यानंतर त्या ठिकाणी कशा पध्दतीची ध्वनिशोषक यंत्रणा बसविलेली आहे त्याचे फोटो काढलेले आहेत. या पूलावर असे ध्वनिशोषक पडदे लावले तर लताबाईंना शेकहॅण्ड करता येणार नाही. सागरी मार्ग पूर्ण झालेला आहे. त्याचे उद्घाटन नजिकच्या काळात होईल. त्या मार्गावरुन जी वाहने येतील ती पुढे कशी जाणार आहेत ? या सागरी महामार्गाच्या संदर्भात काल या सभागृहामध्ये प्रश्न उपस्थित करण्यात आलेला होता त्यावेळी या देशमुख रस्त्यावरील उड्डाण पुलाचा नारळ केव्हा फोडणार असे मी विचारले होते. त्यासंदर्भात मी सात वेळा पत्रे पाठविलेली आहेत. परंतु त्या प्रश्नाचे उत्तर अद्याप मिळाले नाही. हा पूल जोपर्यन्त होत नाही तोपर्यन्त या सागरी मार्गावरुन येणा-या वाहनांची पुढे कोंडी होणार आहे, वाहतूक समस्या निर्माण होणार आहे. तेव्हा या देशमुख मार्गावरील उड्डाण पुलाच्या बाबतीत शासनाचे काय धोरण आहे ? शासनाने काय निर्णय घेतलेला आहे ?

श्री. नितीन गडकरी : माझी एक विनंती आहे की, सभागृहाच्या भिंतीला जी छिद्रे दिसत आहेत ती ध्वनिशोषक आहेत. त्या छिद्रामुळे ध्वनि शोषला जातो.माननीय नगर विकास मंत्र्यांना माझी विनंती आहे की, आपण जी ध्वनिशोषक यंत्रणा बसविणार आहात ती आंतरराष्ट्रीय दर्जाची असावी. विशेषत: सिंगापूरमध्ये या संदर्भात विविध प्रकारे आंतरराष्ट्रीय दर्जाची व्यवस्था झालेली आहे. ज्यावेळी गाडया सुसाट वेगाने जातात त्यावेळी मोठ्या प्रमाणावर त्यांचा आवाज लोकांच्या घरापर्यन्त जातो. अशा प्रकारच्या छिद्रामुळे आवाज कमी होतो. आवाज कमी होणारी ही टेक्नॉलॉजी आहे. परंतु नगरविकास विभागाने याबाबतीत केवळ पत्रक काढून चालणार नाही. आता सीएनजी आल्यामुळे आणि डिझेलचा वापर कमी झाल्यामुळे प्रदुषण कमी झालेले आहे. तेव्हा या ध्वनिशोषक विषयाचा सायंटिफिक अभ्यास करा आणि यासंबंधीचे नियम आंतरराष्ट्रीय मानकाप्रमाणे होईल असे पहा. ध्वनिप्रदुषणासंबंधीचे नियम चांगले आहेत. ध्वनिशोषकासंबंधीचे नियम खूपच कमी आहे. या संदर्भात शासनाने सुमोटो अभ्यास केला तरच यातून मार्ग निघू शकेल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र.51699 .....)

श्री. हसन मुश्रीफ : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी काही इंग्रजी शब्दाऐजी मराठी शब्दांचा वापर करण्यासंबंधी सूचना केली. मी सांगू इच्छितो की, इंग्रजी शब्दाऐवजी मराठी शब्द वापरण्याच्या सूचना अधिका-यांना देण्यात येतील. देशमुख मार्गावरील उड्डाण पुलाचा विषय वेगळा आहे. एमएसआरडीसी तो पूल बांधत आहे. नगरविकास विभागाने बांधकाम विभागाला याबाबतीत कळविले आहे. उड्डाण पूल आणि इमारती यांच्यामध्ये 30 मीटर पेक्षा कमी अंतर असेल तर नॉईज बॅरिअर्स बसविले पाहिजे, असे आदेश नगरविकास खाते काढील आणि त्याप्रमाणे ध्वनिशोषक यंत्रणा बसविण्यात येईल.

...नंतर श्री. गिते....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

रायगड जिल्ह्यातील रोहा आष्टी अर्बन सहकारी बँकेतील गैरव्यवहार

(५) * ५०३९७ श्री. जयंत पाटील , श्री.कपिल पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ४६१५७ ला दिनांक २२ डिसेंबर, २००८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील रोहा आष्टी अर्बन सहकारी बँकेतील गैरव्यवहाराबाबत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८८ अन्वये चौकशी करण्यासंबधी आदेश केव्हा देण्यात आले आहेत,

(२) सदर आदेशानुसार चौकशीचे काम सुरु करुन ते पूर्ण करण्यात आले आहे काय,

(३) असल्यास, शासनास चौकशी अहवाल प्राप्त होवून शासनाने पुढील कार्यवाही केली आहे काय ?

श्री.हर्षवर्धन पाटील : १) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ नुसारदि.१८.८. २००७ अन्वये सहायक निबंधक, पनवेल यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

२) चौकशी अधिकारी यांनी चौकशीचे कामकाज सुरु करुन अंतरिम अहवाल दि. २९.३.२००८ रोजी सादर केला आहे. तसेच महाराष्ट्र सहकारी संस्थांचे नियम ७२(४) नुसार कार्यवाही पूर्ण करुन नियम ७२(५) नुसार सुनावणीचे कामकाज चालू आहे.

३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आतापर्यंत या बँकेतील ठेवीदाराना किती ठेवी परत दिल्या ? चौकशी अधिका-यांनी दिनांक २९.३.२००८ रोजी चौकशी अहवाल सादर केला आहे. त्या अहवालाचे स्वरुप काय आहे ? या बँकेच्या कामकाजाची सद्य:स्थिती काय आहे ? या ठेवीदारांमध्ये १ लाखा पेक्षा जास्त ठेवी असलेल्या ठेवीदारांना किती पैसे परत देण्यात आलेले आहेत ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, आतापर्यंत ६८२.२५ लक्ष रुपयांच्या ठेवीची रक्कम परत देण्यात आली आहे. या ठेवी प्रशासकाच्या काळात परत दिलेल्या आहेत. प्रशासकाच्या काळात

२.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

११२०.७० लक्ष रुपयांची वसुली करण्यात आली आहे. या संस्थेची एकूण सभासद संख्या १२१०० एवढी आहे. या प्रकरणी चौकशी पूर्ण झालेली असून, चौकशी अधिका-यांनी चौकशी अहवाल सादर केलेला आहे. त्या अहवालाप्रमाणे चौकशी अधिका-यांनी संबंधितांविरुध्द दोषारोपत्रे निश्चित केले आहेत. याप्रकरणी ३६ संचालक आणि १२ अधिकारी व कर्मचारी यांच्या मालमत्तेची माहिती प्रशासनाकडून मागविण्यात आली आहे. सदर बँकेचे २५ संचालक आणि ७ अधिकारी असे एकूण ३२ व्यक्तींची मालमत्ता विक्री,हस्तांतरण, गहाण ठेवण्यासंदर्भात महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ९५ अन्वये दिनांक २९.९.०८ ला तहसीलदार, रोहा आणि प्रांत अधिकारी, माणगाव व जिल्हाधिकारी, रायगड यांना या संबंधिताना आदेश कळविण्यात आलेले आहे. या बँकेवर सध्या प्रशासक आहेत.

श्री. जयंत प्र.पाटील : या बँकेतील कर्जदारांमध्ये स्थानिक मोठे पुढारी आहेत. त्यांच्याकडे कर्जाची रक्कम मोठया प्रमाणात आहे. त्या ठिकाणचे स्थानिक पेन्शनर आहेत, तेथील स्थानिक कर्मचारी आहेत. तसेच स्थानिक शेतकरी आहेत त्यांनी या बँकेत ठेवी ठेवल्या आहेत. या ठेवीदारांच्या ठेवी पूर्णपणे परत देण्याबाबत शासन काही प्रयत्न करणार आहे काय ? या बँकेचे निजीकरण दुस-या बँकेत करण्याची बाब शासनाच्या विचाराधी आहे काय ?

श्री. हर्षवर्धन पाटील : या बँकेत ठेवीदारांची १ लाख रुपयापर्यंतच्या ठेवी आहेत त्यांना त्यांच्या ठेवी परत देण्याबाबतची कार्यवाही झालेली आहे. तथापि सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी जी माहिती दिली ती खरी आहे. या बँकेत बेकायदेशीपणे,कुठल्याही नियमाचे पालन न करता मोठया शेतक-यांना मोठया प्रमाणात कर्ज उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे ही वस्तुस्थिती आहे. सभापती महोदय, या प्रकरणी ४६ कोटी ९६ लाख रुपयांची रक्कम संबंधित संचालक आणि अधिकारी व कर्मचारी यांच्यावर या संपूर्ण गोष्टीची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. त्या दोषी व्यक्तींची प्रॉपर्टी सील करण्यासंबंधीची पुढची कार्यवाही चालू आहे. विलिनीकरणाच्या बाबतीमध्ये रिझर्व्ह बँकेचे जे निकष आहेत, त्या निकषाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

३...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लोहगाव विमानतळ येथे बांधण्यात आलेल्या पोलीस चौकीत अपुऱ्या असणाऱ्या सर्व सुविधा त्वरीत पुरविण्याबाबत

(६) * ५१११० श्री.मोहन जोशी , श्री. संजय दत्त , श्री.सय्यद जमा , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील दहशतवादी कारवाया रोखण्यासाठी लोहगाव विमानतळ येथे बांधण्यात आलेल्या पोलिस चौकीत कोणत्याही सुविधा पुरविण्यात आल्या नसल्याचे माहे डिसेंबर, २००८ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पोलिस चौकीसाठी अपुऱ्या असणाऱ्या सर्व सुविधा त्वरीत पुरविण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.नसीम खान, श्री.जयंत पाटील यांच्याकरिता : (१) नाही.

(२) लोहगाव विमानतळ येथील भारतीय विमान पतन प्राधिकरणाच्या जागेत दि.१९.१२.२००७ पासून विमानतळ पोलिस चौकी कार्यरत आहे. सदर चौकीची इमारत बांधण्यात आली असून तेथे वीज, पाणी व इतर सुविधा विमान पतन प्राधिकरणाने मोफत उपलब्ध करुन दिलेले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. मोहन जोशी : या प्रश्नाच्या बाबतीत शासनाने लेखी स्वरुपात उत्तर दिलेले आहे. लोहगाव विमानतळ येथील इमारतींमधील सोयी सुविधांच्या बाबतीत उत्तर दिले आहे. पुणे येथील विमानतळ हे आंतरराष्ट्रीय विमानतळ आहे. पुणे विमानतळाच्या परिसरामध्ये वा पुणे शहरामध्ये अतिरेक्यांच्या कारवाया वाढलेल्या आहेत. पुणे विमानतळाच्या परिसरामध्ये विमानतळाला लागून असलेला बर्मा सेल डेपोच्या चौकामध्ये पोलीस चौकी उभी केली होती. त्या पोलीस चौकीमध्ये कोणत्याही प्रकारच्या सोयी सुविधा शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत. पुणे विमानतळास आणि पुणे शहरास अतिरेक्यांपासून असलेला धोका लक्षात घेता या चौकीसंबंधीची माहिती घेऊन त्या ठिकाणी पूर्णपणे सोयी सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातील काय ?

४...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

१०:३५

ता.प्र.क्र. ५१११०....

श्री. नईम खान : सध्या लोहगाव विमानतळ पोलीस चौकीमध्ये सर्व सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. या चौकीत काही सुविधा उपलब्ध करुन दिल्या नसतील तर त्या उपलब्ध करुन देण्यात येईल.

श्री. मोहन जोशी : विमानतळ परिसरातील पोलीस चौकीमध्ये सुविधा उपलब्ध करुन दिल्या जाव्यात अशी माझी मागणी आहे.

श्री. नईम खान : विमानतळ परिसरातील पोलीस चौकीत सोयी सुविधा उपलब्ध नसतील तर त्यासंबंधीची माहिती घेऊन त्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातील.

5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील नवीन नाटय निर्मिती संस्थांना व संगीत नाटकांना अनुदान देण्याबाबत

(७) * ५०२६९ श्री. संजय केळकर , श्री. रामनाथ मोते , श्री. विनोद तावडे , श्री. मधुकर चव्हाण :

सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गेल्या काही वर्षात आर्थिक दृष्टया अडचणीत आलेल्या नाटय व्यवसायासाठी नवीन नाटय निर्मिती संस्थांना व संगीत नाटकांना अनुदान देण्याबाबत शासनाने दिनांक २८ जानेवारी, २००६ रोजी वा त्या सुमारास एक पॅकेज जाहिर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,शासनाने जाहिर केलेल्या योजनेचे स्वरुप काय आहे,

(३) त्यानुसार सन २००७-०८ व २००८-०९ हया कालावधीत किती नाटय निर्मिती संस्थांनी नाटकासाठी अनुदान मिळावे म्हणून शासनाकडे प्रस्ताव दाखल केलेले आहेत,

(४) त्यापैकी किती प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली व उर्वरित प्रस्तावांना किती कालावधीपर्यंत मंजुरी देण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुरेश वरपुडकर,श्री. हर्षवर्धन पाटील यांच्याकरिता : (१) होय, दिनांक २ मार्च,२००६ च्या शासन निर्णयान्वये नविन नाटयनिर्मिती संस्थाना व संगीत नाटकांना अनुदान पॅकेज जाहिर केले आहे.

(२) राज्यातील व्यावसायिक नाटयसंस्था संस्थेस वर्गवारी मिळण्यासाठी अर्ज करु शकतात. अर्जासोबत संस्थेने केलेल्या प्रयोगाचे तपशील व पुरावे देणे आवश्यक असतात. यात अ.,ब,क,ड श्रेणी खालील दर्शविल्याप्रमाणे निश्चित केली आहे.

अस्तित्वाची किमान वर्ष	किमान नाटयनिर्मिती संस्था	किमान प्रयोग संख्या	वर्गीकरण
१५ पेक्षा जास्त	२०	२०००	अ
१० ते १५	१०	१०००	ब
५ ते १०	५	५००	क
३ ते ५	३	२००	ड

६....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ SBT/ MAP/ प्रथम श्री. शिगम

१०:३५

ता.प्र.५०२६९..... श्री. सुरेश वरपुडकर...

अनुदान हे मराठी,हिंदी,संस्कृत आणि संगीत नाटकांसाठी देण्यात येते.

एका प्रयोगासाठी रु.१५,०००/-

संगीत नाटकासाठी प्रति प्रयोग रु.२०,०००/- इतके अनुदान दिले जाते. संस्थेस अनुदान प्राप्त झालेल्या श्रेणीनुसार व सादर प्रयोगानुसार अनुदान दिले जाते.

(३) सन २००७-०८ या आर्थिक वर्षात १६ नाटयसंस्थांचे अर्ज प्राप्त झाले होते व सन २००८-०९ या आर्थिक वर्षात ३३ संस्थांचे अर्ज प्राप्त झाले होते.

(४) सन २००७-०८ या आर्थिक वर्षात प्राप्त झालेल्या १६ नाटयसंस्थांच्या अर्जाना मंजूरी देऊन अनुदान प्रदान करण्यात आले. सन २००८-०९ या आर्थिक वर्षात प्राप्त झालेल्या ३३ अर्जातून ३१ अर्जाना मंजूरी देऊन अनुदान देण्यात आले व उर्वरित दोन संस्थांच्या अर्जात कागदपत्राच्या त्रुटी आहेत. संबंधित संस्थेने त्या पूर्ण केल्यास त्यांना अनुदान देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, या ठिकाणी उत्तर देण्यात आले आहे. खरे म्हणजे मराठी रंगभूमीची एक वैभवशाली परंपरा आहे. मराठी रंगभूमी असेल, संगीत नाटके असतील, ही मोठया अडचणीत सापडलेली आहेत. निर्माते अडचणीत सापडले आहेत. नाटके अडचणीत आहेत. एक काळ असा होता की, रंगभूमीची एक वेगळी ताकद होती. या नाटकांच्या माध्यमातून एक चांगला मॅसेज राज्यात आणि राज्याच्या बाहेर आणि देशाच्या बाहेर देऊ शकत होतो..

यानंतर श्री. भोगले...

अशुद्धीत प्रत/ शुद्धीसाठी नाही

परंतु शासनाने दिनांक 2 मार्च, 2006 च्या निर्णयान्वये जे पॅकेज निर्माण केले ते असे विचित्र आहे की, या पॅकेजच्या माध्यमातून महाराष्ट्रामध्ये एखादी नाट्यसंस्था चांगले नाटक घेऊन आली तर त्यांना हे अनुदान मिळू शकत नाही. 15 पेक्षा जास्त वर्षे झालेली संस्था आणि प्रयोगांची संख्या 2000 असे म्हटले आहे. 3 ते 5 वर्षे असलेल्या संस्थांना प्रयोगांची संख्या 200 असे म्हटले आहे. एखाद्या संस्थेला 100 प्रयोग करावयाचे झाले तर ती संस्था कर्जबाजारी होते. सध्या महाराष्ट्राचे सांस्कृतिक धोरण तयार होत आहे. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, या पॅकेजमध्ये शासन बदल करणार आहे का? चित्रपटांचे ग्रेडेशन करण्यासाठी निवड समिती आहे, ती समिती चित्रपट बघते आणि ग्रेडेशन केल्यानंतर त्यानुसार अनुदान दिले जाते. तशा पध्दतीने नाटकांसाठी निवड समिती निर्माण करुन अनुदान दिले जाईल काय? एखादी नाटय संस्था चांगली असली तरी प्रयोग होत नसल्यामुळे ती नाटय संस्था बंद पडते. त्यामुळे शासन नाटकांसाठी समिती नेमणार का? ग्रेडेशन करुन नवीन नाट्य प्रयोगांना, नाटकांना आणि नाट्य संस्थांना ताकद दिली जाईल का?

श्री.सुरेश वरपुडकर : नवीन व्यावसायिक नाट्य संस्थांबाबत जाचक अटी होत्या त्या शासनाने 2 मार्च, 2006 च्या शासन निर्णयान्वये 15 वर्षाचा कमाल कालावधी निश्चित केला. सन्माननीय सदस्यांनी सूचना केली त्याप्रमाणे नवीन नाटक ड वर्गात येत नाहीत, नाटक चांगले असते. या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी घोषणा केली असून या संदर्भात लवकरच समिती निर्माण करुन ग्रेडेशन केले जाईल.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मराठी चित्रपटांना प्रोत्साहन देण्यासाठी पहिला चित्रपट पूर्ण झाली की दुसऱ्या चित्रपटाचा काही भाग झाल्यानंतर अनुदान दिले जाते. तशा पध्दतीने नाटक प्रयोगांना अनुदान दिले जाईल का? 200 प्रयोगांची अट घालू नये अशी माझी विनंती आहे. वेगवेगळया दूरचित्रवाहिन्यांवर कार्यक्रम आल्यामुळे मराठी नाट्य क्षेत्राला काही प्रमाणात उतरती कळा लागली आहे. विशेषत: संगीत नाटकांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रयोगांची अट न घालता शासन धोरण स्वीकारणार आहे काय?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.50269....

श्री.सुरेश वरपुडकर : सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी महत्वाचा प्रश्न मांडला आहे. या संदर्भात समिती नेमणार आहोत. ज्याप्रमाणे निवड समिती चित्रपट पाहून विश्लेषण करुन ग्रेडेशन निश्चित करते तशा पध्दतीने व्यावसायिक नाटकांच्या संदर्भात समिती नेमणार आहोत. प्रयोग जरी नाही झाले तरी अनुदान देण्याचा विचार करता येईल.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, महाराष्ट्रातील सांस्कृतिक जडणघडणीच्या दृष्टीने या व्यवसायाकडे शासन लक्ष देत आहे ही खरोखर समाधानाची गोष्ट आहे. ज्या पध्दतीने हा व्यवसाय आज अडचणीत आला आहे त्यासाठी 2006 मध्ये पॅकेज तयार करण्यात आले. एका बाजूने मी नाट्य परिषदेचा पदाधिकारी असल्यामुळे आणि सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर हे नाटयप्रयोग करणारे आमदार कलावंत असल्यामुळे या प्रश्नाची वेगळी बाजू आपल्यासमोर येत आहे. पॅकेज जाहीर झालेले असले तरी सध्याची रंगभूमीची स्थिती पाहिल्यानंतर हे पॅकेज अपूर्ण आहे असेच वाटते. मंत्रीमहोदयांनी समिती नेमण्याची सूचना केली आहे. परंतु सर्व प्रकारचे नाट्यप्रयोग, संगीत नाट्यप्रयोग, व्यावसायिक व हौशी नाट्य कलावंतांचे प्रयोग या सर्वांचा विचार समितीने करावा. अशा प्रकारच्या समितीची रचना करताना शासन त्यामध्ये सुधारणा करेल काय?

श्री.सुरेश वरपुडकर : सभापती महोदय, व्यावसायिक नाट्याच्या संदर्भात ज्या काही ग्रेडनिहाय संस्था ठरविल्या होत्या त्यामध्ये 'अ' ग्रेड प्रत्येक प्रयोगाला 15 हजार रुपये प्रमाणे जास्तीत जास्त 100 प्रयोगासाठी अनुदान देतो. 'ब' ग्रेडमध्ये जास्तीत जास्त 75 प्रयोगांना 15 हजार रुपये प्रमाणे अनुदान देतो.

जे.1....

अशुधारित प्रत / शुद्धीपत्रासाठी नाही

ता. प्र. क्र. 50269..... श्री. सुरेश वरपुडकर.....

"ड" वर्ग नाटकांसाठी प्रत्येक प्रयोगाला व्यावसायिक नाटकासाठी 15000 रुपये 50 प्रयोगांसाठी आणि संगीत नाटकासाठी 25000 रुपये अशा प्रकारे ग्रेडवाईज मॅक्झीमम अनुदानाची मर्यादा आपण ठरवून दिलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी जी सूचना केली ती म्हणजे हौसी नाट्य संस्था आणि व्यावसायिक नाट्य संस्था या सर्वांच्या दृष्टीने पूर्ण पॅकेज देण्याबाबत वेगवेगळा विचार सुरु आहे. तसेच जी समिती आपण नेमणार आहोत त्या अनुषंगाने आणखी काही सूचना आल्यास त्यात बदल करता येऊ शकतो.

प्रा.बी.टी.देशमुख : शासनाने हा अतिशय चांगला उपक्रम सुरु केला असून या अनुषंगाने माझे असे म्हणणे आहे की, संगीत नाटके हे महाराष्ट्राचे फार मोठे वैभव आहे आणि या संगीत नाटकांच्या बाबतीत आपल्या असे लक्षात येईल की, गेल्या 100-150 वर्षातील 5-10-15 नाटके क्लासिकल स्वरुपाची, क्लासिकल या अर्थाने की जोपर्यंत मनुष्यस्वभाव आहे तोपर्यंत टिकणारी नाटके, मानवी स्वभावावर आधारित असलेली नाटके अमर राहतात. मानापमान, धैर्यभर भामिनी अशी अनेक अमर नाटके आहेत. जोवर व्यसने असतील तोवर "एकच प्याला" हे नाटक अमरच राहणार. श्रृंगार सोडत नाही तोवर "सौभद्र" हे नाटक राहणारच, बाल विवाहामध्ये रस घेणारे आहेत तोपर्यंत शारदेचा विसर आपल्याला पडू शकत नाही. शारदेचा विसर तर विद्याधर गोखलेंचा विसर. बालगंधर्वच्या केवळ 5-10 कॅसेट्स ऐकायला मिळतात, बाकी मिळत नाही. म्हणून माझे म्हणणे आहे की, आपण जी तज्ज्ञांची समिती नेमणार आहात त्या समितीने अशा प्रकारची सर्वश्रेष्ठ 10 नाटके निवडून त्याच्या ऑडियो आणि व्हिडियो चित्रणाच्या माध्यमातून चांगल्या प्रकारची योजना करावी, जेणेकरुन आपली नाटके अमर होतील आणि आपण केलेले काम देखील अमर होईल. म्हणून अशा चांगल्या 10-15 नाटकांची यादी तयार करावी व त्यानंतरर आणखी टप्प्याटप्प्याने अशी यादी आपल्याला वाढविता येईल. अशा नाटकांना विशेष अनुदान दिले तर एक चांगल्या प्रकारचा तो ठेवा होईल अशा प्रकारचा प्रस्ताव आपण तयार करावा व येत्या दोन-तीन महिन्यात यासंबंधीचा अंतिम निर्णय घ्यावा.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 50269.....

श्री. सुरेश वरपुडकर : महोदय, व्यावसायिक नाटकांसाठी 15 हजार रुपये प्रत्येक प्रयोगासाठी आपण देतो आणि संगीत नाटकाच्या प्रत्येक प्रयोगासाठी 20 हजार रुपये अनुदान देतो. तसेच सन्माननीय सदस्यांनी समितीच्या अनुषंगाने जी शिफारस केलेली आहे त्या सूचनांचा देखील समितीच्या माध्यमातून विचार करण्यात येईल.

....3

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ MAP/ SBT/

शिवजयंती निमित्त काढण्यात आलेल्या मिरवणूकीवर

औरंगाबाद आणि नांदेड शहरात दगडफेक झाल्याबाबत

(8) * 52020 श्री.सय्यद पाशा पटेल, श्री. नितीन गडकरी : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) शिवजयंती निमित्त काढण्यात आलेल्या मिरवणूकीवर औरंगाबाद आणि नांदेड शहरात दिनांक 13 मार्च, 2009 रोजी वा त्या सुमारास दगडफेक करुन त्यानंतर जमावाने जीप, ऑटो आणि दुचाकी अशी आठ वाहने जाळली व त्यामुळे जमावाला पांगविण्यासाठी पोलीसांनी लाठीमार केला आणि या प्रकरणी पोलीसांनी 35 जणांना अटक केली, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर प्रकरणी अटक केलेल्या व्यक्तींविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. नितीन राऊत, श्री.जयंत पाटील यांच्याकरिता : (1) नांदेड शहरात दिनांक 13 मार्च, 2009 रोजी शिवजयंती निमित्त काढण्यात आलेल्या मिरवणुकीवर दगडफेक करण्यात आली तसेच एक ऑटो व 4 मोटार सायकली जाळण्यात आल्या. या प्रकरणी 38 जणांना अटक करण्यात आली आहे. परंतु औरंगाबाद शहरात दगडफेक अथवा जाळपोळीची घटना घडलेली नाही.

(2) व (3) या घटनेसंबंधात नांदेड शहरात पो.स्टे.शिवाजीनगर गु.र.नं.45/09 कलम 147,148,149,435,353,332,338,336,295,427,291 भा.द.वि. व 3 सा.मा.वि. कायदा व 7 क्रि.लॉ.अमेंडमेंट ॲक्ट प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

श्री. नितीन गडकरी : या प्रकरणात ज्यांनी दगडफेक केलेली होती त्यामागे काही संघटना अथवा नेते होते काय ? तसेच या घटनेची चौकशी झाली काय ? सदर घटनेचा गुन्हा कोणी दाखल केला व कोणावर कारवाई करण्यात आली ?

श्री. नितीन राऊत : महोदय, दगडफेक करणारे जे लोक होते त्यामध्ये कुठलीही संघटना नव्हती तर उत्फुर्तपणे यामध्ये लोक समोर आले होते. शिवजयंतीच्या निमित्ताने 13 मार्चला ही मिरवणूक निघाली हाती. त्यामध्ये महाराणा प्रताप शिवजयंती मंडळ, खेडकर शिवजयंती मंडळ, जय भवानी शिवजयंती मंडळ अशा वेगवेगळ्या मंडळांची संयुक्त मिरवणूक निघाली. ज्यावेळी रात्री 8.45 वाजेच्या सुमारास शिवाजीनगर, नई आबादी मस्जिदजवळून मिरवणूक जात होती. त्यावेळेस

.....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 52020..... श्री. नितीन राऊत ....

"मंदिर वहीं बनायेंगे" अशा घोषणा दिल्या त्यावेळी मस्जिदजवळच्या लोकांनी समोर येऊन गोंधळ घातला त्यात 33 मुस्लीम आणि 5 हिंदू अशा एकूण 38 लोकांना अटक करण्यात आली आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन राऊत ...

त्यांच्यावर गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. यासंदर्भात गु.र.न. 4509 कलम 147, 148, 149, 353, 332, 338, 336, 295, 427, 291 भा.दं.वि. व 3 सा.मा.वि. कायदा व 7 क्रि.लॉ.अमेंडमेंट ॲक्ट प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, "मंदिर वहीं बनायेंगे" या कॅसेटमधील गाण्याच्या संदर्भात यासभागृहात चर्चा झाली व त्यावेळी तत्कालीन गृहमंत्र्यांनी सांगितले होते की, या कॅसेटवर आमची बंदी राहणार नाही. पुसद येथे मुस्लीम समाजाच्या मिरवणुकीमध्ये अधिकृत रित्या "बाबर तेरी मस्जिद वही बनायेंगे, नमाज वही अदा करेंगे" अशा प्रकारचे गाणे दिवसभर न थांबविता हे गाणे वाजविण्यात आले. या गाण्याला पोलिसांनी तसेच कोणीही आक्षेप घेतला नाही, कोणी दंगलही केली नाही किंवा कोणीही दगडफेक केली नाही. परंतु "मंदिर वहीं बनायेंगे" हे गाणे लावल्यावर ज्याला राग येतो तसेच हे गाणे लावल्याबरोबर 5-6 ठिकाणी दंगली झाल्या. माझा प्रश्न असा आहे की, "मंदिर वहीं बनायेंगे" या गाण्यावर बंदी नाही असे आपण त्यांना सांगणार आहात काय? या देशामध्ये रामाच्या नावाचे गाणे लावल्यावर ज्यांची माथी फिरतात त्यांच्यावर शासनाकडून कोणती कारवाई करण्यात येणार आहे? मी गेल्या 10 वर्षापासून पहात आहे की, शिवजयंतीच्या मिरवणुकीच्या वेळेसच मशिदी मधून दगडफेक होते परंतु मुस्लीम समाजाच्या कोणत्याही मिरवणुकीवर दगडफेक होत नाही अशी स्थिती आहे. त्यामुळे शिवजयंतीच्या मिरवणुकीवर जी दगडफेक होते, "मंदिर वहीं बनायेंगे" हे गाणे लागल्यावर ज्यांची माथी फिरतात त्यांच्यी प्रवृत्ती आपण ठेचून काढणार आहात की, नाही असा माझा प्रश्न आहे. नांदेडमध्ये शिवजयंतींच्या मिरवणुकीवर मशिदीमधून दगडफेक झाली होती व त्यामुळेच सर्व तोडफोड झाली होती. "मंदिर वहीं बनायेंगे" हे गाणे लावल्याबरोबर ज्यांची माथी फिरतात त्यांच्यावर तुम्ही कोणती कारवाई करणार आहात ? नाही तर "बाबर तेरी मस्जिद वहीं बनायेंगे" या गाण्यावर तुम्ही बंदी घालणार आहात काय?

श्री. नितीन राऊत : या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांनी अत्यंत भावनिक प्रश्न उपस्थित केलेला आहे. आपला देश हा धर्मनिरपेक्ष देश आहे. आपल्या देशामध्ये सर्व समाजाच्या लोकांना आपल्या धर्माच्या बाबतीत आपल्या भावना व्यक्त करण्याचे अधिकार आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

परंतु जालना, अमरावती, औरंगाबाद, जळगाव, नांदेड, यवतमाळ या ठिकाणी जातीय दंगली झाल्या व दंगलीमुळे लोकांचे नुकसान झाले त्यामुळे राज्यसरकारने एसआयटीच्या सांगण्यावरुन 8 एप्रिल,2009 रोजी "मंदिर वंही बनायेंगे" व "बाबर तेरी मस्जिद में हम फिर से अजान देंगे" या दोन्ही गाण्यांच्या ऑडीओ व व्हिडिओ सीडीमुळे उपस्थित होत असलेल्या कायदा व सुव्यवस्थसाठी या दोन्ही कॅसेटवर बंदी घालण्यात आलेली आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, "राम" हा राष्ट्रपुरुष नाही आणि "बाबर" हा राष्ट्र पुरुष आहे असे शासनाचे मत आहे काय? सत्तेवर आल्यामुळे आपण जास्त काहीही करु नका. "राम" हा या देशाचा राष्ट्रपुरुष नाही त्यामुळे त्यांचे मंदिर बांधण्याची प्रतिज्ञा करणे हा राष्ट्र द्रोह आहे, गुन्हा आहे असे शासनाचे मत आहे काय? "बाबर" हा राष्ट्रपुरुष असल्यामुळे त्याची मस्जिद बांधण्याची घोषणा करणे हा गुन्हा होत नाही काय? बाबर तुमचा बाप आहे काय?

(विरोधीपक्षाचे सन्माननीय सदस्य उभे राहून एकाचवेळी प्रश्न विचारताता.)

श्री. जयंत पाटील : कोण कोणाचा बाप आहे याची चर्चा या ठिकाणी चालू नसून कायदा आणि सुव्यवस्थेच्या संदर्भात जेव्हा तणाव निर्माण होतो त्या ठिकाणी अशा स्वरुपाची गाणी वाजवू नये यासाठी ही बंदी घालण्यात आलेली आहे.

(विरोधीपक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी :छत्रपती शिवाजी महाराजांची मिरवणूक काढणे हा गुन्हा आहे काय ?

श्री.जयंत पाटील : छत्रपती शिवाजी महाराजांची मिरवणूक काढणे हा अजिबात गुन्हा होत नाही. त्या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीच्या निमित्ताने मिरवणूक काढण्यात आली होती आणि तो गुन्हा नाही.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, " मंदिर वही बनायेंगे " ही कॅसेट लावणे गुन्हा आहे हे एकदा सरकारने जाहीर करावे आणि या कॅसेटवर बंदी आणावी .

श्री.अरविंद सावत : आज शिवराज्यभिषेक दिन आहे..

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, ज्या ठिकाणी जातीय तणाव निर्माण होतो त्याठिकाणी अशा प्रकारच्या गीतांच्या कॅसेटस वाजवू नये आणि जाणीवपूर्वक वाजवू नयेत याकरता त्यावर बंदी घालण्यात आलेली आहे.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकाच वेळी प्रश्न विचारतात)

सभापती : या संदर्भात माननीय गृह मंत्र्यांनी स्पष्टीकरण दिलेले आहे.

श्री.जयंत पाटील :सभापती महोदय, " मंदिर वहीं बनायेंगे" और "बाबर तेरी मस्जिद में हम फिर से अज़ान देंगे."या दोन्ही कॅसेटसवर बंदी घालण्यात आलेली आहे. केवळ एकाच कॅसेटवर बंदी घालण्यात आलेली नाही. जातीय तणाव निर्माण करण्यासाठी या कॅसेटसचा जर वापर होत असेल तर त्यावर बंदी घालण्यात आलेली आहे. खाजगी रीत्या कोणांला याकॅसेटस वाजवावयाच्या असतील तर बंदीचा काही सबंध नाही. रामाच्या नावावर मते मागण्याची सवय असणा-यांना रामाचे नाव आल्यानंतर वेलमध्ये यावेसे वाटते ही दुर्देवाची गोष्ट आहे.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात)

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, आम्ही कोणाला राष्ट्रपुरुष मानतो या बाबतीत एक शब्दही आम्ही वापरलेला नाहीतरी सुध्दा सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण वेलमध्ये येऊन कोणाला तरी राष्ट्रपुरुष मानतो यासंबंधी ते घोषणा देत आहेत तेव्हा वेलच्या बाहेर येऊन योग्य तो प्रश्न विचारण्यास त्यांना सांगण्यात यावे. रीतसर आयुधाचा वापर करुन त्यांनी प्रश्न विचारावा रामाचे नाव आल्यानंतर ते विहिरीत का पडतात हे मला समजत नाही .

(गोंधळ)

सभापती : सन्माननीय गृह मंत्र्यांनी या संबंधीचे उत्तर दिलेले आहे. या दोन्ही कॅसेटसमुळे लोकांच्या भावना भडकविल्या जात असल्यामुळे कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने त्यावर बंदी घालण्यात आलेली आहे असे त्यांनी सागितले असून त्यांचे म्हणणे उचित आहे . त्याचबरोबर छत्रपती शिवाजी महाराजांच्या बाबतीत सभागृहातील सर्वच सन्माननीय सदस्यांना उच्च प्रतीचा आदर आहे ही वस्तुस्थिती आहे.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात)

नंतर श्री.सुंबरे

VTG/ MAP/ SBT/ प्रथम श्री.जुन्नरे 10.55

ता.प्र.क्र...52020.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांकडून घोषणा देण्यात येतात)

नतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्ष सदस्य 'वेल'मध्ये येऊन घोषणा देत असतात .... अडथळा..)

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांना काही बोलावयाचे आहे. सन्माननीय सदस्य जे येथे घोषणा देत आहेत त्यांच्या विरोधात त्यांना आपल्या काही भावना येथे मांडावयाच्या आहेत असे दिसते. तरी आपण त्यांना संधी द्यावी ही विनंती.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

***

(विरोधी पक्ष सदस्य 'वेल'मध्ये येऊन घोषणा देत असतात .... अडथळा..)

.... एम 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री. नितीन राऊत (कामगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील अहवाल सभागृहासमोर ठेवतो ..

(1) कापूस बाजार कामगार मंडळ, (बृहन्मुंबई, ठाणे व रायगड जिल्ह्यांकरिता) यांचा सन 2004-05, 2005-06 व 2006-07 चा अनुक्रमे तेहतिसावा, चौतीसावा व पस्तीसावा वार्षिक अहवाल.,

(2) दि रेल्वे गुडस् क्लिअरिंग ॲण्ड फॉरवर्डिंग एस्टॅब्लिशमेंटस् लेबर बोर्ड,मुंबई यांचा सन 2006-07 चा तिसावा वार्षिक अहवाल.,

(3) दि खोका मेकींग ॲण्ड टिंबर मार्केट लेबर बोर्ड, मुंबई यांचा सन 2004-05 व 2005-06 चा अनुक्रमे बत्तीसावा व तेहतिसावा वार्षिक अहवाल.,

(4) कोल्हापूर जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, कोल्हापूर यांचा सन 2003-04 चा लेखा परीक्षण अहवाल.,

(5) धुळे माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, धुळे यांचा सन 2001-02 चा तेरावा वार्षिक अहवाल.

सभापती : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

**

(विरोधी पक्ष सदस्य 'वेल'मध्ये येऊन घोषणा देत असतात .... अडथळा..)

धर्मादाय रूग्णालयांसंदर्भातील तदर्थ समितीचा अहवाल सभागृहास सादर करणे.

श्री. अरूण गुजराथी (समिती सदस्य) : सभापती महोदय, मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम 1950 च्या अंतर्गत येणाऱ्या रूग्णालयांना (ज्यात शुश्रुषालय, प्रसुतीगृह, दवाखाने किंवा वैद्यकीय सहाय्यासाठी असणारे कुठलेही केंद्र यांचा समावेश होतो) शासनातर्फे देण्यात आलेली सवलत, मदत, सूट, माफी इत्यादी आणि या रूग्णालयांमार्फत निर्धन व समाजातील दुर्बल घटकातील रूग्णांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या खाटा, करण्यात येणारा औषधोपचार, वैद्यकीय चाचण्या व तपासण्या, शस्त्रक्रिया इत्यादींसाठी करण्यात येणारा खर्च या संदर्भात सखोल तपासणी करून शासनास शिफारशी करण्यासाठी गठित करण्यात आलेल्या तदर्थ समितीचा अहवाल मी आपल्या अनुमतीने सभागृहाला सादर करीत आहे.

.... एम 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्ष सदस्य 'वेल'मध्ये येऊन घोषणा देत असतात .... अडथळा..)

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराज व प्रभू रामचंद्र यांच्या बाबतीतील शासनाच्या भूमिकेचा आम्ही धिक्कार करतो आणि त्याबद्दल शासनाचा निषेध करून आम्ही सर्व विरोधी पक्ष सदस्य सभात्याग करतो.

(विरोधी पक्ष सदस्य सभात्याग करतात.)

सभापती : तदर्थ समितीचा अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

श्री. जयंत पाटील (गृह मंत्री) : सभापती महोदय, मघाशी विरोधी पक्ष सदस्य घोषणा देत असताना त्यांच्याकडून 'अमुक अमुक तुमचा बाप आहे..' असा उल्लेख झालेला आहे. तो रेकॉर्डवर आला असल्यास आपण तो रेकॉर्डवरून काढून टाकावा अशी मी आपल्याला विनंती करतो.

सभापती : अशा पद्धतीचे काही आक्षेपार्ह वक्तव्य झाले असेल व ते रेकॉर्डवर आले असल्यास मी ते तपासून घेऊन कामकाजातून काढून टाकीन.

मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आज शुक्रवार आहे, आपण ठरविल्याप्रमाणे आज सन्माननीय सदस्यांना औचित्याचे मुद्दे मांडावयाचे असतील तर त्यांनी ते मांडावेत.

***

(यानंतर श्री. सरफरे .... एन 1 ..

अशुधारित प्रत / अशुद्धीपत्र नाही

पृ.शी.: श्रीमती मीराकुमार यांची लोकसभा अध्यक्ष म्हणून निवड झाल्याबद्दल केंद्र सरकारचे अभिनंदन

मु.शी.: श्रीमती मीराकुमार यांची लोकसभा अध्यक्ष म्हणून निवड झाल्याबद्दल केंद्र सरकारच्या अभिनंदनाचा प्रस्ताव

सभापती : सन्माननीय श्रीमती मीराकुमार यांची लोकसभा अध्यक्ष म्हणून निवड झाल्याबद्दल सन्माननीय सदस्या ॲड. उषाताई दराडे यांनी अभिनंदनाचा प्रस्ताव मांडावा.

ॲड.उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, महामहीम राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील यांनी लोकसभेमध्ये केलेल्या अभिभाषणामध्ये महिलांना आरक्षण देण्यासंबंधीचे लोकसभेमध्ये प्रलंबित असलेले विधेयक येणाऱ्या 100 दिवसात शासन पारित करणार आहे अशाप्रकारचा उल्लेख केला आहे.त्याचबरोबर या देशामध्ये पंचायत राज व्यवस्थेमध्ये महिलांसाठी असलेले 33 टक्के आरक्षण 50 टक्के करण्यासंदर्भात जी दुरुस्ती सुचविण्यात आली आहे त्या संदर्भात या सभागृहाने अभिनंदन करावे आणि त्या वक्तव्याचे स्वागत करुन केंद्र शासनाला आपल्या भावना कळवाव्यात अशाप्रकारचा औचित्याचा मुद्दा मी याठिक्राणी मांडते. माननीय श्रीमती प्रतिभाताई पाटील यांना या देशाचे राष्ट्रपती म्हणून काम करण्याची संधी मिळाली आहे त्याप्रमाणे माननीय श्रीमती मीराकुमार यांना लोकसभेच्या अध्यक्ष म्हणून काम करण्याची संधी मिळाली आहे. या देशाच्या पहिल्या महिला अध्यक्ष म्हणून त्यांना ही संधी मिळत असल्याबद्दल या सभागृहाने त्यांच्या व केंद्र शासनाच्या अभिनंदनाचा ठराव पारित करुन केंद्र सरकारला आपल्या भावना कळवाव्यात अशी मी विनंती करते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ KGS/

श्रीमती मंदा म्हात्रे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, युपीए सरकारने संपूर्ण जगासमोर या देशाचा एक नवीन इतिहास मांडला आहे. त्यामुळे महिलांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या देशाच्या माननीय राष्ट्रपती म्हणून प्रथमच महाराष्ट्राच्या कन्येला मान मिळाला. त्याचप्रमाणे लोकसभेच्या अध्यक्ष म्हणून दलित समाजातील एका महिलेला, माननीय श्रीमती मीराकुमार यांना हा मान मिळाल्यामुळे सर्व महिलांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. त्याचप्रमाणे माननीय राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील यांनी आपल्या भाषणामध्ये येत्या 100 दिवसात महिलांना 33 टक्के आरक्षण दिले जाईल असे जाहीर केले आहे त्याबद्दल माननीय सदस्या डॉ. उषा दराडे यांनी मांडलेल्या अभिनंदनाच्या ठरावाला मी अनुमोदन देते. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ KGS/

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, लोकसभेच्या पहिल्या महिला दलित अध्यक्ष म्हणून माननीय श्रीमती मीराकुमार यांची निवड झाल्याबद्दल मांडण्यात आलेल्या अभिनंदनाच्या प्रस्तावाला अनुमोदन देण्यासाठी मी उभा आहे. देशाचे माजी पंतप्रधान श्री. जगजीवनराम यांच्या त्या सुकन्या आहेत. त्यांचा जन्म दि. 31 मार्च 1945 रोजी बिहारमधील पाटणा येथे झाला. वडिलांचा राजकीय वारसा घेऊन राजकारणात प्रवेश करणाऱ्या श्रीमती मीराकुमार यांनी स्वकर्तृत्वावर आपला ठसा उमटविला. उच्च शिक्षित, सुसंस्कृत आणि मृदूभाषी म्हणून त्या भारतीय राजकारणात प्रसिध्द आहेत. दिल्ली विद्यापीठाच्या इंद्रप्रस्थ कॉलेज आणि मिरांडा हाऊस येथून त्यांनी एम.ए.एल.एल.बी.ची पदवी प्राप्त केली आणि स्पॅनिश भाषेचा ॲडव्हान्स डिप्लोमा केला. तसेच भारतीय प्रशासन सेवेची परिक्षा उत्तीर्ण होऊन त्या आय.ए.एस. व आय.एफ.एस. झालेल्या आहेत. त्यांच्या अभिनंदनाच्या प्रस्तावाला मी अनुमोदन देतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदय, लोकसभेच्या अध्यक्षपदाचा मान माननीय श्रीमती मीराकुमार या दलित महिलेला मिळाला ही अतिशय आनंदाची व अभिमानाची गोष्ट आहे. त्यानिमित्ताने या सभागृहातील महिला सदस्यांनी त्यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडला आहे. खरे म्हणजे शोषित व पिडीत व्यक्तिना सामाजिक न्याय मिळाला पाहिजे, त्यांना समाजामध्ये सन्मानाने जगण्याची संधी मिळाली पाहिजे अशाप्रकारचे तत्व माननीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनेमध्ये मांडले. हे तत्व माननीय श्रीमती मीराकुमार यांच्या रुपाने आता पूर्ण होत आहे. उच्च विद्याविभूषित, सुसंस्कृत अशा व्यक्तिला लोकसभेच्या अध्यक्षपदाचा सर्वोच्च मान मिळाला आहे, हा अतिशय आनंदाचा क्षण आहे. त्यानिमित्ताने सभागृहामध्ये व्यक्त करण्यात आलेल्या भावनांशी मी सहमत आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, या देशाच्या राष्ट्रपती पदावर महाराष्ट्राच्या सुकन्या माननीय श्रीमती प्रतिभा पाटील असतानाच, लोकसभेच्या अध्यक्ष पदावर देखील एका उच्च विद्याविभूषित आणि समाजाच्या शोषित घटकामधून आलेल्या महिला श्रीमती मीरा कुमार यांची यु.पी.ए. आणि एन.डी.ए.यांनी निवड केलेली आहे. नेहमी आपण असे म्हणत असतो की, काही प्रश्न हे राजकारणाच्या पलिकडील असतात.म्हणून केवळ राजकारणातील प्रतिकात्मकता म्हणून या पदाकडे पाहिले जाऊ नये. तर महिला सक्षमीकरण आणि खऱ्या अर्थाने ज्या स्त्रियांपर्यंत विकासाची गंगा पोहोचलेली नाही, अशा हिंदुस्थानातील सर्व महिलांपर्यंत न्याय, विकास आणि सुरक्षितता पोहोचावी यादृष्टीकोनातून सन्माननीय श्रीमती मीरा कुमारजी यांचे मी अभिनंदन करते.आपण या सदनामध्येही अशा पध्दतीचे ठराव करावयास पाहिजेत याला मी अनुमोदन देते.

. . . .ओ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मानवी संस्कृतीच्या इतिहासामध्ये, खरे म्हणजे मानवाची स्त्री आणि पुरुष अशी दोन चाके आहेत. आपण जर इतिहास पाहिला तर असे दिसते की, ही दुर्दैवी गोष्ट असली तरी ती ऐतिहासिक गोष्ट आहे की, लोकशाहीचे माहेरघर म्हणणाऱ्या ब्रिटनमध्ये स्त्रियांना मतदानाचा जो अधिकार मिळाला, त्याला 100 वर्षापेक्षा अधिक काळ झालेला नाही.त्यासाठी सुध्दा तेथे स्त्रियांना मोठा संघर्ष करावा लागला.त्यानंतर मग लोकशाहीच्या माहेरघरामध्ये संसदेची जननी म्हणून ज्या पार्लमेंटचा उल्लेख केला जातो,तेथे स्त्रियांना देखील मतदानाचा अधिकार मिळाला.स्वाभाविकपणे आपल्याला एका गोष्टीबद्दल आनंद होणे हे योग्य आहे की,या देशामध्ये पीठासीन अधिकाऱ्यांमध्ये लोकसभेचे अध्यक्ष पद सर्वोच्च असे आहे. कॉन्स्टीटयुशनल प्रोटोकॉलमध्ये या अध्यक्ष पदाला आमच्या घटनेने चौथे स्थान दिलेले आहे. त्या पदावर सन्माननीय श्रीमती मीरा कुमार यांची निवड झालेली आहे. याबाबत भारतातील इतिहास आहे. काही दिवस भारतामध्ये मातृसत्ताक पध्दती होती, पण ती फार दिवस चालली नाही. पण लोकशाही अशी परिस्थिती आहे की,प्रत्यक्षात काही झाल्याशिवाय काही खरे नाही. त्यामुळे महिलांना 33 टक्के आरक्षण देण्यात यावे या मागणीचा रेटा सुध्दा कायम ठेवावयाचा. 33 टक्के आरक्षणाचा मुद्दा ऐकता-ऐकता 33 महिन्यापेक्षा जास्त काळ निघून गेला आहे. पण शेवटी काळ येतो आणि पुढच्या काळामध्ये का होईना, पण 33 टक्के आरक्षणाचा मुद्दा मान्य होईल असे दिसत आहे. तेव्हा खरोखर या दोन्ही घटना मानवी संस्कृतीच्या एकंदर इतिहासामध्ये भारताचे स्थान अतिशय वरच्या क्रमांकावर नेणाऱ्या या दोन्ही घटना आहेत. मी या घटनेबद्दल मनापासून आनंद व्यक्त करतो.

. . . .ओ-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, स्वामी संपूर्णानंदजींच्या पुतळयाचे ज्या कै.बाबू जगजीवनराम यांच्या हस्ते अनावरण झाले, त्यानंतर काही प्रतिक्रिया उमटली आणि मग गंगाजल टाकून शुध्दीकरण केले होते हा इतिहास या देशाने पाहिला. हा काही लांबचा इतिहास नाही. त्याच कै.बाबू जगजीवनराम यांच्या कन्या उच्चविद्याविभूषित अशा श्रीमती मीरा कुमार या आज लोकसभेतील सर्वोच्य पदावर विराजमान झाल्या आहेत ही या देशासाठी फार मोठी आनंदाची गोष्ट आहे. ही या देशाची कमाई आहे आणि त्याचे स्वागत केले पाहिजे, अभिनंदन केले पाहिजे. मी लोकभारतीतर्फे त्यांचे अभिनंदन करतो.

. . .. ओ-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, आज याठिकाणी जो अभिनंदनाचा प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे, त्यावर बोलत असताना मी एक गोष्ट प्रकर्षाने मांडू इच्छिते की, घटनेमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशाला लोकशाहीच्या संदर्भातील जी चौकट दिली, त्याच्याशी अंतर्भूत होऊन या देशातील यु.पी.ए.च्या प्रमुख श्रीमती सोनियाजी गांधी यांनी एक धैर्य दाखविले आणि महामहीम श्रीमती प्रतिभाताई पाटील या देशाच्या राष्ट्रपती झाल्या. तसेच एक उच्च विद्याविभूषित, कमी बोलणाऱ्या आणि सगळयांना बरोबर घेऊन जाणाऱ्या अशा श्रीमती मीरा कुमार यांची लोकसभेच्या प्रमुखपदी नेमणूक करुन त्याचा सन्मान केलेला आहे. मी असे समजते की, हा भारतातील सर्व महिलांचा सन्मान आहे आणि सभागृहाच्या माध्यमातून एक ठराव करुन हा सन्मान दिल्लीपर्यंत पोचवावा अशी मी आपल्याला विनंती करते.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान (नाम-नियुक्त) : सभापति महोदय, लोकसभा के अध्यक्ष के रुप में श्रीमती मीरा कुमार के आसीन होने से न सिर्फ भारत के सामने, बल्कि पूरे जग के सामने एक आदर्श पेश हुआ है. आज हमारे देश के सर्वोच्च पदों पर महिलाएं विराजमान हैं. भारत की राष्ट्रपति महिला हैं, लोकसभा की अध्यक्ष महिला हैं और यू.पी.ए. की चेयर-परसन भी महिला हैं. इन्होंने न सिर्फ पूरे जग के सामने मिसाल कायम की है, बल्कि हमारे देश की महिलाओं के लिए भी यह एक प्रेरणादायक निर्णय है और यह निर्णय यू.पी.ए. सरकार ने लिया है. इससे हमारे देश में सामाजिक न्याय को बढ़ावा मिलेगा, ऐसा मैं समझती हूँ और मैं श्रीमती मीरा कुमार का अभिनन्दन करती हूँ. धन्यवाद.

. . . .

भाषण पूर्ण, नंतर पी 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MMP/ KGS/

श्री. भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : देशाच्या पंधराव्या लोकसभेच्या सभापतीपदी श्रीमती मीराकुमार यांच्या रुपाने एका अर्थाने दलित व उच्च विद्याविभुषित महिलेची निवड केली गेली आहे. त्याबाबतीतील त्यांच्या अभिनंदनाच्या ठरावावर आपण या ठिकाणी चर्चा करीत असतांना मला या गोष्टीकडे सभागृहाचे लक्ष वेधावयाचे आहे की, देशामध्ये महिलांना 33 टक्के आरक्षण ठेवावयाचे की नाही हा चर्चेचा विषय असताना लोकसभेच्या सभापतीस्थानी म्हणजेच एका उच्च स्थानावर बिनविरोध त्यांचा स्वीकार करण्यात आला आहे आणि सर्व देशाने ते मान्य केले आहे. याचे समर्थन करण्यासाठी मी याठिकाणी बोलत आहे. या देशाची वाटचाल महिलांच्या 50 टक्के आरक्षणाच्या दिशेने होत आहे याचा हा शुभांरभ आहे. त्यामुळे हे क्रांतिकारक असे पाऊल आहे असे मी मानतो आणि या अर्थाने या ठरावाचे समर्थन करतो.

सभापती : संसदेतील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी उत्स्फूर्तपणे भारताच्या लोकसभेच्या नूतन अध्यक्षा म्हणून श्रीमती मीरा कुमार यांची एक मताने निवड केलेली आहे. ती खऱ्या अर्थाने भारतीय घटनेच्या अनुषंगाने देण्यात आलेल्या अधिकारान्वये करण्यात आलेली आहे. भारतीय लोकशाहीच्या अनुषंगाने लोकसभेचे अध्यक्षपद आतापर्यंत कधीही महिलांना उपलब्ध झालेले नव्हते परंतु या पध्दतीने अत्यंत पवित्र अशा प्रकारचा अधिकार, त्यांना प्रदान करुन आपल्या देशातील सर्व नेत्यांनी, दोन्ही पक्षाच्या सर्व खासदारांनी एक मताने ही निवड करुन संपूर्ण जगासमोर एक आदर्श घालून दिलेला आहे. ज्या पध्दतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय घटना निर्माण केली आणि भारतीय घटनेच्या माध्यमातून जी तत्वे आपण डोळयासमोर ठेवतो त्या तत्वानुसार उचित अशा पध्दतीने त्यांचा आदर करण्यात आलेला आहे. या दृष्टीने मीरा कुमार यांना अत्युच्च पदी काम करण्याची संधी दिली याबद्दल महाराष्ट्र विधान परिषदेतील सर्व सन्माननीय सभासद त्यांचे अभिनंदन करीत आहेत, या पध्दतीचा उत्स्फुर्त ठराव मी या ठिकाणी पारित करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MMP/ KGS/

औचित्याचा मुद्दा

सभापती : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण मला माझा औचित्याचा मुद्दा मांडण्यास अनुमती दिली या बद्दल मी आपले आभार मानतो. खरे म्हणजे हा विषय या सभागृहात मांडणे मला उचित वाटले नाही. परंतु विशेषत: या संदर्भातील उलट-सुलट चर्चा सातत्याने होत असल्यामुळे सन्माननीय गृह मंत्र्यांकडे एक मागणी करण्याकरिता मी हा विषय या ठिकाणी मांडीत आहे.

सभापती महोदय, मी 19 तारखेला मुंबईच्या विमानतळावर जात असताना नागपूर येथे माझ्या घरामध्ये, माझी पत्नी जी गाडी वापरते त्या गाडीमध्ये एक सात वर्षाची मुलगी गेली, दरवाजा बंद झाला आणि तिचा मृत्यू झाला. त्यानंतर पहिल्यांदा बातमी अशी आली की, "नितीन गडकरी की गाडी मे मौत." असे म्हणून मिडियाने माझा मृत्यू जाहीर केला. त्यामुळे त्यासंबंधात मला फोन आले. दुसऱ्या दिवशी सकाळी माझे स्वीय सहायक श्री. प्रभाकरराव सोनप म्हणून होते त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या अंत्ययात्रेला जाण्यासाठी मी सकाळी 10.00 वाजता खाली उतरलो होतो. सभापती महोदय, माझा मोठा वाडा आहे. तो जुना मातीचा पडका वाडा आहे. राजाचे वाडे असतात तसा आमचाही वाडा आहे. माझ्या घरासमोर बुधवार बाजार भरतो. समोर चार शौचालये होती. बाहेरचे लोक सार्वजनिक शौचालयासारखा त्याचा वापर करतात. लोकांच्या सोईकरिता माझ्या आईने त्याठिकाणी एक मुत्रीघर बांधले आणि दोन नांदा ठेवल्या. बुधवारच्या बाजारासाठी आलेल्या लोकांना आम्ही पाणी द्यायचो. लोकांना वाडा संस्कृतीची माहिती नाही. आमच्या वाडयामध्ये लोकांची सतत वर्दळ सुरु असायची. मी आमदार झाल्यानंतर त्याठिकाणी एक पोलीस चौकी झाली. त्या पोलीस चौकीमध्ये दिवसभर दोन पोलीस बसलेले असतात. ही गाडी त्यांच्या पासून 7 फुटाच्या अंतरावर होती. माझ्या घरी अनेक सदस्य आलेले आहेत. स्वत: गृह मंत्री देखील माझ्या घरी आलेले आहेत.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ...

माझ्याकडे आपल्यापैकी अनेक सन्माननीय सदस्य आलेले आहेत तसेच माननीय गृहमंत्री सुध्दा आलेले आहेत. माझ्याकडे एका मिनिटाला 50 ते 60 लोक येत-जात असतात. तो वाडा असल्यामुळे लोकही त्या ठिकाणी राहतात. बाजूलाच फॅब्रिकेशनचे दुकान आहे. त्यामुळे कोणी काही केले तर ते ताबडतोब कळू शकते अशी परिस्थती आहे. पण ही सगळी चौकशी झाली पाहिजे. सभापती महोदय, यामध्ये एक गंभीर घटना अशी घडली की, मी ज्यावेळी सकाळी निघालो त्यावेळी श्री. किशोर इंगळे नावाचे गृहस्थ दरवाजासमोर एका व्यक्तीबरोबर आले आणि एक चांगला योगायोग असा होता की, त्यावेळी माझे अंगरक्षक श्री. सचिन चितले, बक्कल नंबर 514 आणि श्री. राजेश तोमर, बक्कल नंबर 2679 हे दोघेही माझ्याबरोबर गाडीत बसले होते. मी लगेच उतरलो. ते आल्यानंतर त्यांनी मला सांगितले की, काल जी घटना घडलेली आहे तो अपघात आहे, परंतु तुम्ही असे करा, हा परिवार खूप गरीब आहे, मी हे मॅटर सेट करतो, तुम्ही त्या परिवारालाही काही मदत करा आणि माझ्याकडेही लक्ष ठेवा, मलाही द्या, मी हे प्रकरण सेटिंग करतो. माझा स्वभाव आक्रमक आहे पण सेटिंग शब्द ऐकल्यानंतरही मी त्यांना शांतपणे म्हणालो की, मी बाहेर 1200 लोकांना हार्टच्या ऑपरेशनमधून मुक्त केले आहे. या मुलीची आई तिचे ऑपरेशन करण्याकरिता माझ्याकडे कागदपत्रे घेऊन आली होती. त्यामुळे मी असे म्हटले की, मदत तर मी सगळ्यांनाच करीत असतो आणि तिला मदत करण्यास काहीच अडचण नाही पण जोपर्यंत या प्रकरणाचा निवाडा लागत नाही तोपर्यंत मी काही मदत करणार नाही. नंतर मी त्याला जरा हासडले की, तू कशाचे सेटिंग लावले आहेस ? कशाचे सेटिंग आणि कशाचे पैसे ? याद राख, मी तुला ठोकून काढीन असे मी त्याला म्हणालो. मी असे शब्द वापरुन त्याला दटावले. त्यानंतर हे गृहस्थ गेले. त्या ठिकाणी माझ्यावर संशय घेत नाहीत. पण ते पोलीस चौकीतील जे पोलीस आहेत त्या पोलिसांसोबत त्यांचा सतत वाद सुरु आहे. यामध्ये माझे नाव आहे आणि त्या निमित्ताने मला पब्लिसिटी मिळते आणि नितीन गडकरीच्या घरी काय झाले याबाबत लोकांमध्ये संशय निर्माण होतो. हे ब्लॅकमेलिंग सुरु आहे. हे पोलिसांच्या बाबतीत सतत सुरु आहे. आंदोलन करा, तिथे येऊन भेट द्या असे सर्व सुरु आहे. परवा त्यांनी कळस केला. ते मुलीच्या आईला आणि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

बहिणीला घेऊन आले आणि माझी जी पांढऱ्या रंगाची एसयूव्ही होंडा कंपनीची गाडी आहे, जी मी वापरतो, ती गाडी त्या दिवशी माझी पत्नी रामटेकला घेऊन गेली होती आणि मी इंडिगो एअरवेजने गेल्यानंतर मी साधारणत: पावणे आठ वाजता माझ्या घरी पोहोचल्यानंतर सव्वाआठ वाजता माझी पत्नी रामटेकवरुन परत आली. माझी गाडी तिने नेल्यामुळे तिची गाडी मला पाठविण्याकरिता जेव्हा डायव्हरने साडेसहा वाजता दरवाजा उघडला तेव्हा लक्षात आले की, ही घटना घडलेली आहे. माझी गाडीच नव्हती. पण हे आल्यावर तिने सांगितले की, गडकरी बसतात ती हीच पांढऱ्या रंगाची गाडी आहे. ती गाडी तिने ओळखली. पूर्ण मिडियामध्ये त्या गाडीचे फोटो यावयास लागले. महानगर वर्तमानपत्रामध्ये हेडिंग आले की, गडकरींच्या गाडीतच मृतदेह सापडला. काही राजकीय विरोधकही असतात. त्याची चौकशी करा, हे करा, ते करा, असे म्हणून लागले. माझी पहिली विनंती अशी आहे की, हे प्रकरण आज हायकोर्टात गेले आहे. मी या निमित्ताने माननीय गृहमंत्र्यांना विनंती करतो. अगदी सीबीआयची देखील चौकशी करावयाची असेल तर करावी. सी.बी.आय. चौकशी कशा पध्दतीने होते हे मला माहीत आहे. पण माझी त्यालाही तयारी आहे. सी.आय.डी. चौकशी करावी, त्यालाही माझी तयारी आहे. पण या प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे आणि कदाचित कोणी दोषी असेल तर त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे, त्याला कठोर शिक्षा झाली पाहिजे. त्याला माझे पूर्णपणे समर्थन आहे. मी मिडियाच्या विरोधात बोलायला कधी घाबरत नाही. परंतु या निमित्ताने एक सेक्शन ऑफ मिडिया, काही पत्रकार आणि किशोर इंगळे हा पीएलआय झालेल्या वकिलाच्या बाजूनेही बोलतो. त्यांच्यावर आधीच क्रिमिनल केस क्रमांक 16/191 कलम 500 अन्वये केसेस सुरु आहेत. होमियोपॅथी कॉलेजमधील डॉ. भडांगे स्कँडलच्या संदर्भात ती केस आहे. खोट्या तक्रारी करुन कॉलेजला ब्लॅकमेल केले यासंदर्भात ती केस आहे. त्याचे पुरावे पोलिसांकडे आहेत. विद्यापीठाने याला 16.9.1983 ला बडतर्फ केले. 18 वर्षे तो सेवेत नव्हता. त्याने विद्यापीठाला त्यांच्या हस्ताक्षरात सभ्यपणाचा बॉण्ड लिहून दिला म्हणून त्याला पुन्हा कामावर घेतले. त्याने राष्ट्रसेवा विद्यालय, लालगंज, नागपूर ही शाळा ताब्यात घेण्याच्या संदर्भात त्यांच्यावर केसेस आहेत. त्याने खोट्या हस्ताक्षरात खोट्या सह्या करुन पत्रव्यवहार केला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KGS/

श्री. नितीन गडकरी .....

त्याबाबतही पोलिसांमध्ये तक्रार आहे. सगळ्यात गंभीर बाब अशी आहे की, त्याने शासनाची राजमुद्रा छापून खोटे लेटरहेड वापरल्याची केस क्रमांक 781/08 अन्वये चार्जशीट 271.8 जेएमएफसी कोर्टामध्ये सुरु आहे. या चार्जशीटमध्ये "Emblems & Names (Prevention of Improper Use) Act, 1950" अंतर्गत केस सुरु आहे. शहर युवक कॉंग्रेसचे महामंत्री श्री. बिजू पांडे यांनी सुध्दा त्यांच्या विरोधात युवक कॉंग्रेसचे फर्जी लेटरहेड छापून गैरव्यवहार केल्याचे वृत्त 26 जानेवारी, 1996 ला स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्द केले आहे. ही व्यक्ती आणि त्याच्याबरोबर काही पत्रकार आहेत तसेच एक प्रतिष्ठित इंग्रजी पेपर आहे. माझ्यावर कोणी आरोप करीत नाही. सगळे आरोप गार्डवर आहेत., पोलिसांवर आहेत. पोलीस घाबरले. मग त्यांनी दबावामुळे अज्ञात व्यक्ती विरुध्द गुन्हा दाखल केला आणि ही चौकशी प्रभावित करण्याचा प्रयत्न करतात. पहिली गोष्ट अशी आहे की, या प्रकरणामध्ये जी चौकशी करावयाची असेल ती कडक चौकशी करावी. ती सी.आय.डी. चौकशी करावी अशी माझी मागणी आहे.

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी....

सभापती महोदय, दुसरी गोष्ट अशी की, एखादा ब्लॅकमेलर हा माझ्यासारख्या व्यक्तीला मिडियाद्वारे ब्लॅक मेल करीत आहे. रोज टी.व्ही.वर इंग्रजी न्यूजमध्ये त्याची मुलाखत प्रसिध्द झालेली आहे. हे प्रकरण संवेदनशील असल्यामुळे माझा स्वभाब शांत बसण्याचा नाही. मी त्याला खरोखरच झापड मारणार होतो. बरे झाले मी त्याला मारले नाही. त्याने सेटिंग करतो असे मला म्हटल्याबरोबर राग आला. अशाप्रकारे ब्लॅक मेल करणारी व्यक्ती जिच्याविरुध्द पोलीस स्टेशनमध्ये अनेक केसेस दाखल झालेल्या आहेत. ती व्यक्ती हायकोर्टात वकिलाच्या बाजूला उभी राहते. त्याने हे सर्व कुभांड रचलेले आहे, प्रेसला मुलाखत देतो, रोज रात्री टी.व्ही.वर मुलाखत देतो. त्याचा पोलिसांबद्दलही आक्षेप आहे. पोलिसांबद्दलही तो टीका करीत आहे. पोलीस यामध्ये दोषी असतील तर पोलिसांवरही कारवाई करावी. पण पोलिसांबद्दलही आक्षेप घेणे, ती गाडी माझीच आहे असे खोटे सांगणे हे योग्य नाही. त्याबाबत माझ्याजवळ पुरावे आहेत. त्यात माझी गाडीच नाही. या मुलीचे प्रेत सापडले आहे ती माझी दुसरी गाडी आहे, ती गाडी माझी पत्नी वापरते त्या गाडीत ते सापडले आहे. माझी गाडी तेथे नव्हतीच, हे पोलिसांना सुध्दा माहीत आहे, त्या गाडीचा पंचनामा झाला आहे. परंतु मिडियावाले माझा वर्तमानपत्रात फोटो छापून लिहितात की "गडकरी बैठते है, उस गाड़ी मे हुआ" प्रथम मिडियामध्ये माझ्या गाडीत माझा मृत्यू जाहीर केला होता. त्याबाबत मला फोन आले. या सगळया प्रकरणात काही कारण नसताना एक प्रयत्न सुरु आहे. हे प्रकरण सत्य तर नाही, पण गडकरींची काही बदनामी करता आली तर ती करावी म्हणून हे सुरु आहे. पहिली गोष्ट म्हणजे या प्रकरणाची शासनाने सी.आय.डी.मार्फत चौकशी करावी. यात जे दोषी असतील त्यांना शासन करावे. माझे सन्माननीय गृहराज्यमंत्र्यांशी बोलणे झाल्यावर मी त्यांनाही म्हटले आहे की, याप्रकरणी कोणामार्फतही चौकशी करावी. याप्रकरणाची चौकशी सन्माननीय गृहराज्यमंत्र्यांनी करावी, सी.बी.आय.ने करावी, निवृत्त न्यायमूर्तीमार्फत चौकशी करावी, कोणाकडूनही चौकशी करावी. कारण माझा या घटनेशी काही संबंध नाही. अर्थात ही वाईट घटना घडली आहे, दुर्भाग्यपूर्ण आहे, दुर्दैवी घटना आहे. हायकोर्टामध्ये याप्रकरणाची उद्या तारीख आहे, यासंबंधीचा जो शेवटचा रिपोर्ट आहे तो उद्यापर्यंत मिळणार आहे. त्यातून सत्य

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी....

बाहेर येईल. परंतु या अनुषंगाने मला आणि माझ्या परिवाराला कारण नसताना अनेक प्रकारे त्रास होत आहे, मनस्ताप होत आहे. याप्रकरणी शासनाने राज्य सी.आय.डी.मार्फत चौकशी करावी, त्यातून सत्य बाहेर काढावे, जे दोषी असतील त्यांच्याविरुध्द कारवाई करावी. पण माझा कोठेही संबंध नसताना रोज मिडियामध्ये येत आहे. यासंबंधी मला एका व्यक्तीने असा सल्ला दिला की, तुम्ही कोर्टात जाऊन याबाबतचे वृत्त छापण्याबाबत मिडियाला बंदी करावी. मी ही बंदी आणली तर गडकरी यांनी ही बंदी का आणली, त्यांचा काय उद्देश आहे असे म्हणून पुन्हा न्यूज दिली जाणार, मी सांगितले होते की, ती गाडी माझी नव्हती, त्या गाडीचा पंचनामा केलेला आहे, त्याबाबत पुन्हा नवीन न्यूज देणार की, "गडकरी ने बताया की, यह गाड़ी नहीं, वह कह रहे है की ये गाडी है" तो माणूस पोलिसांच्या लॉरीमध्ये बसून माझ्या घरी येतो, त्या मुलाला घेऊन येतो. भलतीच गाडी दाखवितो, त्या गाडीचे फोटो काढतो, घरात घुसतो. त्या भागात माझ्या पक्षाचे नगरसेवक आहेत. सर्व कार्यकर्ते मला असे म्हणाले होते की, आम्ही यांना हाकलून देतो. परंतु मी त्यांना असे म्हटले की, तुम्ही काही करु नका, उलट पुन्हा आपल्यावर उलटेल. तुम्ही दोन शब्द बोलाल तर ते उलट छापतील. जनमत माझ्या बाजूचे आहे. सगळ्यांना मी सांगितले की, तुम्ही काही करु नका. तुम्ही काही केले तर मिडियावाले पुन्हा "गडकरी ने उसको लाथ मारी, प्रकरण दबाने केलिए उसको ठोका. म्हणजे तोंड मारुन बुक्याचा मार सुरु आहे. आम्हाला बोलता येत नाही आणि सांगताही येत नाही. माझी शासनाला नम्रतापूर्वक विनंती आहे की, माननीय गृहमंत्र्यांनी स्वत: किंवा सी.आय.डी.मार्फत याप्रकरणाची चौकशी करावी. मी या सभागृहाचा 20 वर्षे सदस्य आहे. माझे चारित्र्य हे माझे राजकारणातील मोठे भांडवल आहे. या संदर्भात बेजबाबदारपणे मिडिया वागत आहे. यामध्ये एक कंपू आहे त्यांचे त्या पत्रकारांशी संबंध आहे की नाही हे मला माहीत नाही. पण याच्या बरोबर 3-4 लोक गाडीत बसून येतात. पोलिसांच्या गाडीमध्ये बसून कॅमेरेवाले येतात, पोलीस त्यांना कसे बसू देतात ते कळत नाही. पोलीस घाबरले आहेत. त्यांना असे वाटते की, बसू दिले नाही तर आणखी काही छापून येईल. माझ्यापेक्षा पोलिसांना ब्लॅक मेलिंग करण्याचे काम जोरात सुरु आहे. याचा सरळ माझ्याशी संबंध नाही. पण अशाप्रकारचे वातावरण तयार करणे,

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी....

ज्या व्यक्तीवर एवढे गुन्हे नोंदलेले आहेत तो माणूस कायदा हातात घेऊन धुमाकूळ घालत आहे. मी सर्व कलमांसहित केसेसची माहिती दिलेली आहे. पोलीस विभागाचे दोन पोलीस माझे अंगरक्षक आहेत. त्यांच्यासमोर याने माझ्याकडे पैसे मागितले आहेत. त्याबाबत मी त्याला घाणेरडया शब्दात शिव्या दिल्या आहेत. त्याचा मी येथे उल्लेख करीत नाही. त्याने मला तसे बोलल्यावर मला राग आल्याने मी त्याला तसे बोललो आहे. माझ्या अंगरक्षकाच्या उपस्थितीत हे घडलेले आहे. मी एका अत्यंयात्रेला जात होतो, त्यामुळे ते बरे झाले. त्यामुळे त्यांचा जबाब नोंदवावा, सत्य नोंदवावे, असे ब्लॅक मेलर फिरत असतील तर ते योग्य नाही. या प्रकरणाशी माझा संबंध नसताना एवढे घडले आहे. उद्या निरपराध आणि पोलिसांवर दबाव आणून असे प्रकार घडत राहिले तर सामान्य माणसांचे काय होईल याची काळजी वाटते. म्हणून याप्रकरणी सीआयडीमार्फत चौकशी करावी. कोतवाली पोलीस स्टेशनमध्ये तक्रार करणारा हा मुख्य माणूस आहे. हा पोलिसांना ब्लॅक मेल करीत आहे. याबद्दल चौकशी करुन त्याच्याविरुध्द कडक कारवाई करावी. म्हणून मी तक्रार केलेली आहे. पोलिसांचे दोन बॉडी गार्ड आहेत त्यांच्या उपस्थितीत हे सर्व झालेले आहे. याची चौकशी करावी, मला हातही चालविता येत नाही, गप्प रहावे लागत आहे, बोलताही येत नाही, म्हणजे अवघड जागेचे दुखणे झाले आहे.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. नितीन गडकरी...)

मी बोलत नाही म्हणून गडकरी का बोलत नाही असे विचारतात. बोललो तर गाडीचे फोटो चॅनेलवाले दाखवतात. बोललो तरी प्रॉब्लेम, नाही बोललो तरी प्रॉब्लेम. या प्रकरणी परवा हायकोर्टाचा निर्णय होईल. तो होऊ द्या. तुम्ही सी.आ.डी. चौकशी करा. नागपूरचे गृहराज्य मंत्री आहेत त्यांना चौकशी करायला सांगा. पूर्ण चौकशी होऊ द्या. जे दोषी असतील त्यांच्यावर कठोर कारवाई करा. यामध्ये राजकारण करण्याची गरज नाही. जे सत्य असेल ते बाहेर येऊ द्या. मी याबाबतीत माननीय मंत्री महोदयांकडे तक्रारीचे पत्र दिलेले आहे.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी या पूर्वीच मला याबद्दलची माहिती दिली होती. इंगळे म्हणून जे गृहस्थ आहेत त्यांनी ब्लॅकमेलिंग करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याबाबतीत साक्षीदार म्हणून राज्य शासनाच्या पोलीस खात्यातील 2 पोलीस तेथे् उपस्थित होते. त्यांनी रीतसर त्याबाबतीत तक्रार करावी, ती केल्यानंतर इंगळेवर त्या पध्दतीने कारवाई करण्यात येईल.

दुसरा महत्वाचा भागा हा की, आपण जेव्हा सार्वजनिक जीवनात असतो त्यावेळी मिडियामधून जेव्हा अशा बातम्या यायला लागतात त्यावेळी आपण सर्व अस्वस्थ होतो. आपला सहभाग नसला तरी त्या बातम्या चुकीच्या आहेत हे कळूनही आपण कसे हतबल होतो याचे हे एक उत्तम उदाहरण आहे असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. असे प्रसंग या सभागृहातील अनेकांवर यापूर्वी आलेले आहेत. आपण कितीही सांगितले तरी मिडियामध्ये जे येते त्याबाबतीत आपण कोणाचा हात धरु शकणार नाही. मला खात्री आहे की, महाराष्ट्रातील जनता सुजाण आहे. मिडिया जे काही वेळोवेळी देत असते त्यावर जो अंतिम निष्कर्ष निघतो त्यावर महाराष्ट्रातील जनतेची जास्त श्रध्दा असते. मिडियाने काय छापावे, काय नाही याबाबतीत आपली कितीही इच्छा असली तरी आपल्याला मर्यादा आहेत. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी यापूर्वीच याबद्दलच्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. उद्या कोर्टाचा निर्णय होईल असे दिसते. मला निश्चित खात्री आहे की कोर्टाचा योग्य तो निर्णय होईल. त्या पलीकडे आवश्यकता असेल तर निश्चितपणे या प्रकरणी सीआयडी मार्फत चौकशी करण्याची व्यवस्था करु. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी हे निर्दोष आहेत हे प्रथमदर्शनी पुराव्यात यापूर्वीच कळलेले आहे. ते मुंबईत होते. त्यांच्या घरासमोरच्या गाडीत ही घटना घडलेली असल्यामुळे मिडियावरील सर्व बातम्यांमध्ये त्यांच्या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. नितीन गडकरी....)

नावाचा उल्लेख झालेला आहे. उद्या कोर्टासमोर तारीख आहे. त्या ठिकाणी निष्कर्ष बाहेर येईल. त्यातून काही कमी निष्कर्ष बाहेर आले तर सी.आय.डी.मार्फत, सक्षम अधिका-यामार्फत चौकशी करण्याची शासनाची तयारी आहे. लवकर निष्कर्षापर्यन्त यावे अशी इच्छा आहे. पण ज्या बातम्या बाहेर येतात त्याबाबतीत आपल्या मर्यादा आहेत. या प्रकरणी उद्या कोर्टात तारीख आहे. निष्कर्ष यावेत अशी आमची अपेक्षा आहे. तरी उद्या पूणपणे निष्कर्ष आले नाहीत तर ताबडतोब सी.आ.डी.च्या उच्चपदस्थ अधिका-यामार्फत चौकशी करुन लवकरात लवकर निष्कर्षापर्यन्त यावे अशी व्यवस्था राज्य सरकार करील. या प्रकरणी सन्माननीय सदस्य श्री नितीन गडकरी यांना मन:स्ताप होत आहे हे दिसते. पण असे मन:स्ताप सहन करण्यापलीकडे आपल्या हातात फारसे काही नसते हेही या सभागृहातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना वेळोवेळी कळलेले आहे. विशेषत: सत्तेत असेल तर ते अवघड जागेचे दु:खणे होते. सत्तेत असल्यानंतर काहीही बोललात तरी त्यावर काय काय निष्कर्ष निघतील ते सांगता येत नाही. कालचेच उदाहरण मी सांगतो. फोर्स-1चे पहिले ट्रेनिंग झाले. दुसरे ट्रेनिंग कालपासून सुरु झाले. फोर्स-1चे ट्रेनिंग हे अजून हत्यारापर्यन्त आलेले नाही. त्याठिकाणी कोणकोणत्या प्रकारच्या गन्स किती संख्येने आहेत याची माहिती घेण्यासंबंधीच्या सूचना मी दिल्या. ती सर्व हत्यारे कशी आहेत, त्यांचे वजन किती आहे, त्यांची रेंज काय आहे याबाबतची माहिती घेण्यासाठी मी ती सर्व हत्यारे काढून ठेवण्यास सांगितले. हे सर्व पाहिल्यानंतर एका चॅनेलने असे दाखविले की, फोर्स-1 ला हत्यारे दिलेली नाहीत, काहीच काम केलेले नाही.

...नंतर श्री. गिते....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

त्या ठिकाणी पोलिसांना अतिशय चांगले ट्रेनिंग देण्याचे काम चालू आहे. परंतु आपण म्हणतो तेच मिडियाने दिले पाहिजे असे आपले बंधन नाही. लोकशाहीमध्ये त्यांनी काय छापावे, कोणती माहिती लोकांना द्यावी हा सर्वस्वी अधिकार त्यांना आहे. ही गन फार जुनी आहे, तिचा काही उपयोग नाही. एम.पी.-5 ही लेटेस्ट गन आलेली आहे, ती त्या ठिकाणी ठेवण्यात आली होती. रिव्हॉल्वर व इतर सर्व शास्त्रास्त्रे बघावयाची होती. त्या ठिकाणी काही गन मधून फायर करुन मला ट्रायल देखील घ्यावयाची होती. परंतु मला वेळ कमी होता म्हणून मला त्या व्हेपन्ससंदर्भातील ट्रायल घेता आली नाही. मुद्दा एवढाच की, आपण जे करतो त्यापेक्षा वेगवेगळया ठिकाणी वेगळी माहिती येऊ शकते. या सभागृहातील दोन्ही बाजुच्या सन्माननीय सदस्यांच्या सहनशीलतेची ही परीक्षा असते.

सन्माननीय सदस श्री. गडकरी यांच्या निवासस्थाना बाहेरील गाडीत ही घटना घडलेली आहे. त्या घटनेबाबत त्यांना फार मोठा मनस्ताप झालेला आहे याची मला पूर्णपणे जाणीव आहे. माझी आणि त्यांची अनेक वर्षापासूनची ओळख आहे. अनेक वर्षापासून मी त्यांना या सभागृहात बघतो आहे. त्यांच्या स्वभावाची मला चांगलीच माहिती आहे. या घटनेशी त्यांचा काही संबंध असेल असे मला वाटत नाही. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनाही ब्लॅकमेल करणारा माणूस नागपूर शहरात आहे याचे मला कौतुक आहे. तो माणूस त्यांच्या गाडीत बसला व म्हणतो " आपका सेटलमेंट करता हूं, क्या है वह मेरें को बोलो. मैं सब देखता हूं. मै सब संभालता हूँ. इतना पैसा उसको दे दो. सभापती महोदय, मला या अनुषंगाने एवढेच सांगावयाचे आहे की, समाजातील प्रवृत्त्या कशा वाढल्या आहेत. एखादा माणूस अडचणीत सापडला की, त्याच्यातून कसे द्रव्यार्जन करता येईल असे 0.02 टक्के माणसे राज्यात निर्माण झाली आहेत. मिडियात काय येते ? एखादी व्यक्ती सापडली की, त्याचा कार्यक्रम सुरु होतो. इसके पिढे लगो, कुढ हो सकता हैं. मिडियाने देखील विचार केला पाहिजे की, या गोष्टीतून कोणाकोणाला संधी आपण उपलब्ध करुन देतो आहे याचा कधी तरी अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. मिडियाच्या समोर बोलण्याचे धारिष्ठय आपल्यात आहे. मिडियासामोर बोलण्याचे धारिष्ठय माझ्यात नाही. मी या ठिकाणी खरे सांगतो आहे. जे सत्य आहे ते मी सांगतो आहे. श्री. इंगळे यांची चौकशी करेक्टपणे करणे, अशा

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रकारचे इंगळे महाराष्ट्रात होणार नाहीत याबाबतीत पूर्ण काळजी करण्याची व्यवस्था आमचे सरकार करेल. आवश्यकता वाटली तर याबाबतीत सी.आय.डी.यांचे मार्फत चौकशी करण्याची देखील व्यवस्था करु.

श्री. नितीन गडकरी : मी माननीय मंत्री महोदयांचे आभार मानतो. माननीय मंत्री महोदयांनी जी काही माहिती दिली त्याबद्दल मी समाधानी आहे. यासंदर्भात मी माननीय गृहमंत्र्यांना एक लेखी पत्र सादर केलेले आहे. परंतु सभापती महोदय, आपल्या मार्फत देखील एक पत्र मी माननीय मंत्र्यांकडे सादर करतो. या ठिकाणी मी एकच दुरुस्ती करतो की, नागपुरची 80 टक्के जनता माझ या बाजुने उभी आहे. कोणी चुकीची माहिती दिली याच्याशी मला काही घेणे देणे नाही. मिडियातील अनेक लोकांना घटनेचे सत्य कळलेले आहे. मायक्रोस्कोपीक मॉयनॉरिटी एक सेक्शन आहे. म्हणून माझी मिडिया बद्दल काही तक्रार नाही. परंतु जे मायक्रोस्कोपीक मॉयनॉरिटी सेक्शन आहे तो अशा गोष्टींचा फायदा घेतो. त्यांच्याबद्दलही मला काही म्हणावयाचे नाही. परंतु आपण जे म्हणालात त्याबद्दल मी समाधानी आहे.

(सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी आपले लेखी पत्र माननीय गृहमंत्र्यांकडे सादर केले.)

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा मुंबईतील समुद्र किनारी आश्वारुढ पुतळा उभारण्यासंबंधी प्रकल्प हाती घेण्यात येणार आहे. या प्रकल्पाच्या अनुषंगाने समिती निर्माण केली आहे. शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांना त्या समितीचे अध्यक्ष करण्यासंदर्भात काही मंडळींनी राजकरण करुन राज्यात जातीयवाद निर्माण करण्याचा प्रयत्न केला. तशाच प्रकारचा प्रयत्न महाराष्ट्राच्या शालेय शिक्षण खात्यामध्ये चालला आहे. शालेय शिक्षण विभागाच्या काही अधिका-यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास बदलण्याचा प्रयत्न केला आहे. गेल्या वर्षाच्या इयत्ता चौथीच्या इतिहासाच्या पुस्तकामध्ये "दादोजी कोंडदवे यांच्या देखरेखीखाली शिवरायांचे शिक्षण पुढे चालू झाले" असे लिहिलेले आहे. वेगवेगळया प्रकारची शस्त्रे कशी चालवावयाची यासंबंधीचे शिक्षण देतानाची छायाचित्रे दिली आहेत, तेथे दादोजी कोंडदेव मागे उभे आहेत.

यानंतर श्री. भोगले...

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण.....

या मेटे आणि खेडेकर यांनी जातीयतेचे दूषित राजकारण केले.....

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण हे छत्रपती शिवरायांच्या पुतळयासंबंधी तक्रार करीत आहेत. ज्या व्यासपीठाच्या संदर्भात ते तक्रार करीत आहेत त्याठिकाणी ते स्वत: गेले होते. त्यांना तो नैतिक अधिकार पोहोचत नाही.

श्री.मधुकर चव्हाण : आमच्या पक्षाचे महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष याठिकाणी उपस्थित आहेत. मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे हे भारतीय जनता पक्षाची मागणी आहे. आमच्या अध्यक्षांच्या परवानगीने मी गेलो होतो. मेटेंचा अनुयायी म्हणून गेलो नाही. माझ्या पक्षाच्या अध्यक्षांची भूमिका आहे, त्यांना विचारुन मी शिवाजीपार्क येथील सभेला गेलो होतो. तो विषय वेगळा आहे. त्यांनी विषयाचे राजकारण सुरु केल्यानंतर चौथीच्या पुस्तकातील धडा बदलण्यात आला. दादोजी कोंडदेव यांचे नाव काढून, चित्र काढून असे लिहिले आहे की, "शहाजी राजांनी शिवरायांना युध्द काळात शिकविण्यासाठी काही शिक्षकांची नेमणूक केली." त्यानंतर दादोजी आणि जिजाऊ यांच्या प्रेरणेखाली शिवराय मोठे झाले असे लिहिले आहे. दुसऱ्या पुस्तकात शहाजी राजे यांच्या देखरेखीखाली शिवरायांनी पुण्यामध्ये शिक्षण घेतले. वास्तविक त्यावेळेला शहाजी राजांचा आम्हाला जो इतिहास शिकविला गेला, आम्ही जे शिकलो त्यानुसार शहाजी राजे पुण्यामध्ये त्यावेळी नव्हते. सभापती महोदय, शासनाने भूमिका स्पष्ट करावी. गेल्या वर्षीचा धडा योग्य होता की या वर्षीचा धडा योग्य आहे? अशा त-हेने मुलांना संभ्रमावस्थेत टाकले गेले आहे. गेली दहा वर्षे चौथीमध्ये विद्यार्थी जे शिकले ते खोटे आहे आणि 2009 पासून शिकविले जात आहे ते खरे आहे याची भूमिका शासनाने स्पष्ट करणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात कधीही जातीय राजकारण नव्हते. हा धडा बदलण्याचा अतिशय गंभीर मुद्दा आहे. शासनाने याची नोंद घेऊन निवेदन करावे अशी मी विनंती करतो.

श्री.दिलीपराव देशमुख : होय.

(नंतर हिंदी भाषण श्री.शर्मा.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./ मु.शी : औचित्याचा मुद्दा

उपसभापती : सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, मेरा औचित्य का मुद्दा है. पिछले नागपुर अधिवेशन में दिनांक 26.12.2008 को मेरे तारांकित प्रश्न क्रमांक 44699 के उत्तर में उस वक्त के माननीय मंत्री श्री. हसन मुश्रिफ ने ऐसा आश्वासन दिया था कि महाराष्ट्र पशु व मत्स्य विद्यापीठ के कुलगुरु डॉ. निनावे ने अलग अलग पदों के लिए जो 450 नेमणुक की है, उसमें हुए भ्रष्टाचार की पार्श्वभूमि को देखते हुए ज्युडिशियल इन्क्वायरी की जाएगी. उसके बाद राज्यपाल महोदय ने दिनांक 4.2.2009 को रेवेन्यू कमिश्नर, नागपुर का एक सदस्यीय इन्क्वायरी कमीशन नियुक्त किया. उन्होंने लिखा कि इसमें बहुत बड़ा भ्रष्टाचार हुआ है और बहुत सी शिकायतें प्राप्त हुई हैं, इसलिए इन्क्वायरी जरुरी है और एक महीने में इसकी रिपोर्ट सब्मिट करने के लिए कहा. लेकिन रेवेन्यू कमिश्नर, नागपुर एक्सटेंसन मांगते रहे और 4 महीने हो गए लेकिन इन्क्वायरी रिपोर्ट सब्मिट नहीं हुई. लेकिन मुझे कुछ विश्वसनीय सूत्रों से पता चला है कि इन्क्वायरी रिपोर्ट सब्मिट हो गई है.

सभापति महोदय, मैं सभागृह में यह मांग करती हूँ कि भ्रष्टाचार के आरोप में वाइस चान्सलर के खिलाफ जो रिपोर्ट आई है, वह इस सभागृह में रखी जाए. यह प्रकरण गंभीर है. सोचने की बात यह है कि फरबरी 2009 में राज्यपाल महोदय ने लिखित रुप से स्टे दिया था, उसके बावजूद भी इन्टरव्यू कॉल किए गए. दिनांक 4.6.2009 को डायरेक्टर ऑफ एक्सटेंशन, असोसिएट डीन और दूसरी टीचिंग पोस्ट के इन्टरव्यू लेना शुरु कर दिए. जब मैंने माननीय मंत्री महोदय से इस बारे में बात की तो उन्होंने कहा कि हमने कमेटी बनाई है और वह कमेटी इन्टरव्यू लेगी, वाइस चान्सलर का इससे कुछ लेना-देना नहीं है. मेरा कहना यह है कि वाइस चान्सलर वहां पर चेयर पर है और एक्ट के तहत वह चेयरमेन है, इसलिए वह वहां पर रहेगा. मेरा प्रश्न है कि क्या शासन इस भ्रष्टाचार को खत-पानी देना चाहता है ? इस रिक्रूटमेंट की जल्दी क्या है. मेरी मांग है कि इस रिक्रूटमेंट को तुरन्त रोकना चाहिए, वाइस चान्सलर को कम्पलसरी लीव पर भेजना चाहिए और मंत्री महोदय को इस बारे में राज्यपाल महोदय के पास

. . U 3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . . श्रीमती फौजिया खान

पाठ पुरावा करना चाहिए. "Autonomy doesn't mean Anarchy". इसलिए अगर एक्ट में कुछ बदल करना है तो उसका भी इनीसिटिव सरकार को करना चाहिए. ऐसी मांग इस औचित्य के मुद्दे के द्वारा मैं करना चाहती हूँ.

. . . .

. . . भाषण पूर्ण, इसके बाद श्रीमती फौजिया खान का दूसरा औचित्य का मुद्दा.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : सन्माननीय सदस्या प्रा. फौजिया खान यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

प्रा. फौजिया खान : सभापति महोदय, मेरा औचित्य का मुद्दा यह है कि आज हम लोगों ने सभागृह में लोकसभा की माननीय अध्यक्षा श्रीमती मीरा कुमार का अभिनन्दन का ठराव पारित किया है. भारत के इतिहास में ऐसा पहली बार हुआ है कि हमारी महामहिम राष्ट्रपति महिला हैं, लोकसभा की अध्यक्ष महिला हैं और यू.पी.ए. की चेयर-परसन भी महिला हैं. हर क्षेत्र में महिलाएं अग्रणी हैं और 12 वीं कक्षा के निकाल से पता चला है कि महिलाएं आज हर क्षेत्र में आगे हैं. लेकिन एम.पी.एस.सी. ने 5 महिला केंडीडेट को सलेक्ट किया और वित्त विभाग ने यह कारण देकर उन्हें ज्वॉइन नहीं कराया कि महिलाएं देर तक काम नहीं कर सकती और वह फाइल उन्होंने जी.ए.डी. के पास वापस भेज दी. देश के संविधान में महिलाओं को बराबरी के अधिकार दिए हैं. फुटबॉल की तरह वह फाइल इधर से उधर हो रही है. महाराष्ट्र शासन की एक सीनियर आई.ए.एस. अधिकारी श्रीमती नीला सत्यनारायण ने एक डेलीगेशन लीड किया था कि महिलाओं को अच्छी पोस्टिंग मिलनी चाहिए. महिला होने के कारण 5 महिला केंडीडेट को ज्वॉइन नहीं होने दिया जाता, यह बात हमारे देश के आदर्श के खिलाफ है. महिलाएं सक्षम हैं इसलिए शासन के आदेश में दुरुस्ती करके इन महिलाओं को तुरन्त ज्वॉइन कराना चाहिए, ताकि वे डिप्राइव न हों. मैं इस औचित्य के मुद्दे पर इतना ही कहना चाहती हूँ.

. . . . .

. . . भाषण पूर्ण, नंतर V2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. विक्रम काळे : महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

महोदय, काल राज्यात बारावी परीक्षेचा बोर्डाचा निकाल जाहीर झाला. त्यात मुलींनी चांगल्या प्रकारे यश संपादन केले आहे. आज आपल्याकडे राज्यात प्राथमिक शिक्षक किंवा माध्यमिक शिक्षक होण्यासाठी अनुक्रमे डी.एड. आणि बी.एड. अशी पात्रता निश्चित केली आहे. डी.एड. होण्यासाठी इयत्ता बारावी उत्तीण अशी पात्रता पाहिजे तर बी.एड. साठी पदवीधर अशी पात्रता आहे. परंतु गेल्या 10-15 दिवसापूर्वी माननीय शिक्षणमंत्र्यांनी असे सुतोवाच केले की, यापुढील काळात डी.एड. या पदविकेसाठी पदवी परीक्षा उत्तीर्ण अशी पात्रता असेल. त्यामुळे सर्व विद्यार्थी आणि पालकांमध्ये नाराजीचा सूर पसरला आहे आणि भविष्यात ग्रामीण भागातील मुले शिकणार नाहीत आणि पालक त्यांना शिकविणार नाहीत अशी गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. यासंदर्भात अजून स्पष्टपणे असा कुठलाही शासन निर्णय अथवा आदेश काढलेले नाहीत की, डी.एड. पदविकेसाठी पदवी ही पात्रता पाहिजे. त्यामुळे काल उत्तीर्ण झालेल्या हजारो विद्यार्थ्यांसमोर डी.एड. प्रवेशाच्या बाबत गोंधळ निर्माण झाला आहे. म्हणून माननीय शिक्षण मंत्र्यांनी यासंदर्भात स्पष्ट असा खुलासा करणे आवश्यक आहे, म्हणून मी या औचित्याच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करीत आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. सुरेश जेथलिया यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. सुरेश जेथलिया : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. सभापती महोदय, जालना येथील जिल्हा पुरवठा अधिकारी व अतिरिक्त जिल्हाधिकारी यांनी संगनमताने केलेल्या गैरकारभाराविषयी वारंवार सभागृहात प्रश्न उपस्थित केला असता गतवर्षी सभागृहात मा. सभापतींनी या अधिका-याची संपूर्ण चौकशी करावी व या प्रकरणाची संपूर्ण चौकशी करण्याचे दिलेले निर्देश या निर्देशानुसार संबंधित अधिका-यांची बदली नांदेड येथे झाली असतांना त्या अधिका-यांनी अर्थपूर्ण व्यवहार करुन औरंगाबाद येथे बदली केलीच पण बदली करतांना त्यांनी स्वत:ची निवासी उपजिल्हाधिकारी अशी बढती करुन घेतली. एखाद्या अधिका-याने गैरकारभार केल्यावर त्यास शिक्षा होणे आवश्यक असतांना त्यास बढती व आवडत्या जागी बदली करुन शासनाने त्यांचा सन्मानच केलेला आहे. त्याचबरोबर त्यांच्या गैरकारभाराची चौकशी करण्याचा नुसता फार्स करुन त्यांच्या कार्यकाळातील बदल केलेले परवाने रद्द करुन एक प्रकारे त्या परवानाधारकांवर अन्याय केल्यासारखेच केलेले आहे. यावरुन शासनाने विधानपरिषदे सारख्या मोठया सभागृहात दिलेल्या निर्देशांचा हा अवमानच म्हणावा लागेल. त्यामुळे याबाबत शासनाने त्वरित योग्य तो निर्णय घेवून लाखो रुपयांचा भ्रष्टाचार करणा-या जिल्हा पुरवठा अधिकारी व अतिरिक्त जिल्हाधिकारी यांचेवर कारवाई करावी तसेच याबाबत शासनाने आपली भूमिका स्पष्ट करावी.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. सिंधुदुर्ग जिल्हयातील कणकवली तालुक्यात दिनांक 1.6.2009 रोजी वा त्या सुमारास बालेला चक्रीवादळाचा तडाखा व त्यामध्ये सुमारे 100 घरांची झालेली पडझड, तसेच वीज वितरण कंपनीचे साधारणपणे 11 लाखाचे झालेले नुकसान, यात फोंडाघाट , नाढळ, हरकुळ खुर्द, डामरे-तिवरे, कोडये, लारे वाघेरी आणि बेळणे या गावांतील लोकांच्या घरांचे झालेले नुकसान, तसेच या चक्रीवादळामुळे आंबा, काजू, जांभूळ, रतांबा (कोकम) या पिकांचेही नुकसान झालेले होणे, यामुळे उत्पन्नाच्या 25 टक्के उत्पादनात घट होणे, या सर्व पिकांना नुकसानभरपाई म्हणून अनुदान मिळण्याची आवश्यकता , तसेच आपद्ग्रस्तांना शासनाने तातडीने नुकसान भरपाई देण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे शासनाने सभागृहात नुकसान भरपाई देण्याच्या संदर्भात घोषणा करावी अशा प्रकारे मी औचित्याच्या मुद्याद्वारे निवेदन करतो.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, मी गृहविभागाच्या संदर्भात औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे. भारतीय संविधानाने विविध गुन्हयांच्या केसेस कोर्टामध्ये चालविल्या जातात. आरोपी जर महिला असेल तर त्यांसदर्भात पध्दत वेगळी असावी या बाबतीत लोकसभा आणि विधानसभेत चर्चा झालेली आहे. असे असतांना मालेगाव बॉम्बस्फोटातील आरोपी साध्वी प्रज्ञासिंग ठाकूर यांना पाठदुखीचा त्रास होत असल्यामुळे त्यांना बुधवार दि. 3 जून, 2009 रोजी न्यायालयाने जे.जे.इस्पितळात उपचारासाठी दाखल करण्यासंदर्भात आदेश दिले होते पण त्यांच्या सुरक्षेसाठी नेमलेले विशेष पथक पाच तास उशिरा आल्याने जे.जे. रुग्णालयात पोहोचण्यास त्यांना रात्रीचे पावणेअकरा वाजले. तेथे तासभर तपासणी करुनही त्यांच्यावर कोणतेही उपचार केले गेले नाहीत. परंतु अधिष्ठाता डॉ. रोजेंद्र इनामदारांनी हस्तेक्षप करुन अस्थिव्यंगोपचार विभागाचे प्रमुख डॉ. अजय चंदनवाले यानी साध्वी प्रज्ञासिंग ठाकूर यांची तपासणी केली व त्यांना दाखल करुन घेतले. 30 मे व 1 जून, 2009 रोजी देखील जे.जे. च्या डॉक्टरांनी प्रज्ञासिंग ठाकूर यांच्यावर उपचार करण्यास नकार दिला होता असे आरोपीचे वकील ॲड. गणेश सोवनी यांनी सांगितले.

महिला आरोपींबाबात अनेक मार्गदर्शक तत्वे असूनही त्याकडे सातत्याने दुर्लक्ष होत आहे. यासंदर्भात राज्य व केंद्राच्या महिला संरक्षणाच्या वैधानिक समित्यांनी वारंवार लक्ष वेधले आहे. राष्ट्रीय व राज्य महिला आयोगानेही याबाबत सूचना केल्या आहेत. त्यामुळे साध्वी प्रज्ञासिंग ठाकूर यांच्या आरोग्याविषयक बाबीकडे शासनाने नक्ष घालावे तसेच दिरंगाईने उपचार करणा-या डॉक्टरांच्या संदर्भात चौकशी करावी अशी मी औचित्याच्या द्वारे विनंती करीत आहे.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. कालच आपल्या उपस्थितीमध्ये माझ्या लक्षवेधी सूचनेवर चर्चा झाली होती . प्राध्यापकांच्या जागा न भरल्यामुळे मेडिकलच्या पोस्ट ग्रॅज्युएशनच्या पदवी आणि पदविकेच्या जागा कमी झाल्या आहेत असा त्या लक्षवेधी सूचनेचा विषय होता. त्यासंबंधी प्रश्न विचारत असतांना मी माननीय मंत्री महोदयांना वारवार असे सांगत होतो की, या जागा कमी झालेल्या आहेत तरी सुध्दा माझे म्हणणे मानण्यास ते तयार नव्हते. त्यांनी` मला ठासून असे सागितले की, एकही पदव्युत्तर पदवीची आणि पदविकेची जागा कमी झालेली नाही. माझ्या हातामध्ये वैद्यकीय शिक्षण आणि औषधी विभागाचा कार्यक्रम अंदाजपत्रक 2008-2009 हे पुस्तक आहे . माननीय मंत्री महोदय किती बेलगामपणे असत्य आश्वासने देतात याचा हा मूर्तीमंत पुरावा आहे. या पुस्तकात असे लिहिलेले आहे की, " गव्हर्नमेन्ट मेडिकल कॉलेजमध्ये 21 सब्जेक्ट डिग्रीज आहेत आणि 15 डिप्लोमा आहेत. त्यात जीएमसी मुंबई, बीजीएमसी पुणे , व्हीएनएमसी सोलापूर, जीएमसी मिरज, जीएमसी नागपूर, आयजीएमसी नागपूर, जीएमसी यवतमाळ, जीएमसी औरगाबाद, जीएमसी नांदेड . जीएमसी आंबेजोगाई या कॉलेजेसचा समावेश आहे. या लक्षवेधी सूचनेवर चर्चा सुरु असतांना सन्माननीय सदस्य डॉ. वसंत पवार सभागृहात उपस्थित होते आणि त्यांनीसुध्दा माननीय मंत्री महोदयांना या बाबतीत सांगण्याचा प्रयत्न केला होता. या पुस्तकामध्ये राज्य शसानाने माहिती दिलेली आहे ती माहिती अधिकृत आहे. त्यानुसार या वर्षी जीएमसी मुंबईच्या नऊ जागा , बीजेएमसी पुण्याच्या 2 जागा, व्हीएनएमसी सोलापूरच्या सहा जागा, जीएमसी मिरजच्या 11जागा, जीएमसी नागपूरच्या 3जागा ,आयजीएमसी नागपूरच्या 20 जागा, जीएमसी औरंगाबाद 3 जागा कमी झालेल्या आहेत. 21 सब्जेक्ट डिग्रीजच्या आणि 15 डिप्लोमा कोर्सेसच्या या जागा कमी झलेल्या आहेत. सभापती महोदय, या ठिकाणी औचित्याच्या मुद्दा व्दारे मला असे सांगावयाचे आहे की , माननीय मंत्री महोदयांनी अशा प्रकारचे विधान केले होते की या जागा कमी झालेल्या नाहीत आणि कालच्या लक्षवेधी सूचनेकडे दूर्लक्ष केले होते त्याबाबतीत हक्कभंगाची सूचना देण्यास आपण परवानगी द्यावी आणि माननीय मंत्री महोदयांनी जे उत्तर दिलेले आहे त्याची योग्य ती दखल घ्यावी. यासाठी मी हा औचित्याचा मुद्दा मांडत आहे .धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : या नंतर सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावत यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे.त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.अरविंद सावत : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.आज शिवराज्याभिषेक दिन आहे आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या तेजस्वी पराक्रमाची प्रतापगड ही स्मृती आहे. या प्रतागडावर अनधिकृत बांधकामे करण्यात आली असून त्या संदर्भात सातत्याने प्रतापगड उत्सव समिती शासनाशी संघर्ष आणि आंदोलन करीत आहे. ही समिती अनध्कृित बांधकामाच्या विरोधात उच्च न्यायालयामध्ये गेली होती. माननीय गृह राज्यमंत्री या ठिकाणी उपस्थित असल्यामुळे मी त्यांना अशी विनती करतो की , या प्रकरणी त्यांनी लक्ष द्यावे. प्रतापगड उत्सव समिती प्रतापगडाच्या पायथयाशी असलेल्या अफजलखानाच्या थडग्याचे उदात्तीकरणाविरुध्द उच्च न्यायालयामध्ये गेली होती. उच्च न्यायालयामध्ये या समितीने याचिका दाखल केली असून या संदर्भात उच्च न्यायालयाने सर्व अतिक्रमणे हटविण्याचा राज्य सरकारला आदेश दिला होता. परंतु ही अतिक्रमणे हटविण्या ऐवजी राज्य सरकारने सदर बांधकामे नियमित करण्याचा प्रस्ताव मंजूर केला होता त्यानतंर उत्सव समितीला पुन्हा उच्च न्यायालयात जावे लागले त्यावेळी उच्च न्याायालयात त्यांनी असे सांगितले की,माननीय उच्च न्यायालयाने जो निर्णय दिला होता त्याप्रमाणे न वागता शासनाने ही बांधकामे नियमित करण्याचे ठरविले होते. त्यावर उच्च न्यायालयाने जो निर्णय दिला त्यात असे म्हटले आहे की, "In view of the fact that this court has already disposed off Writ Petition No. 142 of 2004 by judgement and order dated 30.01.2008 which has also disposed off other connected matters".. या निर्णयात पुढे असे म्हटले आहे की, "It is not necessary for us to further entertain the Writ Petition which is based on subsequent development on the subject land relating to unauthorised construction". या निर्णयात पुढे असे म्हटले आहे की, "The Learned Addl. Government Pleader points out to this court that the issue has been dealt by the bench which has disposed of Writ

3..

श्री.अरविंद सावत ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

Petition No. 142 of 2004." माननीय सभापती महोदय, या पुढे जे उच्च न्यायालयाने म्हटले आहे ते अगदी महत्त्वाचे आहे. उच्च न्यायालयाने असे म्हटले आहे की, "We are quite sure that the State would refrain from regularising any construction on the subject land for two reasons. Firstly, this court has directed the authorities to remove encroachment and unauthorised construction and secondly, the land in question is forest land and under the Forest (Conservation) Act, forest land cannot be used for non forest purpose unless permission of specially constituted committee under the Ministry of Environment and Forest is obtained as held by the Supreme Court in the case of T.N. Godavarman Thirumulpad Vs. Union of India and Ors."

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत ....

सभापती महोदय, हा निर्णय देऊन हायकोर्टाने सरकारचा चेहरा चांगला रंगविला आहे. तेव्हा मी या औचित्त्याच्या मुद्याद्वारा शासनाला विनंती करतो की, मतांच्या राजकारणासाठी तेथे अफझलखानाच्या थडग्याचे जे उदात्तीकरण चालले आहे ते आता थांबवा आणि आजच्या शिवराज्याभिषेक दिनी तरी छत्रपतींच्या पराक्रमाची साक्ष असलेल्या प्रतापगड आणि त्या परिसरातील अनधिकृत बांधकामे सरकारने ताबडतोब तोडावी आणि उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाचा देखील मान राखवा. सभापती महोदय, आता या ठिकाणी माननीय गृह राज्यमंत्री उपस्थित आहेत. तेव्हा त्यांनी मी उपस्थित केलेल्या या औचित्त्याच्या मुद्याची दखल घेऊन त्याबाबत येथे थोडी फार माहिती दिली तर अधिक बरे होईल.

उपसभापती : सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या औचित्त्याच्या मुद्याची माननीय गृह राज्यमंत्र्यांनी दखल घ्यावी.

सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगे यांनी औचित्त्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्त्याचा मुद्दा मांडावा.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, सांगली जिल्ह्यातील कवठे-महांकाळ तालुक्यात आरेवाडी येथे धनगर समाजाचे आराध्यदैवत असलेल्या बिरोबाचे प्रसिद्ध देवस्थान आहे. या देवस्थानाला 'ब' दर्जा देण्यात आलेला आहे अशी घोषणा यांनी वर्षापूर्वी तत्कालीन उपमुख्यमंत्री असलेल्या श्री.आर.आर.पाटील यांनी केली होती. सभापती महोदय, काल या ठिकाणी जो अर्थसंकल्प मांडण्यात आला आहे त्यात राज्यातील काही देवस्थानांचा विकास करण्यासाठी काही निधी मंजूर करण्यात आला असल्याचे दाखविण्यात आले आहे. परंतु त्यामध्ये धनगर समाजाचे आराध्य दैवत असलेल्या बिरोबा देवस्थानाचा उल्लेख नाही तसेच त्याच्या विकासासाठी एक छदाम देखील देण्यात आलेला नाही. त्यामुळे या औचित्त्याच्या मुद्याच्या द्वारे माझी शासनाकडे मागणी आहे की, या देवस्थानाला नुसता कागदावर दर्जा द्यावयाचा आणि त्याच्या विकासासाठी एक पैसाही न देता हे तीर्थक्षेत्र वर्षानुवर्षे तसेच ठेवावयाचे हे बरोबर नाही. माननीय श्री.आर.आर.पाटील यांनी या देवस्थानाबाबत बोलताना सांगितले होते की, ते लहानपणापासून तेथे जात आहेत आणि तेव्हापासून त्याची जी अवस्था आहे ती आज देखील तशीच आहे, त्याचा कसल्याही प्रकारे विकास आजतागायत झालेला नाही. तो होण्याची गरज आहे. तेव्हा माझ्या, धनगर समाजाच्या या देवस्थाना

..... वाय 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विषयीच्या भावना लक्षात घेऊन आकस्मिक निधीतून वा अन्य मार्गाने त्वरित 2-3 कोटी रूपयांचा निधी या देवस्थानाच्या विकासासाठी देण्यात येऊन या देवस्थानाचा, तीर्थक्षेत्राचा विकास करण्यात यावा.

श्री. गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, मी देखील औचित्त्याचा मुद्दा मांडण्यासाठी परवानगी मागितलेली होती. ...

उपसभापती : माननीय सभापतींनी जेवढे औचित्त्याचे मुद्दे स्वीकारले आहेत, परवानगी दिली आहे तेवढे मी घेतो आहे. आपण दिलेल्या औचित्त्याच्या मुद्यास परवानगी नाकारली असल्याचे येथे दाखविले आहे.

श्री. गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, आपण मला माझा औचित्त्याचा मुद्दा मांडण्यास कृपा करून परवानगी द्यावी. मी दोन मिनिटात माझा मुद्दा मांडतो. आपण कृपया मला सहकार्य करावे.

उपसभापती : मी सर्व सन्माननीय सदस्यांना नेहमीच सहकार्य करतो, आपण देखील मला सहकार्य करावे एवढीच विनंती आहे.

आता यानंतर सन्माननीय सदस्य श्री.केशवराव मानकर यांनी औचित्त्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितली आहे, त्यांनी आपला औचित्त्याचा मुद्दा मांडावा.

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, श्री. के.के. दुबे हे शासकीय अध्यापक महाविद्यालय, औरंगाबाद येथून 'शिल्प निदेशक' या पदावरून जानेवारी 2007 रोजी निवृत्त झाले आहेत. परंतु आज दोन वर्षे लोटूनही त्यांना निवृत्ती वेतन मिळालेले नाही. या संदर्भात श्री.दुबे यांनी वारंवार माननीय राज्यपाल महोदय आणि शासनाकडे पत्रव्यवहार केला आहे. पण अद्यापही त्यांना निवृत्ती वेतन देण्यासंबंधी शासनाने कोणतीही कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे शासकीय अध्यापक महाविद्यालय, औरंगाबादच्या प्रांगणात श्री.दुबे यांनी आमरण उपोषण सुरू केले आहे. सभापती महोदय, अशा प्रकारे श्री.दुबे आणि त्यांच्या सारखी शासन दरबारी प्रलंबित असलेली अनेक प्रकरणे आहेत. निवृत्ती वेतन मिळत नसल्याने श्री.दुबे आणि अशाच अनेक कुटुंबियांवर उपासमारीची वेळ आली आहे. तरी शासनाने केलेल्या या दिरंगाईची सखोल चौकशी करण्यात यावी आणि श्री.दुबे व त्यांच्या सारख्या अनेक पेन्शनधारकांना तात्काळ निवृत्तीवेतन देण्यात यावे आणि श्री.दुबे यांचे आमरण उपोषण सोडवावे अशी मी या औचित्त्याच्या मुद्याद्वारे विनंती करतो.

(यानंतर श्री. सरफरे .... झेड 1 ..

अशासकीय प्रत / मुद्रणासाठी नाही

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री. भगवानराव साळुंखे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. भगवानराव साळुंखे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. महाराष्ट्राची सुकन्या कुमारी कृष्णा पाटील या मुलीने हिमालयातील सर्वोच्च एव्हरेस्ट शिखर मागील आठवडयात पादाक्रांत केले. त्याबद्दल देशभरातून नव्हेतर जगभरातूनही तिचे कौतुक होत आहे. या धाडशी व गौरवोस्पद कामगिरीबद्दल सारस्वत बँकेने तिचे संपूर्ण कर्ज माफ केले. तिच्यावर सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यामुळे या औचित्याच्या मुद्याव्दारे मी तिच्या अभिनंदनाचा ठराव मांडीत आहे.

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री. व्ही. यू. डायगव्हाणे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, आपण मला औचित्याचा मुद्दा मांडण्यास संधी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. या औचित्याच्या मुद्याव्दारे मी एका अतिशय महत्वाच्या प्रश्नाकडे सभागृहाचे लक्ष वेधतो. विदर्भातील विशेष करुन नक्षलग्रस्त दुर्गम भागामध्ये चंद्रपूर व गडचिरोली व उर्वरित जिल्हयामध्ये आदिवासी व व्ही.जे.एन.टी. च्या विद्यार्थ्यांच्या आश्रमशाळांतील शिक्षकांचे वेतन फेब्रुवारी 2009 पासून झालेले नाही. चार-पाच महिने होऊन देखील आदिवासी भागातील शिक्षकांना पगार दिलेला नाही हा त्यांच्यावर अन्याय आहे. तेव्हा त्यांना आठ ते पंधरा दिवसात वेतन देण्यात यावे यासंबंधी आपण शासनाला निदेश द्यावेत अशी माझी विनंती आहे. तसेच, त्याठिकाणी असलेल्या प्रकल्प अधिकाऱ्यांवर सुध्दा कारवाई करण्यात यावी अशी या औचित्याच्या मुद्याव्दारे मी विनंती करीत आहे. ----

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री. गोपीकिसन बाजोरिया यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, आपण मला याठिकाणी औचित्याचा मुद्दा उपस्थित करण्यास संधी दिल्याबद्दल प्रथमत: आपले आभार मानतो. श्रीमती शकुंतला कोठारी या 80 वर्षाच्या महिलेचे हे प्रकरण गेल्या तीन वर्षापासून दहा वेळा या सभागृहामध्ये मांडले आहे. या संबंधी आपण दोन वेळा शासनाला निदेश सुध्दा दिले आहेत. या महिलेला शासनाने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MAP/

श्री. गोपीकिसन बाजोरिया....

दि. 18.1.1990 रोजी पत्र देऊन 4 हजार 245 चौरस मीटर जागा तत्वत: देण्याचा निर्णय घेतला होता. त्याबाबत या महिलेने शासनाकडे 14 लाख 76 हजार रुपये भरले आहेत. त्याची पावती मी सभागृहाच्या पटलावर ठेवली होती. या महिलेने 1990 मध्ये हे प्रकरण कोर्टातून मागे घेतले. सभापती महोदय, दोन वर्षापूर्वी आपण हे प्रकरण 15 दिवसात मार्गी लावावे असे शासनाला निदेश दिले होते. आणि मागील अधिवेशनामध्ये आचार संहिता नसेलतर आठ दिवसात हे प्रकरण निकाली काढावे असे निदेश दिले होते. तरीसुध्दा अद्याप पावेतो हे प्रकरण निकाली काढले नाही. आपण एकीकडे लोकसभेच्या अध्यक्षपदी माननीय श्रीमती मीराकुमार यांची नियुक्ती झाल्याबद्दल अभिनंदनाचा प्रस्ताव मांडीत आहोत. त्याबद्दल सभागृहामधील सर्व माननीय सदस्यांनी आनंद व्यक्त केला आहे. असे असतांना या देशामध्ये एका 80 वर्षाच्या महिलेला गेल्या दहा वर्षापासून कां त्रास दिला जात आहे? हे मला समजत नाही. याबाबत शासनाचे अधिकारी काही उत्तर देत नाहीत आणि हा प्रश्न मार्गी लावीत नाहीत. याबाबत मी शासनाला एक दिवसांचा अवधी देत आहे. हे प्रकरण एक दिवसात निकालात काढावे. अन्यथा, सोमवारपासून मी आणि माननीय सदस्य श्री. जेथलिया आम्ही दोघेही या सभागृहाच्या "वेल" मध्ये बसून सत्याग्रह करुन हे सभागृह चालवू देणार नाही. शासनावर माझा आता भरंवसा न राहिल्यामुळे मी हे याठिकाणी सांगत आहे.

उपसभापती : माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे हा विषय कमीत कमी 10 ते 15 वेळा सभागृहामध्ये येऊन गेला आहे. या संदर्भात मी शासनाच्या गृहनिर्माण विभागाला काही सूचना केल्या होत्या. शेवटी मी देखील मेटाकुटीला येऊन सांगितले होते की, माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांच्याकडे असलेल्या गृहनिर्माण विभागाकडून याबाबतची नस्ती मागवून घेऊन तातडीने त्यासंबंधीचा निर्णय घ्यावा अशी विनंती केली होती. माननीय मुख्यमंत्र्यांना पुन्हा एकदा विनंती करीत आहे की, त्यांनी गृहनिर्माण विभागाकडून या विषयासंबंधीची नस्ती मागवून घेऊन व हे प्रकरण व्यवस्थितपणे तपासून घेऊन त्याबाबत योग्य तो निर्णय घ्यावा. तसेच, माननीय सदस्यांनी सोमवारपासून या प्रश्नाची तड लावण्यासाठी सभागृहाच्या "वेल" मध्ये बसून सत्याग्रह करण्याचा निर्णय तात्काळ अंमलात आणू नये अशी माझी त्यांना विनंती आहे.

श्री. रमेश बंग : सभापती महोदय, आपण केलेल्या विनंतीची नोंद घेण्यात येत आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री.सुरेश जेथलिया यांनी "जालना जिल्हा परिषदेत मराठवाडा विकास कार्यक्रमाचा निधी अन्यत्र वळवून पाझर तलाव आणि गाव तलावाची 23 कोटी रुपयांची कामे पूर्ण झाल्याचे कागदोपत्री दाखवून गैरव्यवहार होणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री कपिल पाटील, जयंत प्र.पाटील यांनी "राज्यातील सुमारे 40 ते 50 लाख दगडखाण कामगार सतत स्थलांतरित होत असल्याने ते भूमिहीन,बेघर, विना रेशनकार्ड, मतदार यादीत नोंद नसणे, जातीचे पुरावे नसणे, इ.सोयी-सुविधांपासून वंचित असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री किरण पावसकर, परशुराम उपरकर यांनी "सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मानगाव खोऱ्यातील वसोली कार्यक्षेत्रातील भारत निर्माण योजनेतील विहिरी गेल्या तीन वर्षांपासून अपूर्ण अवस्थेत असून त्यात मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार होणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, विनोद तावडे,पांडुरंग फुंडकर, मधुकर चव्हाण यांनी "राज्यातील मोटार वाहन विभागात काम करीत असलेल्या लिपिक वर्गीय कर्मचाऱ्यांमधून पदोन्नतीने पदे भरण्याकरिता दि.16 एप्रिल, 2004 रोजी शासनाने मंजुरी देऊनही त्यावर आतापर्यंत कार्यवाही न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.तो नियम 93 चा विषय होत नसल्याने,मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पाशा पटेल, पांडुरंग फुंडकर यांनी "दि.25 मार्च, 2008 रोजीच्या शासन निर्णयानुसार ग्रामसभेत गावातील अर्ध्यापेक्षा जास्त महिला मतदारांनी दारुबंदी बाबत ठराव केल्यास त्या गावातील दारुबंदी होते, परंतु नांदेड जिल्ह्यातील माळाकोळी येथे .....

. . . .2 ए-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती . . . .

महिलांनी ग्रामसभेत ठराव घेऊनही त्यावर कारवाई न करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता यांनी "मुरबाड जि.ठाणे तालुक्यातील रोजगार हमी योजने अंतर्गत केलेल्या कामाबाबत उप अभियंत्याने ठाणे बांधकाम विभागाला दि.23 ऑक्टोबर, 2008 रोजी अहवाल सादर करणे,त्यात मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचे आढळणे, यामध्ये दोषी असणाऱ्यांवर कारवाई करणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.तो नियम 93 चा विषय होत नसल्याने,मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील, जयंत प्र.पाटील यांनी "लोकनेत्या श्रीमती मृणालताई गोरे यांच्या नेतृत्वाखाली नागरी निवारा अभियाना अंतर्गत 3900 गोरगरीब व गरजू लोकांच्या गृहनिर्माण संस्थांना शासकीय जमीन, शासकीय दरात मिळणेबाबत मुख्यमंत्र्यांनी दि.25 डिसेंबर, 2008 रोजी योग्य तो मार्ग काढण्याचे आश्वासन देऊनही याबाबत अद्याप कार्यवाही न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

उर्वरित सूचनांना दालनामध्ये अनुमती नाकारलेली आहे.

. . . .2 ए-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: ठाणे शहरात मोठया प्रमाणात निर्माण झालेली पाण्याची टंचाई.

मु.शी.: ठाणे शहरात मोठया प्रमाणात निर्माण झालेली पाण्याची टंचाई याबाबत सर्वश्री.संजय केळकर, मधुकर चव्हाण, विनोद तावडे वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

श्री.हसन मुश्रीफ (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री संजय केळकर, मधुकर चव्हाण, विनोद तावडे यांनी "ठाणे शहरात मोठया प्रमाणात निर्माण झालेली पाण्याची टंचाई" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो."

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

. . . .2 ए-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, निवेदनाच्या दुसऱ्या परिच्छेदामध्ये असे म्हटलेले आहे की,"सेंट्रल पब्लिक हेल्थ व एन्व्हायरमेंट इंजिनिअरींग ऑर्गनायझेशन (CPHEEO) या केंद्र शासनाच्या संस्थेच्या मानकाप्रमाणे मोठया शहरांसाठी प्रतिदिन प्रति माणशी 150 लिटर एवढा पाणी पुरवठा होणे आवश्यक आहे." पुढे असे म्हटलेले आहे की,"त्याचा विचार करता ठाणे शहरातील सध्याच्या सुमारे 18 लाख लोकसंख्येस दररोज 324 द.ल.लि.एवढया पाणी पुरवठयाची आवश्यकता आहे. तथापि, एकूण पाणी पुरवठा हा 402 द.ल.लि.प्रति दिन होत असल्याने एकंदरीत पाण्याची उपलब्धता पुरेशी आहे. त्यामुळे महापालिका हद्दीतील सर्व भागांमध्ये दिवसात किमान एकदा व काही भागात दोनदा पाणी पुरवठा करण्यात येतो. शहरातील काही भागात 24 तास पाणी पुरवठा होतो ही देखील वस्तुस्थिती आहे." परंतु या वाक्यांना छेद देणारे वाक्य पान क्र.2 वर असे म्हटलेले आहे की, "उन्हाळयात पाणी कपातीमुळे व इतर तांत्रिक कारणामुळे घ्याव्या लागणाऱ्या Shut Down मुळे महापालिका क्षेत्रात महापालिकेच्या व खाजगी टँकरव्दारे पाणी पुरवठा करण्यात येतो." एकाच निवेदनामध्ये दोन परस्पर विसंगत अशी ही वाक्ये नाहीत काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, ठाणे शहराला 324 द.ल.लि.पाण्याची आवश्यकता आहे आणि सध्या 402 द.ल.लि.प्रति दिन पाणी पुरवठा होत आहे. हा पाणी पुरवठा बार्वी आणि भातसा या जलाशयातून होतो. उन्हाळयामध्ये शासन कधी-कधी या जलाशयाच्या पाण्यामध्ये कपात करते. ठाणे शहराच्या बाहेर विकास होत आहे, त्याठिकाणी कमी दाबाने पाणी उपलब्ध होते. त्या मुळे त्या विभागामध्येच पाण्याची टंचाई निर्माण होते. तसेच 110 द.ल.लि.पाणी पुरवठा करण्यासाठी जवाहरलाल नेहरु पुनरुत्थान अभियानांतर्गत पाणी पुरवठयाच्या संदर्भातील योजनेचे काम हाती घेतलेले असून 90 टक्के काम पूर्ण झालेले आहे. जर हे काम पूर्ण झाले तर ठाणे शहराच्या बाहेर जी लोकवस्ती झालेली आहे, त्या भागाला पाणी मिळू शकेल. मघाशी सांगितल्याप्रमाणे जलाशयातून पाणी कपात होत असते. सध्या शासनाने एप्रिल महिन्यापासून 7 टक्के पाणी कपात केलेली आहे.कारण हे जलाशय शासनाच्या मालकीचे आहेत. म्हणून त्या भागामध्ये देखील काही अडचण निर्माण होणार नाही.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा छोटासा प्रश्न आहे. याठिकाणी निवेदनातील पान क्र.2 मध्ये म्हटल्याप्रमाणे ठाणे येथे 59,923 इतकी अनधिकृत कनेक्शन्स् आहेत असे मान्य करण्यात आले आहे आणि शेवटी असे म्हटलेले आहे की,ठाणे येथे अनधिकृत कनेक्शन्स देण्यात आलेली नाहीत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, 59,923 इतक्या नळ जोडण्यांचा सर्व्हे केला. त्यापैकी 4878 इतकी अनधिकृत नळ जोडण्या सापडल्या. त्यापैकी 212 नळ जोडण्याच्या संबंधात दंडात्मक कारवाई करुन त्या नियमित करण्यात आलेल्या आहेत. बाकीच्या अनधिकृत नळ जोडण्या तोडण्यात येणार आहेत.

उपसभापती : मी या मुद्याच्या अनुषंगाने माननीय मंत्री महोदयांच्या निदर्शनास एकच बाब आणून देऊ इच्छितो. जेव्हा शहरांमध्ये महानगरपालिका किंवा नगरपालिकांच्या मार्फत पाणी पुरवठा केला जातो. तेव्हा नागरिकांची पाणी टंचाईच्या बाबतीत सरसकट ओरड होत असते. पाणी टंचाई बद्दल आम्ही कोणालाही दोष देऊ इच्छित नाही. परंतु सरसकट अनधिकृतपणे नळ जोडण्या झालेल्या आहेत. जी माणसे प्रामाणिकपणे पैसे भरतात, त्यांना मात्र पाणी मिळत नाही आणि सर्रास ज्या अनधिकृत नळ जोडण्या दिल्या जात आहेत, त्यासंदर्भात राज्य शासनाने महानगरपालिका आणि नगरपालिकांच्या स्तरावर कडक अंमलबजावणी करण्याच्या बाबतीत सूचना देणे आवश्यक होते. या सूचना देत असताना जो अशा प्रकारे नळ जोडणी देतो आणि जो त्याचा वापर करतो, ती व्यक्ती जेवढी दोषी आहे. त्यापेक्षाही जे अशा प्रकारे अनधिकृतपणे नळ जोडणी करुन देतात, ते जास्त दोषी आहेत.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती ...

याच्यामध्ये फारमोठया प्रमाणात गैरव्यवहार होत असतात, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे एक व्यवस्थित कालबध्द कार्यक्रम आपण राज्य शासनामार्फत इकडच्या सगळया संबंधित महानगरपालिकांना त्वरित द्यावा, जेणेकरुन महापालिकांचे आणि नगरपालिकांचे उत्पन्न बुडणार नाही. पाण्याची आवश्यकता सर्वांना असते. परंतु अनधिकृत नळजोडण्या घेऊन अशा प्रकारे, महापालिकांनी आणि नगरपालिकांनी प्रशासनाचा तोटा करणे योग्य होणार नाही. सर्वसामान्य नागरिक पैसे भरुन पाणी घेतात त्यांच्यावर एक प्रकारचा अन्याय होईल. याबाबतीत कालबध्द व ठोस कार्यवाही करण्याच्या बाबतीत शासनाने प्रशासनाला सूचना द्याव्यात

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, होय. अशा प्रकारच्या कालबध्द सूचना सगळया महानगरपालिकांना देण्यात येतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ MAP/

पृ. शी. : मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गावर दि.31-5-2009 रोजी झालेला अपघात

मु. शी. : मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गावर दि.31-5-2009 रोजी झालेला अपघात याबाबत डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री जयंत प्र.पाटील, कपिल पाटील, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. नितीन राऊत(गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री जयंत पाटील,कपिल पाटील,यांनी "मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गावर दि.31-5-2009 रोजी झालेला अपघात" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

... 3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : या अपघतामध्ये चार लोक मृत्यू पावलेले आहेत आणि 9 लोक जखमी झालेले आहेत. सभापती महोदय, अशा प्रकारच्या 3938 घटना घडलेल्या आहेत किंवा शासनाने दिलेल्या निवेदनामध्ये जे आकडे सांगितलेले आहेत त्यानुसार दोन्ही मिळून जवळ जवळ 2500 ते 3000 अपघात झालेले आहेत. डॉ. विजया पाटील, या सामाजिक व राजकीय कार्यकर्त्याचाही फार भिषण असा अपघात हाय-वे वर झाला आणि त्या निवडणूक काळात मृत्यूमुखी पडल्या आहेत. या अपघातात चारजण मृत्यू पावलेले आहेत आणि 9 जण जखमी झालेले आहेत, त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत काय देण्यात येईल? ट्रेलर मालकाचे स्वत:चे इन्सुरन्स असते. त्याच बरोबर तो ट्रेलर कोणत्या कंपनीचा होता? कारण त्या कंपनीचीही ही जबाबदारी आहे. त्यांच्या ड्रायव्हरने जबाबदारीने ड्रायव्हिंग केले पाहिजे. या अपघातात मृत्यू पावलेल्या आणि जखमी झालेल्या लोकांच्या कुटुंबियाना आर्थिक मदत देण्याच्या संदर्भात काय पावले उचलण्यात येणार आहेत?

सभापती महोदय, माझा दुसरा प्रश्न असा आहे की, या घटनेनंतर लोक संतप्त झाले, त्याठिकाणी दगडफेक झाली. हाय-वे बंद पडला. तेथील ग्रामस्थांनी भावनेच्याभरात येऊन ही दगडफेक केलेली आहे. त्यापैकी किती लोकांना आरोपी करण्यात आलेले आहे. खरे म्हणजे त्यांच्यावर आरोप ठेवण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. त्यांची फाईल बंद करावयास पाहिजे. तेव्हा शासनाने या संदर्भात विचार करुन मानवतापूर्ण भूमिका घ्यावी. एक्स्प्रेस हाय-वेवर सुरक्षिततेच्या योजना आहेत. माननीय मंत्रिमहोदय, नागपूरला असतात. तेव्हा आपल्यासोबत जो फौजफाटा असतो तो न घेता एक्स्प्रेस हाय-वे वरुन एकदा जाऊन पहावे. एक्स्प्रेस हाय-वेवर कोणीही लेन पाळत नाहीत. सर्वजण 100,120 आणि 140 च्या स्पीडने वाहन चालवत असतात. बरेचसे लोक दारु पीत-पीत वाहन चालवत असतात तसेच आसपास महिला दिसल्या तर वेडेवाकडे हातवारेही करत असतात. त्यामुळे स्वत:ला सुसंस्कृत म्हणवनारे लोक सुध्दा असंस्कृत होतात. एक्स्प्रेस हाय-वे हा या ड्रायव्हर्सना आणि बाकीच्या लोकांना अगदी वरदानच असतो. त्यामुळे याबाबतीत खास पावले उचलण्यात येतील काय?

श्री. नितीन राऊत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा पहिला प्रश्न असा होता की, या अपघातात जे मृत्यूमुखी पडलेले आहेत त्यांच्या कुटुंबियाना राज्य शासनामार्फत काही मदत देता येईल काय? सभापती महोदय, अपघाताच्या प्रकरणांमध्ये अशा प्रकारचे धोरण नाही. परंतु

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ MAP/

श्री. नितीन राऊत...

गाडीचे इन्सुरन्स असते. त्यामुळे इन्सुरन्सच्या कायद्यानुसार त्यांना कॉम्पनन्सेशन दिले जाते. खोपोली पोलीस स्टेशनमध्ये यासंबंधात तीन गुन्हे दखल झालेले आहेत. त्यामध्ये ड्रायव्हर मुख्य आरोपी आहे. त्या ड्रायव्हरच्या निष्काळजीपणामुळे लोक मृत्युमुखी पडलेले आहेत. एकूण चार लोक मृत्युमुखी पडलेले आहेत आणि एकंदर 9 जण जखमी झालेले आहेत. जखमीपैकी दोघेजण अजूनही उपचार घेत आहेत. सात लोक उपचार घेऊन घरी गेलेले आहेत. गाडीच्या मालकाचा पत्ता सापडत नसल्यामुळे त्याच्यावर कारवाई झालेली नाही. बाकीच्यांवर कारवाई करण्यात आलेली आहे. आर.टी.ओ.ला वाहनाची तपासणी करण्यासंबंधीचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन राऊत ....

त्या ठिकाणी आंदोलन घडवून आणले त्यामध्ये 100 ते 120 लोक होते. त्यामध्ये 7 लोकांची नावे निष्पन्न झालेली आहेत. एकाला अटक करण्यात आली आहे. परंतु सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या की, त्या ठिकाणी ट्रक ड्रायव्हरच्या चुकीमुळे 4 लोक मृत्यूमुखी पडल्यामुळे लोकांनी उत्स्फुर्तपणे ते आंदोलन केलेले आहे. त्यामुळे त्या लोकांबद्दल सहानुभूतीपूर्वक विचार करण्यात येईल.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, त्या ट्रेलरच्या मालकाचा पत्ता सापडला नाही असे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले. आपण आम्हाला संरक्षण द्यावे.

उपसभापती : त्या ट्रेलरच्या मालकाचा पत्ता शोधून काढावा.

श्री. नितीन राऊत : सभापती महोदय, ट्रेलरच्या मालकाचा पत्ता शोधून काढण्याचे काम सुरु आहे. चौकशी सुरु आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 93 च्या निवेदन क्रमांक 3 बाबत

उपसभापती : नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेच्या अनुषंगाने आजच्या निवेदन क्रमांक 3 बाबत मी सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांना सांगू इच्छितो की, यासंदर्भात मी नगरविकास विभागाला, माननीय मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिले आहे. ती फाईल प्रोसेसमध्ये आहे. त्यांनी ती बाब विधी व न्याय विभागाकडे पाठविली आहे. त्यामुळे याबाबतीत मी आपल्याला नंतर सांगतो.

श्री. मधुकर चव्हाण : म्हणजे कामगारांना न्याय मिळेल.

उपसभापती : न्याय देण्यासाठीच शासन बसले आहे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : दहिसर, पोईसर नद्यांच्या विस्तारीकरणाकडे दुर्लक्ष केल्यामुळे येत्या पावसाळ्यात उपनगरात पूर परिस्थिती निर्माण होण्याची निर्माण झालेली भीती

मु. शी. : दहिसर, पोईसर नद्यांच्या विस्तारीकरणाकडे दुर्लक्ष केल्यामुळे येत्या पावसाळ्यात उपनगरात पूर परिस्थिती निर्माण होण्याची निर्माण झालेली भीती याबाबत सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, संजय केळकर, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. हसन मुश्रीफ (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, संजय केळकर, यांनी " दहिसर, पोईसर नद्यांच्या विस्तारीकरणाकडे दुर्लक्ष केल्यामुळे येत्या पावसाळ्यात उपनगरात पूर परिस्थिती निर्माण होण्याची निर्माण झालेली भीती " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, 26 जुलै, 2005 ला मुंबईमध्ये मोठा हाहाकार झाला होता आणि त्यानंतर चितळे समिती स्थापन करण्यात आली होती. 2005 ते 11 फेब्रुवारी, 2008 पर्यंत हे शासन अजगरासारखे पडून राहिले आणि परत त्याची पुनरावृत्ती होऊन मुंबईमध्ये पाणी तुंबून हाहाकार झाला. अनेक माणसे मेली. अनेक लोक जखमी झाले आणि कोट्यवधी रुपयांच्या मालमत्तेचे नुकसान झाले. पुन्हा आता पावसाळा आलेला आहे. या ठिकाणी उत्तर देऊन दोन मिनिटामध्ये या नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेवरील निवेदनाच्या संदर्भातील चर्चा संपेल पण या ठिकाणी जनता जीव मुठीत घेऊन जगत आहेत. प्रश्न असा आहे की, मुंबईच्या महापौर डॉ. शुभा राऊळ यांना डॉ. चितळे यांनी भेटून पोईसर आणि दहिसर नदीच्या संदर्भात निवेदन देऊन त्या ठिकाणी आवश्यक ती उपाययोजना करुन नदीचे पात्र रुंद करण्याबाबत सांगितले होते काय ? निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, 11 फेब्रुवारी, 2008 रोजी कंत्राटदाराला कार्यादेश देण्यात आले आहे. त्यांना 20 महिन्यांचा कालावधी दिलेला आहे. आता 16 महिन्यांचा कालावधी पूर्ण झालेला आहे. दहिसर नदीच्या बाबतीत 16 महिन्यांमध्ये केवळ 1200 मीटरचे काम झालेले आहे. आता फक्त दहा महिने उरलेले आहेत. या दहा महिन्यांमध्ये दोनतृतीयांश काम होणार आहे काय ? पोईसर नदीचे काम 6800 मीटरपैकी 2000 मीटर झाले आहे. म्हणजे दहिसर नदीचे 40 टक्के काम झालेले आहे आणि पोईसर नदीचे काम 37 टक्के झालेले आहे. कुर्म गतीने काम करणाऱ्या या कंत्राटदाराविरुध्द शासन कारवाई करणार काय ? या कामावर देखरेख करणारे जे अधिकारी व कर्मचारी असतील त्यांनी वेळेत काम पूर्ण करुन घेतले नाही. पुन्हा लोखंडाचे दर वाढले, सिमेंटचे दर वाढले म्हणून ते कंत्राटदार व्हेरियेशनसाठी येतील. व्हेरियेशनला यावयाचे म्हणून कुर्म गतीने काम करावयाचे आणि कंत्राटाची रक्कम वाढवावयाची असे सगळे मिळून केलेले असते. लोक पावसात मेले तरी चालीतील पण कंत्राटदाराला मदत कशी होईल, त्याचे काम कसे होईल हे पाहिले जाते. त्यांच्याकडून वेळेवर काम करुन न घेणाऱ्या अधिकाऱ्यांवरुध्द सुध्दा शासन कारवाई करणार काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सन 2006 साली चितळे कमिटी नेमली. त्यावेळी मुंबईमध्ये मोठा पाऊस पडून हाहाकार झाला आणि त्यानंतर ब्रिमस्टोवॅड प्रकल्पाच्या अंतर्गत चितळे समितीच्या शिफारशीनुसार निधी मंजूर झाल्यानंतर 2007 मध्ये या कामासाठी निविदा मागविण्याची प्रक्रिया सुरु झाली. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे 11.2.2008 ला कार्यादेश देण्यात आले आणि पावसाळ्याचा कालावधी सोडून त्यांना 20 महिन्यांची म्हणजे 10.6.2010 पर्यंत मुदत देण्यात आलेली आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ....

ज्यावेळी अधिका-यांबरोबर ब्रिफिंग घेतले त्यावेळी मी अधिका-यांना सूचना दिलेल्या आहेत की, 2010 पर्यंत हे काम पूर्ण करण्यासाठी कटाक्षाने लक्ष घालावे आणि त्यांनी सुध्दा ते मान्य केलेले आहे.

श्री.मधुकर चव्हाण : उर्वरित 10 महिन्यामध्ये दोन तृतीयांश काम संपणार आहे काय ? कंत्राटदार व्हेरिएशन्ससाठी आले तर त्यांना पैसा वाढवून दिला जाणार नाही असे आपण खात्रीने सांगू शकता काय ?

श्री.हसन मुश्रीफ : या कामाच्या टेंडरच्या कलमांमध्ये काय नमूद केलेले आहे ते मला माहीत नाही, परंतु 2010 मध्ये हे काम संपविण्यासाठी शासन प्रयत्नशील राहील.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : गुनवडी, ता.बारामती येथील दत्तात्रय कुंभार या शेतकऱ्याने सावकाराच्या जाचास कंटाळून केलेली आत्महत्या तसेच गारपीट झाल्यावर शासनाकडून तातडीने मदत न मिळाल्यामुळे तासगाव येथील श्री.नारायण मोहिते या शेतक-याने केलेली आत्महत्या.

मु. शी. : गुनवडी, ता.बारामती येथील दत्तात्रय कुंभार या शेतकऱ्याने सावकाराच्या जाचास कंटाळून केलेली आत्महत्या तसेच गारपीट झाल्यावर शासनाकडून तातडीने मदत न मिळाल्यामुळे तासगाव येथील श्री.नारायण मोहिते या शेतक-याने केलेली आत्महत्या याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.अजित पवार (जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री) : सभापती महोदय, डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "गुनवडी, ता.बारामती येथील दत्तात्रय कुंभार या शेतकऱ्याने सावकाराच्या जाचास कंटाळून केलेली आत्महत्या तसेच गारपीट झाल्यावर शासनाकडून तातडीने मदत न मिळाल्यामुळे तासगाव येथील श्री.नारायण मोहिते या शेतक-याने केलेली आत्महत्या" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, 2 शेतक-यांनी आत्महत्या केल्यासंबंधी मी नियम 93 ची सूचना दिली होती. श्री.दत्तात्रय शंभूदेव कुंभार यांना घरी मी स्वत: भेट दिलेली आहे. पोलीस खाजगी सावकाराशी कसे सहमत होतात ते कळत नाही. यासंदर्भात डी.एस.पी.श्री.रविंद्र कदम यांच्याशी मी स्वत: बोलले आहे. श्री.कुंभार यांच्या कुटुंबियांनी ॲफिडेव्हिट सुध्दा केलेले आहे. माननीय मंत्री महोदय जून महिन्यात या कुटुंबियांना बारामतीला भेट देणार असतील तर मी त्यांच्यासोबत येण्यास तयार आहे. सन्माननीय मंत्री महोदयांना मी सांगू इच्छिते की, तेथील खाजगी सावकाराबद्दल तक्रार आहे. त्याच्या त्रासामुळे श्री.कुंभार यांनी आत्महत्या केलेली आहे. यासंबंधी पोलिसांना काय तांत्रिक अडचण आहे ते कळलेले नाही. फलटणच्या खाजगी सावकाराबाबत सातत्याने तक्रारी येत आहेत. आपण स्वत: बारामतीला यावे. दुसरे प्रकरण श्री.मोहिते यांनी आत्महत्या केल्याबाबतचे आहे. निवेदनात असे म्हटले आहे की, "चौकशी करण्यात येऊन पात्र ठरल्यास मदत देण्यात येईल" एकूण परिस्थिती पाहिली तर गारपीटीमुळे श्री.मोहिते यांचे खूप नुकसान झाल्याचे दिसून येते. त्याबाबत सुध्दा सहानुभूतिने विचार करावा अशी माझी विनंती आहे.

श्री.अजित पवार : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी दोन विषय येथे उपस्थित केले आहेत. पहिल्या विषयातील श्री.दत्तात्रय कुंभार यांच्या आत्महत्येबाबतचा पंचनामा झालेला आहे. त्यांनी शेतीसाठी कर्ज घेतलेले नसून वीट भट्टीसाठी घेतले होते. अशाप्रकारचा पंचनामा झालेला आहे. याबाबत जिल्हाधिका-यांची बैठक झालेली आहे, त्यात श्री.कुंभार यांच्या कुटुंबियांना मदत देण्यास अपात्र ठरविलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी हा विषय उपस्थित केला असल्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांशी माझे बोलणे झालेले आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, यासंबंधी फेर तपास केला जाईल. फेर तपासामध्ये सन्माननीय सदस्या म्हणतात त्याप्रमाणे जर ते पात्र ठरले तर त्यांना मदत देण्यास कसलीही अडचण येणार नाही, त्यांना मदत दिली जाईल. दुसरा विषय श्री.नारायण मोहिते यांनी आत्महत्या केल्याबाबतचा आहे. सांगली जिल्हयाच्या जिल्हाधिका-यांशी माझी चर्चा झाली आहे. यासंदर्भात काल सकाळी बैठक झालेली आहे. श्री.मोहिते यांचे कुटुंबिय मदतीसाठी पात्र असल्यामुळे त्यांना दोन दिवसामध्ये मदतीचा चेक दिला जाईल. पहिल्या प्रकरणात फेर तपास केला जाईल. त्यानंतर बारामतीला भेट देण्याबाबत विचार करु.

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : राज्यातील रोजंदारी वन मजुरांना सेवेत कायम करण्याचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असणे

मु. शी. :राज्यातील रोजंदारी वन मजुरांना सेवेत कायम करण्याचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असणे याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.बबनराव पाचपुते (वने मंत्री) : सभापती महोदय, डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "राज्यातील रोजंदारी वन मजुरांना सेवेत कायम करण्याचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मी आमदार असले तरी वन मजूर झाल्यासारखी माझी परिस्थिती झाली आहे. कारण अनेक अधिवेशनामध्ये मी हा प्रश्न उपस्थित केलेला आहे. आजही वन कामगार आझाद मैदानावर धरणे धरण्यासाठी बसलेले आहेत. या निवेदनातील शेवटच्या तिसऱ्या ओळीत जे नमूद केले आहे त्याबाबत माझा प्रश्न आहे. या वन मजुरांना नियमित करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्याबाबतचे निदेश दिलेले असताना सुध्दा विलंब का लागत आहे ? याबाबतचा प्रस्ताव दिला गेला आहे की तयार करावयाचा आहे की त्यामध्ये काही अडचण आहे याबाबतचे मंत्रिमहोदयांनी उत्तर द्यावे.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, या प्रश्नासंबंधी अनेक वेळा चर्चा झाली आहे, निवेदने झालेली आहेत. या वन मजुरांसंबंधी 1994 साली शासनाने नियमित करण्याबाबत निर्णय घेतला होता. परंतु राहिलेल्या मजुरांना सुध्दा त्यात घ्यावे, त्यांनी तुटकपणे 240 दिवस काम केले असले तरी त्यांना नियमित करावे, त्यांनी सलग 5 वर्षे काम केल्याचे गृहित धरावे अशी मागणी आहे. यासंबंधी माझी माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर चर्चा झाली आहे. त्यांनी माझ्या अध्यतेखाली एक समिती नेमली आहे. या समितीमध्ये आणखी दोन मंत्री महोदयांचा समावेश आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

या प्रकरणी सर्व तयारी पूर्ण होत असताना हायकोर्टाचा एक निर्णय आला. होयकोर्टाने बॅक-डोअर एण्ट्री बंद करण्याचा निर्णय घेतला आणि महाराष्ट्र शासनाने तशा प्रकारचे पत्रक काढले. त्यानंतर पुन्हा चर्चा झाली. पुन्हा माननीय मुख्यमंत्र्यांसमवेत बैठक झाली. अभियोक्त्यांना बोलावून त्यांचे मत घेतले ते उलट आल्यामुळे पुन्हा बैठक घेण्यात आली. या कामगारांची गरज आहे, त्यांना घेतले पाहिजे अशा प्रकारची पुन्हा चर्चा झाली. त्यानंतर मध्यंतरीच्या काळामध्ये पुन्हा बैठक झाल्यानंतर प्रस्ताव दिला. वन विभागाचे 5828, सामाजिक वनीकरण विभागाचे 1448 आणि वन महामंडळाचे 1139 अशा एकूण 8047 वन कामगारांचा एकत्रित प्रस्ताव तयार केलेला आहे. तो प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविल्यानंतर वित्त विभागाने त्यामध्ये त्रुटी काढल्या. त्या त्रुटींची पूर्तता करुन परत प्रस्ताव दिला .वन संघटनेची प्रमुख माणसे माननीय मुख्यमंत्र्यांना भेटली. माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर पुन्हा बैठक झाली. यासंदर्भात योग्य तो निर्णय लागेल. हा सर्व निर्णय करीत असताना पैशाची बाब पुढे येत आहे. 561 कोटी 33 लाख रुपयाचा मोठा बोजा पडणार आहे. हे कशा पध्दतीने करावयाचे, ॲरिअर्स घेणार की घेणार नाही यासंबंदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांसमवेत बैठक होणार आहे. वन विभागाच्या कामगारांना सामाजिक वनीकरण विभागाच्या कामगारांना आणि वन महामंडळाच्या कामगारांना किती पैसे, किती थकबाकी मिळेल असा प्रस्ताव तयार करुन तो वित्त विभागाकडून माननीय मुख्यमंत्र्यांकडे जाणार आहे.

उपसभापती : माननीय वनमंत्र्यांना मला एक गोष्ट सांगावयाची आहे. ठाणे शहरातील पोखरण तलावामध्ये 2 मगरी आहेत. त्या ठिकणी आजूबाजूचे बरेच नागरिक फिरायला जातात, मुले जातात. गेल्या काही दिवसापासून तेथील नौकाविहार बंद झालेला आहे. मुले सहलीचा आनंद घेऊ शकत नाहीत. या मगरी पकडण्याच्या संदर्भात मी वन विभागाला 10-20 वेळा पत्रे लिहिली आहेत. त्याबाबतीत तुमच्या अधिका-यांनी असे विचारले की, मगरींनी आता पर्यन्त कुणाला अपाय केला आहे काय ?

श्री. दिवाकर रावते : असे सांगणा-या अधिका-याला त्या मगरीच्या तोंडी द्यायला पाहिजे.

उपसभापती : माझे म्हणणे असे आहे की, या अधिका-यांना बांधून त्यांच्या तोंडी द्यावे की काय, म्हणजे त्या मगरी अपाय करतात की नाही हे समजू शकेल. गेले दोन-तीन वर्षे माझ्यासारखा

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MAP/ पूर्वी श्री. खंदारे 12:30

(उपसभापती

माणूस पत्रे पाठवित असताना देखील कोणतीही दखल घेतली जात नाही. अतिरिक सचिवांना देखील मी याबाबतीत लिहिले आहे. तसेच आपणाशीही या विषयी उडत उडत बोललो होतो. ठाण्याचा एक नागरिक म्हणून मी आपणास सांगू इच्छितो की ह्या मगरीचे तातडीने स्थलांतर करण्याच्या संदर्भात वन विभागाच्या अधिका-यांना आपण सूचना द्याव्यात.

श्री. बबनराव पाचपुते : ठाणे महानगरपालिकेबरोबर याबाबतीत चर्चा झाली आहे. कर्नाटकमध्ये मगर पकडणारे लोक आहेत. त्यांनी पुण्यामध्ये येऊन एक मगर पकडली. त्यांना निमंत्रण देऊन त्यांच्याकडे हे काम सोपविण्यात येईल. फोनवर याबाबतीत चर्चा झालेली आहे. त्यांना काम देण्याचा निर्णय झालेला आहे. 15 दिवसात निरीक्षण करुन दोन्ही मगरींना ते पकडू शकतात. पुण्यामधील मगर पकडली असेल किंवा आज संध्याकाळपर्यन्त ती पकडली जाईल कर्नाटकातील मगर पकडणा-या एका संस्थेला पुण्यामध्ये मगर पकडण्याचे काम दिले होते.

...नंतर श्री.गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याचा मुद्यासंबंधी.

उपसभापती : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सभागृहाच्या लॉबीमध्ये लहान उपहारगृह आहे व दुस-या माळयावर एक उपहारगृह आहे. या उपहारगृहामध्ये अतिशय निकृष्ट प्रतीचे खाद्यपदार्थ पुरविले जातात. चहा, बटाटे वडे, उत्ताप्पा तसेच जेवण हे सर्व खाद्यपदार्थ निकृष्ट प्रतीचे आम्हाला दिले जातात. आम्ही परवा सायंकाळी 4.00 वाजता सभागृहाच्या लॉबीतील कॅन्टीनमधून उत्ताप्पा हा पदार्थ मागविला. आम्हाला उत्ताप्पा आणून देण्यात आला, परंतु त्याचेसोबत चटणी आणून दिली नाही. आम्ही चटणीची मागणी केली असता उपहारगृहातील कर्मचा-याने उरलेल्या चटणीत पाणी टाकून आणले. सभापती महोदय, आम्हाला कायम अनुदानीत पदार्थ नको आहेत. आमच्याकडून खाद्यपदार्थांचे पैसे घ्यावेत, परंतु आम्हाला या उपहारगृहामधून चांगल्या प्रकारचे खाद्यपदार्थ देण्यात यावेत. यासंबंधी आपण उपहारगृहाच्या संबंधित अधिका-यांना तात्काळ सूचना द्याव्यात अशी सर्व सन्माननीय सदस्यांच्या वतीने मी विनंती करतो. सभापती महोदय, सभागृहाच्या गॅलरीतील उपहारगृहातून "टी बॅग" आपणास दाखविण्यासाठी या ठिकाणी आणली आहे. त्या "टी बॅग" वर " नॉट फॉर रिटेल सेल" असे लिहिलेले आहे. या उपहारगृहातील अधिकारी स्मॅम्पलच्या गोष्टी आणतात आणि त्या गोष्टी आमदारांना देतात. परंतु असे सॅम्पलच्या गोष्टी आमदारांना देणे् योग्य आहे काय? दारिद्रय रेषेखालील कुटुंबियांना जसे धान्य दिले जाते तसे खाद्यपदार्थ आमदारांना दिले जाते. आमदारांना दुस-या माळयावरील उपहारगृहात जागा राखून ठेवण्यात येत नाही. तेथे गेल्यानंतर बसण्यास देखील जागा नसते. आमदारांना चांगल्या प्रतीचे खाद्यपदार्थ देण्यासंदर्भात आपण संबंधितांना तात्काळ आदेश द्यावेत अशी माझी आपणास विनंती आहे.

उपसभापती : आपल्या सूचनेची गंभीर दखल घेतो आणि योग्य ती कार्यवाही करण्यास संबंधिताना सांगतो. या निमित्ताने सर्व सन्माननीय सदस्यांना सल्ला देतो की, आपण बाहेरचे खाणे बंद करावे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : पवना व इंद्रायणी नद्यात सांडपाणी सोडल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात येणे

मु. शी. : पवना व इंद्रायणी नद्यात सांडपाणी सोडल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात येणे यासंबंधी डॉ.नीलम गो-हे,श्री.परशुराम उपरकर ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.नीलम गो-हे (विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" पुणे जिल्हयातील पिंपरी चिंचवड परिसरातील महापालिकेच्या हद्दीतून वाहणा-या पवना नदीत 23 नाल्यांचे सांडपाणी व इंद्रायणी नदीत 6 नाल्यांचे सांडपाणी सोडल्याने सदर दोन्ही नद्यांचे पाणी दुषित होणे, प्रदुषण करणा-या तेथील नऊ कंपन्यांना राज्य प्रदुषण मंडळाने कारवाई करण्याबाबत दाखविलेली अक्षम्य दिरंगाई, सदर सांडपाण्यामुळे पवना व इंद्रायणी नद्यांना गटाराचे स्वरुप आले असून आसपासच्या परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात येणे, प्रदुषण नियंत्रणकरण्याबाबत शासनाने दाखविलेली अक्षम्य उदासिनता, परिणामी जनतेत पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची लाट लक्षात घेता या प्रकरणी शासनाने तातडीने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.हसन मुश्रीफ (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, कोणकोणत्या कारखान्यांना नोटीसा दिल्या आहेत ? सध्या या कारखान्यांचे सांडपाणी नाल्याव्दारे नदीत सोडले जात आहे की त्यांनी त्यासंदर्भात दुरुस्त करण्यासंबंधी ॲक्शन घेतली आहे? शासनाने निवेदनात म्हटले आहे की, यासंदर्भात कार्यवाही करणार आहेत. त्यासाठी आर्थिक तरतूद करण्यात आली आहे काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतून वाहणा-या पवना नदीमध्ये 23 नाल्यांचे सांडपाणी आणि इंद्रायणी नदीत 6 नद्यांचे सांडपाणी सोडले जात आहेत यासंबंधीचा प्रश्न विचारला जात आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमधून 340 एम.एल.डी.सांडपाणी या नद्यांमध्ये जाते. या महानगरपालिकेकडे 260 एम.एल.डी.सांडपणी शुध्द करण्याची यंत्रणा आहे. 95 एम.एल.डी.सांडपाणी या नद्यांमध्ये सोडण्यात येत आहे. महाराष्ट्र प्रदुषण मंडळाने यासंदर्भात महानगरपालिकेला नोटीस दिली होती की, महानगरपालिकेने सुध्दा 126 एम.एल.डी. पाणी शुध्दीकरणाची यंत्रणा कार्यान्वित करावी. त्याप्रमाणे महानगरपालिकेने 126 एम.एल.डी.पाणी शुध्दीकरण यंत्रणा उभारण्याचे काम हाती घेण्यात आले आहे आणि ते काम लवकरात लवकर पूर्ण होईल व या नद्यांमध्ये सांडपाणी सोडले जाते ते बंद होईल. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी प्रश्न विचारलेला आहे की, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत दहा काखान्यांना नोटीस दिली होती. त्या दहाही कारखान्यांनी नंतर पाणी शुध्दीकरण यंत्रणा बसविलेली आहे. हे कारखाने पूर्ववत सुरु झालेले आहे. त्यांनी सांडपाणी शुध्दीकरणाचे काम सुरु केले आहे. या कारखान्यांची यादी आता माझ्याकडे उपलब्ध नाही. ती यादी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

डॉ.नीलम गो-हे : या नद्यांमध्ये दोन प्रकारचे प्रदूषण होते आहे. रासायनिक प्रदूषण होते त्यासंदर्भात प्रदूषण नियंत्रण मंडळाने लक्ष घातलेले आहे. आता पीएमआरडीए तयार झाले आहे. या ठिकाणच्या आसपासची जी गावे आहेत, त्या गावांमध्ये सांडपाण्याची व्यवस्था नाही. तिवळे, रावेत, वाल्हेकरवाडी, त्रिवणीनगर, ज्योतीनगर, नेवाळेवस्ती, पिंपळे गुरव आदि भागातील ग्रामपंचायती क्षेत्रात लोकवस्ती मोठया प्रमाणात वाढली आहे. या ग्रामपंचायती आर्थिकदृष्टया सक्षम नसल्यामुळे सरळ त्या गावातील सांडपाणी नाल्यात सोडतात आणि त्या नाल्यांचे पाणी नदीत टाकले जात आहे. या ग्रामपंचायतींच्या हद्दीतील सांडपाण्याच्या बाबतीत पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने तसेच

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्य शासनाने काय व्यवस्था केलेली आहे ? या कंपन्यांची नावे सगळीकडे जगजाहीर आहेत. एल.के.केमिकल्स,सिता प्लॅस्टीकस्, अनुज इंडस्ट्रीज, विश्वास ॲटो इत्यादी कंपन्या आहेत. या सगळया कंपन्याच्या प्लॅन्टसंदर्भातील साधारण अनुभव असा आहे की, त्यांच्याकडे पाणी शुध्दीकरणाचे प्लॅन्ट आहेत. परंतु या कंपन्या ते प्लॅन्ट पूर्णवेळ चालवित नाहीत. वीज वाचविण्यासाठी ते प्लॅन्ट बंद ठेवतात. ज्यावेळी प्रदुषण महामंडळाचे अधिकारी येतात,त्यावेळी तात्पुरते प्लॅन चालविले जातात. याबाबतीत नियंत्रण करण्यासाठी काय यंत्रणा शासनाकडून निर्माण केली जाणार आहे ? प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या बाबतीत आम्हाला खात्री वाटत नाही. या ग्रामपंचायतीच्या सांडपाण्याच्या बाबतीत शासनाकडून काय उपाययोजना केली जात आहे?

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.1....

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी मघाशी सांगितले की, 340 एमएलडी इतके सांडपाणी या दोन नद्यांमध्ये सोडले जाते. त्यापैकी 207 एमएलडी सांडपाण्याची यंत्रणा महापालिकेकडे आहे. 95 एमएलडी सांडपाणी या नाल्यांमधून सोडले जाते याचा उल्लेख सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी केला. त्याचा ग्रामपंचायतींना फार मोठा उपद्रव होतो. म्हणूनच या महापालिकेने 126 एमएलडी सांडपाणी शुध्दीकरण प्रकल्पाचे काम हाती घेतले आहे. हे काम 2011 मध्ये पूर्ण होईल. त्यानंतर महापालिकेकडून सांडपाणी सोडले जाणे पूर्णपणे बंद होईल. 10 कारखान्यांनी सांडपाणी सोडणे बंद केले ते पुन्हा सुरु केले असा मुद्दा मांडला आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांना कडकपणाने या कारखान्यांवर देखरेख करुन खरोखर या कारखान्यांनी यंत्रणा बसविली आहे की नाही, त्यांच्या कारखान्यातून सांडपाणी सोडले जाते की नाही याबाबत पुन्हा एकदा सूचना देण्यात येतील.

डॉ.नीलम गोऱ्हे : वारकरी मोठया प्रमाणात त्या नद्यांमध्ये पवित्र तीर्थ म्हणून आंघोळ करतात. त्या काळात स्वच्छ पाणीपुरवठा करण्याच्या दृष्टीने काय पावले उचलणार आहात?

श्री.हसन मुश्रीफ : त्याची व्यवस्था महापालिकेला सांगून करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : शहापूर तालुक्यातील आदिवासी पाडे व गावांमध्ये निर्माण झालेले पाण्याचे दुर्भिक्ष्य

मु. शी. : शहापूर तालुक्यातील आदिवासी पाडे व गावांमध्ये निर्माण झालेले पाण्याचे दुर्भिक्ष्य यासंबंधी सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर, जितेंद्र आव्हाड, रणजितसिंह मोहिते-पाटील, प्रा.फौजिया खान, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री लक्ष्मण जगताप, राजेंद्र जैन, डॉ.वसंत पवार, सर्वश्री भास्कर जाधव, रमेश शेंडगे, संजय पाटील,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"शहापूर तालुक्यातील ४० गावे व १०० पाड्यामधील आदिवासी पाण्यासाठी वणवण फिरत असणे, या तालुक्यात सुमारे ६३२ बोअरवेल असून त्यापैकी ४० नादुरुस्त असून प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे नादुरुस्त बोअरवेलचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून परीसरातील नागरीकांना पाण्यासाठी पायपीट करावी लागत असणे, दिनांक २० मार्च, २००९ पासून ३० आदिवासी पाड्यांसाठी केवळ सात टँकरने पाणी पुरवठा करण्यात येणार असून शहापूर पंचायत समितीच्या आवारात अनेक टँकर उभे असूनसुध्दा त्यांना पाणीपुरवठा करण्याचे आदेश प्रशासनाकडून दिले गेलेले नसणे, यामुळे शहापूर तालुक्यातील नागरिकांच्या मनात निर्माण झालेला असंतोष व संतापाची भावना याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.सिध्दाराम म्हेत्रे(पाणीपुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : शहापूर तालुक्यामध्ये 40 गावे व 100 पाडयांमधील आदिवासींना आज 5 जून रोजीपर्यंत पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे. काल अर्थसंकल्प मांडला गेला त्यावेळी रामराज्य आले आहे असे सांगण्यात आले. निवेदनामध्ये म्हटले आहे की, पंचायत समिती आवारामध्ये कोणतेही टँकर उभे नाहीत. लोकांनी पुराव्यानिशी फोटो काढून संबंधित अधिकाऱ्यांना दिले. टँकर आठ दिवस बंद होते. आम्ही समाधानासाठी प्रश्न विचारतो म्हणून तुम्ही समाधान करुन दोन मिनिटात संपवू नका. आपण निवेदनात जे धोक्याचे वाक्य नमूद केले आहे ते भविष्यकाळात सगळ्यांना त्रासदायक ठरणार आहे. मुरबाड, पालघर व वसई तालुक्यात 1 मीटर व डहाणू तालुक्यात 2 मीटरपर्यंत भूजल पातळीत घट झाली आहे, तथापि शहापूर तालुक्यात भूजलाच्या पातळीत घट झालेली नाही असेही निवेदनात म्हटले आहे. पहिले वाक्य नमूद करण्याची गरज नव्हती. केवळ गोलमाल उत्तर देऊन समाधान केले जाते. शहापूर तालुक्याचा संभाव्य पाणीपुरवठा कृती आराखडा तयार करण्यात आला आहे तो केव्हा पूर्ण होईल? शहापूर तालुक्यातील आदिवासी पाडे व गावातील लोकांना पिण्याचे पाणी आणि जीवनावश्यक असणारे पाणी पुरविण्याची व्यवस्था शासन किती दिवसात करणार आहे?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, शहापूर तालुक्यामध्ये एकूण 229 गावे आणि 404 पाडे आहेत. या परिसरात 5 प्रादेशिक पाणीपुरवठा योजना असून काळू नदीवरुन तद्वत महापालिकेच्या पाईपलाईनद्वारे भातसा, बिनवाडी, टाळंबा अशी स्वतंत्र योजना केली आहे. शहापूर तालुक्यात प्रत्यक्षात पाणी टंचाई निर्माण झालेल्या 7 गावांमध्ये व 14 वाड्यांमध्ये 21 नवीन विंधण विहिरी घेऊन तसेच 39 गावे व 86 वाड्यांना 15 टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. शहापूर तालुक्यातील पाणीपुरवठा कायमस्वरुपी सोडविण्यासाठी भारत निर्माण कार्यक्रमांतर्गत 135 नळ पाणीपुरवठा योजना मंजूर असून त्यापैकी 78 योजना पूर्ण करण्यात आल्या असून इतर कामे प्रगतीपथावर आहेत.

श्री.मधुकर चव्हाण : किती काळात योजना पूर्ण करणार आहात? 5-10 वर्षापासून लोकांना पिण्याच्या पाण्याचा प्रश्न भेडसावत आहे. जानेवारी महिन्यापासून टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे.

...2एच.1...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .....

या गावांना व पाड्यांना बैलगाडीने पाणीपुरवठा करणार काय ? याबाबत माननीय मंत्री महोदय लक्ष देणार की नाही ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : महोदय, मी मघाशीच सांगितले की, एकूण 135 योजनांपैकी 78 योजना पूर्ण झाल्या असून इतर योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत व ती कामे सप्टेंबर, 2009 पर्यंत पूर्ण होणार आहेत.

उपसभापती : आता आपण पुढील लक्षवेधी क्र. 3 चर्चेसाठी घेऊ.

श्री. कपिल पाटील : महोदय, लक्षवेधी क्र. 3 ला उत्तर देणारे माननीय राज्यमंत्री व माननीय गृह मंत्री असे दोघेही सभागृहात उपस्थित नाहीत.

उपसभापती : ठीक आहे, लक्षवेधी क्र. 4.

श्री. अरविंद सावंत : महोदय, लक्षवेधी सूचना क्र. 4 ही मी विचारलेली लक्षवेधी सूचना आहे. त्या विषयाचे देखील मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नाहीत.

श्री. कपिल पाटील : महोदय, हे योग्य नाही. काल सुध्दा असाच प्रकार घडला होता. म्हणून माझी सूचना अशी आहे की, सभागृहाची बैठक माननीय मंत्री महोदय येईपर्यंत स्थगित करावी.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, हा प्रकार नेहमीच घडतो ते योग्य नाही.

श्री. रमेशचंद्र बंग : सभापती महोदय, पुढील लक्षवेधी सूचना चर्चेसाठी घ्यावी तोपर्यंत संबंधित विषयांच्या मंत्री महोदयांना बोलाविण्याची व्यवस्था करण्यात येईल.

(माननीय गृह मंत्री सभागृहात हजर होतात.)

उपसभापती : ठीक आहे, आता आपण लक्षवेधी सूचना क्र. 3 चर्चेसाठी घेऊ.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: 26 नोव्हेंबर, 2008 रोजी मुंबईवरील हल्ल्यात धारातीर्थी पडलेल्या पोलीस अधिकाऱ्यांच्या कुटुंबियांची होत असलेली अवहेलना

मु.शी.: 26 नोव्हेंबर, 2008 रोजी मुंबईवरील हल्ल्यात धारातीर्थी पडलेल्या पोलीस अधिकाऱ्यांच्या कुटुंबियांची होत असलेली अवहेलना यासंबंधी सर्वश्री कपिल पाटील, दिलीपराव सोनवणे, जयंत पाटील, व्ही. यु. डायगव्हाणे, जितेंद्र आव्हाड, लक्ष्मण जगताप, राजेंद्र जैन, डॉ. वसंत पवार, सर्वश्री भास्कर जाधव, रमेश शेंडगे, संजय पाटील,प्रा.फौजीया खान,श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री. अनिल परब, दिवाकर रावते,डॉ. दीपक सावंत, सर्वश्री.अरविंद सावंत, किरण पावसकर, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री. परशुराम उपरकर, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, संजय केळकर, रामनाथ मोते, किशनचंद तनवाणी, सुरेश जेथलिया वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो व याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबईवर दिनांक 26 नोव्हेंबर, 2008 रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा प्रतिकार करण्यात राज्य सरकारच्या यंत्रणेला आलेल्या अपयशाच्या कारणांचा शोध घेण्यास शासनाने नेमलेल्या प्रधान समितीने अधिकाऱ्यांचे अपयश दुर्लक्षित करण्याचा केलेला प्रयत्न, वीर शहीद पोलिस अधिकारी व जवानांचे प्राण वाचविण्यास आलेले अपयश झाकण्याचा केलेला प्रयत्न, शहिदांच्या वीर पत्नींनी याबाबत व्यक्त केलेला संताप आणि शहीद कुटुंबियांचा झालेला अपमान, शहीद कुटुंबियांच्या पुढील आयुष्यासाठी राज्य शासनाने सर्वोतोपरी सहाय्य व तजवीज करण्यासाठी दिनांक 1 डिसेंबर, 2008 रोजी जाहीर केलेले विशेष पॅकेज प्रत्यक्ष अंमलबजावणीत आणताना त्यातून प्रशासनाने शोधलेल्या पळवाटा, शहीद कुटुंबियांना देण्यात येणाऱ्या एकरकमी 25 लाख रुपयांच्या सानुग्रह अनुदानात करण्यात आलेली तरतूद, शहिदांच्या दोन अपत्यांना पदव्युत्तर स्तरापर्यंत मोफत शिक्षण देण्याच्या विशेष पॅकेजमधील तरतुदीत दिनांक 23 जानेवारी 2009 रोजीच्या नविन शासन निर्णयात फक्त इयत्ता 12 वी पर्यंत मोफत शिक्षण असा करण्यात आलेला फेरबदल आणि पुढील शैक्षणिक खर्चास दिलेला नकार, दिनांक 30 मार्च, 2009 रोजी श्रीमती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील .....

मानसी शशांक शिंदे यांना राज्य शासनाने पाठवलेले पत्र, याबद्दल नापसंती व्यक्त करणाऱ्या वीरपत्नींना शहिदांवरील अत्यंसस्कारांचा खर्च शासनाने केल्याची उपकाराची भाषा वापरत शासनाने दिलेले अपमानास्पद उत्तर, शासनाकडून आम्हाला न्याय मिळू शकत नाही, असा वीरपत्नींनी व्यक्त केलेला सात्विक संताप, यामुळे राज्य शासनाविषयी निर्माण झालेली सार्वत्रिक चीड आणि तीव्र संताप याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. जयंत पाटील (गृह मंत्री) : महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

नि वे द न

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, ज्या उद्देशाने ही लक्षवेधी सूचना विचारलेली आहे तो विचारात तर घेतलाच नाही परंतु शासनाने जे निवेदन दिलेले आहे त्यावरुन शासन किती बेफिकीरपणा दाखवित आहे हेच दिसून येते. शासनाने मदत केल्याचा जो आव आणला आहे त्याबद्दल श्रीमती करकरे, श्रीमती कामटे आणि श्रीमती साळसकर या वीर पत्नींनी संताप व्यक्त केला होता. परंतु लक्षवेधी सूचनेला शासनाने जे उत्तर दिले ते तर त्याहुनही संतापजनक आहे आणि तसा खुलासाही वर्तमानपत्रातून सविस्तरपणे दिलेला आहे. 25 लाखाचे सानुग्रह अनुदान देण्याची भाषा शासनाने केली त्यासंबंधीचा जो मूळ निर्णय आहे त्यातच असे म्हटले आहे की, अशा मृत झालेल्यांच्या कुटुंबियांना 13 लाखाचे सानुग्रह अनुदान देण्यात येते. आता 25 लाख रुपये देण्यात येणार असल्यामुळे ते देय राहणार नाही. नंतर असा खुलासा केला की, कामावर असताना जे देय असते ते या पोलिसांना लागू नाही, हे मूळ निर्णयात आहे. तिसरा भाग म्हणजे पदवीपर्यंतचे शिक्षण मोफत देण्याची व्यवस्था शासन करणार होते परंतु त्यानंतर श्रीमती मानसी शिंदे यांनी त्यांच्या अपत्याच्या शिक्षणाबाबत ज्यावेळेस अर्ज केला तेव्हा त्यांना उत्तर देण्यात आले की, बारावीपर्यंतचे शिक्षण देण्याची जबाबदारी आमची आहे, त्यापुढील शिक्षणाची नाही. उच्च शिक्षण व त्यापुढील शिक्षण देण्याची व्यवस्था कोणी करावी याचा खुलासा शासन करणार काय ?

श्री. जयंत पाटील : महोदय, शालेय शिक्षण विभागाची जी जबाबदारी आहे ती त्यांनी पार पाडून तसा जी.आर. देखील काढला व त्यांची माहिती त्यांना देण्यात आली आहे. उच्च शिक्षणासंबंधीचाही जी.आर. शासनाने काढला असून जे 18 शहीद झाले त्यातील 14 अधिकारी आपल्या पोलीस दलातील होते त्यांच्या कुटुंबियांना मी समक्ष भेटलो आहे. त्यावेळी त्यांना सांगितले की, यासंदर्भात पुढे कोणतीही अडचण आली तरी मला अथवा माझ्या कार्यालयात संपर्क करावा. खास करुन उच्च शिक्षण विभागाने सुध्दा यासंबंधीचा जी.आर. काढलेला आहे. अशा प्रकारे दोन वेगवेगळे विभाग असल्यामुळे गैरसमज निर्माण झाला आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी यासंदर्भात दिलगिरी व्यक्त करावी.

श्री. जयंत पाटील : यासंदर्भातील उल्लेख कोणी केला याची माहिती माझ्याकडे नाही. परंतु अशा प्रकारचा उल्लेख कोणी केला असेल असे मला वाटत नाही किंवा मी अशा प्रकारचा खुलासा कधीही केलेला नाही. खर्चाच्या संदर्भात चर्चा होते त्यावेळी खर्चाचा सर्व तपशील एकत्रित दिला जातो. कदाचित त्या खर्चाच्या तपशिलाचा अर्थ वेगळा काढला गेला असेल तसेच यासंदर्भात कोणी तशा प्रकारे उल्लेख केला असेल असे मला वाटत नाही.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, अशा प्रकारचा खुलासा करण्यात आलेला नाही असे मंत्री महोदय जे म्हणतात ते बरोबर नाही. सर्व वर्तमानपत्रात यासंदर्भात पोलीस विभागाकडून व शासनाकडून सविस्तर खुलासा करण्यात आलेला आहे. माननीय मंत्री महोदयांनी व्यक्तिशः खुलासा केलेला आहे, असे मी म्हणत नाही परंतु गृहविभगाचे प्रमुख म्हणून ही जबाबदारी आपल्यावर येते. त्यामुळे गृहमंत्र्यांनी सभागृहाची दिलगिरी व्यक्त करणे आवश्यक आहे.

श्री. जयंत पाटील : ज्यावेळी खर्चाच्या तपशिलाची चर्चा होते त्यावेळी कदाचित विभागात कोण कोणते खर्च झाले यासंदर्भात तपशील दिला गेला असेल व त्यामुळे कोणाच्या भावना दुखावल्या असतील परंतु यामागे कोणाच्याही भावना दुखावण्याचा उद्देश कदापिही नाही. तसेच पोलीस विभागाच्या प्रमुखांनी अशा प्रकारचा खुलासा केला नसेल असे मला वाटते. जे अधिकारी व कर्मचारी या हल्ल्यामध्ये शहीद झाले त्यांच्या कुटुंबाच्या भावना दुखावण्याचा हेतू कदापिही नाही. तरी सुध्दा यामुळे कोणाच्या भावना दुखावल्या असतील तर मी दिलगिरी व्यक्त करतो.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : पुण्याजवळील कोथरुड येथील कमिन्स इंडिया लि.या कंपनीने कंर्मचा-यांना अकारण सेवेतून काढून टाकणे तसेच भूमिपूत्राना डावलून केलेली मनमानी नोकरभरती

मु. शी. : पुण्याजवळील कोथरुड येथील कमिन्स इंडिया लि.या कंपनीने कंर्मचा-यांना अकारण सेवेतून काढून टाकणे तसेच भूमिपूत्राना डावलून केलेली मनमानी नोकरभरती यासंबंधी सर्वश्री अरविदं सावंत, दिवाकर रावते, डॉ. नीलम गो-हे, सर्वश्री किरण पावसकर, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"पुण्याजवळील कोथरुड येथील कमिन्स इंडिया लिमिटेड या कंपनीने सुमारे २५ वर्षे सेवा केलेल्या कर्मचाऱ्यांना अकारण निलंबित करुन त्यानंतर त्यांना सेवेतून कायमस्वरुपी काढून टाकणे, सदर कंपनीने भूमीपूत्रांना ८० टक्के नोकऱ्या देण्याचा शासनाच्या आदेशाची पायमल्ली करणे, १८०० कामगारांच्या भरतीत मराठी स्थानिक भूमिपूत्रांची संख्या जाणीवपूर्वक कमी ठेवण्यात येणे, बडतर्फ कर्मचाऱ्यांना सेवेत समाविष्ट करुन घेण्यात येईल अशी राज्य शासनाने दिलेली ग्वाही, परंतु कंपनीने भूमिपूत्रांना डावलून केलेली मनमानी, कमिन्स इंडिया कंपनीने ८० टक्के भूमिपूत्रांना नोकरीबाबत शासनाने आदेश डावलल्याने व स्थानिक कामगारांवर भरतीत केलेल्या अन्यायामुळे कामगारांमध्ये व जनतेत पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची लाट लक्षात घेता शासनाने तातडीने केलेली व करावयाची उपाययोजना वा शासनाची प्रतिक्रिया."

श्री. नवाब मलिक (कामगार मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात मी नागपूर येथे झालेल्या डिसेंबर, 2008 च्या अधिवेशनात विशेष उल्लेख उपस्थित केला होता. परंतु मी उपस्थित केलेल्या विशेष उल्लेखाच्या संदर्भात आजपर्यंत विभागाकडून उत्तर आलेले नसल्यामुळे मी माननीय सभापती महोदयांना तशा प्रकारचे पत्र दिले होते. त्यामुळे माननीय सभापती महोदयांच्या कार्यालयातून 16 मार्च, 2009 रोजी सचिव महाराष्ट्र शासन, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग यांना पत्र लिहिण्यात आले. परंतु या पत्राचे देखील आजपर्यंत उत्तर आलेले नाही. त्यामुळे दिनांक 25 मार्च, 2009 रोजी श्रम आयुक्त, पुणे यांना पत्र लिहिले त्याचेही उत्तर मला आजपर्यंत आले नाही. मी उपस्थित केलेल्या विशेष उल्लेखाला उत्तर येत नसल्यामुळे यासंदर्भात संशय निर्माण होतो. मी उपस्थित केलेल्या विशेष उल्लेखाच्या संदर्भात मला पत्र न आल्यामुळे मी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून हा प्रश्न उपस्थित केलेला आहे. कमिन्स इंडिया लि. कोथरुड, पुणेच्या संदर्भात माझे फक्त बडतर्फ आणि नोकरभरती असे दोनच प्रश्न आहेत. या कंपनीतील सहा कामगारांना बडतर्फ केले होते व त्यामुळे या कामगारांनी आंदोलन केले होते. लेखी उत्तरात आपण म्हटले आहे की, औद्योगिक न्यायालय, पुणे यांनी जो प्रतिबंधात्मक आदेश दिला होता त्याचे उल्लंघन केल्याच्या कारणास्तव तसेच इतर विविध आरोप ठेवून 6 कामगारांना चौकशी पूर्ण होईपर्यंत करण्यात आले होते. व चौकशी पूर्ण झाल्यानंतर 6 कामगारांना चौकशी अहवालाच्या आधारे बडतर्फ करण्यात आले व 3 कामगारांना वारंवार गैरहजेरीच्या कारणावरून बडतर्फ करण्यात आले तसेच 1 कामगाराला दि. 1.3.07 पासून निलंबित करण्यात आले आहे. परंतु या कामगारांना कंपनीच्या अधिका-यांनी अश्लाघ्य शब्द वापरले होते. अधिका-यांनी कामगारांच्या संदर्भात जे शब्द वापरले होते ते शब्द मी या ठिकाणी उच्चारू सुध्दा शक्त नाही. या कपंनीच्या अधिका-यांनी या कामगारांच्या कुटुंबाना तसेच त्यांच्या घरातील महिलांच्या संदर्भात अश्लाघ्य शब्द वापरले होते त्यामुळे या कामगारांनी कंपनीच्या बाहेर आंदोलन केल्यामुळे या कामगारांना बडतर्फ करण्यात आलेले आहे त्यामुळे शासन या प्रश्नाच्या संदर्भात लक्ष घालणार आहे काय?

दुसरा प्रश्न असा आहे की, कंपलसरी नोटीफिकेशन ऑफ एम्पलॉयमेंट एक्सचेंज ॲक्ट नुसार नोकरभरती करतांना कंपनीने सेवा योजन कार्यालयाला कळविले होते काय?

यानंतर श्री. गायकवाड...

अशुद्धीरहित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविद सावंत ..

माझा असा दावा आहे की, या कंपनीने एकूण 1489 कामगारांची भरती केली असून त्यापैकी 825 कामगार परप्रांतीय आहेत. 80 टक्के स्थानिक तरुणांची भरती करावयास पाहिजे असा जी.आर. असतांना या कंपनीने या जी.आर.च्या विरोधात 825 पर प्रांतीय आणि 664 स्थानिक तरुणांची भरती केली आहे. तेव्हा यासबंधी चौकशी करुन जी.आर.नुसार सबंधित कंपनीच्या विरुध्द कारवाई करण्यात येणार आहे काय ?

श्री.नवाब मलिक : सभापती महोदय सन्माननीय सदस्यांनी तीन चार प्रश्न एकाच वेळी विचालेले आहेत. कमिन्स इंडिया या कंपनीमध्ये जे कामगार कामावर होते त्यांची अशी मागणी होती की निवृत्तीचे वय 58 ऐवजी दोन वर्षानी वाढवून 60 वर्षे करण्यात यावे. त्या मागणीच्या संदर्भात कंपनीमध्ये आणि कंपनीच्या बाहेर त्यांचे आंदोलन सुरु होते . त्यामुळे व्यवस्थ्ांपनाने न्यायालयातून जाऊन 200 मिटर्सपर्यत आदोलन करता येणार नाही अशा प्रकारचा बंदी आदेश आणला होता. त्यानंतर त्या आदेशावर पुन्हा सुधारित आदेश देऊन ही मर्यादा 100 मिटर्सची करण्यात आली होती. त्या नियमाचे उल्लंघन होत असल्यामुळे संबंधित कामागारांना नोटीस देऊन निलंबित करण्यात आले तसेच बडतर्फ करण्यात आले होते. या प्रकरणी कामगार आयुक्ताकडे तीन कामगारांनी दाद मागितली होती परंतु कामगार आयुक्ताला किंवा शासनाला या बाबतीत निर्णय देण्याचा क्वासी ज्युडिशिअल अधिकार कामगार कायद्यात नाही. त्यांच्याकडे हे प्रकरण फक्त रेफर करता येते . त्यामुळे हे प्रकरण त्यांच्याकडे रेफर करण्यात आले असून आता सबंधित प्रकरण न्यायालयासमोर आहे . सन्माननीय सदस्यांनी कामगार भरतीच्या बाबतीत प्रश्न विचारला असून त्या सबंधी मला अशी माहिती मिळालेली आहे की , कमिन्स इंडिया लिमिटेड मध्ये जी भरती झालेली आहे त्यात 90 टक्के भूमिपूत्र आहेत...

श्री.अरविद सावंत : माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री.नवाब मलिक : माझे उत्तर पूर्ण झाल्यानंतर सन्माननीय सदस्यांनी हरकीचा मुद्दा मांडावा. सन्माननीय सदस्यांकडे भूमिपूत्रांची नावे आणि आकडेवारी असतील तर ती द्यावीत 80 टक्के भमिपूत्रांची नोकर भरती करावयास पाहिजे असा जी.आर. असतांना तो डावलून जर नोकर भरती केली असेल तर त्याबाबतीत संबंधित व्यवस्थापना विरुध्द कारवाई करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : जळगाव जिल्हयातील पारोळा येथे फटाक्याच्या कारखान्यात स्फोट होऊन 30 व्यक्तिंचा झालेला मृत्यू

मु.शी : जळगाव जिल्हयातील पारोळा येथे फटाक्याच्या कारखान्यात स्फोट होऊन 30 व्यक्तिंचा झालेला मृत्यू या सबंधी श्रीमती मंदा म्हात्रे यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्रीमती मंदा म्हात्रे (विधान सभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

" पारोळा जि.जळगांव येथे दिनांक १० एप्रिल, २००९ रोजी फटाक्याच्या कारखान्यात स्फोट होऊन सुमारे ३० व्यक्ती मृत्यूमुखी व ५० व्यक्ती जखमी होणे, सदरचा फटाक्याचा कारखाना बेकायदेशीर असणे कारखान्याच्या शेजारी एम.एस.ई.बी.चे पॉवर स्टेशन असणे, तसेच स्फोट झाला त्यावेळी कारखान्याच्या आवारातच रॉकेलचा २५ बॅरल बेकायदा साठा असणे, सदरचा कारखाना अत्यंत बेकायदा असून तेथे सुरक्षेसंबंधी कोणतीही उपाययोजना नसून तेथे लहान मुले व महिलांना धोकादायकरितीने कामास लावून आवारातच रॉकेल साठा ठेवला जात असून त्याच आवारात वेल्डिंग रॉड बनविण्याचा देखील कारखाना असणे, अशा परिस्थितीत कधीही मोठा अपघात होऊ शकतो अशी तक्रार तेथील स्थानिक नागरिकांनी दिनांक ३ फेब्रुवारी, २००९ रोजी पारोळा पोलीस स्टेशन, दिनांक ५ फेब्रुवारी, २००९ रोजी तहसिलदार पारोळा व दिनांक ३० जानेवारी,२००९ रोजी जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडे लेखी स्वरुपात केली असतांना प्रशासनाचे त्याकडे दुर्लक्ष होणे संबंधितांनी वेळीच कार्यवाही केली असती तर सदरचा अपघात झाला नसता अशी जनमानसात निर्माण झालेली प्रतिक्रिया व पसरलेला असंतोष याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना आणि शासनाची भूमिका."

श्री. नवाब मलिक (कामगार मंत्री) :सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस : कृपया येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदना नतर

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना अत्यंत महत्वाची आहे राज्यामध्ये बाल कामगारांना कामावर ठेवण्यास बंदी असतांना सुध्दा पारोळा येथील फटाक्याच्या कारखान्यात बालकामगारांना कामावर ठेवण्यात आले होते त्या ठिकाणी स्फोट होऊन 5 बाल कामगारांचा मृत्यू झाला आहे त्याचबरोबर काही महिलांचे मृत्यू झाले आहेत. या अपघातामध्ये 9 महिला ृ 8 पुरुष् आणि 9 बाल कामगार जखमी झालेले आहेत. या लक्षवेधी सूचनेला चुकीचे आणि दिशाभूल करणारे उत्तर देण्यात आलेले आहे. माझ्याकडे काही पुरावे असून ते मी आपल्याकडे पाठवणार आहे.

सभापती महोदय, निवेदनामध्ये 25 जणांचा मृत्यू झाला आहे असे सांगितले आहे परतु प्रत्यक्षात 26 जण मृत्युमुखी पडलेले आहेत. त्याचबरोबर हा कारखाना नोदणीकृत आहे असे सांगण्यात आले आहे. सहा महिन्यापूर्वी हा कारखाना नोंदणीकृत नव्हता अशी माहितीच्या अधिकाराखाली माहिती मिळालेली आहे.सभापती महोदय, एक्प्लोझिव्ह डिपार्टमेन्ट कन्ट्रोल ,नागपूर आपली जबाबदारी आता झटकत आहेत. सहा महिन्यापूर्वी या कारखान्याचा परवाना रदद करण्यात आला होता असे ते सांगत आहेत. मला माननीय मंत्री महोदयाना असा प्रश्न विचारावयाचा आहे की, सहा महिन्यापूर्वी जर या कारखन्याचा परवाना रद्द करण्यात आला होता असे सांगण्यात आले आहे परंतु संबधित अधिका-यांनी जर त्या ठिकाणी भेंट देऊन माहिती घेतली असती तर त्या ठिकाणी स्फोट होऊन त्यांचा जो मृत्यू झाला आहे तो टाळता आला असता.त्याचबरोबर सामाजिक कार्यकर्त्यानी जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक जळगाव तसेच स्फोटक नियंत्रक,अधीक्षक नागपूर यांना दोन तीन महिन्यापूर्वी पत्र दिले होते . त्या पत्रात त्यांनी असे म्हटले की, नुकतेच बीड येथे फटाका कारखान्यात मालकाच्या हलगर्जीपणामुळे स्फोट झाला होता तेव्हा अशा प्रकारचे पत्र देऊन सुध्दा अधिका-यांनी निष्काळजीपणा केलेला आहे. त्यामुळे कामगार मृत्युमुखी पडलेले आहेत ....

नतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत/शोधनेपर्यंत नाही

श्रीमती मंदा म्हात्रे ....

काल तो मालक जामिनावर सुटला आहे, खरे म्हणजे तो जामिनावर सुटतोच कसा ? त्याच्यावर कोठली कलमे लावण्यात आली होती ? सभापती महोदय, या घटनेमध्ये जे जे मृत्यूमुखी पडलेले लोक आहेत त्याला संबंधित अधिकारी आणि सदरहू मालक हेच जबाबदार आहेत आणि म्हणून त्यांच्याकडून या घटनेत मृत्यूमुखी पडलेल्यांच्या वारसांना 5-5 लाख रूपये भरपाई दिली गेली पाहिजे तशी ती आपण देववणार आहात का ? तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर आपण कोणती कारवाई करणार आहात ?

श्री. नबाब मलिक : सभापती महोदय, ही घटना दु:खद आहे आणि या घटनेतील हा जो फटाक्याचा कारखाना होता तो नोंदणीकृत आहे परंतु त्यांच्याकडे कारखान्यास परवानगी नव्हती. त्या कारखान्यास प्रथमत: डायरेक्टर ऑफ एक्स्प्लोसिव्ह यांनी परवाना दिला होता, पण तो दिल्यानंतर त्यांची जी तेथे व्हिजिट झाली त्यात तेथील व्हायोलन्समुळे तो परवाना रद्द करण्यात आला होता आणि त्याची माहिती जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेली होती. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्याची ही जबाबदारी होती की, लगेच त्या कारखान्याला सील करून तेथील उत्पादन त्यांनी बंद केले पाहिजे होते. परंतु त्या संदर्भात जिल्हाधिकारी यांचेकडून एस.पी. यांना पत्र पाठविण्यात आले. सकृतदर्शनी हे प्रकरण पाहिले तर यामध्ये शासनाची हलगर्जी झालेली आहे हे आम्हाला मान्य आहे. त्यासाठी त्या जिल्ह्यातील जिल्हाधिकारी तसेच एस.पी. यांची तात्काळ बदली करून आमचे तेथील जे जे अधिकारी आहेत त्यांची देखील बदली करून या संपूर्ण प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करण्यात येईल आणि त्या चौकशीमध्ये जे दोषी आढळून येतील त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल. सभापती महोदय, या प्रकरणात शासकीय यंत्रणेकडून हलगर्जीपणा झाल्याचे आढळून आले आहे. जिल्हाधिकारी, एस.पी. तसेच कामगार खात्याच्या अधिकाऱ्यांकडून डोळेझाक झाली आहे त्यामुळेच ही घटना घडलेली आहे, हे लक्षात घेऊन त्या सर्व संबंधित अधिकाऱ्यांची बदली करण्यात येऊन या प्रकरणी न्यायालयीन चौकशी करून त्यात दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल हे मी सांगितलेच आहे. तसेच या घटनेत मृत पावलेल्यांना शासनाच्या नियमानुसार भरपाई देखील दिली जाईल. तसेच हा जो मालक आहे, श्री.शिरोडे म्हणून, ते तेथील नगराध्यक्ष देखील आहेत आणि त्या सगळ्यांना अटक करण्यात आली होती पण कालच सेशन कोर्टामध्ये त्या मालकाला जामीन मंजूर करण्यात आलेला आहे. ...

..... केके 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मलिक ....

सभापती महोदय, सदरहू मालकाना सेशन कोर्टाकडून जामीन मिळालेला आहे. मात्र शासन मान्य करते आहे की, यामध्ये शासकीय अधिकाऱ्यांची चूक झालेली आहे आणि त्यामुळेच ही घटना घडली आहे. म्हणूनच अगदी जिल्हाधिकारी, एस.पी. सह सर्वच संबंधित अधिकाऱ्यांची तेथून बदली करण्यात येऊनर या साऱ्या प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करण्यात येऊन चौकशीत जे दोषी आढळतील त्यांच्यावर नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल. शासनाने या घटनेतील मृत तसेच जखमींना नियमानुसार भरपाई दिलेली आहे. तसेच मालकाकडून देखील त्यांना भरपाई देण्याच्या दृष्टीने कायद्यातील तरतुदीनुसार सर्व काही करण्यात येईल.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, त्या ठिकाणी 30-30 माणसे मरतात पण तरी देखील त्या मालकाला लगेच जामीन मिळतो. हे कसे काय होते ?

श्री. नबाब मलिक : सभापती महोदय, ही न्यायालयीन प्रक्रिया आहे आणि त्यात शासनाला हस्तक्षेप करता येत नाही. कोर्टाने एखादा निर्णय दिल्यानंतर त्याच्या विरोधात कारवाई करता येत नाही. या मालकाला पोलिसांनी अटक केली होती पण सेशन कोर्टाकडून त्याला जामीन मिळाला आहे. तरीही या प्रकरणी न्यायालयीन चौकशी करण्यात येऊन त्यात जे दोषी आढळतील त्या सर्वांवर नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल.

***

..... केके 3 ...

अशुधारित प्रत / अशुद्धीसाठी नाही

पृ. शी. : सिंधुदुर्ग जिल्ह्यात कोल्हापूर येथील महाबीज व राष्ट्रीय बीज निगम कंपनीकडून पुरविण्यात आलेले निकृष्ट बियाणे व त्यामुळे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान.

मु. शी. : सिंधुदुर्ग जिल्ह्यात कोल्हापूर येथील महाबीज व राष्ट्रीय बीज निगम कंपनीकडून पुरविण्यात आलेले निकृष्ट बियाणे व त्यामुळे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान यासंबंधी सर्वश्री राजन तेली, जयप्रकाश छाजेड, सुभाष चव्हाण, उल्हास पवार, संजय दत्त, मोहन जोशी, सय्यद जामा, चरणसिंह सप्रा, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय कृषी मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" सिंधुदुर्ग जिल्ह्यात कोल्हापूर येथील महाबीज व राष्ट्रीय बीज निगम कंपनीकडून यावर्षी शेतकऱ्यांना पुरविण्यात आलेले भुईमुगाचे बियाणे निकृष्ट दर्जाचे असल्याने या बियाण्याची उगवण न झाल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात झालेले नुकसान., शेतकऱ्यांची या दोन्ही कंपन्यांकडून फसवणूक झाल्याने शेतकरी वर्ग चिंतातूर होऊन, झालेल्या नुकसानीची भरपाई मिळण्याबाबत शेतकरी वर्गाकडून वारंवार होत असलेली मागणी, भात पीक नुकसानपोटी प्राप्त झालेले अनुदान व नारळ पीक संरक्षण योजनेंतर्गत मंजूर झालेला निधी शेतकऱ्यांना अद्याप न मिळणे, परिणामी शेतकऱ्यांत शासनाबद्दल निर्माण झालेली चिडीची भावना, त्यामुळे जनतेत पसरलेला असंतोष, उक्त योजनेंतर्गत मंजूर झालेले अनुदान तसेच नुकसान भरपाई वेळेत मिळण्याची गरज, यावर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाय योजना. "

श्री. सुरेश बरपुडकर (कृषी राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

(यानंतर श्री.सरफरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली : सभापती महोदय, माझा पहिला प्रश्न असा आहे की, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाकडून नुकसान भरपाई केव्हा दिली जाईल? सन 2006-07 च्या खरीप हंगामातील भात पिकाच्या नुकसान भरपाईपोटी द्यावयाची रक्कम रु.745 लाख दाखविण्यात आली आहे. व त्यापैकी 96 लाख 22 हजार खर्च करण्यात आले आहेत. ज्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई अद्यापि मिळालेली नाही त्यांना किती दिवसात नुकसान भरपाई दिली जाईल? तसेच, लाभार्थ्यांच्या याद्या अप्राप्त असल्याचे म्हटले आहे. एक वर्ष झाले तरी शेतकऱ्यांना नुकसान भरपाई न देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल काय?

श्री. सुरेश वरपुडकर : सभापती महोदय, भातपीक नुकसान भरपाई एक महिन्याच्या आत दिली जाईल. भात पिकाच्या संदर्भात आमच्या विभागाने जिल्हाधिकांकडे पूर्णपणे अनुदान दिले आहे. परंतु शेतकऱ्यांच्या याद्या वेळेवर न आल्यामुळे अनुदानाचे वाटप झाले नाही. जसजशा याद्या प्राप्त होतील त्याप्रमाणे आपण अनुदानाचे वाटप करावे अशाप्रकारच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, सन 2006-07 मधील भात पिकाच्या झालेल्या नुकसानीपोटी मिळावयाचे अनुदान कृषी व महसूल विभागाच्या चुकीमुळे परत गेले. त्याबाबत आपण जबाबदारी फिक्स करणार काय? त्यामुळे भात बियाणे अनुदान पुन्हा प्राप्त झाल्यानंतर ते केव्हा वाटप करण्यात येईल? तसेच, भुईमूगाचे बियाणे कणकवली, कुडाळ व सावंतवाडी या तालुक्यांमध्ये वाटप केल्यानंतर त्याची उगवण झाली नाही. त्याचप्रमाणे अन्य तालुक्यांमध्ये सुध्दा वाटप करण्यात आलेल्या भुईमूगाच्या बियाण्याची उगवण झाली नाही. त्याची सुध्दा कृषी विभागामार्फत चौकशी केली जाईल काय?

श्री. सुरेश वरपुडकर : सभापती महोदय, कृषी विभागाने जिल्हाधिकाऱ्यांकडे पूर्णपणे याद्या मागितल्या होत्या. परंतु जिल्हाधिकाऱ्यांकडे वारंवार मागणी करुन सुध्दा त्यांच्याकडून याद्या मिळाल्या नाहीत. म्हणून त्या याद्या मिळण्यासंबंधी आयुक्तांना सूचना देण्यात आलेली आहे. यामध्ये जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत आयुक्तांना कळविण्यात आले असून ती कारवाई केली जाईल. आणि अनुदानाचे लवकरात लवकर वाटप केले जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ KGS/

श्री. राजन तेली : सभापती महोदय, हे सन 2006-07 मधील अनुदान असून 2009 सालापर्यंत याबाबतीत दिरंगाई झाली आहे. ज्या अधिकाऱ्यांकडून दिरंगाई झाली आहे त्यांच्यावर किती दिवसात कारवाई करणार?

श्री. सुरेश वरपुडकर : लवकरात लवकर कारवाई करु.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ KGS/

नामफलक बदलण्यासंबंधी माननीय उपसभापतींनी दिलेल्या निदेशासंबंधी

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, शहरामध्ये रेल्वे स्थानके वगैरे ठिकठिकाणी फलकांवरील नाव मराठीमध्ये व पूर्ण नाव लिहिण्याबाबत आपण शासनाला निदेश दिले होते. त्याबाबत वर्तमानपत्रामध्ये बातमी छापून आली आहे ती आपण वाचली असावी...

उपसभापती : मघाशी माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी वेगवेगळया वर्तमानपत्रामध्ये वेगवेगळया बातम्या छापून आल्या असल्याचे सभागृहामध्ये सांगितले. जे घडले आहे ते कुठेच दिसले नाही. मी त्याठिकाणी जाऊन आलो आणि पाहिले आहे ही वस्तुस्थिती आहे. नामफलक बदलण्यासंबंधी शासनाला अकरा वाजेपर्यंत वेळ दिली होती, त्या दृष्टीने कार्यवाही सुरु झाली आहे. तेव्हा माणुसकीच्या भावनेतून आपण आणखी एक-दोन दिवसांचा अवधी देऊ शकतो. वर्तमानपत्रामध्ये कोण कशा बातम्या छापतात हे आपल्याला माहीत आहे. माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी हे कधीही चुकीचे बोलत नाहीत. त्यामुळे वर्तमानपत्रामध्ये जी बातमी आली आहे तिचा आपण व्यवस्थित समाचार घेऊ.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, त्याचप्रमाणे आपण एम.एम.आर.डी.ए.ला सांगावे...

उपसभापती : आपण मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण असे म्हणावे...

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे फलक द्रुतगती मार्गावर लावण्यात आले आहेत. त्याठिकाणी सुध्दा पूर्णपणे नाव लिहिण्यास सांगावे...

उपसभापती : त्यांना सुध्दा कळविण्यात आले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : नागपूरच्या मेयो हॉस्पिटलने पाठविलेला अहवाल मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाने नामंजूर करणे.

मु. शी. : नागपूरच्या मेयो हॉस्पिटलने पाठविलेला अहवाल मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाने नामंजूर करणे यासंबंधी सर्वश्री अशोक मानकर, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. अशोक मानकर (नागपूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नागपूर शहरातील मेयो हॉस्पिटलने पाठविलेला अहवाल मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाने नामंजूर करणे, त्यामुळे एम.बी.बी.एस. च्या 100 जागांपैकी 40 जागा कमी करणे, शासनाने मेयो हॉस्पिटलच्या विकासासाठी 10 कोटी रुपये देण्याचा निर्णय घेऊनही शासनाकडून निधी उपलब्ध न होणे, त्यामुळे मेयो हॉस्पिटलचा थांबलेला विकास, जागा कमी झाल्याने विदर्भातील विद्यार्थ्यांचे प्रवेशाअभावी भविष्य धोक्यात येणे, परिणामी विद्यार्थ्यांमध्ये व पालकांमध्ये पसरलेले चिंतेचे वातावरण व शासनाचे होणारे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने केलेली कार्यवाही वा उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया"

श्री. सुरेश शेट्टी (वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक मानकर : सभापती महोदय, नागपूर येथील इंदिरा गांधी शासकीय महाविद्यालयात 100 जागा भरण्यात याव्यात म्हणून एक प्रस्ताव देण्यात आला होता आणि त्याचे निरीक्षण भारतीय आयुर्विज्ञान परिषदेने केले. या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये म्हटल्याप्रमाणे "येथे विकास नसल्यामुळे तो नामंजूर करण्यात आला आहे. माझा प्रश्न असा आहे की, मेयो हॉस्पिटल येथील अधिष्ठाता, डॉ.डोंगरे यांनी राज्य शासनावर असा ठपका ठेवलेला आहे की, राज्य शासनाने जे 10 कोटी रुपये मंजूर केले होते, ते न मिळाल्यामुळे आम्ही मेयो हॉस्पिटलचा विकास करु शकलो नाही. यामुळे आम्ही गरीब विद्यार्थ्यांसाठी 40 जागा वाढवू शकलो नाही. तसेच दुसरा भाग म्हणजे शासनाने निवेदनाच्या माध्यमातून जे उत्तर दिलेले आहे, ते मला अमान्य आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाला 2008-2009 मध्ये इमारतीच्या बांधकामासाठी 453 लाख रुपये सापडले. माझी अशी माहिती आहे की, सार्वजनिक बांधकाम विभागाने अजूनही तेथील काम सुरु केलेले नाही. म्हणून याबाबतीत असा प्रश्न आहे की, सार्वजनिक बांधकाम विभागाकडे जी रक्कम वर्ग करण्यात आली आहे, त्यामधून इमारतीचे बांधकाम सुरु झालेले आहे काय ? त्याची आज काय स्थिती आहे आणि हे बांधकाम कधी पूर्ण होणार आहे ? तसे मेयो हॉस्पिटलचे अधिष्ठाता डॉ.डोंगरे यांनी दि.24 एप्रिल 2009 रोजी एक निवेदन दिलेले आहे की, राज्य शासनाकडून निधी उपलब्ध झाला नाही. म्हणून आम्ही मेयो हॉस्पिटलचा विकास करु शकलो नाही. ते प्रशासकीय अधिकारी आहेत, त्यांच्यामार्फत जे निवेदन करण्यात आले आहे, ते खरे आहे की खोटे आहे ? हे समजणे आवश्यक आहे. तसेच शासकीय मेडिकल कॉलेजमध्ये 40 जागा वाढल्या तर तेथील गरीब विद्यार्थी शिक्षण घेऊ शकतील. त्यांना न्याय मिळू शकेल. कारण त्यांची खाजगी मेडिकल कॉलेजमध्ये शिक्षण घेण्याची आर्थिक स्थिती नाही. तेव्हा या विद्यार्थ्यांना शासन न्याय केव्हा मिळवून देणार आहे ? तसेच 40 जागा वाढविण्याच्या दृष्टीने केव्हा निर्णय घेतला जाणार आहे ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी नागपूर वैद्यकीय कॉलेजच्या संदर्भात येथे चार प्रश्न उपस्थित केले आहेत. हे खरे आहे की, 9 मे रोजी मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाने इन्स्पेक्शन झाले. त्यानंतर इन्स्पेक्शन कमिटीने जो रिपोर्ट दिला आहे त्यामध्ये त्यांना इन्फ्रास्ट्रक्चर मध्ये काही त्रुटी असल्याचे म्हटले आहे आणि त्या त्यांनी आम्हाला दाखविल्या. या त्रुटी सुधारण्यासाठी 10 कोटी रुपयांची आवश्यकता होती. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या-प्रमाणे आपण त्यासाठी 453 लाख रुपयांची प्रोव्हीजन केली आणि आम्ही ॲडमिनिस्ट्रेटीव्ह ॲप्रुव्हल

. . . .2 एम-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

देऊन तो निधी पी.डब्ल्यू.डी.ला रिलीज केला. त्यानंतर 2009-2010 च्या बजेटमध्ये आपण ती रक्कम व्होट ऑन अकाऊंटमध्ये घेतली. हया दोन्ही निधी व्यतिरिक्त, परत काल जो अर्थसंकल्प सादर करण्यात आलेला आहे, त्यामध्ये आपण 23 कोटी रुपयांचे प्रपोजल दिलेले असून ते विधानसभा आणि विधान परिषदेसमोर मांडण्यात आलेले आहे. अशा प्रकारे मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाने जेवढया त्रुटी दाखविलेल्या होत्या, त्या सर्वांच्या बाबतीत आपण ॲडमिनिस्ट्रेटर ॲप्रुव्हल घेऊन त्यासाठी निधीची प्रोव्हीजन केलेली आहे. ही गोष्ट खरी आहे की, आपण पी.डब्ल्यु.डी.ला पैसे रिलीज केलेले आहेत, पण अजून काम सुरु झालेले नाही. मागील अधिवेशनामध्ये सुध्दा सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी या विषयाच्या संबंधात चर्चा उपस्थित केली होती. आपण व्हर्टीकल एक्स्पांशनचा प्रोग्रॅम हाती घेतला होता, त्या कार्यक्रमामध्ये थोडा विलंब झाला. कारण नागपूर इम्प्रुव्हमेंट ट्रस्टने जी टेंडर प्रोसेस हाती घेतली होती, त्यामध्ये काही लॅक्युना होता म्हणून त्यासंबंधात आपण वित्त विभागाच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी नेमली आणि त्यांच्या रिपोर्टमध्ये असे सांगितले होते की, तुम्ही परत रि-टेंडर करावे. मग आपण एन.आय.टी.ला सांगून पुन्हा त्यांच्याबरोबर एम.ओ.यु.साईन केला आणि त्यांना सांगण्यात आले की, तुम्ही रि-टेंडर करावे. एन.आय.टी.रि-टेंडर करीत आहे. आपण एन्टायर प्रोजेक्ट हाती घेतलेले आहेत. यानंतर एम.सी.आय.ने सुचविलेली जी कामे आहेत, ती आपण अगोदर एन.आय.टी.च्या आर्कीटेक्टकडे दिली आणि जो एक्सपांशन प्रोजेक्ट येणार आहे, त्यात आपण हे ॲक्युम्युलेट करुन घेतलेले आहेत. कारण आपण अशी काळजी घेतलेली आहे की,जी नवीन कामे होणार आहेत, त्याचे पैसे वाया जाऊ नयेत म्हणून ती तोडावयाची नाहीत.

यानंतर कु.थोरात . . ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी

एन.आय.टी.चे आर्किटेक्ट आणि पी.डब्लू. डी. हे दोघे को-ऑर्डिनेट करुन डिझाईन तयार करतात. शासनाने जे पैसे सँक्शन केलेले आहेत त्याचे प्रॉपर यूटिलायझेशन झाले पाहिजे. त्यानंतर तेथे जे व्हिर्टिकल एक्स्पान्सेनचे प्रोजेक्ट घेण्यात येणार आहेत त्यामध्ये प्रॉब्लेम होता कामा नये, असा त्यांचा हेतू आहे. म्हणून थोडा विलंब झाला हे खरे आहे. पण हे काम लवकरात लवकर सुरु होणार आहे. मी सभागृहाला आश्वासन देऊ इच्छितो की, नागपूर रुग्णालयासंबंधी दि.4-6-2009 तारखेला मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाची बैठक होणार होती पण काल ती बैठक झाली नाही. चार-पाच दिवसात ती बैठक होणार आहे. आमचे अधिकारी त्यांच्या संपर्कात आहेत. सभापती महोदय, सिट्स कमी होणार नाहीत याची मी 100 टक्के खात्री देऊ इच्छितो. 100 सीट्सचा जो कोटा आहे तोच कोटा या वर्षी देखील तसाच राहील.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, नागपूरच्या अधिवेशनाच्या वेळी आम्ही माननीय मंत्रिमहोदयांकडे ही भिती व्यक्त केली होती. दि. 6 मे, 9 मे, रोजी भारतीय आयुर्विज्ञान तपासणी पथकाने महाविद्यालयाचे निरीक्षण केले. सुविधांचा अभाव असल्यामुळे त्यांनी दिनांक 9 मे रोजी अधिष्ठात्यांना कळविले की, 40 जागांना मान्यता देता येणार नाही. सभापती महोदय, या 40 जागा कमी झाल्या तर विदर्भाचे मोठे नुकसान होणार आहे. हे दोन प्रकल्प एकमेकात मिसळण्यात आले आहेत. एन.आय.टी.कडून ज्या प्रकल्पाला वर्क ऑर्डर दिली आहे, ती सत्यम कंपनी होती. ती कंपनी आता डुबली. दुसरा भाग असा की, माननीय मंत्रिमहोदय, त्या ठिकाणचे काम करण्याबद्दल सांगत आहेत. पण त्यावर मेडिकल कौन्सिल विश्वास ठेवेल काय? या प्रकल्पाला अडीच एफ.एस.आय. देण्याच्या बाबतीत काय परिस्थिती आहे? मुंबईच्या हॉस्पिटल करिता चार एफ.एस.आय. देण्यता आला आहे. नगरविकास सचिवांनी मला कबूल केले होते की, नागपूरच्या सगळया रुग्णालयांना एफ.एस.आय.वाढवून देण्यात येईल. पण नागपूरमधील रुग्णालयांसाठी अडीच एफ.एस.आय. देण्यात आला नाही. त्यामुळे मेयोचे सगळे प्रकरण अडकून पडले आहे. नागपूरसाठी अडीच एफ.एस.आय. मंजूर झाला आहे काय याची मला माहिती नाही. त्या शिवाय हे सगळे प्रोजेक्ट व्हायबल होणार नाहीत. त्यमुळे ते प्रोजेक्ट "आत्याबाईला मिशा असतील तर" ते

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MMP/ KGS/

श्री. नितीन गडकरी...

सगळे पुढचे आहे.एन.आय.टी.चे ट्रस्ट होईल की नाही मला माहीत नाही. पण शासनाने एक तर 10 कोटी रुपये पी.डब्लू.डी.कडे डिपॉझिट करुन त्या कामाची सुरुवात करावी. पण काहीही करुन 4 तारखेला कुठल्याही परिस्थितीत विदर्भाला 40 जागा मिळाल्या पाहिजेत. त्या जागा जर सुविधा नसल्यामुळे मिळाल्या नाहीत तर विदर्भाचे नुकसान होणार आहे. शासनाने त्या ठिकाणी एन.आय.टी.चा प्रोजेक्ट सुरु करावा अन्यथा पी.डब्लू.डी.ला पैसे देऊन त्रुटी पूर्ण कराव्यात हा प्रश्न शासनाचा आहे. परंतु वर्षा-नु-वर्षे यावर चर्चा घडवून आणणे आणि विद्यार्थ्यांचे नुकसान करणे योगय होणार नाही. कुठल्याही स्थितीत 40 जागा कमी होणार नाहीत, याची खात्री महाराष्ट्र सरकार देईल काय? तसेच आवश्यकता असेल तर त्यासाठी 10 कोटी रुपये डिपॉझिट देऊ अशी गॅरन्टी देण्यास शासन तयार आहे काय?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय श्री. गडकरीसाहेबांनी जो प्रश्न उपस्थि केलेला आहे. त्या प्रश्नाचे उत्तर मी अगोदरच दिलेले आहे. मी 100 ट्क्के सांगू इच्छितो की, सीट्स कमी होणार नाहीत. शासन या दृष्टीने काळजी घेत आहे. हा फक्त विदर्भाचा प्रश्न नाही. कारण सी.ई.टी.ची ॲडमिशन प्रोसेस संपूर्ण महाराष्ट्रात होते त्यामुळे 40 सीट्स कमी झाल्या तर संपूर्ण महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचे नुकसान होणार आहे.

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, जर एफएसआयची अडचण आली, अडीच एफएसआयसाठी काम अडले तर शासन एफएसआय वाढवून देणार काय ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, जी कामे हातामध्ये घेतलेली आहेत त्यामध्ये एफएसआय चा प्रश्न नाही. एनआयटीचा जो नवीन प्रकल्प आहे त्याच्याशी एफएसआयचा संबंध आहे. त्याबाबत नंतर बघू. आता फक्त सिट्स ठेवण्यासाठी जी कामे एमसीआयने सांगितली ती कामे करण्यासाठी जादा एफएसआयची गरज नाही.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विशेष उल्लेख

पृ. शी. : केंद्र सरकार पुरस्कृत इंदिरा आवास योजनेची मोठ्या प्रमाणावर अंमलबजावणी करण्याची आवश्यकता

मु. शी. : केंद्र सरकार पुरस्कृत इंदिरा आवास योजनेची मोठ्या प्रमाणावर अंमलबजावणी करण्याची आवश्यकता याबाबत श्री. विनोद तावडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य श्री. विनोद तावडे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. विनोद तावडे (विधानसभेने निवडेलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

" केंद्र सरकार पुरस्कृत इंदिरा आवास योजनेअंतर्गत राज्यातील अनुसूचित जाती जमातीच्या नागरिकांना घरकुल देण्याची तरतूद करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत 2008-09 या वर्षात केंद्र सरकारने महाराष्ट्रासाठी 30,415 लक्ष रुपये मंजूर केले आहेत. या योजनेअंतर्गत केंद्र आणि राज्य सरकार यांचे 75:25 असे खर्च निधी करण्याचे प्रमाण असते. सन 2008-09 या वर्षात राज्य सरकारने सदर योजनेची अंमलबजावणी फक्त 41 टक्के केली असल्याचे निदर्शनास येत आहे. या वर्षात राज्य सरकारने 69,521 घरकुल बांधणे अपेक्षित होते परंतु यापैकी केवळ 45,000 घरकुलांचे बांधकाम करण्यात आले. देशभरातील जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालकांच्या राष्ट्रीय परिषदेत ही आकडेवारी सादर करण्यात आली. यात महाराष्ट्र राज्याला सर्वात खालची म्हणजे 'सी' ग्रेड देण्यात आली आहे. सदर योजना ही राज्यातील गरीब तसेच अनुसूचित जाती जमातीच्या नागरिकांसाठी असताना प्रशासनाने सदर योजना राबविण्यासाठी अकार्यक्षमता दाखविल्यामुळे सदर नागरिक हे या योजनेपासून वंचित राहिले. याची गंभीर दखल घेऊन राज्य शासनाने त्वरित संबंधित अधिकाऱ्यांवर योग्य ती कार्यवाही करुन अनुसूचित जाती जमातीच्या नागरिकांसाठी असलेल्या या योजनेची अंमलबजावणी करुन राज्यातील गरीब नागरिकांना घरकुल मिळण्यासाठी प्रयत्न करावे."

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : लोककलेची जोपासना करणाऱ्या वृध्द कलावंतांना मानधन वेळेवर न मिळणे

मु. शी. : लोककलेची जोपासना करणाऱ्या वृध्द कलावंतांना मानधन वेळेवर न मिळणे याबाबत श्रीमती मंदा म्हात्रे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य श्रीमती मंदा म्हात्रे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्रीमती मंदा म्हात्रे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

"लोककलेची जोपासना करणाऱ्या वृध्द कलावंताबाबत शासन उदासिन असणे, 500 रुपये ते 700 रुपये एवढे मानधन सुध्दा वेळेवर न मिळणे, औरंगाबाद जिल्ह्यातील 740 वृध्द कलावंतांचे प्रस्ताव शासनाकडे पडून आहेत, त्या प्रस्तावांची प्रतीक्षा यादी तयार करणे व दरवर्षी केवळ 40 प्रस्ताव मंजूर करण्याचे शासनाचे धोरण, या धोरणामुळे वृध्द कलाकार मृत्यू पावल्यावर मानधन देणार का अशी प्रतिक्रिया वृध्द कलाकार व जनमानसातून व्यक्त होणे, शासनाच्या या अनास्थेमुळे जनमानसात निर्माण झालेली चीड व सर्वच वृध्द कलावंतांना मानधन मिळणे व मानधनात वाढ करणेबाबत शासनाने करावयाची उपाययोजना."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : शेतकऱ्यांना मावेजा न मिळाल्यामुळे सिंदफणा मध्यम प्रकल्पाचे काम बंद पडणे

मु. शी. : शेतकऱ्यांना मावेजा न मिळाल्यामुळे सिंदफणा मध्यम प्रकल्पाचे काम बंद पडणे याबाबत ॲड. उषा दराडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य ॲड. उषा दराडे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

ॲड. उषा दराडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

" शिरुर कासार तालुक्यातील बराचसा भाग बागायती होण्यासाठी माजी मुख्यमंत्री कै. शंकरराव चव्हाण यांच्या प्रयत्नाने सिंदफणा मध्यम प्रकल्पाची उभारणी करण्यात येणे, मात्र कालांतराने या प्रकल्पात गाळ साचल्याने पाणी साठवण क्षमता कमी होणे, गाळ काढण्याच्या कामाला प्रारंभ होणे, तथापि गाळ काढण्यास आणखी जादा निधी लागणार असल्याने गाळ काढण्याचा प्रस्ताव मागे पडून उंची वाढविण्याबाबत प्रयत्न होणे, यासाठी 7 कोटी 75 लाखाचा निधी मंजूर होऊन सिंदफणा धरणाची उंची वाढली, मात्र प्रकल्पाची उंची वाढल्यानंतर पाण्यासाठी जाणाऱ्या साडेतीनशे शेतकऱ्यांच्या 110 हेक्टरचा मावेजा मिळावा म्हणून शेतकरी कोर्टात जाऊन प्रकल्पाचे काम बंद पडणे, पर्यायाने यावर्षीही सदर प्रकल्पातून पाणी वाया जाण्याची निर्माण झालेली परिस्थिती, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही."

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : माहितीच्या अधिकारान्वये मागविलेली माहिती देण्यामध्ये होत असलेली टाळाटाळ

मु. शी. : माहितीच्या अधिकारान्वये मागविलेली माहिती देण्यामध्ये होत असलेली टाळाटाळ याबाबत श्री. अरविंद सावंत, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□□य सदस्य श्री. अरविंद सावंत यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

"माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत जनतेला हवी असलेली शासनाच्या विविध विभागाकडील माहिती ठराविक वेळात देण्याचे सदर अधिनियमान्वये शासकीय अधिकाऱ्यांवर असलेले बंधन, नागरिकांनी माहितीच्या अधिकारान्वये मागविलेली माहिती देण्यास टाळाटाळ, नकार अथवा चुकीची, अर्धवट माहिती दिल्यास त्याविरुध्द माहिती आयुक्तांकडे याचिका दाखल करण्याची सदर कायद्यामध्ये असलेली तरतूद, माहिती आयुक्तांचे पद हे न्यायाधीश, मुख्य निवडणूक आयुक्त यांच्या दर्जाचे आहे. राज्याच्या माहिती आयुक्तांकडे हजारो प्रकरणे प्रलंबित असून ती जाणीवपूर्वक प्रकरणे निकाली काढण्यास विलंब केला जात आहे. केंद्रीय माहिती आयुक्त, माहिती अधिकारातील प्रतिमहा 650-700 खटले निकाली काढत होते, असे असताना राज्य माहिती आयुक्तालयातील प्रकरणे निकाली काढण्यास जाणीवपूर्वक विलंब करुन माहिती अधिकार कायद्याच्या अंमलबजावणीत उदासिनता दाखविण्यात येत आहे. अत: विनंती की, राज्य माहिती आयुक्तांच्या कार्यालयातील प्रकरणांचा जलद गतीने निपटारा लावण्याबाबत शासनाने खास अशी काही व्यवस्था केली आहे काय व तसेच त्यांच्याकडे सध्या किती प्रकरणे प्रलंबित आहेत, याबाबत तातडीने शासनाने निवेदन करावे."

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/

श्री.अरविंद सावंत....

सभापती महोदय, या देशामध्ये व राज्यामध्ये सर्व सामान्यांना माहितीचा अधिकार मिळाला. आज माहितीचा अधिकार अधिनियमान्वये जनतेला शासनाच्या विविध विभागाकडील माहिती ठराविक वेळेमध्ये देण्याचे शासकीय अधिकाऱ्यांवर असलेले बंधन, नागरिकांनी माहितीच्या अधिकारान्वये मागविलेली माहिती देण्यास टाळाटाळ, नकार अथवा चुकीची माहिती दिल्यास त्याविरुद माहिती आयुक्तांकडे याचिका दाखल करण्याची तरतूद या कायद्यामध्ये आहे. मी अत्यंत खेदाने सांगतो की, माहितीच्या अधिकाराद्वारे अधिका-यांनी वेळेवर माहिती न दिल्यामुळे अनेक खटले प्रलंबित आहेत. माहितीच्या अधिकारासंबंधी राज्यात 15,438 खटले प्रलंबित आहेत. संबंधित अधिकारी माहिती वेळेत देत नाहीत म्हणून हे खटले प्रलंबित आहेत. माहिती अधिकारी यांच्यानंतर माहिती आयुक्त हे अधिकारी आहेत. त्यांच्याकडूनही यासंबंधी तातडीने माहिती दिली जात नाही किंवा ते अधिकारी माहिती देत नाहीत आणि त्यांच्यावर कारवाईही होत नाही. दिल्लीमध्ये केंद्रीय माहिती आयुक्तालय यांच्या कार्यालयाकडून दरमहा 650-700 खटले निकाली काढले जातात. परंतु आपल्याकडे जाणीवपूर्वक विलंब होत आहे. त्यामुळे मी ही बाब या विशेष उल्लेखाद्वारे शासनाच्या निदर्शनास आणत आहे. जे कोणी माहिती आयुक्त आहेत त्यांना प्रलंबित असलेले खटले तातडीने निकाली काढण्यासाठी शासनाने सूचना द्याव्यात अशी मी यानिमित्ताने विनंती करतो.

...3...

अशुधारित प्रत / शीर्षकासाठी नाही

NTK/ MMP/ KGS/

पृ. शी. : एव्हरेस्ट सर करणाऱ्या कु.कृष्णा पाटील हिचा शासनाकडून गौरव करुन तिला मदत करणे

मु. शी. : एव्हरेस्ट सर करणाऱ्या कु.कृष्णा पाटील हिचा शासनाकडून गौरव करुन तिला मदत करणे याबाबत श्री.संजय दत्त, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य श्री.संजय दत्त यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"अथक प्रयत्न, परिश्रम, जिद्द, चिकाटी हे गुण अंगी असतील तर कोणतीही गोष्ट अशक्य नाही, हे आजवर अनेकांनी दाखवून दिले आहे. महाराष्ट्राची कुमारी कृष्णा पाटील हे त्याचे ताजे उदाहरण आहे. अवघ्या 19 व्या वर्षी थेट एव्हरेस्टचा माथा सर करुन कृष्णाने एक नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. इतक्या लहान वयात एव्हरेस्ट सर करणारी ही पहिलीच तरुणी आहे. कृष्णाने ही कामगिरी करुन महाराष्ट्राचेच नव्हे तर देशाचे नावही उज्जवल केले आहे. महाराष्ट्राच्या मातीतला कणखरपणा आणि चिवटपणा तिच्या कामगिरीने पुन्हा एकदा प्रत्ययास आला आहे. मध्यमवर्गीय कुटुंबातील एक मराठी तरुणी इतके मोठे यश मिळवू शकते हे पाहून या वाटेने जाण्याची इच्छा असणा-या तरुण पिढीला एक नवा आदर्श मिळाला आहे. हे जरी खरे असले तरी कृष्णाच्या जिद्दीच्या पंखात बळ तिच्या आई-वडिलांनी दिले आणि कर्ज काढून तिच्या एव्हरेस्ट मोहिमेची वाट मोकळी करुन दिली ही बाब देखील अत्यंत महत्वाची आहे. विशेषत: या क्षेत्रात येऊ इच्छिणा-या तरुण-तरुणींसाठी कृष्णाचे उदाहरण दिपस्तंभासारखे ठरणार आहे. राज्याच्यादृष्टीने हे कौतुकास्पद असून तिच्या या कामगिरीची दखल घेऊन तिचा महाराष्ट्र शासनाकडून गौरव करुन तिला सर्वतोपरी मदत करुन देण्याबाबत करावयाची कार्यवाही करावी तसेच माऊंटेनिरींग (गिर्यारोहण) व ट्रेकिंगला राज्य शासनाने प्रोत्साहन देण्याबाबत धोरण ठरवावे, या अति महत्वाचा विषय विशेष उल्लेखाद्वारे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो.

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/

श्री.दिलीपराव देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी याठिकाणी विशेष उल्लेखाद्वारे महत्वाचा विषय मांडलेला आहे. कु.कृष्णा माधव पाटील या महाराष्ट्राच्या 19 वर्षीय तरुणीने दिनांक 21.5.2009 रोजी एव्हरेस्ट शिखर सर केले हा महाराष्ट्राच्या नव्हे तर भारताच्या शिरपेचामध्ये मानाचा तुरा खोवला गेला आहे. मी महाराष्ट्र शासनाचा क्रीडा मंत्री म्हणून कु.कृष्णा पाटील हिचे मन:पूर्वक अभिनंदन करतो आणि तिच्या शौर्यपूर्वक कार्याबद्दल तिला शासनाच्यावतीने 5 लाख रुपयांचे बक्षिस देऊन तिचे कौतुक करण्यात येईल असे मी जाहीर करतो.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती अलका देसाई)

यानंतर श्री.गिते....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : विधानसभा व विधान परिषद सदस्यांना मुंबईतील विविध क्लबमध्ये सदस्यत्व मिळणेबाबत

मु. शी. : विधानसभा व विधान परिषद सदस्यांना मुंबईतील विविध क्लबमध्ये सदस्यत्व मिळणेबाबत याबाबत श्री.सुभाष चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती (श्रीमती अलका देसाई) : मा□□य सदस्य श्री.सुभाष चव्हाण यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

सभापती महोदया, विधान परिषद सन 2008 च्या पहिल्या अधिवेशनामध्ये व दिनांक 24 जुलै, 2008 च्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात नियमितपणे खालील विशेष उल्लेखाची सूचना मांडलेली आहे.

सभापती महोदया, मुंबईमध्ये असलेले वेलिंग्टन क्लब, नॅशनल स्पोर्टस क्लब ऑफ इंडिया, रेडीओ क्लब, एम.सी.टी.क्लब, बांद्रा येथील एम.आय.जी.क्लब तसेच विविध जिमखाने इत्यादी सर्व क्लबचे नियंत्रण शासनाच्या अधिपत्याखाली येते. त्यात शासनाचे प्रशासकीय अधिकारी (आयएएस) या क्लबचे नियमित सदस्य असतात. त्याच धर्तीवर विधानसभा व विधान परिषद सदस्यांना । या सर्व क्लबमध्ये मिळावे.

त्यावर वेळोवेळी माननीय सभापतींनी सभागृहात सन्माननीय मंत्री महोदयांना यासंबंधी त्वरीत कार्यवाहीसाठी संबंधित अधिका-यांची बैठक बोलावून होकारार्थी निर्णय घेण्याचे निर्देश दिले होते. मी देखील वेळोवेळी सन्माननीय मंत्री महोदयांना स्मरण करुनही आजतागायत कोणतीही बैठक घेतली गेलेली नाही अथवा कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. सभागृहाच्या सन्माननीय सदस्यांच्या हिताच्या दृष्टीने मांडलेल्या प्रस्तावाची शासनाने गांभीर्याने दखल घेणे आवश्यक आहे असे मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून सूचित करु इच्छितो.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण...

सभापती महोदया, मी या विषयाचा विशेष उल्लेख हा तिस-यांदा केलेला आहे. याबाबतीत त्वरीत कार्यवाही करावी म्हणून आपण मुंबईचे पालक मंत्री, मुंबई जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हाधिकारी यांचे समवेत एक बैठक घेण्यात येईल व त्यासंबंधीचा निर्णय घेण्यात येईल. परंतु यासंदर्भात आज तागायत एकही बैठक घेतली गेली नाही. माझी आपणास पुन:श्च विनंती आहे की, या संदर्भात येत्या 15 दिवसात किंवा सभागृहाचे कामकाज संपण्यापूर्वी मंबईचे पालक मंत्री, मुंबई जिल्हाधिकारी आणि मुंबई उपनगर जिल्हाधिकारी यांना बोलावून याबाबतचा निर्णय घ्यावा.

तालिका सभापती (श्रीमती अलका देसाई) : या विषयाच्या अनुषंगाने बैठक घेण्यात येईल.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : राजेगाव (जि.जालना) येथे उन्हाच्या तीव्रतेने मोसंबी फळबागांचे झालेले नुकसान

मु. शी. :राजेगाव (जि.जालना) येथे उन्हाच्या तीव्रतेने मोसंबी फळबागांचे झालेले नुकसान याबाबत श्री.सुरेश जेथलिया वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती (श्रीमती अलका देसाई) : मा□□□य सदस्य श्री.सुरेश जेथलिया यां□ विशेष उल्ले□□संबंधीची सूच□□ दिली आहे. त्यां□□ ती मांडावी.

श्री.सुरेश जेथलिया (विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□□संबंधीची सूच□□ मांडतो.

सभापती महोदया, राजेगाव (ता.घनसावंगी,जि.जालना) येथे मागील वर्षीच्या उन्हाळयात उन्हाच्या तीव्रतेमुळे मोसंबीसारख्या फळबागांचे मोठया प्रमाणात झालेल्या नुकसानीची भरपाई म्हणून शासकीय निधी देण्यात आला होता. मात्र मोठया प्रमाणावर नुकसानग्रस्त शेतक-यांना डावलून आर्थिक हितसंबंध व राजकीय दबाव टाकून अनुदानाच्या यादीत बोगस नावे देण्यात येणे, याबाबत तहसीलदार यांच्याकडे तक्रार केली असता आतापर्यंत कोणतीच कारवाई न होणे, यामुळे तेथील ग्रामस्थांमध्ये व बाधित शेतक-यांमध्ये निर्माण झालेला असंतोष व संताप. याबाबत शासनाने या मोसंबीच्या अनुदान यादीची चौकशी करुन दोषीवर कारवाई करण्यात यावी.

या ठिकाणी माननीय कृषी मंत्री बसलेले आहेत. मराठवाडयातील जालना जिल्हयातील घनसावंगी तालुक्यात मोसंबी फळबांगाचे मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. मोसंबी उत्पादक शेतकरी उध्वस्त झाले आहेत. त्या शेतक-यांना योग्य न्याय देऊन त्यांना नुकसान भरपाई तात्काळ देण्यात यावी म्हणून मी शासनाचे लक्ष विशेष उल्लेखाच्या माध्यमातून वेधत आहे. याबाबतीत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून कार्यवाही करावी अशी या निमित्ताने विनंती करतो.

पृ. शी. : मुंबईतील बी.डी.डी.चाळीतील लोकांसाठी स्वच्छता निरीक्षक,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुकादम यांची रिक्त असलेली पदे भरण्याबाबत

मु. शी. : मुंबईतील बी.डी.डी.चाळीतील लोकांसाठी स्वच्छता निरीक्षक, मुकादम यांची रिक्त असलेली पदे भरण्याबाबत याबाबत श्री.प्रकाश शेंडगे,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती (श्रीमती अलका देसाई) : मा□□य सदस्य श्री. प्रकाश शेंडगे यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.प्रकाश शेंडगे (विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

सभापती महोदया, मुंबईतील वरळी, शिवडी, नायगाव आणि डिलाईल रोड येथील 207 बीडीडी चाळीत एकूण 16 हजार 553 कुटुंब रहातात. सदर कुटुंबाबतील जवळपास लाखभर लोकांसाठी 5 स्वच्छता निरीक्षकांची, 13 स्वच्छता मुकादमांची आणि 292 सफाई कामगारांची आवश्यकता आहे. परंतु सदर ठिकाणी 2 स्वच्छता निरीक्षक आणि 180सफाई कामगार कार्यरत आहेत. सदर सफाई कामगारापैकी रोज 30 ते 35 सफाई कामगार रजेवर असतात. रिक्त पदांची भरती करण्याऐवजी कंत्राटी पध्दतीने कर्मचारी घेऊन स्चछतेची कामे करुन घेत आहेत. कंत्राटी पध्दतीनेच कर्मचारी नेमण्याचे शासनाने आदेश काढलेले आहेत. राज्य शासनाच्या या आदेशाच्या बाबतीत सफाई कामगारांच्या युनियनने निषेध केला असून त्यांनी अंदोलनाचा देखील इशारा दिलेला आहे. त्या वसाहतींमध्ये सफाई कामगार वेळोवेळी उपलब्ध होत नसल्यामुळे मुंबईतील बी.डी.डी.चाळीमध्ये घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे. या घाणीमुळे डांसाच्या प्रमाणात वाढ होऊन तेथील रहिवाशांना अनेक आजारांना तसेच अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

यानंतर श्री. भोगले..

अशुधारित प्रत / शीघ्रलेखापाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे.....

पर्यायाने साथीच्याही रोगांचा प्रादुर्भाव वाढत आहे. सदर विषयाबाबत गांभीर्याने विचार करुन शासनाने ताबडतोब उपाययोजना करावी अशी मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून विनंती करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याचा मुद्दा.

तालिका सभापती (श्रीमती अलका देसाई) : सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदया, माझा औचित्याचा मुद्दा आहे. 5 जून हा जागतिक पर्यावरण दिन म्हणून पाळला जातो. या निमित्ताने मुंबई महानगरातील इमारतींवर मोबाईल टॉवर्स उभारण्यात आले आहेत त्यामुळे निर्माण होणाऱ्या वायू लहरींचा दुष्परिणाम नागरिकांच्या आरोग्य जीवनावर होत असल्याचे आरोग्य तज्ज्ञांनी वेळोवेळी निदर्शनास आणले आहे. याबाबत तज्ज्ञांची काय मते आहेत ती जाणून घ्यावीत. न्यूझीलंडमधील लिंकन युनिव्हर्सिटीचे डॉ.नील चेरी यांनी काय म्हटले ते मी सभागृहाच्या माहितीसाठी सांगू इच्छितो. "Dr. Neil Cherry, Biophysicist from Lincoln University of New Zealand, opined at Scientific workshop on biological & health effects of RF - EMF in Vienna in 1999, "Every night, as we go to sleep, our melatonin level rise. Melatonin goes through our blood & clears our cells up, that is to say, scavenges free radicals, which are highly damaging chemicals. If free radicals persist for long, they damage the DNA, cause damaged cells and are shown to be carcinogenic. Melatonin is one of those agents, that cleans us up every night to reduce the possibility that cells will become carcinogenic. Power lines, Radio, TV and Cell phone towers should be kept away from houses, hospitals, schools." इतके भयानक परिणाम या मोबाईल टॉवरमुळे होऊ शकतात. त्यामुळे मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाला विनंती करतो की, मुंबई शहरात मोठया प्रमाणात मोबाईल टॉवर्स वाढत आहेत त्या संदर्भात शासनाने अभ्यासपूर्ण शास्त्रीय भूमिका जनतेसमोर मांडावी आणि याबाबत योग्य ती कारवाई करावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 च्या सूचनेवरील निवेदनासंबंधी

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, आज जी नियम 93 च्या सूचनेवरील निवेदने चर्चेला होती त्यामधील अनुक्रमांक-3 वर मी उपस्थित केलेल्या सूचनेसंबंधीचे निवेदन चर्चेला होते. मी माननीय सभापतींची परवानगी घेऊन माननीय मंत्रीमहोदयांच्या दालनात बैठकीसाठी गेलो होतो. त्यामुळे प्रस्तुत निवेदनासंबंधी संबंधित मंत्रीमहोदय आता सभागृहात उपस्थित नसतील तर ते निवेदन सोमवारी चर्चेला घेण्यात यावे अशी माझी विनंती आहे.

तालिका सभापती : प्रस्तुत नियम 93 च्या सूचनेवरील निवेदन सोमवारी चर्चेला घेण्यात येईल. सभागृहाची बैठक आता मध्यंतरासाठी स्थगित होत असून दुपारी 2.30 वाजता सभागृहाची बैठक पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.37 ते 2.30 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरा नंतर)

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. संजय केळकर)

<u>सभागृहातील गणपूर्तीबाबत</u>

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहात आवश्यक ती गणपूर्ती नाही.

पृ.शी.: खरीप हंगामापूर्वी खते व बी-बियाण्यांची टंचाई तसेच अकाली झालेल्या गारपीटीमुळे राज्यात शेतीचे व फळबागांचे झालेले नुकसान

मु.शी.: खरीप हंगामापूर्वी खते व बी-बियाण्यांची टंचाई तसेच अकाली झालेल्या गारपीटीमुळे राज्यात शेतीचे व फळबागांचे झालेले नुकसान या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, नितीन गडकरी, डॉ. नीलम गोऱ्हे डॉ. दीपक सावंत, सर्वश्री. केशवराव मानकर, विनोद तावडे, सुरेश जेथलिया, चंद्रकांत पाटील, सय्यद पाशा पटेल वि.प.स. यांचा प्रस्ताव

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो :--

"राज्यात ऐन खरीप हंगामाच्या प्रारंभी खते बियाण्याची भीषण टंचाई निर्माण होणे, विक्रेत्यांना परवाने देण्यास विलंब केल्यामुळे खते विक्रीस न येणे, खते मिळावीत म्हणून काही ठिकाणी शेतकऱ्यांनी रात्रभर दुकानाबाहेर रांगा लावणे परंतु दुकाने दुपारपर्यंत न उघडणे, त्यामुळे शेतकऱ्यांचा संताप अनावर होणे,काही ठिकाणी गोळीबाराच्या घटना घडणे, शासकीय दिरंगाई व धरसोड वृत्तीमुळे शेतकऱ्यांवर अगोदरच ओढवलेल्या संकटात नैसर्गिक आपत्तीची भर पडणे, मे महिन्याच्या दुसऱ्या व तिसऱ्या आठवड्यात झालेल्या वादळी पावसामुळे व गारपीटीमुळे शेतकऱ्यांचे कोटयवधी रुपयांचे नुकसान होणे, द्राक्षमळे, केळी, पानमळे, संत्रा बागायती, भाजीपाला आदींचे प्रचंड नुकसान होणे, घरादारांचे नुकसान होणे, अनेक लोक बेघर होणे, गुरे मृत्यूमुखी पडणे, त्यामुळे उध्वस्त झालेला शेतकरी, त्याना तातडीने मदत देण्याची नितांत आवश्यकता व याबाबत करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

सभापती महोदय, हा प्रस्ताव आम्ही दोन भागात दिलेला आहे. या प्रस्तावातील एक भाग कृषीच्या संदर्भातील असून सन्माननीय कृषी मंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. परंतु महाराष्ट्रातील शेतक-यांवर नैसर्गिक आपत्ती ओढवलेली असतांना त्यासंबंधीचे मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नाहीत म्हणून संबंधित मंत्रीमहोदयांना सभागृहात बोलावणे आवश्यक आहे. संबंधित खात्याचे मंत्री सभागृहात उपस्थित नसल्यामुळे नैसर्गिक आपत्तीत सापडलेल्या शेतक-यांना न्याय मिळू शकणार नाही असे आम्हाला वाटते. नैसर्गिक आपत्तीमध्ये शेतक-यांचे जे नुकसान झालेले आहे त्यासंदर्भात आम्ही जे मुद्दे मांडणार आहोत त्याला कोणते मंत्री महोदय उत्तर देणार आहेत? संबंधित मंत्री महोदय 10 मिनिटात सभागृहात उपस्थित होतील असे गृहीत धरुन सभागृहाचे कामकाज आपण 10 मिनिटांसाठी स्थगित करावे अशी माझी विनंती आहे.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, कृषी मंत्री म्हणून मी या ठिकाणी उपस्थित आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितल्याप्रमाणे नैसर्गिक आपत्तीमध्ये ज्या शेतक-यांचे नुकसान झालेले आहे त्यासंदर्भात येथे जी काही चर्चा होईल त्यासंदर्भातील मुद्दे मी लिहून घेणार आहे. संबंधित मंत्री येईपर्यंत सभागृहाचे कामकाज सुरु ठेवावे अशी माझी आपल्याला विनंती आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, ज्या वेळेस शेतक-यांच्या नुकसान भरपाईचा विषय या सभागृहात उपस्थित होतो त्यावेळेस संबंधित खात्याचे मंत्री महोदय सभागृहात उपस्थितच नसतात.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, शेतक-यांचे अपरिमित नुकसान झालेले असल्यामुळे त्यासंदर्भात आपल्याला धोरणात्मक निर्णय घ्यावे लागणार आहेत, पंचनामे करावे लागणार आहेत त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर आपण देऊ शकणार आहात काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, संबंधित मंत्री महोदय येईपर्यंत मी त्यासंदर्भात सर्व मुद्दे लिहून घेत असल्यामुळे सभागृहाचे कामकाज स्थगित न करता चर्चा सुरु ठेवावी अशी माझी विनंती आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, नैसर्गिक आपत्तीचा हा विषय आहे त्यामुळे जोपर्यंत संबंधित मंत्री महोदय सभागृहात उपस्थित होत नाही तोपर्यंत आम्ही चर्चेला सुरुवात करणार नाही.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री.संजय केळकर) : सभागृहाची बैठक मी 10 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक 2 वाजून 38 मिनिटांनी, 10 मिनिटांसाठी स्थगित करण्यात झाली.)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगिती नंतर)

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.संजय केळकर)

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, नियम 260 अन्वये मी जो प्रस्ताव मांडलेला होता तो दोन भागात मांडलेला होता. पहिला भाग हा खताच्या टंचाई संबंधीचा असून वादळी पावसामुळे व गारपीटीमुळे ज्या शेतक-यांचे नुकसान झालेले आहेत त्यांना मदत देण्यासबंधीचा दुसरा भाग होता. त्यामुळे पुनर्वसन व मदत कार्य मंत्र्यांनी सभागृहात उपस्थित रहावे अशी मी मागणी केली होती.

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये गेल्या दोन तीन वर्षापासून खतांची आणि बियाण्यांची टंचाई आहे अशी सातत्याने ओरड सुरु होती. केन्द्रामध्ये कृषी मंत्रालय महाराष्ट्राच्या वाटयाला आले आहे. या कृषी मंत्रालयात महाराष्ट्रातील एक जाणकार व्यक्ती बसली असून महाराष्ट्रातील गावा गावाची त्यांना माहिती आहे, महाराष्ट्रातील शेतीचा त्यांना अनुभव आहे. अशी जाणकार व्यक्ती केन्द्रातील कृषी मंत्रालयात जाऊन बसल्यामुळे आता महाराष्ट्रातील शेतक-यांना चांगले दिवस येतील असे आम्हाला वाटले होते.

नतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. फुंडकर ....

परंतु गेल्या 3-4 वर्षात शेतकऱ्यांच्या हालअपेष्टांमध्ये अधिकाधिक वाढ होत गेली. दरवर्षी खतांची टंचाई, बियाणांचा तुटवडा या गोष्टी आता राज्याच्या आणि शेतकऱ्यांच्या पाचवीला पुजल्यासारख्या झालेल्या आहेत. सभापती महोदय, या राज्याला खरीप हंगामासाठी लागणारी खते आणि बियाणांचे नियोजन खरे म्हणजे खात्यामार्फत व्हायला पाहिजे आणि खात्यातील अधिकारी हल्ली बऱ्यापैकी नियोजन करू लागले आहेत. परंतु त्या नियोजनानुसार अमलबजावणी मात्र होत नाही. त्यामुळे राज्यातील शेतकरी अडचणीत येतो. सभापती महोदय, मी मागील वर्षीचे उदाहरण देऊन सांगेन की, राज्यात जेवढे खत लागते त्याचे बुकींग केंद्र सरकारकडे जानेवारीमध्ये करायला पाहिजे असते. परंतु या संदर्भात मी मार्चच्या अधिवेशनामध्ये प्रश्न विचारला असता असे दिसून आले की, तोपर्यंत खतांचे बुकींग झालेलेच नाही. मग या ठिकाणी चर्चा झाली त्यामुळे कृषी खाते खडबडून जागे झाले आणि त्याने खताची नोंदणी करण्याचा प्रयत्न केला. याचा परिणाम असा झाला की, मागील वर्षी शेतकऱ्याला खते मिळाली नाहीत. पाहिजे तेवढे आणि पाहिजे ते खत शेतकऱ्याला मिळू शकले नाही. त्याबद्दल खूप ओरड झाली आणि सरतेशेवटी शेतकऱ्याला विनाखते शेती करावी लागली. अव्वाच्या सव्वा किंमतीने बियाणे आणि खते घ्यावी लागली त्यातून शेतकऱ्याची अगदी ससेहोलपट झाली. खरे म्हणजे या खतांच्या खरेदीचे जिल्हा निहाय नियोजन हे जानेवारी महिन्यातच व्हायला पाहिजे असते. जिल्हा कृषी विकास अधिकारी जिल्ह्यातील पीक निहाय लागवडीचा अंदाज घेऊन आवश्यक त्या ग्रेडच्या खतांची मागणी विभागीय कृषी कार्यालयातर्फे पुणे येथील कृषी आयुक्तालयाला कळवितात. त्यानंतर कृषी आयुक्त सर्व खत कंपन्यांच्या प्रतिनिधींची बैठक बोलावून कंपनीकडे उपलब्ध असलेला साठा किती आहे, कोणत्या जिल्ह्यातून कोणत्या खताची किती मागणी आहे वगैरेचा आढावा घेऊन त्या अनुषंगाने कंपनी खत पुरवठ्याची जबाबदारी स्वीकारते, त्यासाठी विशिष्ट कालमर्यादा ठरविते. कोणत्या महिन्यात किती खत उपलब्ध व्हायला पाहिजे ते विक्रेत्यांच्या माध्यमातून कोणत्या महिन्यामध्ये ग्राहक शेतकऱ्यापर्यंत जायला पाहिजे याचेही नियोजन होते. ठरलेल्या कालमर्यादेत पुरवठा कमी झाल्यास कृषी विकास अधिकारी आयुक्तालयाला कळवितात. त्याप्रमाणे मग आयुक्त कंपनीला खत पुरवठा सुरळीत करण्यासाठी म्हणून कायदेशीर नोटीस पाठवितात अशी याची कार्यपद्धती आहे. पण ही सारी कार्यपद्धती कागदावरच राहते, प्रत्यक्षात त्याची अमलबजावणी होत नाही हे दु:ख आहे. सभापती महोदय,

..... व्हीव्ही 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. फुंडकर ....

खरीप हंगामापूर्वी विभागवार खरीपाच्या बैठका घेतल्या जातात. खरे म्हणजे या बैठका आता औपचारिक झालेल्या आहेत. त्यात कोठलीही चर्चा होत नपाही. खानेसुमारी होते त्याच पद्धतीने या बैठकांचे नियोजन केले जाते. एकाच दिवशी दोन दोन विभागांच्या बैठका ठेवल्या जातात. सकाळी नागपूर विभागाची बैठक असेल तर दुपारी अमरावती विभागाची बैठक असे नियोजन केले जाते. त्या ठिकाणी जिल्हावार बियाणे आणि खतांची चर्चा होत नाही. जिल्हावार कोणत्या ग्रेडचे किती बियाणे पाहिजे, त्याची मागणी किती आहे वगैरे चर्चाच या बैठकांमध्ये होत नाही. याचा परिणाम काय होतो ? 18 मे 2009 ला पारोळ्याला एक घटना घडली. त्या घटनेने हे सिद्ध केले आहे. नामदार मंत्र्यांच्या मनामध्ये चांगला हेतू होता पण त्यांच्या अधिकाऱ्यांनी तो बिघडविला. तुमच्या खात्याचे सारे नियोजन बिघडविले. जळगाव, भुसावळ, मुक्ताईनगर वगैरे भागामध्ये बीटी बियाणांच्या बाबतीत आपल्या शहाण्या अधिकाऱ्यांनी नियोजन केले. त्यामध्ये बियाणे खरेदीसाठी शेतकऱ्यांनी 7/12 आणावा असे सांगण्यात आले. ..

(यानंतर श्री. सरफरे ....2डब्ल्यू 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

खरे म्हणजे 7/12 चा उतारा सादर करण्याची पध्दत आपण केव्हापासून सुरु केली? राज्यातील शेतकऱ्यांना जेवढे खत लागेल तेवढे खत आणि जेवढे बियाणे लागेल तेवढे बियाणे देण्याची राज्य शासनाची जबाबदारी आहे. 7/12 च्या उताऱ्याचा वापर कुठे सुरु झाला? आपल्याला काही मदत द्यावयाची असेल तर 2 हेक्टर जमीन असलेला 7/12 चा उतारा सादर केला पाहिजे. बियाणे व खतांसाठी 7/12 चा उतारा सादर केला पाहिजे, तो सादर केल्याशिवाय बियाण्यांची विक्री करु नये असे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत. शासनाने कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस बंदोबस्त ठेवला. शेतकऱ्याला वाटले की, बियाणे कमी आहे, खत कमी आहे म्हणून शेतकऱ्यांनी रात्री 12 वाजल्यापासून दुकानांसमोर रांगा लावल्या. ते शेतकरी रात्रभर दुकानासमोर उभे राहिले. दिवस उजाडल्यानंतर सुध्दा ते दुकान उघडले जात नव्हते. सकाळचे 9 वाजले, 11 वाजले तरी दुकान उघडले जात नव्हते. त्यामुळे शेतकऱ्यांचा संयम सुटला. आणि मग त्यांनी आरडा ओरड करावयास सुरुवात केली. त्याठिक्राणी अधिकारी गेले व त्यांनी शेतकऱ्यांना काही प्रमाणात समजाविण्याचा प्रयत्न केला. परंतु रात्रीपासून रांगेत असलेल्या शेतकऱ्यांचा राग अनावर झाल्यानंतर त्याठिकाणी गोंधळ निर्माण झाला. त्यानंतर पोलिसांना त्याठिकाणी बंदूकीच्या फैरी झाडाव्या लागल्या. त्यामध्ये पोलीस अधिकारी जखमी झाले, शेतकरी जखमी झाले. या राज्यातील शेतकऱ्यांवर खत व बियाण्यांसाठी गोळीबार होत असेल तर या सरकारला कोणत्याही प्रकारे आपली पाठ थोपटवून घेण्याचा अधिकार राहिलेला नाही. हे सरकार राज्यातील अन्नदात्या शेतकऱ्याला बियाणे व खते पुरवू शकत नाही. उलट त्यांच्यावर हे सरकार गोळीबार करीत आहे. आणि ईकडे मात्र आम्ही शेतकऱ्यांसाठी काम करीत आहोत अशापध्दतीचे ढोल बढवीत आहे.

सभापती महोदय, 13 मे 2009 रोजी अमरावती येथे माननीय मुख्यमंत्री व माननीय कृषी मंत्र्यांनी खरीपाचा आढावा घेण्यासाठी बैठक घेतली. त्यावेळी त्यांनी दोन-तीन महत्वाच्या घोषणा केल्या. त्यामध्ये शेतकऱ्यांना गुणवत्तापूर्ण बियाणे व खते मिळण्याचा मूलभूत हक्क आहे असे सांगितले. तसेच, बियाणे व खताच्या विक्रीमध्ये काळाबाजार करणाऱ्या विक्रेत्यांवर कारवाई करुन त्यांचा परवाना कायम स्वरुपी रद्द केला जाईल असे सांगितले. आतापर्यंत आपण किती विक्रेत्यांचे परवाने रद्द केले हे आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये सांगावे. आपण घोषणा केल्यानंतर 24 मे 2009 पासून अकोला जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शेतकऱ्यांनी बेमुदत उपोषण सुरु केले. आपली बैठक संपल्यानंतर तीन दिवसांनी शेतकऱ्याला जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाला बसावे लागले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MAP/

श्री. पांडुरंग फुंडकर....

सभापती महोदय, नॅशनल सीड कॉर्पोरेशन या कंपनीने बाजारात विक्री केलेले उन्हाळी भुईमूगाचे टीएजी 24 हे बियाणे बोगस निघाले. शेतकऱ्यांनी मशागत केली, रासायनिक खत टाकले, किटकनाशकांचा वापर केला तरी ते बियाणे उगवले नाही. त्यामुळे नॅशनल सीड कॉर्पोरेशनवर ताबडतोब कारवाई झाली पाहिजे अशी शेतकऱ्यांनी मागणी केली. शेतकऱ्यांना बोगस खते आणि बियाणे दिली जातात. जी चांगली खते आणि बियाणे दिली जातात त्यांचा देखील पुरवठा कमी होतो. सभापती महोदय, मागणी व पुरवठा लक्षात घेऊन कृषी विभागाने यंदाच्या हंगामासाठी सुमारे 7 लाख 66 हजार 900 हेक्टर क्षेत्राचे नियोजन केले. त्यामध्ये 2 लाख 36 हजार 700 हेक्टर इतके कापसाचे क्षेत्र आहे. त्या पाठोपाठ 1 लाख 94 हजार 500 हेक्टर व 1 लाख 16 हजार हेक्टर इतके तृणधान्य व सोयाबीनचे क्षेत्र होते. या क्षेत्रासाठी महाबीजसह खाजगी कंपन्यांकडून बियाणे उपलब्ध करुन देण्याची मागणी करण्यात आली. संकरित ज्वारीच्या 4575 क्विंटल बियाण्यापैकी 250 क्विंटलचा पुरवठा झाला. सुधारीत ज्वारीच्या 50 क्विंटल बियाण्यापैकी फक्त 10 क्विंटल पुरवठा झाला, बाजरीच्या 50 क्विंटल बियाण्यापैकी शून्य पुरवठा झाला, मका 6500 क्विंटल बियाण्यापैकी 714 क्विंटल पुरवठा झाला.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

संकरित कापूस 3000 क्वि.इतकी आवश्यकता असताना फक्त 465 क्वि.इतका पुरवठा झाला. सुधारित कापूस 430 क्वि.इतकी गरज असताना, फक्त झिरो क्विं.इतका पुरवठा झाला. तूर 4260 क्वि.इतकी गरज असताना, 180 क्विं.इतका पुरवठा झाला. मूग 4140 क्वि. इतकी गरज असताना, फक्त 1389 क्वि.इतका पुरवठा झाला. उडीद 4000 क्वि.इतकी गरज असताना, फक्त 900 क्विं.इतका पुरवठा झाला. सोयाबीन 55,000 क्विं.इतकी गरज असताना, फक्त 11,700 क्वि.इतका पुरवठा झाला आहे. तसेच पंतप्रधानांनी जाहीर केलेल्या पॅकेज अंतर्गत सांगावयाचे तर विविध बियाणांच्या बाबतीत 53,405 क्विं.इतकी गरज असताना फक्त 34,568 क्वि.बियाणे पुरविण्यात आले.एकंदर 82,200 क्वि.पैकी फक्त 15,568 क्वि.बियाणे बाजारामध्ये उपलब्ध झाले. विदर्भ असो, मराठवाडा असो किंवा खानदेश असो, याठिकाणी आता कापसाबरोबरच सोयाबीनचा पेरा देखील वाढलेला आहे. परंतु शेतकऱ्यांना सोयाबीनचे बियाणे मिळत नाही अशी स्थिती आहे. वेगवेगळया सीड कंपन्या असतील . . . .

तालिका सभापती (श्री.संजय केळकर) : मी सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, कामकाजाची वेळ दुपारी 3.00 वाजेपर्यंत होती. परंतु आजच्या कार्यक्रम पत्रिकेवर जे कामकाज दाखविण्यात आलेले आहे, ते संपेपर्यंत सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, वेगवेगळया सीड कंपन्या, महाबीज व महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ यांच्या माध्यमातून खत आणि बियाणांचा पुरवठा केला जातो. मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, मी मागच्या वर्षी माहिती काढली. खरे म्हणजे सीड कंपन्याकडून बियाणे महामंडळ सीड खरेदी करत असते. महाराष्ट्रातील सीड कंपन्यांकडून ही खरेदी होतेच, परंतु मध्य प्रदेशातील सीड कंपन्यांकडून देखील महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाकडून बियाणे खरेदी केली जाते. मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, त्यांनी याची चौकशी करावी. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना सांगू इच्छितो की, मी मागच्या वर्षी मध्य प्रदेशमध्ये देखील जाऊन आलो आणि तेथील सीड कंपन्यांच्या बाबतीत चौकशी केली. तेव्हा असे दिसून आले की, या सीड कंपन्या फक्त कागदावरच आहेत. याबाबतीत टेंडर मागविले जाते. परंतु बोगस सीड कंपन्या रजिस्टर्ड झालेल्या आहेत. कंपनीच्या नावाने टेंडर भरले जाते,पण

. . . .2 एक्स-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

जेव्हा बियाणांचा पुरवठा करण्याची वेळ येते, तेव्हा ते बियाणे मार्केटमधून खरेदी केले जाते. कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये हरास पध्दतीने शेतकरी जो माल विकण्यासाठी आणतो, तो खरेदी केला जातो. त्याच्या पिशव्या भरल्या जातात. मग तेथील कंपन्या बियाणे महामंडळाला त्या पिशव्या पुरवितात ही वस्तुस्थिती आहे.आपण याची चौकशी करणार आहात काय ? याठिकाणी शेतकऱ्यांच्या जीवाशी खेळ खेळण्याचा प्रकार सुरु आहे. शेतकऱ्यांच्या शेतामध्ये निर्माण झालले पीक हे सर्टीफाईड बियाणे म्हणून जर त्या शेतकऱ्यांना देणार असाल तर तो शेतकरी जिवंत राहू शकणार नाही. म्हणून याची चौकशी झाली पाहिजे. माननीय मंत्री महोदयांनी सांगावे की, आपण ज्या पध्दतीने नियोजन करीत आहात, मग खत विक्रेता असेल किंवा बियाणे विक्रेता असेल, जे राशी-2 नावाचे बियाणे आहे, त्याची काय अवस्था आहे ? राशी-2 या बियाणाची कंपनी आहे, खरे म्हणजे एप्रिल-मे पूर्वी त्याबाबतीत बुकींग केले जाते. व्यापारी बुकींग करतात, सरकार बुकींग करते. . . . .

तालिका सभापती : मी माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांना विनंती करु इच्छितो की, आता सभागृहासमोर माननीय संसदीय कार्य मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांना कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सादर करावयाचे आहे. सदरहू प्रतिवृत्त संमत झाल्यानंतर माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

. . . .2 एक्स-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: कामकाज सल्लागार समितीचा अहवाल सभागृहाला सादर करणे व संमत करुन घेणे.

श्री.हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्य मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर करतो.

"कामकाज सल्लागार समितीच्या शुक्रवार, दिनांक 05-06-2009 रोजी भरलेल्या बैठकीत सोमवार, दिनांक 08-06-2009 ते मंगळवार, दिनांक 16-06-2009 पर्यंतचा विधान परिषदेच्या कामकाजाचा कार्यक्रम पुढीलप्रमाणे ठरविण्यात आला आहे.

(कार्यक्रम)

(प्रेस : येथे सोबत जोडलेला कार्यक्रम छापावा.)

. . . .2 एक्स-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

05-06-2009 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) XX-4

APR/ MAP/ SBT/ 15:00

तालिका सभापती : कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर झाले आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहास संमत आहे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

यानंतर कु.थोरात .. . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: खरीप हंगामापूर्वी खते व बी-बियाण्यांची टंचाई तसेच अकाली झालेल्या गारपीटीमुळे राज्यात शेतीचे व फळबागांचे झालेले नुकसान.

मु.शी.: खरीप हंगामापूर्वी खते व बी-बियाण्यांची टंचाई तसेच अकाली झालेल्या गारपीटीमुळे राज्यात शेतीचे व फळबागांचे झालेले नुकसान या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, नितीन गडकरी, डॉ. नीलम गोऱ्हे डॉ. दीपक सावंत, सर्वश्री. केशवराव मानकर, विनोद तावडे, सुरेश जेथलिया, चंद्रकांत पाटील, सय्यद पाशा पटेल वि.प.स. यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरु)

श्री. पांडुरंग फुडकर :सभापती महोदय, मी आपल्याला राशी-2 या बियाणासंबंधी सांगत होतो. सभापती महोदय, राशी-2 हे वाण असे आहे की, विदर्भ, मराठवाडा आणि खानदेशातील कापूस उत्पादक शेतकरी प्रामुख्याने या राशी-2 कडे वळलेला आहे. या राशी-2 कंपनीने व्यापाऱ्यांकडून एप्रिल व मे महिन्यात पैसे घेऊन बियाणांचे बुकिंग केले होते. मागणी प्रमाणे पुरवठा करु शकतो की नाही याचा या राशी-2 कंपनीने त्यावेळी विचार केला नाही. राशी-2 च्या पेरणीला विदर्भात "धूळ पेरणी" असे म्हणतात. मे महिन्यात म्हणजे रोहिणी नक्षत्र लागण्या अगोदर साधारणत: पावसाळयापूर्वी या बियाणांची पेरणी केली जाते. त्यावेळी जेव्हा हा विक्रेता बियाणे मागायला राशी-2 कंपनीकडे गेला त्यावेळी या राशी-2 कंपनीने हात वर केले आणि सांगितले की, जर बियाणे पाहिजे असतील तर तुम्हाला जास्तीची किंमत मोजावी लागेल तसेच तुम्ही मागाल तेवढे बियाणे आम्ही तुम्हाला देऊ शकणार नाही. सभापती महोदय, या राशी-2 कंपनीवर काय कारवाई करण्यात येणार आहे? सभापती महोदय, या पध्दतीने बियाणे विक्रेते किंवा बियाणांच्या कंपन्या सरकारला वेठीस धरतात,शेतकऱ्याला वेठीस धरतात, विक्रेत्यालाही वेठीस धरतात आणि मनमानेल त्या पध्दतीने बियाणांचा कारभार महाराष्ट्रात चालतो. आपले नशीब चांगले आहे म्हणून पावसाळा थोडा पुढे गेला आहे. पाऊस पडला असता तर कदाचित या अधिवेशनामध्ये खतासाठी आणि बियाणासाठी या सभागृहाचे कामकाज आम्हाला बंद करावे लागले असते, अशी स्थिती या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/

श्री. पांडुरंग फुंडकर...

राज्यामध्ये निर्माण झाली असती. तेव्हा शासन आता तरी या खताचे आणि बियाणांचे नियोजन करणार आहे काय? ही चर्चा उपस्थित करण्यामागे आमचा उद्देश असा आहे की, या बाबतचे नियोजन नीट पध्दतीने केले गेले पाहिजे. कृषि खात्याचा कारभार कसा चाललेला आहे?

माझ्याकडे बुलढाणा जिल्हा कृषी साहित्य विक्रेता व उत्पादक असोसिएशनने कृषी विभागाला लिहिलेले एक पत्र आहे. त्या पत्रामध्ये असे म्हटले आहे की, "मागील दीड वर्षापासून रासायनिक खतांची उपलब्धता कमी असल्यामुळे ते खरेदी करणे व विक्री करणे या दोन्ही गोष्टी सर्वसामान्य दुकानदारांना दिवसें दिवस त्रासदायक ठरत आहेत. रासायनिक खतांची कमतरता असल्यामुळे खत कंपन्या विक्रेत्यांना वेठीस धरुन त्यांची दामदाटी करीत आहेत. डी.ए.पी. पाहिजे असेल तर सल्फर घ्या." सभापती माहेदय, डी.ए.पी. पाहिजे असेल तर जो सल्फरचा आऊट-डेटेड कोटा पडलेला आहे तो घेतल्याशिवाय डी.ए.पी. मिळणार नाही. "किंवा 19:19:19 घ्या किंवा एखादा मायक्रोन्युट्रीयंट घ्या असे सुरु आहे. एका कॉम्प्लेक्सला मध्ये चक्क 10 टन, एका कॉम्प्लेक्सला अडीच टन सल्फर घ्यायला भाग पाडले." ही कुठली पध्दत आहे, हा कुठला कायदा आहे की, शेतकऱ्यांना पाहिजे ते खत घ्यायचा असेल तर त्या खताबरोबर दुसरे खत घेतले पाहिजे. सभापती महोदय, "हया परिस्थितीमुळे जिल्हयातील खत विक्रेत्यांकडे जवळपास दीड ते दोन कोटी रुपयांचे बेनसल्फ, 19:19:19 मॅग्नेशियम सल्फेट, सेंद्रीय खतांच्या पिशव्या इत्यादी जे काही सोबत दिले ते पडलेले आहे." तसेच सभापती महोदय, रॅक पॉईंट चा मुद्दा महत्वाचा आहे.

यानंतर श्री. बरवड....

अशुद्धीत प्रत / परिशुद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

मागच्या वर्षी आपण घोषणा केली होती. रॅक पॉइन्टवरुन एफओआर मिळत नाही त्यामुळे 10 ते 20 रुपये प्रती बॅग ट्रान्स्पोर्टेशन आणि हमालीचा खर्च लागतो. रॅक पॉइन्टवरुन माल आणावयास 500 रुपये ते 2000 रुपये प्रती गाडी भाडे सोडून वेगळे द्यावे लागतात, नाही तर डी.ओ. हातात असून सुध्दा विक्रेत्यांकडे खत पोहोचत नाही. मागच्या वेळी हे ट्रान्स्पोर्टींग चार्जेस आपण दिले नाहीत. त्याचा परिणाम असा झाला की, महाराष्ट्र डिलर असोसिएशनने परवा 25 एप्रिलला अमरावतीला एक ठराव केला. खत उत्पादक कंपन्यांनी वितरक व विक्रेत्यांच्या ठिकाणापर्यंत रासायनिक खत पोहाचवून न दिल्यास येत्या खरीप हंगामात खत न विकण्याचा ठराव महाराष्ट्र फर्टिलायझर, पेस्टीसाईड, सिड डीलर असोसिएशनने अमरावती येथे शनिवारी झालेल्या बैठकीत केला. आता त्याबाबत काय निर्णय झाला हे माहीत नाही पण जर निर्णय झाला नसेल तर शेतकऱ्यांची काय परिस्थित होणार आहे याचा शासनाने विचार करावा. माझा आक्षेपार्ह मुद्दा असा आहे की, खत विक्रेत्यांना, बियाणे विक्रेत्यांना लायसन्स देण्याची जी पध्दत आहे ती या वर्षी बदलली आहे असे मला वाटते. आता ते अधिकार आपण कृषी आयुक्तांना दिले. त्याचा परिणाम असा झाला की, 28.4.2009 पर्यंत त्यांनी लायसन्स दाबून ठेवले. मार्केटमध्ये विक्रेत्यांमध्ये अशी चर्चा आहे की, त्यांच्याकडून 5 कोटी रुपयांची मागणी करण्यात आली. आपण जर 5 कोटी रुपये दिले तर आपल्याला लायसन्स रिन्यू करुन दिले जातील, आपल्याला नवीन लायसन्स दिले जातील, अन्यथा दिले जाणार नाही. अशा प्रकारे कोंडी केली गेली. या पध्दतीने खत आणि बियाणांच्या बाबतीत राज्यामध्ये कारभार चालला असेल तर आधी शेतकरी एका बाजूला कर्जामुळे आत्महत्या करीत होता, दुसऱ्या बाजूला मालाला किंमत नाही म्हणून आत्महत्या करीत होता आणि आता तिसऱ्या बाजूला खत मिळत नाही म्हणून शेतकऱ्याला आत्महत्या करावी लागेल. या राज्यामध्ये वीज मिळत नाही म्हणून आत्महत्या, कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या, मुलीचे लग्न करता येत नाही म्हणून आत्महत्या आणि आता तर खत मिळत नाही म्हणून आत्महत्या अशी स्थिती येण्याची शक्यता आहे. मी माननीय मंत्रिमहोदयांना विनंती करतो की, आपण थोडी कठोर पावले उचलावीत. शेतकऱ्यांना नागवणाऱ्या ज्या कंपन्या असतील त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे. राशी-2 कंपनीचा मालक

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

कितीही मोठा असो त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे. आपले काही अधिकारी आम्हाला खाजगीत सांगतात की, साहेब, तो मोठा माणूस आहे, आम्ही त्यांच्यावर कारवाई करु शकत नाही. आपल्याच अधिकाऱ्यांचे हे उत्तर आहे. मोठा माणूस असला तरी त्याला राज्यात काहीही करण्याची मुभा आहे काय ? तो कितीही मोठा असू द्या पण अन्नदाता शेतकऱ्याला जर ते अशा पध्दतीने ब्लॅकमेल करीत असतील तर त्या राशी-2 कंपनीवाल्यालवर सुध्दा कारवाई झाली पाहिजे अशी माझी मागणी आहे. राज्यात खत आणि बियाणांची तीव्र टंचाई आहे. कधी कधी असे वाटते की, शेतकऱ्यांचे नशीबच असे आहे का ? दुसऱ्या बाजूला परमेश्वरही त्या शेतकऱ्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करीत नाही. मे महिन्याच्या 21 तारखेला, 22 तारखेला, 23 तारखेला, 24 तारखेला राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये वादळ झाले. चकीवादळापेक्षाही भयानक वादळ झाले. मी त्या दिवशी अकोल्याला उपस्थित होतो. एक मोटारसायकल एका जागेवरुन 50 फूट लांब लोटली गेली. विजेचे खांब वाकडे झाले. ही सत्य घटना आहे. वादळ थांबल्यानंतर मी पाहणी करण्यासाठी गेलो. मोटारसायकल 50 फूट बाजूला सरकली याचा अर्थ किती मोठे वादळ आले असेल याची आपण कल्पना करावी. घरांचे नुकसान झाले, विजेच्या तारा तुटल्या, त्यामुळे जनावरे मेली, माणसे मेली. जळगाव असेल, संग्रामपूर असेल, बुलढाणा जिल्हा असेल, अकोला जिल्हा असेल, खानदेश असेल, नाशिक असेल या भागामध्ये शेतकऱ्यांच्या पिकाचे प्रचंड नुकसान झाले. केळीची झाडे जमीनदोस्त झाली. एका एका झाडाला 20 ते 25 किलोचे घळ असलेली केळीची झाडे नेस्तनाभूत झाली. केळी उत्पादकांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले. कांदा उत्पादकांचे नुकसान झाले. नाशिक जिल्हातील भाजीपाला बागायतदार शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले. वादळ तर आलेच पण अनेक भागामध्ये गारपीट सुध्दा झाली.

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

सरकारने या वादळाची, गारपीटीची दखल घेतली आहे काय ? अजूनही शेतक-यांच्या जमिनीचे पंचनामे झालेले नाहीत. विद्युत तारांमुळे, वादळामुळे, जनावरे मेली आहेत त्याची नुकसान भरपाई मिळालेली नाही. दुष्काळात तेरावा महिना म्हणावे तसे झाले आहे. एका बाजूला गट सचिव संपावर गेलेले आहेत. मी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती केली होती की, खरीपासाठी जिल्हा सहकारी बँकेतून शेतक-यांना कर्ज दिले जाते. परंतु राज्यात गट सचिव 15-15 दिवस संपावर गेले आहेत. खरीपाची पेरणी तोंडावर आलेली असताना राज्य सरकार हा संप मिटविण्यासाठी काही करीत नाही, त्याबाबत सभागृहात स्टेटमेंट केले जात नाही. अधिवेशनापूर्वी झालेल्या चहापानाच्या कार्यक्रमाच्या वेळी आम्ही माननीय मुख्यमंत्र्यांना म्हटले होते की, गट सचिवांचा चालू असलेला संप ताबडतोब मिटवावा. त्याशिवाय शेतक-यांना कर्जपुरवठा होणार नाही, कर्ज मिळाले नाही तर त्यांना बियाणे घेता येणार नाही, शेतात पेरणी करता येणार नाही. परंतु त्याची दखल घेतली गेली नाही. त्यामुळे अजूनही राज्यात शेतक-यांना पीक कर्जाचे वाटप झालेले नाही. एका बाजूला गट सचिवांचा संप चालू आहे, दुस-या बाजूला तो वादळात सापडला आहे, त्याला बियाणे मिळत नाही, शेतात केलेली मशागत वाया गेली आहे, शेतात पाणी आहे त्यामुळे राशी-टू ची पेरणी करुन पीक जगविण्याचा तो प्रयत्न करीत होता परंतु पण लोड शेडिंगमुळे शेती पंपाद्वारे शेताला पाणी देता येत नाही. म्हणजे चारही बाजूने तो वेढला गेला आहे. त्याचा परिणाम आत्महत्यामध्ये होत आहे. आम्ही असा आग्रह धरला होता की, नुकसानीचे ताबडतोब पंचनामे करावेत. ज्या शेतक-यांचे वादळामुळे नुकसान झाले आहे त्यांना ताबडतोब नुकसान भरपाई दिली जाईल असे घोषित करावे. शेतातील विजेची तार पडली आहे ती जोडून दिली जाईल, तसेच जनावरे मेली असतील त्यांना नुकसान भरपाई दिली जाईल. सभापती महोदय, एका बैल जोडीची किंमत 50 ते 70 हजार रुपये असते. एक बैल मेला तर दुसरा बैल घेण्यासाठी शेतकरी खर्च करु शकत नाही अशी त्यांची स्थिती आहे. म्हणून त्यांना ताबडतोब नुकसान भरपाई द्यावी. ज्या शेतक-यांचे वादळामुळे नुकसान झालेले आहे त्या नुकसानीचे पंचनामे करुन 7 दिवसामध्ये नुकसान भरपाई दिली जाईल अशी घोषणा करावी अशी विनंती करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, ग्रामीण भागातील उद्ध्वस्त शेतक-यांना प्रशासकीय यंत्रणेच्या माध्यमातून आणखी जास्तीत जास्त उद्ध्वस्तेकडे नेण्याचे प्रयत्न कसे होत आहेत त्याच्यावर ही चर्चा होत आहे.

सभापती महोदय, आहे पण मिळत नाही, देतो पण देत नाही, करतो पण करीत नाही या विषयावर आजची ही चर्चा आहे. दुष्काळ असेल तर मी समजू शकतो. दुर्भिक्ष्य असेल तर मी समजू शकतो. परंतु असे काही नसताना अशी परिस्थिती निर्माण होते त्यावेळी विधिमंडळाच्या माध्यमातून आम्हाला शेतक-यांच्या व्यथा मांडाव्या लागतात, त्यासाठी आजची ही चर्चा आहे.

यानंतर श्री.शिगम...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मी अत्यंत नम्रपणे आपल्यामार्फत शासनाला सांगतो. मला मंत्रिमहोदयांकडून उत्तर पाहिजे की, खते, महाराष्ट्रात बी-बियाण्यासंबंधी निर्माण झालेल्या परिस्थितीबाबत ही चर्चा आहे, या चर्चेतून कदाचित सरकारला जाग आली तर आली. सरकारला निवडणुकांना सामोरे जावे लागणार आहे. येन केन प्रकारे त्याला तोंड द्यावयाचे आहे.

या नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

वैद्यनाथन समितीचा अहवाल स्वीकारल्यानंतर सेवा संस्थांच्या संदर्भात गट सचिवांचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. अधिवेशन सुरु होण्यापूर्वी माननीय मुख्यमंत्र्यांकडून विरोधी पक्षाच्या लोकांचा चहा-पाणी घेण्यासाठी निमंत्रित केले जाते. आम्हा चहा पानाच्या कार्यक्रमवर बहिष्कार टाकतो त्यावेळी तो गंमतीचा विषय होतो. सत्ताधारी पक्षाकडून सांगितले जाते की, हे त्यांचे नेहमीच आहे. या राज्यात नव्या दमाचे मुख्यमंत्री आलेले आहेत. ते पूर्वी वन-डे क्रिकेट खेळत होते. आता मी ट्वेन्टी ट्वेन्टी खेळतो आहे अशी मुलाखत दिली आहे आणि ती वृत्तपत्रात छापून आली आहे., नव्या दमाचे मुख्यमंत्री आलेले आहेत, ते सिक्सर आणि चौकार मारतील असे आम्हाला वाटत होते. आम्ही जाणीवपूर्वक या वेळी त्यांच्या निमंत्रणाचा स्वीकार करुन चहा-पानाच्या कार्यक्रमास उपस्थित राहिलो. या अधिवेशनात विरोधी पक्षाला काय अभिप्रेत आहे त्यासंदर्भात त्यांच्याशी चर्चा केली. विरोधी पक्षाला सरकारकडून काय अपेक्षित आहे त्यासंबंधीची भूमिका माननीय मुख्यमंत्र्यांनी त्या कार्यक्रमात स्पष्ट केले पाहिजे. विरोधी पक्षाच्या अडचणी त्यांनी समजावून घेवून त्या बाबतीत शासन काय करणार आहे, तसेच या अधिवेशानात सरकारची काय भूमिका असणार आहे, सरकार कोणकोणत्या गोष्टीची दखल घेणार आहे याबाबतची त्यांनी विरोधी पक्षाला माहिती देणे आवश्यक असते. मला आठवते की, गट सचिवांच्या विषयाच्या बाबतीत माननीय विरोधी पक्ष नेते श्री. रामदास कदम बोलले,तसेच सन्माननीय सदस्य श्री. एकनाथ खडसे बोलले, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी देखील हा विषय त्या ठिकाणी काढला होता, मी देखील हा विषय तेथे उपस्थित केला होता. हे सर्व गट सचिव सन्माननीय श्री. उध्दव ठाकरे यांना शिवसेना भवन येथे भेटण्यासाठी आले होते. त्यांनी जे निवेदन दिले आहे, ते माझ्याकडे उपलब्ध आहे. या गट सचिवांच्या सगळया सवयी, त्यांच्या अडचणी यांची मला पूर्णपणे माहिती असल्यामुळे मी त्यांना माझ्या पध्दतीने समजावून सांगितले. तो विषय इतराना नगण्य वाटतो. परंतु ग्रामीण भागामध्ये गट सचिवांच्या संपामुळे शेतकरी अडचणीत सापडलेला आहे. या विषयाच्या संदर्भात मी सन्माननीय श्री. उध्दव ठाकरे यांना सांगितले की, हा विषय धोरणात्मक आहे. केंद्र शासनाने वैद्यनाथन समितीचा अहवाल स्वीकारला आहे. त्या अहवालाची अंमलबजावणी करणे हे प्रत्येक सरकारला भाग आहे. त्यातून हा गट सचिवांचा प्रश्न निर्माण झालेला आहे. हा विषय मी

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

एवढयासाठी मांडला की, गट सचिवांचे जे काही करावयाचे आहे ते करा. त्यांच्या संदर्भात शासनाला जो काही निर्णय घ्यावयाचा असेल तो त्यांनी घ्यावा. परंतु ग्रामीण भागात त्यांच्या संपामुळे फार मोठी कोंडी निर्माण झाली आहे. प्रत्येक शेतकरी सेवा सहकारी संस्थांच्या मार्फत शेतक-यांचा व्यवहार चालत असतो. या संस्थांच्या गट सचिवांनी संप केला असल्यामुळे शेतक-यांना अनंत अडचणींना सामोरे जावे लागते आहे. म्हणून राज्यातील शेतक-यांसाठी दुसरी काही पर्यायी व्यवस्था करा. आम्हाला वाटले की, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाला माननीय उपमुख्यमंत्र्यांनी उत्तराचे भाषण केले. परंतु या गंभीर विषयाचा साधा उल्लेखही केला नाही. त्यांना हा विषय अतिशय कॅज्युअल वाटला. सरकारला हा विषय गंभीर वाटला नाही काय ? त्यांनी हुतात्मा स्मारक कसे बांधले, ते किती खोल बांधले या विषयी माहिती दिली. मी त्यावेळी काही बोललो नाही. मी बोललो असतो तर शासन मोठया अडचणीत आले असते. मी बोललो असतो तर उद्याच्या सर्व वृत्तपत्रात हेड लाईन्स म्हणून छापून आले असते. परंतु तो आमचा उद्देश नव्हता. "Neither to damage, not to focus" आमच्या सभागृहाच्या नेत्याचे नुकसानही करावयाचे नव्हते. त्यांना प्रसिध्दी देखील द्यावयाची नव्हती म्हणून मी गप्प बसलो. परंतु त्यांनी अतिशय मरगळलेले, चटावरचे श्राध्द उरकवावे असे उत्तर दिले आहे. उत्तर द्यावयाचे म्हणून द्यावयाचे. सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या एकाही प्रश्नांला त्यांनी उत्तरे दिली नाहीत. एकंदरीत सरकारच्या कृतीशीलतेमधील पडझड व्हावी, शैथिल्यता निर्माण व्हावी अशा प्रकारची उत्तरे या सभागृहात माननीय मंत्री महोदयांकडून दिली जात आहेत व ही गोष्ट गेल्या चार पाच दिवसापासून सभागृहात अनुभवतो आहे. यावेळी एक गोष्ट अतिशय चांगली झाली आहे. या अधिवेशनात मी अतिशय समाधानाने बाहेर जाणार आहे. एका गोष्टीचे फलित मला अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी माझ्या हातात लागेल असे मला वाटले नव्हते. मी मनापासून या सरकारला धन्यवाद देतो आणि या सरकारमधील मंत्र्यांना मनापासून शुभेच्छा व्यक्त करतो. भविष्यामध्ये तुम्ही तेथे कसे राहणार नाहीत याची चिंता तुम्ही करीत असाल तर तुम्हाला मी शुभेच्छा देतो.

यानंतर श्री. भोगले...

अशुद्धलिखित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

काय लागले हाती? हा देश रामाचा नाही, हा देश बाबरचा आहे. या देशात रामाच्या गाण्यावर आम्ही बंदी घातली. कोणासाठी? का बंदी घातली? असे त्या गाण्यामध्ये काय आहे? ज्याच्यामुळे कोणाच्या भावना दुखवाव्यात. परंतु ते केले म्हणून आम्ही धन्यवाद देतो. उद्याकरिता महाराष्ट्राला सभागृहातून संदेश दिला. या देशाचा महान प्राणी कोण असेल तर तो बाबर आहे.

ॲड.उषा दराडे : सभापती महोदय, सत्ताधारी पक्षाच्या कोणत्याही मंत्र्यांनी महाराष्ट्र बाबरचा आहे असे म्हटलेले नाही. चुकीचे रेकॉर्डवर येणार नाही याची खबरदारी घ्यावी.

श्री.दिवाकर रावते : खलनायकासारखे कधीतरी हसावे लागते. बाबरचे नाव घेतले की यांना इंगळ्या का डसतात? मी असे म्हणालो नाही की कोणी म्हणाले. या सभागृहातून हा संदेश मिळाला असे मी म्हटले.

ॲड.उषा दराडे : आम्ही बाबरचे नाव घेतले म्हणून चिडणारे नाही. बाबरचा देश आहे आणि रामाचा देश नाही असे समोरुन बोलले गेले त्याला आम्ही आक्षेप घेतला. बाबरचे नाव घेण्यामुळे आम्ही चिडणारे नाहीत. कोणाचा बुध्दीभेद होईल अशी भाषा वापरली जाऊ नये.

श्री.दिवाकर रावते : वकिली भाषेमध्ये खोट्याचे खरे आणि खऱ्याचे खोटे करणे हा अंगीभूत गुणधर्म असतो. त्यामुळे असे कधीकधी होते.

ॲड.उषा दराडे : वकिलीचा पेशा हा अत्यंत नोबल व्यवसाय आहे. खऱ्याचे खोटे आणि खोट्याचे खरे करणारा व्यवसाय नाही. न्यायदान करणारा व्यवसाय आहे.

श्री.दिवाकर रावते : वह हिंदुस्थान में आया ही नही, वहॉ से उठाकर लाए त्या कसाबचे वकीलपत्र घेणारे कोण? कसाबचा वकील खोटेच बोलत आहे. तेच उदाहरण घेऊन बोललो. तुम्ही वकील आहात म्हणून वाईट वाटते का? या सभागृहातून संदेश काय गेला ते मी सांगितले. कृतीचा अन्वयार्थ मी सांगितला. त्यामुळे मी आनंदी आहे. गट सचिवांच्या संदर्भात आज शेतकरी कोंडीत सापडला आहे. त्यांची कोंडी फोडण्यासाठी आठवडाभर आम्ही सांगूनही शासनाने लक्ष दिले नाही. असे गर्भगळीत सरकार याठिकाणी राज्य करीत आहे. तुम्ही चांगले काम केले त्याबद्दल आम्हाला आनंद आहे. सन्माननीय श्री.गोपीनाथ मुंडे प्रचंड मतांनी निवडून आले. किती चांगले योगदान मिळाले आम्हाला. काही चिंता करु नका. आम्ही बलदंड भाऊ तुमच्यासाठी असल्यामुळे काही चिंता करु नका. असेच काम करा.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

सभापती महोदय, बियाण्यांच्या संदर्भात सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.फुंडकर यांनी भूमिका मांडली. राशी-2 चे व्यापाऱ्यांकडून बुकिंग घेतले. ते बुकिंग 130-135 या दराने घेतले. आम्ही शेतकऱ्यांना एवढे राशी-2 पुरविणार म्हणून बुकिंग घेतले. परंतु राशी-2 चे मालक आणि कंपनी यांनी वाटप करताना 155 रुपये भाव घेतला. राशी-2 ची जाहिरात लोकमत वृत्तपत्रात दिली. आम्ही मद्रासमध्ये वादळ झाल्यामुळे बियाण्यांचा योग्य तो पुरवठा करु शकत नाही.

3इ.2....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

म्हणून शेतकऱ्यांनी आम्हाला माफ करावे. मुळात असे की, राशी-2 या बी.टी. बियाच्यासंबंधीचा कायदा सभागृहात पारित होऊ शकले नाही म्हणून ते विधेयक मागे घेण्यात आले. त्यानंतर ते लॅप्स झाले व पुन्हा निवडणुका झाल्यानंतर पहिल्यांदा जी मंत्रिमंडळाची बैठक झाली त्यामध्ये यासंबंधीच्या अध्यादेशाला मंजुरी दिली व तो अध्यादेश सभागृहासमोर आला. याचा अर्थ असा होतो की, या सभागृहात विधेयक पारित केलेले नसतांना अध्यादेशाच्या माध्यमातून सरकारला जो अधिकार प्राप्त झाला, तो योग्य की अयोग्य यासंबंधीची चर्चा विधेयकावर बोलताना होणारच आहे. राशी-2 या बियाण्याच्या बाबतीत कोणती किंमत ठेवावी यासंबंधीचे अधिकार आपल्याला या अध्यादेशाच्या माध्यमातून मिळाले. परंतु राशी-2 या बी.टी. कॉटनच्या बियाण्याला फक्त आपल्याच राज्यात मागणी नाही तर शेजारच्या आंध्र प्रदेश, कर्नाटक, गुजरात तसेच उत्तर प्रदेश अशा प्रकारे जी जी राज्ये कापसाचे उत्पादन घेतात त्या राज्यांतूनही मोठ्या प्रमाणात मागणी येऊ लागली. परंतु बियाण्याच्या किंमती नियंत्रित केल्यामुळे बियाणे कंपनीला ठराविक किंमतीत पाहिजे तेवढा नफा मिळत नव्हता म्हणून कंपनीने या बियाण्याचा पुरवठा कमी केला आणि इतर ठिकाणी त्या बियाण्याची विक्री करुन भरमसाठ नफा कमाविला त्यामुळेच शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण होईल अशी परिस्थिती राज्यात निर्माण झालेली आहे. हा आपण तयार केलेल्या विधेयकाचे हिमनगाच्याही खालचा भाग असेल. प्रत्यक्ष विधेयकावर चर्चा होईल त्यावेळेस सविस्तर बोलता येईल. परंतु अशा प्रकारे नियंत्रित किंमतीमुळे शेतकऱ्यांचे काय नुकसान होते ही भूमिका मी सभागृहासमोर मांडण्याचा प्रयत्न करीत आहे. या अध्यादेशाच्या माध्यमातून किंमती नियंत्रित करुन अशा प्रकारे शेतकऱ्यांची पिळवणूक होत असेल आणि ठरविलेल्या भावापलिकडे जाऊन बियाणे विकणाऱ्या आणि शेतकऱ्यांसाठी बियाण्याचा पुरवठा न करणाऱ्या कंपन्यांवर सरकार कोणती कारवाई करणार आहे, याचा खुलासा झाला पाहिजे. शासनाला या अध्यादेशान्वये जे अधिकार प्राप्त झालेले आहेत ते देखील सभागृहाला समजले पाहिजेत. मला एका गोष्टीचे आश्चर्य वाटते की, माननीय कृषी मंत्री अथवा माननीय मुख्यमंत्र्यांनी यांनी असे निवेदन केले आहे की, राशी-2 बियाणे उपलब्ध नसेल तर अशाच प्रकारच्या आणि त्याच जातीचे बियाणे विकणाऱ्या दुसऱ्या कंपनीचे बियाणे बाजारात उपलब्ध आहे ते बियाणे शेतकऱ्यांनी घ्यावे. याचा अर्थ मुलगी दाखवायची आणि वरुन म्हणायचे की ही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

मुलगी कशाला करतो, त्यापेक्षा मेहुणी बरी. शेतकऱ्याला ठराविक एका गोष्टीची गरज आहे आणि ती पुरविण्यात अपयश येत असेल तर आम्ही दुसरी व्यवस्था केली, तिसरी व्यवस्था केली अशा प्रकारे कंपनीच्या एजंटचे काम सरकार करीत आहे. सरकार कंपनीचे एजंट आहे काय ? शेतकऱ्याला जे बियाणे आवश्यक असते ते पुरविण्याची जबाबदारी शासनाचीच आहे, त्याला अमुक पर्याय दिला हे सांगणे कितपत योग्य आहे ? सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांच्याकडून एक जाहिरात घेतली. ती जाहिरात कृषी विभाग, महाराष्ट्र शासन या विभागाची असून त्यात खरीप हंगाम, 2009 साठी केंद्रशासनाचे अनुदान .....या अनुदानाच्या संदर्भात मी नंतर बोलणार आहे. विविध प्रकारची 35.35 लाख मेट्रिक टन एवढ्या खताचा पुरवठा करण्याचे नियोजन शासनाने केले आहे. असे त्या निवेदनात सांगून एका प्रकारे आशा दाखविली आहे. राज्यातील जनतेला आशा दाखविली आहे की, घाबरु नका, ऐन पेरणीच्या वेळी खताची वाढती मागणी विचारात घेऊन राज्यशासनाने 4 लाख मेट्रिक टन डीएपी खताचा संरक्षित साठा करण्याचे नियोजनन केले आहे. प्रत्येक जिल्ह्यात डीएपी या खताचा पुरवठा करण्यासाठी संरक्षित साठा केला असून वेळेत ते खत उपलब्ध करुन दिले जाईल, अशा प्रकारची जाहिरात शासनाने दिली आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

सभापती महोदय, महाराष्ट्रातील शेतकरी हे डीएपी खतापेक्षा युरीया खताला जास्त प्राधान्य देतात, युरीया खत हे महाराष्ट्रातील शेतक-यांचा आत्मा आहे. शेतक-यांना कोणतेही खत मिळाले नाही तर ते नाइलाजाने डीएपी खत घेतात व त्यामध्ये इतर खत मिक्स करुन आपल्या शेतात टाकतात. युरीया, एसएमपी, डीएपी,एमओपी, संयुक्त खते, मिश्र खते यांचा पुरेसा साठा उपलब्ध करुन देण्याचे नियोजित केलेले अशी आपण जाहिरात दिली होती. खताच्या संदर्भात या शासनाने काय काय केलेले आहे हे सांगण्यासाठीच मी उभा आहे. पुढे असे म्हटले आहे की, "केंद्रशासनाने व राज्य शासनाने खताच्या वाहतुकीचे अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे." खताच्या वाहतुकीच्या संदर्भात कायद्यात तरतूद करण्यात आलेली आहे व ही तरतूद माझ्याकडे आहे. वाहतूक अनुदान ही कायदेशीर तरतूद आहे. फर्टीलायझर कंट्रोल ॲक्ट,1985 यामध्ये व्यापा-यांच्या दरवाज्यात खत पोहचविण्याची वाहतुकीसहीत जबाबदारी शासनाची आहे. रॅकमधून जर व्यापा-याने खत उचलले तर त्याचेही अनुदान सरकारला द्यावे लागते. वाहतूक अनुदानाच्या संदर्भात कायद्यात तरतूद आहे, तुम्ही शेतक-यांवर काही मेहरबानी करीत नाही. वाहतूक अनुदानाचा उल्लेख अर्थसंकल्पात सुध्दा आहे. आम्ही फार वेगळे करीत आहोत असे भासविण्याचे काम हे शासन करीत आहे. परंतु वाहतुकीच्या संदर्भात केंद्रसरकारचीच तरतूद आहे. वाहतुकीचे पैसे केंद्र सरकार देते ते पैसे काही राज्यशासनाच्या तिजोरीतून जात नाही. खताच्या वाहतुकीसाठी केंद्रशासनाने राज्यसरकारला 20 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. लातुर येथील शेतक-यांवर जेव्हा लाठी चार्ज झ ाला होता त्यावेळेस तेथे जाऊन मी शेतक-यांशी चर्चा देखील केली होती. खताच्या संदर्भात जाहिरातीत असे म्हटले आहे की, "खताची विक्री त्याच्या अधिकतम दरापेक्षा, एमआरपी पेक्षा जास्त दराने विक्री केल्यास, लिंकिग व साठेबाजी केल्यास उत्पादक कंपनी व विक्रेत्यांविरुध्द कडक कारवाई करण्यात येईल. खरीप हंगामासाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आला असून खताबाबत कोणतीही तक्रार असल्यास जिल्हाधिकारी व कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याशी संपर्क साधावा." आपल्या खात्यामार्फत आपण जी जाहिरात दिली होती त्या जाहिरातीमधील कोणती कलमे या राज्यशासनाने पाळली आहेत? गेल्या तीन-चार वर्षापासून खताच्या तसेच बि-बियाण्यांच्या संदर्भात महाराष्ट्रात जो गोंधळ झालेला आहे तो पाहून माननीय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

मुख्यमंत्र्यांनी खते व बी-बियाण्यांच्या पुरवठ्याच्या संदर्भात दक्षता घेण्याच्या संदर्भात अगोदरच काळजी घेतली व माननीय मुख्यमंत्री महोदयांनी तीन वेगवेगळया दिवशी जाहीर निवेदने केली. त्यांनी काही ठिकाणी चिंताही व्यक्त केली. खते व बी-बियाण्यांच्या संदर्भात शेतक-यांनी कोणत्याही प्रकारची चिंता करु नये, यासंदर्भात शासनाने दखल घेतलेली आहे असे माननीय मुख्यमंत्र्यांनी निवेदन केलेले आहे. बी-बियाण्यांमध्ये तसेच खत वाटपामध्ये काही तरी गडबड होईल अशी माननीय मुख्यमंत्र्यांना चिंता होती त्यामुळेच त्यांनी तीन वेळेस यासंदर्भात निवेदन केलेले होते. माननीय मुख्यमंत्र्यांनी जी चिंता व्यक्त केली होती ती योग्य ठरली. खते व बी-बियाण्यांच्या संदर्भात जामनेर येथे रस्ता रोको झाला, भडगाव येथे शेतक-यांवर लाठी चार्ज झाला, मेहंदळयामध्ये शेतक-यांनी दुकानावर दगडफेक केली,यावल येथे राशी बियाण्यांच्या वाटपासाठी पोलिसांना बोलवावे लागले व पोलीस बंदोबस्तात बियाण्यांचे वाटप करावे लागले. इतर ठिकाणी जाळपोळ होऊ नये म्हणून पोलिसांना दक्षता घ्यावी लागली. धरणगाव येथे सुध्दा पोलिसांच्या बंदोबस्तात बियाणे वाटप करावे लागले. हे लोण उत्तर महाराष्ट्रातून, मराठवाडा व विदर्भात आले होते. खते व बि-बियाण्यांच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी जी चिंता व्यक्त केली होती ती बरोबर होती. इटीव्हीवर ग्रामीण भागातील बातम्या बरोबर दाखवल्या जातात.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

परभणी येथील शेतकरी बियाण्यांच्या दुकानासमोर बियाण्यांची मागणी करीत होते असे दृश्य टी.व्ही. वर दाखविले जात होते. त्या दुकानदारांकडे बियाणे असतांनासुध्दा तो शेतक-याला देत नव्हता. आयुक्तांनी बियाणे विकण्याची परवानगी दिली नसल्यामुळे बियाणे असूनही देऊ शकत नाही असे दुकानदारांनी त्यांना सांगितले होते. आयुक्तांनी वेळेवर बियाणे विकण्याची परवानगी का दिली नाही या बाबतीत मी अधिक खोलात जाण्याचा प्रयत्न केला . तेव्हा मला जे समजले ते मी सभागृहात अधिकृतपणे सांगू इच्छितो की, त्यांनी पाच कोटी रुपयांची मागणी केली होती. एकूण 350 ते 400 कंपन्या आहेत प्रत्येकाने दीड लाख रुपये दिले तरी पाच कोटी रुपये जमतात. असा हिशोब मी केला होता. बी.टी. कॉटनच्या संदर्भात जेव्हा विधेयक चर्चेसाठी येईल तेव्हा मी सविस्तर बोलणार आहे बी.टी. कॉटनच्या एकूण 382 जाती आहेत. बियाण्यांच्या काही कंपन्या आपल्या आहेत तर काही कंपन्या बाहेरच्या आहेत. शेतक-यांना वेळेवर बियाणे मिळते किंवा नाही हे न पहाता आपला हप्ता वेळेवर पोहोचतो किंवा नाही एवढेच अधिका-याकडून पाहिले जाते. सभापती महोदय, हे शेवटचे अधिवेशन आहे. परंतु कृषी खात्यामध्ये एवढया मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार सुरु आहे की, त्या संदर्भात अडीच तासाची चर्चा उपस्थित करण्याची माझी इच्छा आहे आणि त्या चचेमध्ये ग्रामीण भागातील सर्व आमदार भाग घेतील याची मला खात्री आहे. बियाण्याची परवानगी देण्यासबंधीचे अधिकार आयुक्तांपर्यंत कसे आले ? वास्तविक हे अधिकार जिल्हा पातळीवर असणा-या अधिका-यांकडे होते तसेच विभागीय पातळीवरील

अधिका-यांना हे अधिकार होते . असे असतांना हे स्थानिक आणि विभागीय पातळीवरील अधिकार आयुक्तांकडे कसे देण्यात आले आहेत ? कृषी विभागात श्री. नाना पाटील यांच्यासारखे सक्षम प्रधान सचिव आहेत. असे असताना त्या खात्यात अशा प्रकारचा गोंधळ होत आहे असे ऐकल्यानंतर आम्हाला धक्का बसतो. पूर्ण जाणीव असलेले आणि क्षमता असलेले तसेच ग्रामीण भागातील विषयाची जाण असलेले ते अधिकारी आहेत.,बियाण्याच्या क्षेत्रात काय काय चालते याची त्यांना चांगली जाण आहे. दरवर्षी 25 ते 30 लाख रुपयांचा आपल्या शेतातील ऊस ते साखर कारखान्याला देतात .अशा प्रकारची सर्व माहिती असलेली व्यक्ती कृषी विभागाचे प्रधान सचिव आहेत. असे असतांना श्री. नाना पाटील यांच्या कारकिर्दीमध्ये असे प्रकार का घडतात हे मला

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

अजून तरी कळलेले नाही. त्यांच्याही पेक्षा अजून दुसरा कोणी कडक माणूस आहे काय हे मला समजत नाही. माननीय मंत्री श्री.बाळासाहेब थोरात हे तर मला मृदू वाटतात परंतु ते आतून कडक आहेत की नाही हे मला माहीत नाही. काही व्यक्ती आतून मृदू असतात आणि वरुन कडक असतात तर काही व्यक्ती आतून कडक असतात परंतु बाहेरुन मृदू वाटतात .

सभापती महोदय, कृषी खात्यामध्ये प्रचंड प्रमाणावर भ्रष्टाचार सुरु आहे तो नाकारता येणार नाही परंतु आताच्या चर्चेचा तो विषय नसल्यामुळे मी त्यावर बोलणार नाही. महाराष्ट्रामध्ये कोणत्या खताची किती गरज आहे हे राज्याला ठरविता येत नाही. राज्य सरकारच्या माध्यमातून अहवाल केन्द्राकडे जातो त्या अहवालाच्या आधारावर संपूर्ण देशामध्ये कोणत्या राज्यामध्ये कोठल्या खताची किती गरज आहे हे केन्द्र सरकार ठरवत असते.डी.ए.पी. खत परदेशातून येत असते . हे खत आपल्याकडे तयार होत नाही. अणुकराराची हीच भानगड होती. जर आपण अणुकरार केला नसता तर जसा अन्ना शिवाय माणूस उपाशी मरतो तसा शेतकरी खताशिवाय तडफडला असता.जर केन्द्र सरकारने अणुकरार केला नसता तर अमेरिकेने हे खत आपल्या देशात येऊ दिले नसते. गेल्या वर्षी अमेरिकेने खत अडवून ठेवले होते आणि अणुकराराचे काय करता असे विचारले होते. हा विषय अत्यंत मोठा आहे. त्या वर्षी जर अणु करार झाला नसता तर अमेरिकेने जे खत थांबवून ठेवले होते ते आपल्या देशात आलेच नसते .डी.ए.पी खत अमेरिका आणि कॅनडा मधूनच आपल्या देशात येते आपल्याकडे राजस्थानमध्ये फक्त सल्फर तयार होते. राजस्थानच्या मुख्यमंत्री श्रीमती वसुंधरा राजे यांनी अधिकृतपणे असे सांगितले की, हे खत प्रथम आमच्या राज्यातील शेतक-याना देण्यात येईल आणि त्यानंतर जर खत उरले तर इतर राज्याला देण्यात येईल. त्यावेळी गुर्जर आंदोलनामुळे खताच्या रॅकस् अडकलेल्या नव्हत्या . अमेरिकेतून खताचा पुरवठा वेळेवर झाला नाही ही खरी मेख होती आणि अणुकराराची हतबलता होती.

नतर श्री.सुंबरे

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, त्यावेळेस आम्ही सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांना यामध्ये मध्यस्थी करा म्हणून विनंती केली होती. त्यावेळी राजस्थानमध्ये श्रीमती वसुंधरा राजे या मुख्यमंत्री होत्या आणि म्हणूनच त्यांच्याकडे वशिला लावण्यासाठी श्री.पाशा यांनी माननीय श्री. मुंडे यांच्यामार्फत मध्यस्थी करावी अशी आमची विनंती होती.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल हे इतके ताकदवान व्यक्ती असतील हे मला माहीत नव्हते. असो. सभापती महोदय, हा विषय आंतरराष्ट्रीय आहे, म्हणूनच आपले बुकींग करून घेतले गेले नव्हते. किंबहुना बुकींग होऊ नये असेच प्रयत्न होते. यामध्ये मुख्यत: आपल्याकडे येणारी सारी खते ही परदेशातून येतात आणि म्हणून आपण या बाबतीत हतबल आहोत. तो सारा आंतरराष्ट्रीय घोळ होता. पण त्यावेळेस या सगळ्या गोंधळामुळे शेतकऱ्यांना लाठ्या खाल्या आहेत हे आपण सर्वांनीच पाहिले आहे. पण शेवटी खत कोठले घ्यायचे? मघाशी येथे सांगण्यात आले की, 19-19-19 घ्या म्हणून शेतकऱ्यांवर जबरदस्ती केली गेली. पण हे खत कोठे लागते ? आसाम, बिहार, पश्चिम बंगाल वगैरे भागात हे खत लागत नाही. उत्तर प्रदेश, पंजाब पैकी उत्तर प्रदेशमध्ये या खताची मागणी केवळ .08 एवढीच आहे तर उत्तराखंड मध्ये .01 एवढी आहे आणि आंध्र प्रदेशमध्ये 35.13, कर्नाटकामध्ये 121.18 व महाराष्ट्रात 114.80 इतकी मागणी होती. हे खत कशासाठी लागते ? गहू, ज्वारी, ऊस या पिकांसाठी ते लागत नाही तर तेलबियांच्या पिकासाठी लागते. म्हणूनच त्याची मागणी इतकी कमी आहे. सभापती महोदय, महाराष्ट्रात लागणाऱ्या एकंदर खाताची मागणी किती आहे याची आकडेवारी मी वाचून दाखविली तर त्यासाठी मला खूप उवेळ लागेल. मात्र केंद्र सरकारने कोठल्या राज्यात किती आणि कोणत्या खताची मागणी आहे याची एक यादीच दिलेली आहे. त्यात महाराष्ट्रात सर्वात जास्त मागणी ही युरियाची आहे पण ते जास्त मिळत नसल्याने त्याचे आपण कन्व्हर्शन करतो. त्यामुळे आता आपल्याकडे मिश्रखताची मागणी जास्त आहे आणि आपल्या बरोबरच आंध्र प्रदेश आणि कर्नाटकमध्ये देखील हे खत मोठ्या प्रमाणात वापरले जाते. आपल्या राज्यात मिश्रखताचे तीन कारखाने चालतात. आपल्याकडे सर्व खते मिळून जवळपास 35 लाख टनाची मागणी असते त्यामध्ये मिश्र खताची मागणी साडेसात लाख टनाची असते. पण आमच्याकडे हे खत एवढ्या प्रमाणात उपलब्ध आहे काय ? मिश्रखत बनविण्याचा जो कारखाना आहे त्यात

..... 3एच 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते .....

सर्वात महत्त्वाचा कारखाना हा सरकारचाच आहे. या संदर्भात गेल्या संपूर्ण वर्षामध्ये नामदार मंत्री महोदयांनी एक धोरण स्वीकारले आणि या महाराष्ट्रातील मिश्रखताचे जे खाजगी कारखानदार आहेत ते सारे चोर आहेत, लबाड आहेत, ते घाणेरडे खत बनवितात असा त्यांचा कोणी तरी ग्रह करून दिला होता म्हणून असेल पण त्यांनी त्या सर्व कारखान्यांचे परवाने बंद केले होते. पण तेव्हा त्या सर्वांची मिळून ते खत पुरवठा करण्याची जी क्षमता होती ती सरकारी कारखान्यात निर्माण करण्याची गरज होती. पण तसे झाले नाही. तुम्ही कितीही केले तरी सरकारी कारखान्यातून एक ते दीड लाख टनाच्या वर मिश्र खताची निर्मिती होऊ शकत नाही. ...

(यानंतर श्री. सरफरे ....3आय 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

18-18-10 ची जास्त गरज असल्यामुळे आपण त्याची निर्मिती करतो. त्यामुळे 18-18-10 हे दीड लाखाचे खत असले तर राहिलेले खत आपण कोठून घेणार? आपल्या राज्यातील त्या खत निर्मिती कारखान्यांवर सरकारचे नियंत्रण आहे. बाजूच्या राज्यातून उत्तर प्रदेश, मध्य प्रदेशामधून मिश्र खताच्या नावाखाली अत्यंत बोगस, निकृष्ठ दर्जाचे खत येते. त्यामध्ये तुम्ही 18-18-10 हे प्रमाण पहावयास गेलोतर 2-3-5 तर कुठे 18-5-7 हे प्रमाण मिळते. तुमचे अधिकारी या खताचे टेस्टींग कसे करतात? आपणास ती माहिती असल्यामुळे त्याबाबत मी सांगण्याची आवश्यकता नाही. गहू आणि तांदळाची पोती येतात. व्यापारी टोचा मारुन पोत्यातील गहू पाहून सौदा करतात. परंतु खताचे तसे करता येत नाही. मिश्र खताची एक गोणी घ्यावयाची, तिचे चार भाग पाडावयाचे, त्यानंतर त्या चार भागाचे पुन्हा चार भाग पाडावयाचे. ज्याप्रमाणे मातीचे परिक्षण केले जाते त्याप्रमाणे खताचे परिक्षण केले जाते.. त्यामध्ये बरोबर मिश्रण केले आहे की नाही हे पहावयाचे. तुमचे अधिकारी जातात, गोणीला टोचा मारतात पुडी बांधून मालकाला फोन करतात.आणि सांगतात की, खताचे सँपल घेतले आहे दोन दिवसानंतर भेट, नाहीतर तुझी भेट व्यवस्थित.... तरीसुध्दा आपण नशीबवान आहोत. महाराष्ट्रामध्ये मिश्र खत निर्माण करणारे जे कुणी आहेत ते योग्य प्रकारचे खत तयार करतात. हे महाराष्ट्र भाग्यशाली आहे. डीएपीची बॅग 435 रुपये आहे. परंतु आपण जाहिरातीत म्हटले आहे की, आपण काळा बाजार करणाऱ्यांना रोखू. 435 ची बॅग शेतकऱ्याला 530 ते 535 रुपयांना घ्यावी लागते. आपल्याला ही बॅग मिळते, आपण डीएपीचा साठा करुन ठेवला आहे. त्यामुळे त्या शेतकऱ्याला स्वस्त मिळत नाही. प्रत्येक बॅगेमागे 50 ते 60 रुपये जास्त दिल्याशिवाय शेतकऱ्याला ती बॅग मिळत नाही. आपण जाहिरात देऊनही याबाबतीत नियंत्रण आणि नियोजन होत नाही. हा एक सरकारच्या मानसिकतेचा प्रशासकीय भाग होतो. त्यामध्ये शेतकऱ्यासाठी केलेल्या कर्तृत्वाचा भाग नसतो. म्हणून आपण डीएपी उपलब्ध करुन देत होतो त्यावेळी त्याला मिश्र खताची गरज होती. त्यामध्ये यूरीया, सिंगल सुपर फॉस्फेट, हेमोबी या मिश्र खताची गरज होती ती आपण पुरवू शकलो नाही हा चर्चेचा भाग आहे. म्हणून महाराष्ट्रामध्ये मिश्र खताची गरज आहे. त्याची निर्मिती मागणीप्रमाणे केली असली तरी तुम्ही 70 टक्के बनविता. खाजगी कंपन्या जास्त बनवीत नाहीत. खाजगी कंपन्या 27 टक्के बनवितात, आणि बाहेरुन 30

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

टक्के येते. छत्तीसगड, मध्यप्रदेश, कर्नाटक इत्यादी राज्यातून 2 ते 3 टक्के येते. सभापती महोदय, आपल्याकडे मिश्र खताच्या कारखान्यांना लायसन्स देणार होतो ते बंद केले. ते कां बंद केले? त्याबाबतचा खुलासा मागील वेळी झाला नाही. कारण काय होते ते कळले नाही. सर्वच लबाड असू शकत नाही, असतील तर ती गंभीर घटना आहे. म्हणून ही घटना घडल्यानंतर 2006 मध्ये आपण त्यांना अत्यंत मर्यादित काळापुरती परवानगी दिली होती. त्यांनी कच्चा पुरविण्याची जबाबदारी असतांना तो वेळेवर पुरविला नाही. म्हणून 17 जुलै 2006 मध्ये त्यांच्यावर बंदी घातली, ती बंदी 15.9.2006 रोजी उठविण्यात आली. फक्त 60 दिवसांची बंद घालण्यात आली. त्यानंतर 18.6.2007 मध्ये बंदी घातली ती 19.10.2007 ला उठविण्यात आली.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

218 दिवसांची म्हणजेच 7 महिन्यांची बंदी होती. त्यानंतर दि.25-04-2008 मध्ये बंदी घालण्यात आली आहे, ती तुम्ही अजूनपर्यंत उठविलेली नाही. फक्त दोन महिन्यांपुरती बंदी उठविली. ज्या खाजगी कारखान्यातून 27 टक्के मिश्र खताची निर्मिती होत होती. ती थांबविण्यात आली आहे. ती कशासाठी थांबविण्यात आली ? त्यावर कशासाठी बंदी घातली ? याची कारणे देखील पुढे आली पाहिजेत. तसेच जी बंदी घालण्यात आलेली आहे, ती उठविली जाते त्याअर्थी तुम्ही त्यांना खताची निर्मिती करण्यासाठी परवानगी देत असता. त्यामुळे त्याबाबतीत देखील खुलासा होणे अत्यंत आवश्यक आहे. शासनाने खताचे उत्पादन थांबविले आणि परराज्यातील निकृष्ट दर्जाचे खत येथील शेतकऱ्यांच्या माथी मारण्यासाठी त्या कंपन्यांना वाव दिला. याच्याशी माननीय मंत्री महोदयांचा याच्याशी काही संबंध नसेल. पण यामध्ये खालच्या अधिकाऱ्यांचे हात गुंतलेले असतात, त्याचे एक उत्कृष्ट उदाहरण आहे.एकीकडे राज्यातील शेतकऱ्यांना निकृष्ट दर्जाचे खत मिळत आहे आणि दुसरीकडे कंपन्यांकडून खालच्या पातळीवर भ्रष्टाचाराची देवाण-घेवाण होत आहे. ही भ्रष्टाचाराची कीड सर्व राज्यकर्त्यांना सतावत आहे आणि सर्वांची इच्छा असताना सुध्दा ते थांबवता येत नाही. संभाजीनगर येथे एक घटना घडलेली आहे. तेथे आर.टी.ओ.मधील एका कारकुनाने 40 लाख रुपये खाल्ले, मग त्यांना निलंबित करण्यात आले. अशा वेळी माझ्या वहिडलांना निलंबित का केले? म्हणून त्याच्या मुलाने सरळ जाऊन संबंधितांना गोळया घातल्या, म्हणजे खाऊन-पिऊन वर शिरजोर असे जे म्हटले जाते, ती बाब या मुलाने सत्यामध्ये आणली, एवढे उघडपणे सर्वकाही सुरु आहे. याचे समर्थन कोण करणार ? त्याला वाचविणारा कोण आहे ? तर पोलीस अधिकारीच आहे. त्याला पळवून लावणारा श्री.मोरे नावाचा अधिकारी आहे आणि तो त्याचा मामा आहे. तो हिरोसारखा सरन्डर झाला, त्याचे पेपरमध्ये नाव देखील आले होते. परंतु जणुकाही तो माणूस युध्दा जिंकून आला आहे अशा थाटात आरोपी सरन्डर झाला आहे. ज्या संबंधित अधिकाऱ्याने प्रामाणिकपणे काम केले, भ्रष्टाचार बाहेर काढला, त्या आमच्या एका अधिकाऱ्याला त्सरले गोळी घातली हो ? त्याला आयुष्यातून उठविले. पण आता तेथे भीती निर्माण झाली. म्हणजे या लोकांनी अशा प्रकारे भ्रष्टाचार करावा आणि तो शोधून काढल्यावर त्यांच्या पोरांनी लोकांना बंदूका घेफन गोळया माराव्यात. उद्या जर सभागृहामध्ये भ्रष्टाचाराची प्रकरणे मांडली तर मग तुम्हाला-आम्हाला गोळया घालतील अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे.माननीय मंत्री महोदय, तुमच्या शेती खात्या-

. . . .3 जे-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

तील भ्रष्टाचाराबद्दल काय बोलावयाचे ? कोणी बोलत नाही. या खात्यामध्ये एवढया मोठया प्रमाणात भ्रष्टाचार होत आहे की, त्यासंबंधात स्वतंत्रपणे चर्चा व्हावयास पाहिजे. मला संधी मिळाली तर त्या बाबतीत देखील बोलेन. पण आता संधी मिळण्याची शक्यता फार कमी वाटते. माझे असे म्हणणे आहे की, आतापर्यंत खतावरील अधिभाराच्यारुपाने जी चार टक्के रक्कम शासनाच्या तिजोरीमध्ये जमा होत होती, ती आता राज्यामध्ये खत निर्माण होत नसल्यामुळे जमा होऊ शकत नाही. त्यामुळे आपल्या शासनाच्या तिजोरीमध्ये येणारी किती रक्कम कमी झाली आहे हे पहाणे अर्थव्यवस्थेचा भाग आहे.

सभापती महोदय, याठिकाणी छत्तीसगढ मधील नर्मदा ॲग्रो केम, नर्मदा फॉस्फेट आणि मध्य प्रदेश मधील ए.पी.इंडियन बायोटेक, सुहाना ॲग्रो लिमिटेड इ.कंपन्यांची निकृष्ट दर्जाची खते वापरली जातात आणि मग शेतीमध्ये खते घातल्यानंतर देखील ती फुलत नाही, उध्वस्त होते, असे झाल्यानंतर शेतकरी आत्महत्या करतात, असे दुष्टचक्र सुरु होते. या शेतकऱ्यांची अशी अवस्था होते की, खत निकृष्ट दर्जाचे निघाले, बियाणे खराब निघाले आणि त्यामुळे कर्जाऊ घेतलेले पैसेही वाया गेले, या सर्व दुष्ट चक्रामध्ये शेतकरी अडकत आहेत. शेतकरी सबळ होण्यासाठी कृषीच्या बाबतीत नियोजन कसे असावे आणि कसे नसावे याचे आता दिग्दर्शन सुरु आहे. अशा वेळी खालच्या पातळीवर जो भ्रष्टाचार होत आहे, त्याकडे लक्ष देण्याची गरज आहे. त्यामुळे गंभीर परिस्थिती निर्माण झालेली आहे.

सभापती महोदय, 18:18:10 हे खत मराठवाडा, विदर्भामध्ये वापरले जाते. पश्चिम महाराष्ट्रामध्ये 20:10:10 च्या खताची मागणी आहे. पण तसे मिळत आहे काय ? मला खात्री आहे की, याबाबतीत तुम्ही छातीवर हात ठेऊन सांगू शकणार नाही. ऊस शेतकऱ्यांसाठी मुबलक प्रमाणात खत उपलब्ध आहे आणि कापसाच्या बाबतीत दुसरी स्थिती आहे. खताचा तुटवडा निर्माण झालेला आहे. यावर माननीय मंत्री असे सांगणार की, आम्ही मुबलक प्रमाणात खत उपलब्ध करुन दिले आहे, याची मला कल्पना आहे. पण डी.ए.पी.चे खत उपलब्ध करुन दिले असेल. समृध्द शेतीची गरज काय-काय आहे ? पिकाचा कस चांगला असावा, यासाठी काय-काय गरज आहे ? जे मिश्र खत आहे, ते पंजाबमध्ये वापरुन चालत नाही. ते खत आपल्या राज्यामध्ये आणि दुसऱ्या तीन राज्यांमध्ये चालते. मात्र ते उपलब्ध होत नाही हा महत्वाचा विषय आहे. यासाठी खाजगी कारखाने

. . . .3 जे-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहेत. तसे ते मराठवाडयामध्ये 2-4 कारखाने असतील, इतर भागामध्ये देखील असतील. पण आज हे खत कारखाने बंद असल्यामुळे तेथील कामगारांची रोजी-रोटी बुडालेली आहे. त्यामुळे ते भेटावयास येतात. या कारखान्यांचे मालक भेटावयास येतच नाहीत. कारण जेव्हा हंगाम होता, तेव्हा त्यांना सर्वकाही मिळाले असेल, त्यामुळे ते व्यवस्थित असणार. परंतु कामगारांची रोजी-रोटी थांबल्यामुळे ते आमच्याकडे येतात. मग मी या गुंतवणुकीमध्ये शिरलो, तेव्हा असे लक्षात आले की, यामध्ये 300 ते 400 कोटी रुपयांची गुंतवणूक झालेली आहे. त्यानंतर मी आपल्या लायब्ररीमध्ये जाऊन यासंबंधात वर्तमानपत्रामध्ये जे लेख आले होते, ते वाचले.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

लेखामध्ये असे दिसते की, 7 टक्के सबसिडीमधील 25 टक्के पैसे रोखीने देण्यात येतात आणि बाकीचे बॉण्डने देण्यात येतात. बॉण्डचे पैसे कधी मिळणार हे माहीत नाही. बँकेचे कर्ज काढले आहे, ते फेडावयाचे आहे. त्यासाठी बॉण्ड उपयोगी पडत नाहीत. बॉण्डवर कर्ज मिळत नाही. शासनाने दिलेल्या बॉण्डची आज अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे की, त्या बॉण्डची गॅरन्टी नसल्यामुळे बँक सुध्दा शेतकऱ्यांना कर्ज देण्यास तयार नाही. बुडीत खात्यातील धंदा खाजगी कंपन्यांनी करावा, त्यापेक्षा त्या बंद केलेल्या परवडल्या अशी परिस्थिती निर्माण होत आहे. त्यांचे कारखाने बंद झाल्याचे दु:ख तुम्हाला आणि आम्हाला होण्याचे काही कारण नाही. 30 लाख कामगार बेकार झालेले आहेत. काल परवा परत 3 लाख कामगार बेकार झाले. अशा प्रकारची माहिती शासनाच्या आर्थिक पाहणी अहवालामध्ये देण्यात आलेली आहे. त्यामध्ये परत हजार-बाराशे कामगार बेकार होतील. प्रश्न तो नाही. खताच्या पुरवठयाचा 27 टक्के भार उचलणारे कारखाने बंद झाले तर 60 टक्के शेतकरी असलेल्या या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची काय परिस्थिती होईल हा प्रश्न आहे. 200 ते 250 रुपये किंमतीच्या खताच्या एका बॅग ऐवजी जर डी.ए.पी. 450 आणि 500 रुपयाने ती बॅग घ्यावी लागत असेल तर डी.ए.पी. पूर्ण घालून सुध्दा शेतकऱ्यांची गरज भागत नाही. कारण त्या खाताचे विश्लेषण बॉटनिकल करायचे की बायोकेमिकल करायचे हा वेगळा विषय आहे. झाडाचे खोड कशाने वाढते, पाने कशाने वाढतात आणि फळ कशाने वाढते? मिश्रखातातील तो गुण आहे. म्हणून पूर्ण डी.ए.पी. दिल्यानंतर पिकांची वाढ चांगल्या प्रकारे होते असे नाही. अशा प्रकारे शेतकऱ्यांची खताची गरज बघितली तर मला असे वाटते की, खत आहे पण योग्य खत नसल्यामुळे जी परिस्थिती निर्माण होते त्यासंबंधीचा हा विषय आहे. निकृष्ट खताची विक्री करणाऱ्या मराठवाडयातील कंपन्यांची नावे वर्तमानपत्रात छापून आलेली आहेत. त्याबाबतीत काय कारवाई केली याबद्दल मला माहीत नाही. त्यासंबंधीचा खुलासा माननीय मंत्रिमहोदयांनी त्यांच्या उत्तराच्या भाषणात करावा. मातोश्री ट्रेडर्स, नांदेड, लोखंडे ट्रेडर्स, मुदखेड, गोविंदराज कृषी सेवा केंद्र,सिंधी, गजानन एजन्सी, वसमत, शिवशक्ती एजन्सी, कुरुंदा, कैलास फर्टिलायझर, कुरुंदा, अग्रवाल कृषी सेवा केंद्र आडगाव, ता. जिंतूर, जि.परभणी. स्वराज कृषी केंद्र, ता.जि.परभणी,साईनाथ कृषी केंद्र, पाथरी, ही सगळी यादी छापून आलेली आहे. या केंद्रानी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

निकृष्ट अशा मिश्र खताची विक्री केलेली आहे. याबाबतीत शासनाने कोणती कारवाई केली तसेच याबाबतीत अधिकाऱ्यांनी नक्की नोंद काय केलेली आहे.? सभापती महोदय, माझ्याकडे याबाबतचे वर्तमानपत्रातील एक कात्रण आहे. हे एक प्रकरण उघडकीस आले आहे, अशा अनेक ठिकाणच्या उघडकीस न आलेल्या प्रकरणांच्या बाबतीत शासनाने काही कारवाई केलेली आहे काय? याबाबतचे उत्तर माननीय मंत्रिमहोदयांनी दिले तर शेतकऱ्याला असे वाटेल की, आपल्या जीवनमरणाशी संबंधित असलेल्या या प्रश्नाच्या संदर्भात शासन विचार करीत आहे. फवारणीच्या संदर्भातील विषय वेगळा आहे. महाराष्ट्रामध्ये 8 हाजर कोटी रुपयांची फवारणीची औषधे विकली जातात हा धक्कादायक विषय आहे. विदर्भ, मराठवाडयात आंध्र प्रदेशातून ही फवारणीची औषधे येतात. त्या औषधांनी कीड मरत नाही. त्यामुळे हा वेगळा विषय आहे. केंद्र शासनाच्या कायद्यामुळे ही परिस्थिती निर्माण झालेली आहे. खाजगी कारखाने बंद केले आहेत ते कशासाठी बंद केले? शासनाने यासंदर्भात जाहिरात देखील दिलेली आहे. महाराष्ट्र कृषी विकास महामंडळाची ती जाहिरात आहे. शासन डी.ए.पी.आणील आणि मिश्रखाताचे उत्पादन करील, यासाठी खाजगी कारखाने शासनाला भाडयाने चालवायला द्यावेत, यासंदर्भात ही जाहिरात देण्यात आली आहे. मला हे कळत नाही की, शासनाला हा निरुद्योगीपणा कशासाठी पाहिजे? शासनाने मिश्रखतांचे 70 टक्के उत्पादन करावयाचे आहे ते शासनाने करावे, खाजगी कारखान्यांनी 27 टक्के उत्पादन करावयाचे आहे ते त्यांना करु द्यावे. अर्थकारणामध्ये यासंबंधीचा एक वेगळा भाग असतो. इतर सगळया ठिकाणी स्वायत्तता निर्माण केलेली असताना, याच बाबतीत हा अग्रह कशासाठी धरण्यात येत आहे? त्यांच्याकडून हप्ता येत नाही, पैसे मिळत नाहीत कां, पॅकेट्स येत नाहीत? यातील नेमकी मेख काय आहे? यामध्ये नेमकी काही तरी मेख असली पाहिजे. नसेल तर शासनाने या सभागृहात जाहीर करावे की, हे सगळे कारखाने अत्यंत निकृष्ट दर्जाची मिश्रखते निर्माण करतात. मग त्यांच्यावर काय कारवाई करण्यात आली? हेही येथे सांगण्यात यावे. अद्याप कोणत्याही कारखान्यावर कारवाई करण्यात आलेली नाही. माला खात्री आहे की, अशी परिस्थिती नाही. पण दुर्दैवाने हे सगळे चालू आहे. आम्हाला तुमचे कारखाने चालवण्यासाठी द्या, अशा प्रकारची जाहिरात दि. 24 ऑक्टोबर, 2008 रोजी शासनाने दिलेली आहे, ती जाहिरात माझ्याजवळ आहे.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

एस.टी.महामंडळाने खाजगी बसेस चालकांकडून सीट-बेसिसवर बसेस चालवायला घेतल्या, तो चांगला निर्णय होता. सभापती महोदय, निकृष्ट खतांची विक्री करणाऱ्या जवळ जवळ 40 कारखान्यांची यादी माझ्याकडे आहे. ती यादी वाचण्यात सभागृहाचा वेळ मी घेत नाही. पण महाराष्ट्रातील कारखान्यांची ही परिस्थिती आहे.

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

आता आपण जी परवानगी दिली त्यामध्ये 25 मे, 2008 रोजी मिश्रखताचा कच्चा माल देण्याचे बंद केल्यानंतर 25 फेब्रुवारी, 2009 रोजी आपण परवागनी दिली आणि 15 मे रोजी पुन्हा रद्द केली. आपण एवढेच काम करा. मी 2009 चे सांगत आहे. हे सगळे कशासाठी चालले आहे ? या 200 ते 250 रुपयांच्या मिश्रखताच्या बॅगा आहेत. त्या आपल्याकडे निर्माण होतात आणि शेतकऱ्यांना परवडतात. परंतु बाहेरची जी खरे येतात उदा सुमन ऑरगॅनिक्स अँड फर्टिलायझर लिमिटेड यांची जी प्राईस लिस्ट आहे त्यामध्ये 18:18:10 ची किंमत 425 रुपये आहे. ही किंमत डीएपी एवढी आहे. त्यानंतर 20:20:00 ची किंमत 400 रुपये आहे. 10:20:20 ची किंमत 435 रुपये आहे. म्हणजे अपेक्षेपेक्षाही 150 ते 175 रुपये शेतकऱ्यांना जास्त मोजावे लागत आहेत. मी दिल्लीला गेलो होतो आणि तेथील लायब्ररीमधून सगळी माहिती काढण्याचा प्रयत्न केला. हा विषय केवळ महाराष्ट्राचा नसून संपूर्ण देशाचा आहे. 1 लाख 10 हजार कोटी रुपयांची सबसिडी केंद्र सरकार आपल्या देशातील शेतकऱ्यांना देते. पण त्यातील जवळजवळ 40 टक्के माल नेपाळ आणि बांगलादेशमार्गे पाकिस्तानातील शेतकऱ्यांकडे जातो. या ठिकाणी आपली खताची जी बॅग 450 रुपयाला आहे ती तिकडे 2200 रुपयांना विकली जाते. ती 2200 रुपये, 2000 रुपये किंवा 1500 रुपये दराने विकली तर किती नफा होतो ? देशामध्ये खत माफिया निर्माण झाले आहेत. मी बिहारमध्ये त्या भागात काम केले. ते भयंकर आहे. मी ते काम सोडून दिले. ते काम आपल्याला झेपण्यासारखे नाही. आपण कोठे बंदुका वगैरे घेऊन फिरणार ? एक तर मरावयाचे किंवा मारावयाचे अशी तेथे परिस्थिती आहे. हा माझा व्यक्तिगत अनुभव आहे. पुरुलियामध्ये ज्यावेळी शस्त्रे टाकली त्याच्या आदल्या दिवशी मी त्या ठिकाणी होतो. हे सगळे माफिया आहेत. तो सगळा मुस्लीम पट्टा आहे. त्या ठिकाणी सगळ्या बांगलादेशी लोकांची संख्या आहे. तिकडून रॅकच्या रॅक जातात. कोणी अडवू शकत नाही. श्री. रामविलास पासवान त्या मतदारसंघाचे खासदार आहेत. सभापती महोदया, खत माफिया हे वेगळे प्रकरण आहे. माझ्याकडे कर्नाटक सरकारचा परमीशनच्या संदर्भातील कागद आहे. त्यांनी आपल्याकडील कारखाने बंद झाल्यानंतर तिकडच्या कारखान्याना भराभर परवानग्या दिल्या. आपल्याला महाराष्ट्रामध्ये मार्केट आहे कारखाने चालू करा, असे त्यांनी सांगितले. मग आपण का कर्मदरिद्रीपणा करावयाचा असा माझा विषय आहे. शेतकऱ्यांना खत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. दिवाकर रावते ....

मिळाले पाहिजे हा विषय आहे. मागच्या वेळी लक्षवेधी सूचना किंवा दुसरे कोणते आयुध होते माहीत नाही पण मी एक विषय या ठिकाणी मांडला होता. केंद्र सरकारने जाहिरात देऊन शेतकऱ्यांकरिता खतांच्या किंमती कमी केल्या होत्या. त्याप्रमाणे कर्नाटकने किंमती कमी केल्या, आंध्र प्रदेशने कमी केल्या पण महाराष्ट्रामध्ये टनामागे जो 8 हजार रुपये दर होता तो 5 हजार रुपये करावयास सांगितले पण ते केले नव्हते. शेतकऱ्यांची लुबाडणूक चालली होती. तो विषय शासनाने मार्गी लावला की, नाही हा प्रश्न आहे.

सभापती महोदया, माझ्याकडे भारत सरकार खत विभाग, रसायने आणि खत मंत्रालयाची जाहिरात आहे. आपल्याला हा विषय माहीत आहे. त्यांनी मिश्रखताच्या किंमती 18.6.2008 पासून कमी केल्या होत्या. 16:20:00:13 ची किंमत 7100 रुपयांवरुन 5875 रुपये केली. 20:20:00:13 ची किंमत 7280 रुपयांवरुन 6295 रुपये केली. असे करत करत त्यांनी सगळ्या किंमती जाहीर केल्या. याच किमतीने खत विकावयाचे आणि वरची सबसिडी केंद्र सरकार देणार हा त्यातील विषय होता. आपण महाराष्ट्रात ते केले नाही आणि शेतकऱ्यांची लुबाडणूक झाली असा माझा आक्षेप आहे आणि आरोपही आहे. आजही ती लुबाडणूक होत आहे. त्याची अंमलबजावणी आपण करीत नाही. केंद्र सरकारने सांगितल्याप्रमाणे 5556 रुपये खताची किंमत असावी पण तशी ती आज नाही. त्यामुळे त्या किंमतीने आपण शेतकऱ्यांना न देता जुन्या 8 हजार रुपये किमतीने देत आहात अशा प्रकारचा माझा आक्षेप आहे. यामध्ये शेतकऱ्यांची लुबाडणूक होत आहे. शेतकऱ्यांना योग्य त्या खताचा पुरवठा उपलब्ध नाही.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी ज्या किंमती सांगितल्या त्याबाबत सांगू इच्छितो की, त्याच्या रॉ मटेरियलची जरी किंमत काढली तरी ती यांच्यापेक्षा जास्त होणार. आपण हे आकडे कोठून आणले आणि कोणी जाहीर केले हे मला माहीत नाही.

श्री. दिवाकर रावते : ते कशाला गोळा करावयास पाहिजे ? आपल्या लायब्ररीत, केंद्राच्या लायब्ररीत गेले की सगळे मिळते. मी उगाचच काही मांडत नाही. मला पटल्याशिवाय मी बोलत नाही. माझी ती सवय नाही.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

सभापती महोदय, माझ्याजवळ राज्य सरकारची एक जाहिरात आहे. कर्नाटक सरकारने काढलेल्या आदेशाची प्रत आहे ती सुध्दा मी देण्यास तयार आहे. (अडथळा) दिल्लीच्या ग्रंथालयामध्ये गेल्यावर खत माफियांची मला माहिती मिळाली. मला या विषयामध्ये राजकारण शोधावयाचे नाही. कोणत्याही विषयामध्ये राजकारण शोधावयाचे नसते. त्यामुळे शेतकरी दगावण्याची शक्यता आहे. राज्यात गंभीर परिस्थिती का निर्माण झाली ते सांगतो. राज्यात आत्महत्या होत आहेत. सन 2006 मध्ये राज्यात 1460 शेतक-यांच्या आत्महत्या झाल्या, 2007 मध्ये 1280, 2008 मध्ये 1080 आणि जानेवारी ते 31 मे, 2009 पर्यंत 342 शेतक-यांनी आत्महत्या केल्या आहेत. शेतकरी अजूनही आत्महत्या करीत असल्यामुळे त्यांच्या व्यथांची माहिती घेण्याची ओढ मनापासून निर्माण होते. त्याबाबतची माहिती घेण्यासाठी स्फूर्ति निर्माण होते हे दुर्दैवी आहे. तुम्ही आणि आम्ही मिळून हे कोठे तरी थांबविले पाहिजे. अधिकारी भ्रष्टाचार करुन शेतक-यांना डुबवित असतील तर तेही थांबविले पाहिजे, ही आमची भूमिका आहे. या भावनेतून मी ही माहिती प्रामाणिकपणे मांडलेली आहे. शासनाने शेतक-यांसाठी जे काही उपलब्ध असेल ते प्रामाणिपणे उपलब्ध करावे, काठया खाण्यापासून ते त्यांच्यावर गोळीबार होईपर्यंत वेळ येऊ देऊ नका एवढी अत्यंत नम्रपणे विनंती करतो. आपण मला वेळ दिल्याबद्दल धन्यवाद देतो आणि माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद पाशा पटेल (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, ऐन खरीपाच्या हंगामध्ये खते बियाण्यांची निर्माण झालेली टंचाई, त्याचबरोबर ओढवलेले नैसर्गिक संकट यासंबंधी सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी नियम 260 अन्वये चर्चा उपस्थित केली आहे त्यावर मी बोलण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, सध्या शेतक-यांना बिकट परिस्थितीतून जावे लागत आहे. आता पेरणीचा हंगाम असल्यामुळे शेतक-यांना सगळयाच प्रकारच्या बियाण्यांची आवश्यकता असते. परंतु सरकार आवश्यक तेवढा खतांचा पुरवठा करु शकत नाही. प्रत्येक पिकाचे बियाणे सरकारला बाजारात आणावे लागते परंतु ते हायब्रिडच आहे. खरे तर कोणत्या पिकासाठी कोणते बियाणे आणावे लागते ही सरकारला माहिती असते. सरकारने असे जाहीर केले आहे की, शेतक-यांना जेवढे लागेल तेवढे बियाणे व खते देण्यास सरकार तयार आहे. सरकार इतके ॲलर्ट असते तर काय काय टाळता आले असते ? यातून दोन महत्वाच्या गोष्टी समोर आल्या आहेत. धुळे, नाशिक, जळगांव या जिल्हयांमध्ये कापसाचा पेरा प्रचंड होतो. तेथे कापसाच्या बियाण्याचा पुरवठा केला असता तर तेथे गोळीबार झाला नसता, दुकानांची जाळपोळ झाली नसती, सरकारला हे का सुसले नाही ? प्रत्येक भागातील आवश्यकतेनुसार बियाण्यांचा पुरवठा झाला असता तर ही परिस्थिती ओढवली नसती. यासंदर्भात एका पत्रकाराने चांगले लिहिलेले आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पाशा पटेल...)

त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, शेतकरी बी.टी.बियाणे घेण्यासाठी आतूर झाले आहेत ही बाब चाणाक्ष व्यापा-यांच्या आणि बियाणे उत्पादन करणा-या कंपन्यांच्या लक्षात यायला उशीर लागला नाही. म्हणून निर्माण झालेल्या परिस्थितीचा फायदा घेण्यासाठी ज्या काही हातचलाख्या करावयाच्या होत्या त्या केल्या आणि जास्त पैसे कमावण्याच्या नादामध्ये बाजारामध्ये शॉर्टेज तयार केले. बाजारामध्ये बियाणे कमी आहे हे लक्षात आल्यानंतर शेतक-यांनी बियाणे आणण्यासाठी मोठमोठ्या रांगा लावल्या. त्यामध्ये गोंधळ झाला, गोळीबार झाला, 30-35 पोलीस जखमी झाले, शेतकरी जखमी झाले. एवढा सगळा उपद्व्याप कशासाठी ? तर बियाणे घेण्यासाठी. आता बियाणे घेण्यासाठी एवढ्या सगळया भानगडी आहेत तर मग ते लावण्यासाठी, खुरपण्यासाठी, राखण्यासाठी आणि पुन्हा विकण्यासाठी आणि विकल्यानंतर त्याचे पैसे मिळण्यासाठी आणि मालाचा भाव काय राहावा यासाठी किती उपद्व्याप करावे लागतात. सगळया गोष्टी या शेतक-याच्या जिवावर उठलेल्या आहेत. येथे सांगितले गेले की, उत्तर महाराष्ट्रात कापसाखालील क्षेत्र 5 लाख हेक्टर इतके आहे. आता कापसामध्ये राशी बियाणे प्रथम क्रमांकावर आहे. हे बियाणे शेतक-यांचा हिरो झालेले आहे. आता हे राशीच बियाणे का चालावे ? अशा प्रकारची आणखी बियाणे करता आली असती. बियाणे तयार करणारी सरकारी कंपनी नाही म्हणून बरे आहे. एका खाजगी कंपनीचा हा चमत्कार आहे. राशी ही सरकारी नव्हे तर खाजगी कंपनी आहे. सरकारची एवढी विद्यापीठे, एवढे अधिकारी , एवढे शास्त्रज्ञ असताना त्यांना काहीच जमत नाही काय ? हे काम खजगी लोकच करतात. चमत्कारच म्हणावा लागेल. मागे महिकोचे ज्वारीचे बियाणे आले. एकदा उदगीरला 700 पिशव्या आल्या होत्या आणि रांगेमध्ये 21 हजार लोक होते. हा सर्व बियाण्याचा चमत्कार खाजगी व्यापारी करु शकतात तर मग या देशामध्ये करोडो रुपये खर्च करुन उभी केलेली विद्यापीठे, कृषि महाविद्यालये, मोठे अधिकारी एवढे सर्व असताना देखील त्यांना हे का जमत नाही ? या सर्व गोष्टींचा उपयोग आपण केला असता तर कदाचित अशी गोष्ट झाली नसती. कापसाच्या बाबतीत आणि बियाण्याच्या बाबातीत हे झाले. आमच्या भागामध्ये आता सोयाबीनचा हंगाम आहे. परवा मराठवाड्याची खरिपाची बैठक झाली. त्या बैठकीला दोन्ही मंत्री महोदय उपस्थित होते. सर्व अधिका-यांनी सांगितले की, आमच्या जिल्हयामध्ये सोयाबीनच्या बियाण्याचा तुटवडा आहे. आता

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पाशा पटेल....

ख-या अर्थाने शेतकरी सोयाबीन का पेरु लागले हा एक संशोधनाचा विषय आहे. कोणत्याच पिकामध्ये जे शिल्लक राहात नाही ते सोयाबीनमध्ये शिल्लक राहायला लागले आहे. तीन महिन्याचे हे पीक आहे. एका एकरामध्ये 12 पोती उत्पादन येते. एका पोत्याला 3 हजार रु. मिळतात. नोटा मोजून बोटे काळी व्हायला लागली एवढी मजा त्या पिकामध्ये आहे. म्हणून सगळे लोक सोयाबीनच्या नादाला लागले. आता सगळे लोक सोयाबीनच्या नादाला लागल्यानंतर तुम्ही देखील सोयाबीनच्या नादाला लागायला पाहिजे होते. पण कुणाला जमले नाही. बियाणाचा तुटवडा निर्माण झाला. याबाबतीत मी राज्य सरकारचे नाही तर केन्द्र सरकारचे कौतुक करतो. सगळे शेतकरी आता सोयाबीन पेरुन जास्त पैसे कमवणार आहेत हे चाणाक्ष केन्द्र सरकारच्या लक्षात आल्यामुळे सोयाबीनवाल्याची जिरवायचा कार्यक्रम केन्द्र सरकारने घेतलेला आहे. मी एमएमएसवरील माहिती देत नाही तर मी आता कागदावर माहिती लिहून आणलेली आहे.त्या दिवशी गडबड होती म्हणून एसएमएस वाचून दाखवला. तुम्ही एसएमएसची टर्र उडवू नये म्हणून मी कागदावर माहिती लिहून आणलेली आहे. मी गावातला असल्यामुळे एवढा तरी फरक पडतो. आता सोयाबीन वाल्याची जिरवायचे केन्द्र सरकारने ठरविलेले आहे. पुढच्या वर्षी लोक सोयबीन पेरणार नाहीत आणि बाजारामध्ये सोयाबीनचे बियाणे जास्त प्रमाणात येईल. सध्याची परिस्थिती अशी आहे की, खाद्यतेलावरचे आयात शुल्क शून्य टक्के केल्यामुळे आता पामतेल येऊ लागले आहे. गेल्यावेळी न सांगितलेली माहिती मी आपणास आता सांगतो. हे पामतेल आपल्या मुंबईमध्ये 40 रु. किलोने येऊन पडू लागले आहे आणि त्यावर फक्त 3 रुपये टॅक्स घेऊन 43 रुपयाला ते विकले जात आहे. मला आश्चर्य वाटते ते हे की, भारतातील शेतक-याला पैसे मिळतात हे तुम्हाला बघवत नाही म्हणून हे पामतेल बाहेरुन आणलेले आहे काय ? या पामतेलामध्ये चांगले गुणधर्म काय आहेत ? तर हे पामतेल खाल्ल्यामुळे शरीरातील रक्त कमी होते. शरीरातील रक्त कमी झाल्यामुळे हार्टॲटक येतो. म्हणजे सर्व हार्टचे दवाखाने चालावेत म्हणून तुम्ही पामतेल आणलेले आहे काय ? म्हणजे भारतातील शेतक-याचा फायदा होण्याऐवजी परदेशातील शेतक-याचा फायदा तुम्ही करीत आहात. आता शून्य टक्के डयूटी लावल्यामुळे फार मोठ्या प्रमाणात हे पामतेल येऊ लागले आहे. तुमचे सगळे अधिकारी काय करतात हे मला माहीत नाही.

...नंतर श्री. गिते...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखापाठी नाही

श्री.सय्यद पाशा.....

आता मात्र मी त्या गोष्टीचा उल्लेख करतो. मला त्या गोष्टीचे पाठांतर झाले आहे. 60.50 लाख टन खाद्य तेल आपल्या देशात आलेले आहे. 60 दिवस पुरेल एवढे पामतेल आपल्या देशात आलेले आहे. ते 40 रुपये किलोने आले आहे आणि त्याची विक्री प्रति किलो 43 रुपये या दराने विकले जात आहे. आपल्या शेतक-यांचे सोयाबीन बाजारात येईल, त्या दिवशी आपण असे म्हणाल की, जे खाद्यतेल परदेशातून येत आहे त्याच्यावर आयात कर लावा. त्या दिवशी लागलीच सरकारकडून आयात कर लावला जाईल. आयात कर ज्यावेळी लावला जाईल, त्यावेळी सोयाबीन बाजारात येईल त्या दिवशी स्वस्त भावात आणलेले तेल महाग दराने विकले जाईल आणि सोयाबीन उत्पादक आर्थिक अडचणीत सापडला जाईल. त्यातून व्यापारी मोठया प्रमाणात पैसे कमावतील. पुढील वर्षी तर सोयाबीन उत्पादक शेतकरी निश्चितपणे मरतील. अस्थिरता कशी तयार झाली आहे. खरे तर मी नियतीचे कौतूक करतो. नियतीने काय चमत्कार केलेला आहे. ज्या विभागात बर्फ पडतो त्या ठिकाणी केसाळ प्राणी असतो. ज्या भागात खडक असतो तेथे बैलाची जात छोटी असते. नदीच्या बाजुला जंगल आहे तेथे देवनी जातीचे बैल असतात. कोणत्या जमिनीतून कोणते पीक येते हे निसर्गाने ठरवून ठेवलेले आहे. भावाची स्थिरता नसल्यामुळे ज्या पिकाला भाव मिळेल, त्या पिकाकडे शेतकरी वळू लागले आहेत. नियोजनाची भानगड समोर येऊ लागली आहे. देवाचे संपूर्णपणे चांगले नियोजन करुन ठेवले होते. परंतु तुमच्या गडबडीमुळे देवाचे नियोजन देखील बिघडवून टाकले आहे एवढे गबरु लोक तुम्ही आहात. पुढे कसे होईल हे काही सांगता येणार नाही. आता सोयाबीन पिकाची वाट लागली. कापूस पिकाची वाट लागली. सभापती महोदय, केळी पिकाच्या बाबतीतील अडचणी काय आहेत त्याची माहिती मी या ठिकाणी सांगतो. केळी पिकाच्या बाबतीत वेगळाच चमत्कार झाला. मला पहिल्यांदाच तो चमत्कार कळला. केळीचे झाड आपोआप वाकले. केळीचे झाड केळांच्या घडासहीत वाकले. मी केळी उत्पादक शेतक-याला विचारले की, केळी पिकावर रोग कसा काय आला ? त्याने सांगितले की, आमच्या विभागात तापमान मोठया प्रमाणात वाढले. गेल्या वर्षापेक्षा या वर्षी त्या विभागात तापमान जास्त वाढले. तापमानाचा आणि लाईटचा संबंध कसा येतो त्यासंबंधीची मी माहिती सांगतो. त्या ठिकाणी दिवसाच लाईट असतात. रात्री लाईट नसतात. दिवसा वीज असते म्हणून शेतकरी केळीच्या पिकास दिवसा पाणी देतो. परंतु उष्मा वाढल्यामुळे विहिरीतील पाणी गरम होते, पाणी वाहून नेणारे पाईप गरम होतात. त्यामुळे

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद पाशा.....

केळी पिकाला दिवसा गरम पाणी दिल्यामुळे केळीची झाडे वाकली आहेत. अखील भारतीय केळी उत्पादक संघटनेच्या अध्यक्षांना मी रात्री 12 वाजता उठविले. त्याला विचारले की, केळी उत्पादक शेतकरी कसा काय वाचेल ? त्यांनी सांगितले की, आमच्या भागातील परिस्थितीची माहिती व्हावयास पाहिजे. संपूर्ण रात्र किंवा रात्रीच्या दहा वाजेपर्यंत वीज आली तर आमच्या भागातील केळी पीक वाचतील अन्यथा केळी पीक वाचविणे कठीण आहे. एक तर केळीला योग्य भाव मिळत नाही म्हणून तो शेतकरी सतत चिंतेत असतो. केळी पिकास पाणी जास्त लागते. लोड शेडींग करताना कोणत्या भागात किती वाजेपासून किती वाजेपर्यंत केली पाहिजे, कोणत्या पिकाला कोणत्या वेळेला पाणी दिले गेले पाहिजे याबाबतचा अभ्यास शासनाने केला पाहिजेत. विजेच्या लोड शेडींगमुळे केळी पिकाचा प्रॉब्लेम निर्माण झाला आहे. त्याने मला सांगितले की, शासनाने आम्हाला वेळेवर वीज पुरवठा केला पाहिजे. आम्हाला शासनाकडून दुसरी कसलीही अपेक्षा नाही. परवा माननीय ऊर्जा मंत्र्यांनी सभागृहात सांगितले की, आता दहा-दहा तास वीज पुरवठा करण्यात येत आहे. परंतु परिस्थिती अशी आहे की, ग्रामीण भागात चार तासापेक्षा जास्त वीज मिळत नाही. माननीय कृषी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, तुम्ही दहा तास वीज दिली. ज्या दिवशी फक्त आठ तास वीज दिली तर उरलेली दोन तासाची वीज पुढच्या दिवशी द्या. ऊर्जा मंत्र्यांनी सांगितल्या प्रमाणे दहा तास वीज मिळाली तरच केळी उत्पादक शेतकरी वाचणार आहे. अन्यथा तो वाचणार नाही. केळी पिकाचे ज्या ज्या वेळेस नुकसान झालेले आहे, त्या नुकसानीचे फक्त पंचनामे करण्यात आले आहेत. पंचनामे होतात, परंतु शेतक-यांच्या हातात काही मिळत नाही. आताच्या नुकसानीचे नवीन पंचनामे होतील, परंतु शेतक-यांच्या पदरी काही पडणार नाही. त्यांच्या पदरी निराशाच पडले याची त्यांना कल्पना आहे.

सभापती महोदय, अमरावती जिल्हयात संत्रा पिकाचे मोठया प्रमाणात उत्पादन होते. दोन-तीन महिन्यापूर्वी केंद्रीय कृषी मंत्री माननीय श्री. शरद पवार अमरावती येथे आले होते. संत्रा पिकाच्या बाबतीत तेथे राष्ट्रीय परिषद झाली.

यानंतर श्री. भोगले...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.पाशा पटेल....

त्या राष्ट्रीय परिषदेमध्ये काय झाले? आतापर्यंत संत्र्यावर प्रक्रिया करणारे कारखाने निघाले, ते बंद पडले. घोषणा खूप झाल्या. परंतु प्रत्यक्षात काहीच झाले नाही. परवा एक चमत्कारीक घोषणा झाली. 200 कोटी रुपयांचे प्रोसेसिंग युनिट आणणार आहोत अशी घोषणा झाली. संत्र्याच्या ठिबकसाठी आम्ही सबसिडी 90 टक्के देऊ, 200 कोटी रुपयांचे प्रोसेसिंग युनिट देऊ. पदरात काय पडले? आता सबसिडी किती मिळते? तेथील शेतकऱ्यांच्या पदरात फक्त 25 टक्के सबसिडी पडते. 50 टक्के जाहीर केलेली आहे. परंतु सरकारचे रेट, खरेदीचे रेट या भानगडीमुळे 25 टक्के सबसिडी शेतकऱ्यांच्या पदरात पडू लागली आहे असे प्रत्यक्ष शेतीमध्ये काम करणाऱ्या माझ्या मित्रांनी मला सांगितले.

डॉ.सुनील देशमुख : मी त्या भागात राहतो. तुमचे कोण मित्र आहेत त्यांचे नाव मला सांगा. मी त्यांची भेट घेईन. 50 टक्के सबसिडी मिळत असताना 25 ते 30 टक्के मिळते असे आपल्या मित्रांचे म्हणणे असेल तर मला अधिक माहिती घेता येईल.

श्री.सय्यद पाशा पटेल : जे कंपनीचे रेट आहेत आणि सरकारची किंमत जाहीर झाली त्यातील फरक पाहिला तर ड्रिप केल्यानंतर मला 50 टक्के जाहीर सबसिडी असली तरी 25 ते 30 टक्के पदरात पडते अशी त्यांची ओरड आहे. समजून घ्या. निवडणुका जवळ आल्या आहेत. समजून घेतले तर तुमचाच फायदा होईल. नाही तर लोक तुम्हाला शिक्षा देतील. त्यात आपल्या बापाचे काय जाते? आपल्याला जे जे ठावे ते इतरांना सांगावे, शहाणे करुनी सोडावे सकल जन. आम्ही जे ऐकले ते सांगणे आपले कर्तव्य समजतो.

सभापती महोदय, दुसरी महत्वाची गोष्ट संत्र्यांची झाडे वाळली तर 125 रुपये प्रत्येकी याप्रमाणे 90 टक्के झाडांचे पैसे दिले जातात. परंतु धरणामध्ये शेती गेली तर त्या शेतीतील एक झाड जरी बुडित क्षेत्रात गेले तर 5000 रुपयांच्या आसपास मदत मिळते. वाळलेल्या झाडांच्या संदर्भात दुजाभाव का? आज राजस्थानमधील संत्री आपल्या बाजारात येत आहेत. तुमच्या संत्र्यांवर अतिक्रमण झाले आहे. तेथील संत्री चांगली आणि अधिक प्रमाणात आली आणि शासनाने येथील संत्रावाल्यांना मदत केली नाही तर आमचा कॅलिफोर्निया करतो म्हणू म्हणता ते सगळे जाईल आणि आपला इथिओपिया होईल. रस्त्यावर कपडे घातलेला माणूस दिसला तर त्याचे कपडे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल....

काढून घेतले जातील. हे दिवस यायचे नसतील तर आपण काय सुधारणा केल्या पाहिजेत, आपल्या राज्यातील या पिकाला स्पर्धेमध्ये टिकविण्यासाठी काय केले पाहिजे याचा विचार होणे गरजेचे आहे. सगळ्यात महत्वाची गोष्ट म्हणून खताच्या संदर्भात चर्चा झाली. संत्रा, खते, द्राक्ष या सगळ्या शब्दांचा उल्लेख प्रस्तावामध्ये आहे म्हणून मी प्रत्येक शब्दांवर बोलणार आहे.

श्री.बाळासाहेब थोरात : ठिबक सिंचनाचा वापर होत असेल तर खत कमी लागते म्हणून सन्माननीय सदस्य ठिबकवर बोलत आहेत असे वाटते.

श्री.सय्यद पाशा पटेल : सभापती महोदया, खताच्या बाबतीत आणखी एक विषय सुरु झाला आहे. मी कृषि विभागाच्या अनेक अधिकाऱ्यांना विचारले. तुमच्या केसेस दाखल झालेल्या दिसत नाहीत. चोऱ्या होऊ लागल्या आहेत. ते म्हणाले, आमच्या हातात काही नाही? आम्ही त्यांच्यावर केसेस दाखल करु शकत नाही. आता केसेस करायचे अधिकार नेमके कोणाकडे आहेत हा कृषि विभागाचा विषय आहे. अधिकारी दिसला की लोक घाबरले पाहिजेत. पूर्वी कायद्याची जरब होती. पोलीस दिसला की लोक घाबरुन घरात पळायचे. आता कायद्याची जरब कमी झाली आहे. खताच्या चोऱ्या होत आहेत, खतावरुन मारामाऱ्या होत आहेत. हे थांबवायचे असेल तर अधिकार कोणाला असले पाहिजेत, कोणत्या अधिकाऱ्याला लोकांनी घाबरले पाहिजे, एखाद दुसऱ्या अधिकाऱ्याला अधिकार दिले तर भीती निर्माण होऊन मॅनेज केले जाते.

3क्यू.1....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद पाशा पटेल.....

दोन चार असले तर त्यांची तोंडे बंद केली तर बाकी मग मज्जाच मजा. म्हणजे जास्तीत जास्त जेवढे अधिकार शासनाकडे घेता येतील तेवढे आपल्या अधिकाऱ्यांना द्यावेत आणि कारवाई करावी.....अडथळा.....नको केंद्रात नको, आहे तेवढेच भरपूर आहे. भरपूर झाले आमची जिरवायला, आता अजून कशाला पाहिजे ? माननीय कृषी मंत्र्यांना माझा असा सवाल आहे तसेच मला आश्चर्य वाटते ते असे की, डॉक्टरांच्या घरासमोर पेशंटची गर्दी असते आणि कृषी अधिकाऱ्यांच्या घरासमोर मात्र शेतकऱ्यांचा ओढाच नसतो, त्यांच्याकडे कोणी जातच नाही. काय कारण आहे हे शोधण्याचा प्रयत्न केला असता मला त्याचे उत्तर सापडले की, "ॲग्रोवन" या कृषी विषयक मासिकात म्हटले आहे की, कृषी अधिकारी अप्रशिक्षीत असल्याने त्यांच्या घरासमोर गर्दी नसते, त्यांच्याकडे शेतकऱ्यांचा ओढा नसतो. "कृषी खात्यातील 60 टक्के कर्मचारी अप्रशिक्षीत आणि शेतकरी हतबल" असेही त्यात दिले आहे. म्हणून शेतकरी म्हणतात की, आमच्यापेक्षाही ते वेडे आहेत मग त्यांच्याकडे कशाला जायचे.....अडथळा.....आमचे भांडण आपण लावू नये, एक आमच्या जवळचे एकमेव कृषीमंत्री आहेत, माणूस चांगला आहे पण पक्ष नीट नाही, वरुनच अशा प्रकारची खुंटी मारल्यावर खालचा काय करणार ? केंद्रात असले तरी राज्यात काय करु शकतात ? एक गोष्ट सर्वांसाठी सांगू इच्छितो, मला माफ करावे. या देशातील काँग्रेसचे शेतीविषयक धोरण सुरुवातीला जे ठरविले होते ते असे होते की, "आपला देश गरिबांचा देश आहे.....

<u>पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनसंबंधी</u>

श्री. दिवाकर रावते : महोदय, सभागृहात माननीय शिक्षणमंत्री उपस्थित आहेत आणि थोड्या वेळाने आजची सभागृहाची बैठक देखील स्थगित होणार आहे. म्हणून पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनच्या माध्यमातून मला असे निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, मराठी भाषेच्या संदर्भात कालही चर्चा झाली होती तसेच माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेच्या वेळी देखील मराठी भाषेसंबंधीचा मुद्दा उपस्थित झाला. तरी देखील कालच्या आणि आजच्या वर्तमानपत्रात अनेक सरकारमान्य विद्यालयांमध्ये भरती करण्यासाठीच्या जाहिराती इंग्रजीतूनच आल्या आहेत. यासंबंधीची तरतूद कायद्यात अजिबातच नाही की कसे, याबाबतची माहिती आपण घ्यावी आणि त्याबाबत योग्य ती कारवाई करण्यासंबंधीचे निदेश द्यावेत व आवश्यक ती तरतूद करावी व तसे पत्र संबंधित संस्थांकडे पाठवावे.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/

पृ.शी.: खरीप हंगामापूर्वी खते व बी-बियाण्यांची टंचाई तसेच अकाली झालेल्या गारपीटीमुळे राज्यात शेतीचे व फळबागांचे झालेले नुकसान

मु.शी.: खरीप हंगामापूर्वी खते व बी-बियाण्यांची टंचाई तसेच अकाली झालेल्या गारपीटीमुळे राज्यात शेतीचे व फळबागांचे झालेले नुकसान या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, नितीन गडकरी, डॉ. नीलम गोऱ्हे डॉ. दीपक सावंत, सर्वश्री. केशवराव मानकर, विनोद तावडे, सुरेश जेथलिया, चंद्रकांत पाटील, सय्यद पाशा पटेल वि.प.स. यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरु.....

यानंतर श्री. जुन्नरे.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल .....

शेवटचे दोन मुद्दे मांडून मी माझे भाषण संपवतो. शेतक-यांच्या बाबतीत आज जी परिस्थिती निर्माण झालेली आहे त्याबाबतीत कृषी मंत्री जबाबदार आहे, असे मी म्हणत नाही तर ज्या पध्दतीत कृषी धोरण राबवायला पाहिजे होते त्या पध्दतीने कृषी धोरण राबविण्यात आले नाही त्यामुळे आज शेतक-यांची ही परिस्थिती आलेली आहे. देशातील गरीबांना स्वस्त दराने धान्य मिळावे यासाठी परदेशातून महागडया दराने धान्य आणून ते देशातील गरीब जनतेला स्वस्त दराने दिले पाहिजे परंतु असा प्रकार होतांना दिसत नाही. आज सोयाबीनच्या तेलाची किंमत 60 रुपये प्रती लिटर झालेले आहे त्यामुळे सोयाबीनचे तेल परदेशातून आयात करुन देशातील गरीब जनतेला स्वस्तात उपलब्ध करुन दिले पाहिजे परंतु हे शासन मात्र तसे करीत नाही. आपला देश कृषी प्रधान असतांना सुध्दा आपल्या गरीब जनतेला जास्त दराने धान्य विकत घ्यावे लागते याचेच आम्हाला वाईट वाटते. परंतु लोकांच्या दृष्टीने चांगले निर्णय घेतले, स्वस्तात धान्य दिले म्हणजे जनता आपल्याला मतदान करते असे काही नाही तर मतदानाच्या अगोदर त्यांची खाण्याची व पिण्याची व्यवस्था केली म्हणजे लोक सर्व विसरतात व तुम्हाला मतदान करतात हे आता तुम्हाला माहिती झालेले आहे त्यामुळे तुम्ही गरीब जनतेच्या दृष्टीने व शेतक-यांच्या प्रश्नाकडे पहात नाही याचे मला दु:ख वाटते.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांना शेतक-यांच्या संदर्भात पूर्ण माहिती आहे त्याबद्दल काही शंका नाही. परंतु सन्माननीय सदस्यांनी आता लोकांना दारु पाजली अशा अर्थाने हातवारे करुन निवडून येतो असे म्हणणे योग्य नाही. दारु पाजून या ठिकाणी लोकप्रतिनिधी निवडून येतात असे म्हणणे योग्य नाही त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी दारुच्या संदर्भात जो उल्लेख केलेला आहे तो कामकाजातून काढून टाकावा.

श्री. मधुकर चव्हाण : सन्माननीय सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल साहेबांनी जे शब्द उच्चारले आहेत ते कामकाजातून काढून टाकावे.

श्री. पाशा पटेल : सन्माननीय सभापती महोदया, माझ्या सहकाऱ्यांनी शब्द मागे घ्या सांगितले त्यामुळे मी माझे शब्द मागे घेतो. महाराष्ट्रातील शेतकरी संत्र्याचे पीक मोठया प्रमाणात घेत असतो परंतु संत्र्याच्या पिकाचे मोठया प्रमाणात नुकसान होत असते त्यामुळे शासनाने संत्रा पिकासाठी पीक विमा पध्दत सुरु करणे गरजेचे आहे. दुसरा मुद्दा असा आहे की, ट्रान्सफॉर्मर

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल.....

जळाल्यानंतर तो बदली करण्यात 15 दिवस निघून जातात. आपल्याला माहिती आहे की, जी नाजूक पिके आहेत त्या पिकांना एक दिवस जरी पाणी दिले गेले नाही तर ते पीक जळून जाते त्यामुळे ट्रान्सफॉर्मर जळाल्यानंतर तीन दिवसात पैसे न घेता बदलून देण्याची व्यवस्था करावी. तिसरा मुद्दा असा आहे की, अगोदर ज्या शेतक-यांने वीज बील भरले नाही त्याचे कनेक्शन कापले जात होते परंतु आता संपूर्ण गावाचे कनेक्शन कापून त्यांना वेठीस धरले जाते त्यामुळे ज्यांचे वीज बील थकीत नाही त्यांचे कनेक्शन कट होता कामा नये याची काळजी घ्यावी एवढी विनंती आहे. विजेच्या संदर्भात जी काही वस्तुस्थिती आहे ती नाकारुन चालणार नाही. त्यामुळे यासंदर्भात चिंतन करण्याची गरज आहे. अशा प्रकारे चिंतन केले तरच जनता तुम्हा-आम्हाला माफ करेल. त्यामुळे यासंदर्भात सगळयांनी गंभीरपणे लक्ष घालण्याची गरज आहे.

सभापती महोदय, जोपर्यंत उत्पादन खर्चावर शेतक-याला मालाला भाव मिळणार नाही तोपर्यंत शेतक-यांची आर्थिक परिस्थिती सुधारणार नाही. त्यामुळे यासाठी माननीय मंत्रीमहोदयांनी कृषीच्या संदर्भातील चांगली माहिती असणा-या चारपाच लोकांची मदत घेऊन त्यासंदर्भात निर्णय करावा. आपण त्या निर्णयाची अंमलबजावणी केली नाही तरी चालेल परंतु या प्रश्नाला सुरुवात होईल हे काही कमी नाही. त्यामुळे निवडणुकीला अजून तीन महिन्याचा अवधी आहे त्यामुळे या कालावधीत तरी आपण हे काम पूर्ण करावे, अशी माझी आपल्याला विंनती आहे. आपण जर कृषीच्या उत्पादन खर्चावर शेतक-यांना भाव देण्याच्या संदर्भात निर्णय घेतला तर जनता आपल्याला कधीही विसरणार नाही. मग आम्हाला पुढील वर्षी या ठिकाणी बसावे लागले तरी काही फरक पडणार नाही. कारण मी ज्या समाजातून जन्माला आलेलो आहे त्याचे दु:ख कमी झाले तर माझ्या दृष्टीने ती एक चांगली गोष्ट होईल. इकडे बसावे की, तिकडे बसावे यामध्ये मला काही फरक पडत नाही.

सभापती महोदय, कृषीच्या संदर्भात मी आतापर्यंत ज्या काही सूचना केलेल्या आहे त्यापैकी एकाही सूचनेचा शासनाने गंभीरपणे विचार केलेला नाही त्यामुळे मी ज्या काही सूचना केलेल्या त्याचा शासनाने गंभीरपणे विचार करावा एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

यानंतर श्री. गायकवाड...

अशुद्धीत मत / शोधनासाठी नाही

श्री.सुरेश जेथलिया (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी 260 नियमान्वये जो प्रस्ताव मांडलेला आहे. त्यावर माझे विचार मांडण्याकरिता मी येथे उभा आहे.

सभापती महोदय, शेतक-यांच्या व्यथा, शेतकऱ्यांच्या अडचणी त्यांनी या ठिकाणी मांडल्या आहेत. शेतक-यांना जर वेळेवर खते आणि बी बियाणे दिली तर कर्जमुक्तीतून आणि आत्महत्येतून शेतकरी बाहेर पडू शकेल. माननीय मंत्री महोदयांना मला अशी विनंती करावयाची आहे की, या प्रस्तावावर बोलत असतांना सन्माननीय सदस्य सर्वश्री.पांडुरंग फुडकर, दिवाकर रावते, पाशा पटेल यांनी या ठिकाणी सविस्तर मुद्दे मांडलेले आहेत तेव्हा त्याबाबतीत मी पुन्हा सविस्तर बोलणार नाही. त्यांनी ज्या चांगलया सूचना केल्या आहेत त्याची अंमलबजावणी तातडीने करण्यात आली पाहिजे आणि शेतक-यांना खते आणि बी बियाणे वेळेवर पुरविण्यात आली पाहिजेत.

सभापती महोदय, जालना जिल्हयामध्ये दुकानदाराकडून खते न घेता खरेदी विक्री संघाच्या मार्फत विक्री करण्याची पध्दत आम्ही सुरु केलेली आहे त्यामुळे शेतक-यांना वेळेवर खते मिळू लागली आहेत. दुकानदाराकडून कधी कधी वेळेवर खते मिळत नाहीत. त्याचप्रमाणे शेतक-याला 10:26:26 किंवा डीएपी या खताची आवश्यकता असतांना इतर जे मिश्र खते असतात ती खते सुध्दा शेतक-यांनी घ्यावीत अशा प्रकारचे बंधन दुकानदार घालत असतात . जी खते फारशी वापरली जात नाहीत किंवा जी बोगस खते असतात ती खते विकत घेण्याची सक्ती त्यांच्याकडून केली जाते व दुकानदाराकडून शेतक-यांची पिळवणूक केली जाते म्हणूनच संपूर्ण राज्यात खरेदी विक्री संघा मार्फत खते देण्याचा जर निर्णय घेण्यात आला तर शेतक-याना वेळेवर चांगल्या दर्जेचे खत आणि बी बियाणे मिळू शकतील आणि तसे झाले तर या ठिकाणी जो प्रस्ताव मांडलेला आहे त्याचे सार्थक होईल एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर (विधान सभेने निवडलेले) : सभ्ांपती महोदय, नियम 260 अन्वये या ठिकाणी जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे. सभापती महोदय, शेतक-यांना लागणारे रासायनिक खते आणि शेतक-यांना काळया बाजारातून मिळणारे खते यामध्ये तफावत आहे. ही तफावत शासनाच्या निदर्शनास आणून देणे हे माझे कर्तव्यच आहे असे मी समजतो.

सभापती महोदय, या क्षेत्रात मी स्वत: काम करीत असून 1969 साली युरियाचा भाव 72 रुपये 50 पैसे आणि सुफला खताचा भाव 120 रुपये प्रती बॅग होता. त्यावेळी खत विकणा-या व्यापा-यांना नऊ ते दहा रुपयांचा फायदा मिळत होता. परंतु आज काय अवस्था आहे हे मी आपल्याला सांगणार आहे. त्या निमित्ताने सर्व खतांचे होलसेल आणि रिटेलचे भाव मी विशद करणार आहे. आज युरियाचा भाव 4820 रुपये प्रती टन असून विक्रीचा दर 5000 रुपये प्रती टन आहे म्हणजेच व्यापा-याला एक खताची गोणी होलसेलच्या भावाने 241 रुपये पडते आणि शेतक-याला 250 रुपये दराने द्यावी लागते. कंपनी होलसेलर्सला खताचा पुरवठा करते. हालसेलर्सला एफ.ओ.आर. माल पोहोचवत असतो. होलसेलर्सच्या दुकानात जर पुरेशी जागा असेल तर त्या ठिकाणी खताच्या गोण्या ठेवल्या जातात परंतु जर तेथे जागा नसेल तर तो गोडावूनमध्ये गोण्या ठेवल्या जातात. त्यानंतर होलसेलर्स रिटेलर्सला खते विकतो त्यावेळी रिटेलर्सला कोणत्याही प्रकारची सबसिडी वा वाहतूक सवलत दिली जात नाही. एखाद्या रिटेलर्सला जर युरिया खत घ्यावयाचे असेल तर त्याचा स्टॉक चार महिने अगोदर करावा लागतो. पूर्व विदर्भातील अनेक मोठया व्यापा-यांनी चार महिन्यापासून रासायनिक खताचा साठा करुन ठेवला आहे. अशा प्रकारे मोठया प्रमाणात जर त्यांनी खताची खरेदी करुन ठेवली असेल तर बॅन्केच्या डी.डी.चे कमिशन, गोडावूनचे भाडे, बॅन्काचे व्याज, नोकराचा पगार, व्यवस्थापन खर्च याचा विचार केला तर कोणत्याही खत विक्रेत्याला फायदा होऊ शकत नाही एखादा विक्रेता जर इनकम टॅक्स भरणारा असेल व त्याने जर रिटर्न सादर केले असेल तर इनकम टॅक्स ऑफिसरचे असे म्हणणे असते की या व्यवसायामध्ये किमान 3 टक्के फायदा असलाच पाहिजे. परंतु मी आपणास सांगू इच्छितो की खत विक्री व्यवसायामध्ये 3 टक्के तर नाहीच परंतु .....

नंतर श्री.सुंबरे

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखापी नाही

श्री. केशवराव मानकर ....

एक टक्का देखील फायदा नाही. म्हणून या सर्वांचे पुनर्निधारण करणे आवश्यक आहे. या व्यवहारात होलसेलरला किती फायदा मिळायला पाहिजे, कारण भाव नियंत्रित आहेत. फर्टिलायझर 1945 प्रमाणे हे भाव सरकार निर्धारित करते आणि हे निर्धारण देखील चुकीचे असल्यामुळे शेतकऱ्याला वारंवार जास्त दरामध्ये, काळ्या बाजारात खते खरेदी करावी लागतात. सभापती महोदय, राष्ट्रीय कमिकल फर्टिलायझर ही एक खत उत्पादक कंपनी आहे, या कंपनीची युरिया आणि सुफला ही दोन खते आहेत. सभापती महोदय, दोन वर्षापासून या कंपनीमध्ये 20-20-0 आणि 15-15-15 या रासायनिक खतांचे उत्पादनच बंद आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना सांगितले जाते की, तुम्ही डीएपी वापरा. पण या डीएपीची तरी काय अवस्था आहे ? डीएपी किती स्वस्त आहे हेही मी आपल्याला येथे सांगणार आहे. परंतु सुफलाचा भाव हा 6350 रूपये टन होलसेलरसाठी आणि रिटेलरला होलसेलरकडून 6540 रूपये या भावाने मिळते. म्हणजे एका बॅगेमागे केवळ साडेनऊ रूपयांचा फायदा होलसेलरला होतो. सुफला 15-15 हे खत 4820 रूपये टन अशी किंमत आहे आणि त्याचा विक्रीचा दर 5000 रूपये म्हणजे रिटेलरला फायदा होतो. होलसेलर, रिटेलर आणि वाहतूक खर्च याचा विचार यामध्ये आपण केला पाहिजे. सभापती महोदय, आमच्या विदर्भामध्ये कृषीदेव आणि कृषी-उद्योग एमआयडीसीचे हे खतांचे दोन कारखाने आहेत. या खतांच्या प्रत्येक बॅगमागे केवळ 5 रूपये मिळतात. कृषीदेवच खताचा प्रत्येक टनामागे भाव 7750 रूपये आहे आणि विक्रीचा दर 7850 रूपये आहे म्हणजे केवळ 100 रूपये टनामागे त्याला फायदा मिळतो आहे. कृषी-उद्योग या खताचा भाव देखील या सारखाच आहे. बाकी खर्च विचारात घेता हे खत विकण्यास परवडणारे नाही. त्यामुळे व्यापाऱ्याने चार महिन्यांपासून साठविलेला माल काळ्या बाजारात विकणार नाही तर काय करणार ? यामध्ये दोषी कोण आहे ? व्यापारी, सरकारी यंत्रणा की ते खत विकत घेणारा शेतकरी ? याचा निर्णय झाला पाहिजे. सभापती महोदय, डीएपीची अवस्थादेखील तशीच आहे. आताच सन्माननीय सदस्य श्री.रावते यांनी सांगितले ते खरे आहे की, 100-50 रूपयांनी भाव वर जातो. डीएपीचा प्रति टनाला भाव आहे 9540 रूपये आणि विक्रीचा दर आहे 9700 रूपये. म्हणजे प्रति बॅग 8 रूपये केवळ फायदा मिळतो. आता एक बॅग 477 रूपयांना होलसेलमध्ये मिळते आणि रिटेलमध्ये तीच बॅग 485 रूपयांना मिळते. अशा प्रकारे एका बॅगमागे व्यापाऱ्याला 8 रूपये मिळत असतील तर मला वाटते याचा व्यापार करणे कोणाही व्यापाऱ्याला शक्य

..... 3टी 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नाही. कोठलाही हिंदुस्थानातील व्यापारी याचा व्यापार करू शकणार नाही. म्हणून नियंत्रणाखाली असलेल्या या खतांच्या किंमती ठरवित असताना आपण याचाही निश्चित विचार केला पाहिजे. शेवटी यामध्ये अनलोडींगचा खर्चही असतो. माल दुकानात आला तर तो उतरवून घेण्यासाठी हमाली द्यावी लागते. त्यासाठी जो हमाल वा मजदूर वर्ग आहे हा वर्ग 50 किलोच्या दोन बॅग्स उतरावयाच्या असतील तर दोन रूपयांपेक्षा कमी हमाली घेत नाही. या शिवाय डीडी कमिशन, नोकरांचा पगार, बँकेचे व्याज, गोडावूनचा खर्च, दुकानाचा खर्च या साऱ्या गोष्टी विचारात घेतल्या तर हा व्यापार झेपण्यासारखा नाही. म्हणून मग त्याचा काळाबाजार होतो. आता तर काळाबाजार करणे फार सोपे झाले आहे. सभापती महोदय, एफसीआयच्या किंवा वखार महामंडळाच्या गोडावून मधून माल उचलला किंवा रेल्वेच्या फलाटावरून माल उचलला तरीही कोठल्याही व्यापाऱ्याला मोजमाप करून होलसेलरला वा रिटेलरला माल दिला जात नाही ही त्यातील आणखी एक शोकांतिका आहे. होलसेलरने माल उचलताना वजनकाट्यावर वजन करून तो माल त्याला दिला गेला पाहिजे. पण तसे दिले जात नाही. जेथून माल उचलला जातो तेथे किंवा वेअरहाऊसच्या ठिकाणी देखील वजनकाट्याची व्यवस्था नसते. तेव्हा व्यापाऱ्याला माल मोजून मापून दिला गेला असता तर व्यापाऱ्याने देखील ग्राहकाला, शेतकऱ्याला मोजून मापून माल दिला असता, विकला असता. पण तसे होत नाही आणि त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्याला इतके महाग खत घेऊनही 1 ते 5 किलोपर्यंत कमी वजनाचा माल मिळतो. म्हणजे हा सर्व तोटा सहन कोणाला करावा लागत असेल तर तो म्हणजे शेतकऱ्यालाच करावा लागतो हे मला येथे अत्यंत खेदाने सांगावेसे वाटते. तेव्हा ही जी सारी व्यवस्था आहे ती बदलण्याची आवश्यकता आहे. शेतकऱ्याला त्याने विकत घेतलेला माल मोजून दिला गेला पाहिजे. आता हे तुमचे सोपे आहे, या व्यवहारात तुम्हाला 8, 9, 4 रूपये मिळत असतील... अगदी सुपर फॉस्पेट खताच्याबाबतीतच सांगावयाचे असेल तर त्याची प्रति बॅग चार साडेचार रूपयांच्या वर त्यात वाचत नाही. या खताचा होलसेलचा दर 3850 रूपये आहे तर रिटेलमध्ये विक्रीचा दर आहे 3940 रूपये. .....

(यानंतर श्री. सरफरे ..... 3यू 1 ...

अशुद्धीत प्रत / शोधनासाठी नाही

श्री. केशवराव मानकर...

पूर्वी डीएमसीचे मिश्र खत हे दाणेदार व पावडरच्या स्वरुपात मिळत होते आता ते मिळत नाही. आता फक्त आनंद कंपनीचे खत आमच्याकडे येत आहे. त्यामध्ये सुपर फॉस्फेट, मिश्र खत समाविष्ट नाही. फक्त यूरीयाच्या भरंवशावर शेती करावयाची काय? अशी अवस्था झाली आहे. सभापती महोदय, महाराष्ट्रातील भौगोलिक परिस्थिती पाहिली तर विदर्भातील कापूस उत्पादन करणारे जिल्हे व अन्य पिक घेणारे जिल्हे आहेत त्यांना जून महिन्यात खताची आवश्यकता लागते. धानाचे पिक घेणाऱ्या जिल्हयांना जून महिन्यामध्ये खताची आवश्यकता लागत नाही. पाऊस इ ाल्यानंतर जुलैच्या दुसऱ्या आठवडयामध्ये यूरीयाची आवश्यकता असते.आणि जुलै व ऑगस्ट महिन्यामध्ये मिश्र खताची आवश्यकता लागते. ते खत भरपूर प्रमाणात मिळत नाही. पुरेसा माल वेळेवर न मिळाल्यामुळे मागील वर्षी मोठया प्रमाणात काळा बाजार झाला होता. प्रत्येक जिल्हयाच्या लोकेशनप्रमाणे त्या जिल्हयामध्ये पाहिजे तेवढा माल पोहोचला नाही. आज सुध्दा महाराष्ट्राच्या सर्व जिल्हयामध्ये किती लोकेशन आहे व त्याप्रमाणे आपल्याकडे खताचा किती साठा आहे हे आपण जाहीर करावे. त्यावरुन प्रत्येक जिल्हयामध्ये किती खताची आवश्यकता आहे हे स्पष्ट होईल. त्यामुळे शेतकऱ्यांवर अन्याय करणारे या फर्टिलायझरचे नियम बदलले पाहिजेत. आज 10 हजाराचे मशीन घेऊन प्रत्येक बॅगेमधून दोन-तीन किलो खत काढून पुन्हा ती बॅग पूर्वीसारखी शिलाई मारुन विकायला काढून हे व्यापारी अवैध धंदे करतात. यामध्ये शेतकऱ्यांचे शोषण होते आणि व्यापाऱ्याचा फायदा होतो हे आपण थांबविले पाहिजे. खरे म्हणजे आपल्या कृषी विभागाचे जे इन्सपेक्टर आहेत ते खतांचे सँपल घेतात त्यावेळी गैरप्रकार होतात. त्या इन्सपेक्टरना व्यापाऱ्यांकडून आमिष मिळाल्यानंतर ते सँपल खड्डयात जाते. आणि ते चांगले असल्याचे प्रमाणित करुन सांगितले जाते. सभापती महोदय, गेल्या 30 वर्षाच्या कालावधीत या व्यवसायामध्ये एखाद्या व्यापाऱ्यावर या प्रकरणामध्ये गुन्हा दाखल झाल्याचे मला आठवत नाही. अशाप्रकारे खताचा नमुना बोगस असल्यामुळे त्या फर्टिलायझरच्या व्यापाऱ्यावर कारवाई झाल्याचे मला आठवत नाही. सभापती महोदय, यामध्ये व्यापारी दोषी नसतो तर या खताची निर्मिती जी कंपनी करते त्या कंपनीला शिक्षा झाली पाहिजे. परंतु त्या कंपनीला शिक्षा होत नाही, कुठेतरी बिनसते आणि त्यामध्ये शेतकऱ्याचे नुकसान होते. ही अत्यंत खेदजनक अशी बाब आहे. त्यामुळे आपण ही फर्टिलायझरची वितरण व्यवस्था बदलली पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. केशवराव मानकर...

सभापती महोदय, मला आपणास सूचना करावयाची आहे की, आमच्या भागामधील मिश्र खत निर्माण करणारे कारखाने बंद झाले आहेत. परंतु अमरावतीच्या परिसरामध्ये काही कारखाने सुरु आहेत. त्याठिक्राणी मिश्र खतासाठी ट्रान्सपोर्ट सबसिडी फक्त 200 रुपये टन आहे. त्या सबसिडीवर पूर्व विदर्भातील गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोलीपर्यंत माल पोहोचू शकत नाही. म्हणून मी या नियम 260 अन्वये प्रस्तावाच्या माध्यमातून आपणास विनंती करतो की, ही ट्रान्सपोर्ट सबसिडी आपण वाढवून दिली पाहिजे व ती 300 रुपये प्रति टन केली पाहिजे. ज्यामुळे विदर्भातील शेवटच्या टोकापर्यंत मिश्र खते पोहोचतील अशी व्यवस्था आपण केली पाहिजे. सभापती महोदय, फर्टिलायझरच्या बाबतीत माझ्याकडे अनेक मुद्दे आहेत परंतु वेळेअभावी मी त्यांचा उल्लेख करीत नाही. परंतु जेवढया मालाची निर्मिती होते त्यावर कंपनीकडून व्हॅट लावला जात असला तरी जो काही फायदा होतो त्यावर देखील आपल्याला 4 टक्के व्हॅट भरावा लागतो. त्यामुळे शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी करावयाचा असेल तर व्यापाऱ्यांवरील 4 टक्के व्हॅट आपण कमी केला पाहिजे अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, बियाण्यांची स्थिती कशी आहे? बियाणे स्वस्त मिळते काय? आज आमचे धान 700 रुपये हमी भावाने विकले जाते. आज महा गुजराथ सारथी या नावाच्या 8 किलोच्या बियाण्याची बॅग 390 रुपयांना मिळते, सहयाद्री संकरित या बियाण्याची एक किलोची बॅग 85 रुपयांना मिळते, मंगला संकरित या बियाण्याची 1 किलोची बॅग 150 रुपयांना मिळते. चांदणी संकरित बियाण्याची 1 किलोची बॅग 290 रुपयांना मिळते. जया महाबीज या बियाण्याची 25 किलोची बॅग 500 रुपयांना मिळते. म्हणजे जवळ जवळ 20 रुपयांपेक्षा कमी धानाचे कोणतेही बियाणे मिळत नाही. तीच अवस्था कापूस व सोयाबीनची आहे. शेतीला लागणाऱ्या बियाण्याच्या किंमती आकाशाला पोहोचल्या आहेत, त्यांच्या किंमतीवर कुणाचेही नियंत्रण नाही.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर . . . .

सभापती महोदय, मी आता केवळ दोन मिनिटे भाषण करणार आहे.मला जळगाव जिल्ह्यातील घटनेबाबत सांगावयाचे आहे. या जिल्हयातील पारोळा येथे संतप्त शेतकऱ्यांना पांगविण्यासाठी पोलिसांनी केलेल्या गोळीबारामध्ये 6 शेतकरी जखमी झाले आणि संतप्त शेतकऱ्यांनी केलेल्या दगडफेकी मध्ये 30 पोलीस देखील जखमी झालेले आहेत.या विषयाच्या संबंधात एवढा आगडोंब उसळूनही बियाणे आणि खत वाटपाचे प्रश्न सुटलेले नाहीत.सरकारने शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर कर्जमाफीची योजना आणली.पण ही योजना आणल्यानंतर देखील यासंबंधातील सर्व प्रश्न सुटलेले नाहीत. कापसाच्या बी.टी.बियाणामुळे कापसाचे एकरी उत्पन्न वाढलेले असले तरी त्या बियाणाच्या किंमती एवढ्या जास्त आहेत की, शेतकऱ्यांना हे बियाणे विकत घेणे परवडत नाही. त्यासाठी शेतकऱ्यांना रांग लावावी लागते.खरे म्हणजे शासनाने शेतकऱ्यांच्या घरापर्यंत रासायनिक खते, बियाणे घरपोच पोहोचविण्याचे काम करावयास पाहिजे, मदत करावयास पाहिजे. पण शेतकऱ्यांना यासाठी रांगेमध्ये उभे रहावे लागते आणि तरी त्यांची अशी अवस्था झालेली आहे हे अत्यंत दुर्दैवी आहे. म्हणून या शासनाने जागरुक होऊन शेतकऱ्यांच्या हितासाठी तातडीने व्यवस्था करण्याची गरज आहे, शेतकऱ्यांना दिलासा देण्याची गरज आहे. जर शासनाने शेतकऱ्यांसाठी या गोष्टी केल्या नाहीत तर शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या घटना थांबणार नाहीत. राज्यातील शेतकरीच नाही तर सर्वसामान्य माणसावर देखील आत्महत्या करण्याची वेळ येऊ शकते. शेतकरी या देशाचा राजा आहे आणि जर तो सुखी नसेल तर येथील जनताही सुखी राहू शकत नाही. एवढेच मी या प्रस्तावाच्या निमित्ताने सांगतो आणि माझे भाषण संपवितो. जय हिंद जय भारत.

. . .. 3 व्ही-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी फक्त दोनच मिनिट बोलणार आहे. विषय असा आहे की, आज शेती दलालांच्या हातामध्ये गेलेली आहे आणि व्यापाऱ्यांच्या हातामध्ये बियाणे, खते वगैरे असल्याने ते देखील महाग झालेले आहे. याचा परिणाम होऊन शेतकरी सावकरी पाशाला बळी पडत आहे आणि अल्प भूधारक शेतकऱ्याला आपली शेती विकावी लागत आहे आणि तो भूमीहीन होत आहे. त्यामुळे त्याला शहराची वाट धरावी लागत आहे. सध्या असा प्रकार प्रत्येक खेडयामध्ये मोठया प्रमाणात होत आहे. या गोष्टीकडे गांभीर्याने पाहिले तरच शेतकरी वाचण्याची शक्यता आहे, नाहीतर महाराष्ट्रातील अल्प भूधारक शेतकऱ्यांचे पूर्णपणे उच्चाटन होईल एवढी राज्यामध्ये गंभीर स्थिती आहे एवढेच मला सांगावयाचे आहे. धन्यवाद.

---

3 व्ही-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी येथे जो प्रस्ताव आणलेला आहे, त्याला पाठिबां देण्यासाठी आणि या विषयाच्या अनुषंगाने त्यावर माझे मत व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील शेतकरी उपेक्षित आहे, त्याला आधार देण्यासाठी महाराष्ट्र शासन सक्षम आहे. जो राज्यातील शेतकरी आत्महत्या करीत आहे. अशा वेळी त्यांच्यापाठिमागे महाराष्ट्र शासनाने सर्व शक्तीनिशी उभे रहाण्याची आवश्यकता आहे आणि त्यादृष्टीने शासनाच्या वतीने कार्यवाही होण्याची गरज आहे. म्हणून मी शासनाला अशी विनंती करतो की, त्या दृष्टीकोनातून पावले उचलण्यात यावीत. आज शेतकऱ्यांची स्थिती कशी आहे ? तर एका कवीने असे म्हटलेले आहे की,

पायजो पायजो म्हणता म्हणता गेलीच पायात
आणि तरी तुझ्या डोळयातून कसे आले नाही पाणी
जखम झाल्या पायावर पदर तरी ठेव
जीवाचाही तुला कसा लागत नाही भेव
तुला वाटले तरी तुवा धनी येणार नाही
दूर गेल्या वखरालोक तुझी हाक ही जाणार नाही
सपनात रहायच, बिचार गालातच हासत
मला त गडे, तू मुलखा न्यारीच दिसत
काळ काळ ढेकुळ म्हणत नवरीवाणी दिसते
रक्ताचा थेंब ही त्यावर मेहंदीवाणी हसते, मेहंदी वाणी हसते.

सभापती महोदय, जर शेतकऱ्यांची अशी स्थिती असेल तर त्यातून त्यांना बाहेर काढण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

सभापतीस्थानी - तालिका सभापती (श्री.सुरेश जेथलिया)

यानंतर कु.थोरात . . ..

अशुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश नवले...

सभापती महोदय, सन्माननीय मंत्रिमहोदय, श्री. थोरात साहेब तरुण व तडफदार आहेत. कृषी खात्याविषयी त्यांचा आवाका दांडगा आहे. विरोधी पक्ष नेत्यांनी ज्या भावनेतून हा प्रस्ताव येथे आणलेला आहे ती भावना अतिशय महत्वाची आहे. शेतकऱ्यांसमोर खताचे व बियाणाचे संकट आहे. त्यासाठी त्यांना रांगा लावाव्या लागतात. या रांगेवर पोलीस लाठीमार करतात. कर्नाटक मध्ये येडीयुरप्पा सरकारने शेतकऱ्यावर गोळीबार केला. कर्नाटकमध्ये भारतीय जनता पाटीचे सरकार आहे. याचा अर्थ महाराष्ट्र सरकारने किंवा महाराष्ट्रातील पोलिसांनी शेतकऱ्यावर लाठीमार करावा असे मी म्हणणार नाही. याचे समर्थन होऊ शकत नाही. पण या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी भ्रष्ट शासकीय यंत्रणेवर नियंत्रण ठेवण्याची गरज आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या ठिकाणी अतिशय गंभीर आरोप केलेला आहे. कुठल्या तरी आयुक्तांनी पाच कोटी रुपयांची मागणी केलेली आहे. पुरोगामी महाराष्ट्रात एखादा अधिकारी जर अशा प्रकारची मागणी करीत असेल तर या अधिकाऱ्यावर जरब बसविण्यासाठी आणि महाराष्ट्र शासनाचा नैतिक दरारा निर्माण करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने खऱ्या अर्थाने पाऊले उचलण्याची आवश्यकता आहे तरच महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना आणि सर्वसामान्य माणसांना शासन एक प्रकारचा दिलासा देऊ शकेल. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना वाचवायचे असेल, महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या पाठीमागे सर्वशक्तीनिशी उभे रहावयाचे असेल तर माझी कृषी मंत्र्यांना आणि आदरणीय पुनर्वसन मंत्र्यांना विनंती रहील की, याबाबतीत गांभीर्याने विचार करावा. (अडथळा) सभापती महोदय यापूर्वी सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी त्यांचे शब्द परत घेतलेले आहेत. त्याप्रमाणे माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी उपस्थित केलेल्या ठरावाला समर्थन देण्याबाबतचा एखादा शब्द अनावधानाने माझ्या तोंडून बाहेर पडला असेल तर तो शब्द मी परत घेतो. सभापती महोदय, या विषयावरील माझे मत व्यक्त करीत असताना मी या ठिकाणी एकच भावना व्यक्त करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करणार आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना खताची कमतरता पडणार नाही. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना बियाणाची कमतरता पडणार नाही आणि महाराष्ट्रातील शेतकऱ्यांवर आत्महत्त्या करण्याची वेळ येणार नाही या दृष्टीने महाराष्ट्र शासनाचे सर्वंकष धोरण राबविण्याच्या दिशेने कडक पाऊले टाकावित एवढीच आग्रहाची विनंती मी सन्माननीय कृषी मंत्र्यांना आणि सन्माननीय गृह राज्य मंत्र्यांना करतो. विरोधी पक्ष नेत्यांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे, त्यावर माझ्या भावना व्यक्त करुन मी आपली रजा घेतो. जय हिंद. जय महाराष्ट्र.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MMP/ KGS/

श्री. बाळासाहेब थोरात (कृषी मंत्री) : सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर आणि अन्य सदस्यांनी नियम 260 अन्वये या ठिकाणी प्रस्ताव उपस्थित केला आहे आणि त्या निमित्ताने कृषी विभागातील खते आणि बियाणे यासंदर्भातील चर्चा घडवून आणलेली आहे. अत्यंत चांगल्या प्रकारची चर्चा या निमित्ताने करण्यात आलेली आहे. अनेक महत्वाचे मुद्दे या सभागृहात मांडण्यात आलेले आहेत. खरीप हंगाम सुरु होतो त्यामध्ये अपल्या सर्वांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची गोष्ट कोणती असेल तर ती म्हणजे मान्सून होय. मान्सून झाला तर शेती व्यवस्थित होते, ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. म्हणून आपण सर्वजण मान्सूनची चातक पक्षाप्रमाणे वाट पहात असतो. त्यावेळी शेतकऱ्याला ज्या आवश्यक गोष्टी असतात, आवश्यक निविष्ठा असतात त्यामध्ये बियाणे ही अत्यंत मूलभूत अशी गोष्ट आहे. तसचे पिकावर रोगराई आल्यानंतर औषधांची फवारणी करणे हे देखील महत्वाचे असते हे मी या ठिकाणी नाकारु इच्छित नाही. तसेच मागील दोन वर्षामध्ये खताच्या संदर्भात मोठया प्रमाणावर चर्चा झालेली आहे, हेही मी नाकारीत नाही. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी सुध्दा मान्य केलेले आहे की, मागील वर्ष हे अपवादात्मक अशा प्रकारचे वर्ष् होते. त्यावेळी जागतिक पातळीवर सुध्दा काही प्रश्न निर्माण झाले होते. खताचे बाजार उच्च पातळीला गेले होते. आयातीचे प्रश्न निर्माण झाले होते. आयात केल्यानंतर सुध्दा काही स्थानिक प्रश्न निर्माण झाले, देशामध्ये काही प्रश्न निर्माण झाले, बंदराचे काही प्रश्न निर्माण झाले. पावसाचे प्रश्न निर्माण झाले. निरनिराळी आंदोलने झाली.

यानंतर श्री. बरवड....

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात.....

खताचे बाजार सुध्दा खूप उच्च पातळीवर गेले होते. आयातीचे प्रश्न निर्माण झाले होते. आयात केल्यानंतर सुध्दा आपल्या देशामध्ये काही स्थानिक प्रश्न निर्माण झाले. बंदराच्या बाबतीत, पावसाच्या बाबतीत प्रश्न निर्माण झाले. निरनिराळी आंदोलने झाली. त्यामुळे मागील वर्ष अडचणीचे गेले ही वस्तुस्थिती आहे. मी या निमित्ताने सांगेन की, या वर्षाचे नियोजन करीत असताना आम्ही खताच्या संदर्भात पूर्णपणे खरीप नियोजनाची बैठक 1 जानेवारीला घेतली होती. केंद्र सरकारकडे आपली मागणी नोंदविणे, आग्रह धरणे यासंदर्भातील सगळ्या चर्चा आम्ही केल्या. त्या पध्दतीने आतापर्यंत त्याबाबतीत काटेकोरपणे नियोजन कसे होईल यादृष्टीने खताच्या आणि बियाणाच्या बाबतीत आम्ही काळजी घेत आहोत. आम्ही केंद्र शासनाकडे खताची मागणी नोंदवली. केंद्र सरकारकडे जी खताची मागणी नोंदवली त्यामध्ये 36 लाख 85 हजार मेट्रिक टन एवढ्या खताची मागणी नोंदवली. त्यापैकी 35 लाख 35 हजार मेट्रिक टन खताची मागणी केंद्र सरकारने मान्य केली. खरिपामध्ये खताची अडचण येते. मागील वर्षी एक महत्वाची अडचण निर्माण झाली. एकंदर आलेले खत जर आपण पाहिले तर त्याचा आकडा मोठा दिसतो पण आवश्यक त्या वेळी जेवढे खत पाहिजे होते ते उपलब्ध होऊ शकले नाही. याची जी निरनिराळी कारणे आहेत त्या कारणमीमांसेमध्ये मी जात नाही. परंतु त्या आवश्यक वेळेस नेमका खताचा तुटवडा आल्यामुळे काही प्रश्न निर्माण झाले होते. या सगळ्या गोष्टींची आम्ही काळजी करीत असताना वेळोवेळी यासंदर्भात मंत्रिमंडळामध्ये चर्चा झाली. मंत्रिमंडळाने निर्णय घेतला आणि त्या पध्दतीने ज्याला आपण गव्हर्नमेंट गॅरंटी म्हणतो ती गॅरंटी बँकेकडून कर्ज उपलब्ध करण्याकरिता घेतली. त्यामध्ये एकूण 400 कोटी रुपयांपैकी 300 कोटी रुपये एमएआडीसीकरिता आणि 100 कोटी रुपये मार्केटिंग फेडरेशनकरिता एवढी उपल्बता सुध्दा करुन दिली. त्याच्यातून संरक्षित साठा करण्याच्या संदर्भात मंत्रिमंडळामध्ये निर्णय झाला आणि त्याकरिता मंत्रिमंडळाची एक उपसमिती निर्माण करण्यात आली. कोणतेही प्रश्न येवोत, त्या प्रश्नाला तातडीने उत्तर शोधण्याकरिता आणि निर्णय घेण्याकरिता उपसमितीची निर्मिती सुध्दा करण्यात आली. ही वस्तुस्थिती आहे की, खताच्या निर्मितीबाबत आपल्या देशामध्ये खूप मर्यादा आहेत. त्यामुळे बरेचशे खत आयात करावे लागते. खत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात .....

आयात करताना आणखी एक प्रश्न असा निर्माण होत असतो की, आपल्या जवळ अजूनही खताचे बंदर नाही. कांडला बंदरामध्ये खत उतरवले जाते आणि ते रेल्वेच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रामध्ये जेवढे पाठविता येईल तेवढे पाठविण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे ही सुध्दा मोठी अडचण आहे. एक धरमतर नावाचे बंदर आहे परंतु पाऊस सुरु झाल्यानंतर त्याचा बंदराचा सुध्दा आपण उपयोग करु शकत नाही, ही वस्तुस्थिती आहे. रॅकच्या संदर्भात सांगावयाचे म्हणजे एक रॅक म्हणजे रेल्वेची पूर्ण एक गाडी. त्या रॅकच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रामध्ये खत पाठविण्याचे काम करावे लागते. यामध्ये आणखी एक गोष्ट आम्ही केली. हे सर्व करीत असताना पूर्णपणे मॉनिटरींग करण्याकरिता एक सेल आणि एक कंट्रोल रुम सुध्दा आता आम्ही निर्माण केलेली आहे. कोणत्या जिल्ह्यामध्ये किती खत पोहोचले, दुसरा रॅक कोठे आहे, कोठे खत पाठवावयाचे आहे यावर सतत मॉनिटरींग करण्याकरिता कंट्रोल रुमची सुध्दा व्यवस्था केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना सांगेन की, युरियाचे महत्व हे असतेच. युरियाचा उपयोग पाने वाढण्याकरिता तसेच हिरवेपणा येण्यासाठी होतो. परंतु फलधारणेसाठी जे घटक आवश्यक असतात ते डीएपीमधून मिळतात. डीएपीमध्ये सुध्दा नायट्रोजन आहे. आपल्याला मागच्या वर्षी जी अडचण आली ती डीएपीच्या संदर्भात आली. म्हणून डीएपीकडे आम्ही जास्तीत जास्त लक्ष केंद्रित केले आणि या वर्षी आम्ही 3 लाख 5 हजार टन इतका संरक्षित साठा अगोदर करुन ठेवलेला आहे. मी आपल्याला सांगेन की, 31 मार्चला वर्ष संपते पण त्यांच्या अगोदरचे जे खत होते ते सुध्दा जास्त उपलब्ध करुन 90 हजार टन खत आणून ठेवण्याची व्यवस्था केली आणि एक चांगला संरक्षित साठा निर्माण करण्याचे काम आपण केले. आपण 31 मे हा पहिला टार्गेट ठेवतो. कारण नंतर पावसाळा सुरु होतो. त्यादृष्टीने आपण जे एकंदर नियोजन केले त्यामध्ये

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात...

एकूण युरियाचे जे नियोजन केले ते 4.62 मे.टन होते. 30 जूनपर्यंत 534 मे.टन इतका पुरवठा करावयाचा होता. त्यापैकी 83% पुरवठा केलेला आहे. शासनाने 31 मेपर्यंतचे नियोजन केलेले आहे. नियोजनापेक्षा अधिक नियोजन कसे करता येईल यादृष्टीकोनातून जवळपास 120% खताचे नियोजन केलेले आहे ही वस्तुस्थिती आहे. एका बाजूला पाहिले की, 35.35 लाख मे.टन खत मिळाले आहे ते 2008 च्या तुलनेत 17 टक्के जास्त आहे. मे, 2009 पर्यंत 11 लाख 57 हजार मे.टन पाहिजे होते, परंतु प्रत्यक्षात 12 लाख 66 हजार 109 मे.टनाचा पुरवठा केला आहे. मागील वर्षाच्या तुलनेत 130% जादा आहे. एका बाजूला संरक्षित साठा केला म्हणून खतांचा साठा दाबून ठेवला असे नाही. बाकी खत बाजारामध्ये येत होते. आपल्याकडे जो सुरक्षित साठा आहे त्याच्यातून 50 टक्के साठा उपलब्ध करुन देत आहोत. पुरेसे खत बाजारात असले पाहिजे, त्याच्यातून जे पैसे उपलब्ध होतील ते पैसे नव्याने खते आयात करण्यासाठी वापरावयाचे अशाप्रकारचे चक्र सुरु करीत आहोत. शेतक-यांना खतांची अडचण भासू नये यादृष्टीने सरकारच्यावतीने प्रयत्न केले जात आहेत. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी मिश्र खतासंबंधीचा मुद्दा उपस्थित केला आहे. मी कृषी मंत्री झालो त्याला आता 5 वर्षे होत आली आहेत. सुरुवातीच्या कालखंडामध्ये मिश्र खतासंबंधी खूप तक्रारी ऐकू येत होत्या ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. त्यासंदर्भात काही सन्माननीय सदस्यांनी सुध्दा सभागृहात तक्रार केली होती. त्यामुळे त्याच्यावर शासनाने नियंत्रण आणण्याचा प्रयत्न केला होता. खतांचे मोठया प्रमाणावर सॅम्पल घेण्याचा प्रयत्न केला. गुणवत्तेच्या बाबतीत तडजोड करावयाची नाही असा कसोसीने शासनाने प्रयत्न केला होता. कमी गुणवत्तेची खते सापडली यासंबंधीच्या बातम्या आपल्याला ऐकावयास मिळाल्या असतील ती खते कृषी विभागाने मोठया प्रमाणावर मोहिम घेऊन पकडली होती. खताचे कारखाने बंद करण्यात आले त्यासाठी गुणवत्तेचे कारण नव्हते. ते या विषयाशी निगडित नव्हते. यासंदर्भात सन्माननीय सदस्यांनी सभागृहात माहिती दिली आहे. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, मागील दोन वर्षात खतांची होणारी आयात आणि पुरवठा यामधील अंतर खूप कमी राहिले होते. त्याच्यामध्ये मिश्र खत पाठविले असते तर त्यात आणखी कालावधी गेला असता आणि नवीन प्रश्न

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात...

निर्माण झाले असते. म्हणून दुस-या बाजूने मिश्र खते तयार कशी करावीत यासाठी जास्तीत जास्त शेतक-यांना प्रशिक्षण देण्याचा प्रयत्न केला आणि त्याच्या जमिनीला पाहिजे ते खत सरळ खतापासून कसे तयार करावयाचे याची त्यांना माहिती दिली. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांची यासंदर्भात थोडीशी गफलत होत आहे. सन्माननीय सदस्यांनी मघाशी एक चार्ट वाचून दाखविला आहे. कॉम्प्लेक्स खताच्या एकजीव अशा स्वरुपाच्या गोळया तयार करणाऱ्या मोठया कंपन्या तयार करतात. या कंपन्यांचे मागील वर्षापासून उत्पादन कमी होण्यास सुरुवात झाली आहे. त्यांना पाहिजे असलेले ॲसिड, त्याची उपलब्धता आणि वाढलेले भाव याचा उत्पादनावर परिणाम होऊ लागला. त्यामुळे इफ्को, आरसीएफ सारख्या मोठया कंपन्या म्हणू लागल्या की, हे खत आम्हाला तयार करणे शक्य नाही. त्यामुळे या खताचे उत्पादन मोठया प्रमाणावर घटले परिणामी सगळीकडे कॉम्प्लेक्स खताचा तुटवडा दिसत आहे. यावर्षी मिश्र खते पुन्हा सुरु करण्याचा शासनाने निर्णय घेतला. त्यासाठी काळजी घेण्याचा प्रयत्न केलेला पाहिजे. सध्या असलेल्या कंपन्यांचे रेप्यूटेशन कसे आहे ते पाहण्याचा प्रयत्न केला आहे. ज्या कंपन्यांचे रेप्यूटेशन सातत्याने वाईट राहिलेले आहे त्यांना बाजूला ठेवण्याचा प्रयत्न आहे. ही वस्तुस्थिती आहे. इतर 35 कंपन्यांना मिश्र खत तयार काम दिले आहे. परंतु इन्स्पेक्शन करण्याचेही ठरविले आहे. त्याच्यामध्ये प्रॉडक्शनपासून इन्सपेक्शन सुरु ठेवले आहे. एवढेच नाही तर जो लॉट तयार होईल त्याच्या नमुन्याचा अहवाल घेऊन त्यानंतर तो लॉट पाठवावयाचा. आजच्या परिस्थितीत शासनाची काही अडचण झालेली आहे. लॉट तयार झाल्यानंतर तो काही दिवस तसाच राहतो. त्यामुळे माल पाठविणे शक्य होत नाही. त्यातून शासनाला मार्ग काढावा लागेल. परंतु खतांच्या गुणवत्तेबाबत तडजोड होणार नाही याची काळजी शासन घेत आहे हे मी आपल्याला सांगू इच्छितो.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.शिगम....

श्री.दिवाकर रावते...

आपण जे खाजगी कारखान्यांच्या बाबतीत काटेकोरपणे करता. परंतु आपल्या सरकारी कारखान्यांमध्ये लॉटचे टेस्टींग होण्यापूर्वीच तेथील माल बाजारात जातो अशी माझी खात्रीलायक माहिती आहे. तर त्यांना ते का लागू नये असा खरा माझा महत्वाचा विषय आहे.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, आजही आमची पाहण्याची तयारी आहे. एम.ए.आय.डी.सी. असेल वा मार्केटींग फेडरेशन असेल या दोन्हींचा लॉट तपासल्या शिवाय तेथील माल मार्केटमध्ये पाठवित नाही. या ठिकाणी सांगू इच्छितो की, मी एम.ए.आय.डी.सी.चा चेअरमन आहे. मला एक विश्वास आहे. शेवटी ते कंटेंट आम्ही टाकलेले आहे. तेथे आपण मॅनिप्युलेशन करु शकत नाही. असा आम्हाला विश्वास आहे. काल रोजी मार्केट फेडरेशनचे चेअरमन श्री.अंकुशराव टोपे आले होते. त्यांनी मला सांगितले की, तुम्ही मालाच्या तपासणीमध्ये एवढा वेळ घालवित आहात. त्यामुळे आमच्याकडे मोठया प्रमाणात मालाचा साठा जमा होतो. पर्यायाने आमचे सर्व गोडाऊन्स भरुन जातात. आपण त्यात काही तरी मार्ग काढला पाहिजे. मी एवढयाकरिता सांगू इच्छितो की, जरी संस्था सरकारी किंवा निम सरकारी असल्या तरी आपण ती काळजी घेतो. सर्वांना सारखे वागविण्याचा आमच्याकडून नेहमी प्रयत्न केला जातो.

सभापती महोदय, मिश्र खताच्या बाबतीत अनेक सन्माननीय सदस्यांनी तक्रारी केल्या आहेत. परराज्यातून येणा-या मिश्र खतांचा बाबतीत मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. मी कृषी मंत्री झाल्यानंतर लागलीच माझ्याकडे परराज्यातून येणा-या मिश्र खतांच्या दर्जाच्या संदर्भात तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी केली असता काही कारखान्यांमधील खत अतिशय निकृष्ट दर्जाचे आढळून आले आहेत. चातक ॲग्रो, सुमन ॲग्रो मिश्र खते, गोदावरी फॉस्फेट, या कंपन्यांची खते निकृष्ट दर्जाची आढळून आल्यामुळे त्यांच्याकडून मिश्र खते मागविणे बंद केले आहे. काहीही झाले तरी त्यांच्याकडून मिश्र खते मागवावयाची नाहीत असा शासनाने निर्णय घेऊन टाकला आहे. मिश्र खताच्या बाबतीत चुकीचे होत असल्याबाबतची बाब आढळून आली तर त्यासंदर्भात कोणालाही पाठिशी न घालता संबंधितांवर कारवाई करण्यासंदर्भातील निर्णय शासनाने वेळोवेळी घेतलेले आहेत. राज्यात खताचा तुटवडा होऊ नये याकरिता शासनाने पूर्णपणे प्रयत्न केलेला आहे. यापुढे देखील खताचा तुटवडा होऊ नये म्हणून काळजी घेण्यात येत आहे. शेतक-यांना गुणवत्तेचे खत मिळाले पाहिजे या दृष्टीने देखील शासन काळजी घेत आहे. यामध्ये

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात.....

मिश्र खते आणि कॉम्प्लेक्स यांचे शॉर्टेज असल्यामुळे मे महिन्यात कृषी दिंडी काढली होती. त्यामध्ये कृषी अधिका-यांनी आपल्याला खते कशी बनविता येतील याची माहिती शेतक-यांना दिली. राज्यातील सर्व विभागातील प्रत्येक गांवातील मातीचे परीक्षण करणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे. या दिंडीच्या वेळी कृषी विभागातील सर्व अधिकारी गावोगावी फिरले. सकाळ, संध्याकाळ शेतक-यांना मार्गदर्शन करण्याच्या संदर्भातील कार्यक्रम झाले. दुपारच्या वेळेस ऊन असल्यामुळे मंदिरात शेतक-यांना मार्गदर्शन केले.

श्री.दिवाकर रावते : उन्हामुळे शेतकरी दिंडी यशस्वी झाली नाही असे माझे मत आहे.

श्री. बाळासाहेब थोरात : आम्ही प्रामाणिकपणे प्रयत्न केलेला आहे. आमच्या प्रामाणिकपणा बद्दल आपण शंका घेऊ शकत नाही. आमचे कृषी अधिकारी शेतक-यांच्या शेतापर्यंत गेले. शेतक-यांना समजावून सांगण्याचा अधिका-यांनी प्रयत्न केलेला आहे. मी तर अशा सूचना दिल्या होत्या की, सर्व लोकप्रतिनिधींना देखील सहभागी करुन घ्या. अनेक ठिकाणी लोकप्रतिनिधीनी चांगल्या प्रकारे सहभाग घेतला होता हे मी या ठिकाणी आवर्जून सांगू इच्छितो. खताच्या बाबतीत पूर्णपणे काळजी घेण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. या ठिकाणी लिंकींगच्या संदर्भात चर्चा झाली. लिकींग किंवा जादा भाव आढळून आला. भाववाढीच्या संदर्भात काही तक्रार करावयाची असेल तर त्यासाठी वृत्तपत्रात शासनाने दूरध्वनी देखील छापले आहेत. अशा बाबी आढळून आल्या व त्यासंबंधीची आपण तक्रार केली तर संबंधिताविरुध्द कारवाई केलेली आपल्याला आढळून येईल. मला या ठिकाणी एक गोष्ट सांगितली पाहिजे की, एका ठिकाणी असे आढळून आले की, कोरामंडलम ही खताची कंपनी आहे. लिकींगमध्ये एक सल्फर विकण्याचे काम सुरु होते. आपण त्यांचा सल्फरचा एक कोटी रुपयांचा साठा सीज् केला. शासनाचा असा प्रयत्न आहे की, अशा प्रकारांना आळा बसावा, असा प्रकार करणा-यांवर धाक असावा यासंबंधी पूर्णपणे शासन काळजी घेत आहोत. असा प्रकार राज्यात कुठेही निदर्शनास आला तर शासनाने मोबाईल नंबर उपलब्ध करुन दिलेले आहेत. ते मोबाईल फोन 24 तास सुरु आहेत. त्या मोबाईलवर तक्रार करा. त्या तक्रारीच्या अनुषंगाने आपल्याला संबंधितांवर कारवाई केलेली आढळून आल्याचे चित्र आपल्याला दिसून येईल अशी मी या निमित्ताने ग्वाही देतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात.....

सभापती महोदय, बियाण्याचा बाबतीत या सभागृहात बरीच चर्चा् झाली. त्यावर एवढी चर्चा करण्याची आवश्यकता नव्हती असे मला वाटते. या राज्यात कापसाचे बी.टी.चे बियाणे 90 टक्क्यांपर्यंत वापरले जात आहे ही वस्तुस्थिती आहे. अनेक चांगल्या कंपन्या बी.टी.चे बियाणे घेऊन बाजारात आलेल्या आहेत. आपणाकडे 30 लाख वा 32 लाख हेक्टर कापसाचे क्षेत्र वाढणार आहे असे म्हटले तरी 75 ते 80 लाख पिशव्या लागतील असा साधारणत: अंदाज आहे. आज कृषी विभागाकडे बी.टी.बियाण्याची एकंदर 155 लाख पिशव्यांची उपलब्धता आहे. एवढे बी.टी.चे बियाणे आज कृषी विभागाकडे तयार आहे.

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात.....

कदाचित त्यापेक्षा जास्त असतील. बीटी बियाणे मिळत नाही अशी परिस्थिती नाही. संपूर्ण महाराष्ट्रात 155 लाख म्हणजे 80 लाखाच्या तुलनेत 155 लाख बियाणे पाकिटे निरनिराळ्या कंपन्यांची असतील. परंतु जळगाव येथे घडले ते उदाहरण आहे. त्यामध्ये राशी-2 हे एक कारण आहे. साधारणत: खानदेशात सातपुडयाच्या पायथ्याला जो इरिगेटेड भाग आहे तेथील शेतकऱ्यांचा राशी-2 वापरण्याचा इरादा असतो. जळगावचे उदाहरण दिले तरी जळगावला एकूण जी मागणी आहे, व्यापाऱ्यांनी राशी-2 वाल्यांकडे मागणी नोंदविली ती 15 लाख पाकिटांची होती. व्यापाऱ्यांनी मात्र 2.69 लाख पाकिटे उपलब्ध करुन दिली. याचे वाटप कसे करायचे हा मुख्य प्रश्न होता. 60 ते 65 हजार शेतकऱ्यांनी मागणी नोंदविली असताना व्यापाऱ्यांनी मात्र 15 लाख पाकिटांची मागणी नोंदविली. शेतकऱ्यांची मात्र राशी-2 हे खत मिळावे अशी इच्छा होती. जिल्हाधिकारी यांची खतांच्या संदर्भात, बियाण्यांच्या संदर्भात नियंत्रण काळजीपूर्वक व्हावे म्हणून नेमणूक केली होती. त्यांनी शेतकऱ्यांना जास्तीत जास्त वितरण व्हावे म्हणून प्रयत्न केले. पारोळ्याचे उदाहरण दिले असले तरी नियंत्रण करण्याच्या संदर्भात प्रयत्न होत असताना पारोळा येथे एकूण 20 दुकाने ग्रामीण भागात व 17 दुकाने शहरी भागात होती. त्यांनी सर्व दुकानदारांना सांगितले की, 18 तारखेला पाकिटे द्यायची आहेत. सकाळपासून दुकानांसमोर शेतकऱ्यांनी रांगा लावल्या ही वस्तुस्थिती आहे. त्या ठिकाणी घडले असे की, ज्यांनी दुकाने वेळेवर उघडली तेथे सगळे व्यवस्थित झाले. काही दुकानदारांनी रिट पिटिशन औरंगाबाद येथील हायकोर्टात दाखल केले होते. त्यांनी वाटले, सकाळी 11 वाजता निकाल आला की, निकालाची प्रत दाखवू. त्या दुकानदारांनी दुकान उघडले नाही. त्यातून असंतोष निर्माण झाला आणि त्याचा उद्रेक झाला ही वस्तुस्थिती अमान्य करीत नाही. खते आहे तेथे त्याची उपलब्धता मोठया प्रमाणावर न झाल्यामुळे काही प्रश्न निर्माण होणार ही वस्तुस्थिती आहे. कदाचित राशी-2 नव्हे तर अनेक चांगली बियाणे बाजारात आहेत, परंतु कोणाची जाहिरात होत नाही अशी परिस्थिती आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : 7/12 चा आग्रह का धरला जातो?

श्री.बाळासाहेब थोरात : जो शेतकरी आला आहे त्याच्याकडे 7/12 हे प्रमाण म्हणून असावे यासाठी मागणी केली जात होती.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, विषय 7/12 चा आहे. 7/12 ची मागणी केली तेथे गोंधळ झाला. प्रत्येक 7/12 वर दोन बॅग असे रेशनिंग केले म्हणून असंतोष निर्माण झाला.

श्री.बाळासाहेब थोरात : ज्यांनी वेळेवर दुकान उघडले तेथे गोंधळ झाला नाही. त्यांनी 7/12 ची प्रत दाखविली, सही केली आणि बॅग घेतली. 18 तारखेला खरीपाची बैठक झाली. एकत्रित चर्चा केली. आम्ही तेथे होतो. पालकमंत्री होती. सन्माननीय सदस्य श्री.एकनाथराव खडसे होते. एकत्र बसले होतो. एकत्र बसून नियोजन त्यांनी केले. नंतर प्रश्न उद्‌भवला नाही ही वस्तुस्थिती आहे. एकाच बियाण्याची सर्व शेतकऱ्यांनी मागणी केली आणि मर्यादित साठा, त्यात व्यापाऱ्यांनी केलेला असहकार, त्यातून परिस्थिती निर्माण झाली हे या निमित्ताने सांगू इच्छितो. बियाण्याच्या संदर्भात अनेक प्रश्न उपस्थित केले गेले. बियाण्यांची उपलब्धता करुन देत असताना भाताचे बियाणे महत्वाचे असते. त्यामध्ये अडचण नाही. परंतु सोयाबीनचे बियाणे हा एक मोठा प्रश्न सातत्याने पुढे येत होता. 2007-08 मध्ये सोयाबीनचे उत्पादन चांगले झाले होते. बाजार चांगला राहिला आणि शेतकरी सोयाबीनकडे वळले. 2007-08 मध्ये 2400 रुपयेपर्यंत भाव गेला होता ही वस्तुस्थिती आहे. सुरुवातीला 1400 रुपये बाजारभाव मिळाल्यानंतर तो 2800 ते 3000 पर्यंत गेला.

5बी.1....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात .....

पण नंतर तसे लक्षात आले आणि यावेळेस सुध्दा सोयाबीनची मागणी जास्त राहणार त्यादृष्टीने महाबीजने 5 लाख, एनएससी कडे 1.45 लाख, खाजगी कंपन्यांकउे 1.51 लाख अशा प्रकारे 11 लाख बॅगांची व्यवस्था केली.....

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, महाबीजने सोयाबीनचे बियाणे कोठून आणले ? मध्य प्रदेशातून, मार्केटमधून की एपीएमसी मधून घेतले ?

श्री. बाळासाहेब थोरात : महोदय, ही शंका सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केली त्याचबरोबर दुसरी शंका सुध्दा व्यक्त केली. त्या अनुषंगाने मला सांगावयाचे आहे की, या कंपन्या जे बियाणे पुरविते त्याच्या बाबतीत आम्ही जास्तीत जास्त काळजी घेण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी आपण आयुक्तांना अधिकार दिले. त्याबाबत सुध्दा आरोप करण्यात आला ? खरे म्हणजे आयुक्तांच्या पातळीवर जास्त कडक धोरण घ्यावे म्हणून प्रयत्न केला ही वस्तुस्थिती लक्षात घ्यावी. परंतु दुर्दैवाने त्याची मांडणी चुकीची झाल्यासारखे मला वाटते. निरनिराळ्या कंपन्या बियाण्याचे काम करीत असताना त्या कंपन्यांनी कोणते व किती प्लॉट घेतले यासंबंधीची काळजी आम्ही घेतली. त्याप्रमाणे कंपनीने बियाण्याचे नियोजन कसे व कुठे केले यासंबंधीची शेतकऱ्यांसह माहिती मागितली होती. यापूर्वी आम्ही एवढी सविस्तर माहिती मागितली नव्हती परंतु आता आम्ही सांगितले की, आपले संपूर्ण नियोजन आम्हाला पाहिजे त्यानंतरच लायसेन्स देण्यात येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, मी आरोप ठरवून केला नाही तर वस्तुस्थिती अशी आहे की, आपल्या राज्यात परप्रांतातून जे बियाणे आणले होते त्या बियाण्याचे लॉटच टाकले गेले नाहीत. बियाण्याची जी कंपनी आहे ती केवळ कागदावरच असून त्या कंपनीने मात्र मार्केटमधील माल खरेदी केला आणि त्याच्या पिशव्या भरुन बियाणे महामंडळाला बियाणे म्हणून तो माल पुरविला यासंबंधीची चौकशी करणार काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : महोदय, ज्या बियाण्याच्या कंपन्यांना आम्ही ही माहिती मागविली होती त्यांनी ती दिल्याशिवाय लायसेन्स रिन्यू केले नाहीत. कायदे व नियम खूप आहेत पण त्यांची अंमलबजावणी करणे देखील महत्वाचे असते. त्यानुसार आम्ही या कंपन्यांकडून केवळ वदवूनच घेतले नाही तर स्टॅम्प पेपरवर सुध्दा लिहून घेतले आहे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मध्य प्रदेशातून बियाणे आणल्याबद्दलची चौकशी आपण करणार काय, असा स्पेसिफिक प्रश्न मी विचारला होता. जे बियाणे महामंडळाने उपलब्ध केले ते टेंडरने मागविले, त्याचे प्लॉट टाकले होते की, मार्केटमधून माल घेतला ? या सर्व गोष्टींचा खुलासा होणे आवश्यक आहे.

श्री.बाळासाहेब थोरात : कुणाच्याही मनात शंका राहू नये म्हणून माननीय विरोधी पक्षनेते म्हणतात त्याप्रमाणे चौकशी करण्यात कुठलीही अडचण नाही. तसेच आयुक्तांना अधिकार दिल्याबद्दल येथे शंका व्यक्त करण्यात आली.....

श्री. दिवाकर रावते : महोदय, आयुक्तांबद्दल शंका व्यक्त करण्याचाच विषय नाही पण ज्यावेळी आम्ही विचारले की, 5 कोटीची मागणी करण्यात आली म्हणून परवानगी दिली नाही अशा प्रकारची चर्चा संपूर्ण बाजारात होती.

श्री. बाळासाहेब थोरात : बियाण्याच्या बाबतीत अत्यंत कडक धोरण स्वीकारल्यानंतर कोण काय तक्रारी करतील याचा भरवसा नसतो.

श्री. पांडुरंग फुंडकर : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी 28 मे, 2009 पर्यंत नुतनीकरण केले नाही. जर आयुक्तांमार्फत कडक धोरण अवलंबिले तर मार्च महिन्यातच तपासणी करुन पुरविणे आवश्यक होते. त्यासाठी एवढा उशिर लागण्याचे कारण काय ? तसेच असोसिएशनचे पत्र सुध्दा माझ्याकडे आहे.

श्री. बाळासाहेब थोरात : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी अशा प्रकारचे कोणते उदाहरण असेल तर ते माझ्याकडे द्यावे, त्याची चौकशी करण्यात येईल.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात ....

सभापती महोदय, बीटीच्या बियाण्यांच्या संदर्भातील कायदा आपण पास करु शकलो नाही. मध्यंतरी लोकसभेच्या निवडणुका असल्यामुळे आचारसंहितेमुळे आपण यासंदर्भात काम करु शकलो नाही. परंतु आचारसंहिता संपल्या बरोबर कॅबिनेटची मिटिंग घेऊन अध्यादेश पारीत केला आणि बी.टी. चे नियमन करण्याचा अधिकार घेतला व त्यामुळेच बीटीचे कमी करण्यात आपण यशस्वी होऊ शकलो ही वस्तुस्थिती आहे. यामध्येही वेळ गेलेला आहे. तसेच सोयाबीन आणि इतर बियाण्यांच्या प्लॉटच्या संदर्भात सविस्तर माहिती दिल्याशिवाय लायसन्स दिले जाणार नाही याबाबत निर्णय घेतला. तसेच बियाण्यांची गुणवत्ता टिकवण्याचा आमचा प्रयत्न होता व त्यामुळे परवाने मिळण्यास उशीर झाला, यापेक्षा दुसरे वेगळे कारण नाही. सोयाबीनच्या बियाण्यांचे वाटप करण्याच्यासंदर्भात काही अडचण येईल असे मला तरी वाटत नाही. बियाण्यांचा जास्तीत जास्त पुरवठा करण्याचा प्रयत्न शासनाकडून झालेला आहे हे मी येथे सांगू इच्छितो. आपण आज जवळ जवळ सगळयाच बाबीवर चर्चा केलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी "राशी" सारखे बियाणे कृषी विद्यापीठात का तयार केले जात नाही असा प्रश्न उपस्थित केलेला आहे. यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, आपल्याकडील कृषी विद्यापीठे चांगली आहेत. आपल्या कृषी विद्यापीठात चांगल्या प्रकारचे संशोधन होत आहे. कृषी विद्यापीठाने संशोधन केलेले अनेक बियाणे आज शेतकरी वापरीत आहेत ही वस्तुस्थिती आहे. परंतु चांगल्या प्रकारचे बियाणे हाताला लागणे ही फार मोठी गोष्ट असते. एवढया प्रकारचे चांगले बियाणे असतांना एकाच बियाण्यांकडे शेतक-यांची मर्जी जाणे ही अवघड बाब आहे. तसेच शेतकरी एका बियाण्याच्या मागे लागले म्हणजे दुसरे बियाणे कितीही चांगले असले तरी ते त्याचा वापर करीत नाही. आपल्याला माहिती आहे की, एकदा शेतक-याने कांदा लावावयास सुरुवात केली की, सगळे शेतकरी कांदेच लावावयास सुरुवात करतात तसा प्रकार बियाण्यांच्या संदर्भात सुध्दा होतो. त्यामुळे आपली कृषी विद्यापीठे चांगल्या प्रकारचे काम करीत आहेत हे मी येथे सांगू इच्दितो. सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी ठिबकचा चांगला मुद्दा उपस्थित केलेला आहे. ठीबकच्या संदर्भात शेतक-याला जास्तीत जास्त सबसीडी कशी मिळेल याचा प्रयत्न करण्यात येईल. व आपण ठीबकच्या संदर्भात जी सूचना केलेली आहे त्याप्रमाणे निश्चित दुरुस्ती करण्यात येईल. फर्टीलायझरच्या संदर्भात आपण ब-याच केसेस केलेल्या आहेत.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात ....

मागच्या वर्षी खताच्यासंदर्भात 24,298 विक्रेत्यांच्या तपासण्या करण्यात आल्या होत्या त्यापैकी 17,840 एवढा साठा जप्त केलापरवाने रद्द करण्यात आले होते, 195 लोकांचे परवाने निलंबित करण्यात आले होते, 36 परवाने रद्द करण्यात आले, 36 पोलीस केसस करण्यात आले होते व 673 व्यक्तींविरुद्ध कोर्टात केसेस करण्यात आले होत्या . यावर्षी दोन महिन्यापूर्वी 1840 विक्रेत्यांच्या तपासण्या करण्यात आल्या, 3420 टन साठा जप्त करण्यात आला असून 20 परवाने रद्द करण्यात आले व 20 परवाने निलंबित करण्यात आले, 4 पोलीस केसेस करण्यात आल्या, 9 कोर्ट केसेस दाखल करण्यात आल्या आहेत. गुणवत्तेच्या बाबतीत अडचण होऊ नये ही वस्तुस्थिती आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी उत्पादन खर्चाच्या संदर्भात महत्वाचा प्रश्न या ठिकाणी उपस्थित केलेला आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय बाळासाहेब थोरात हे गेल्या 5 वर्षापासून कृषी मंत्री आहेत. आपल्या कृषीची कशी वाट लागली हे मी येथे काही सांगत नाही परंतु यामध्ये आपली चूक नसून ती चूक केंद्राच्या धोरणाची आहे. त्यामुळे खताच्या आणि बियाण्यांच्या संदर्भात आतापर्यंत किती तपासण्या झाल्या, किती गुन्हे दाखल झाले व किती गुन्हेगारांना शिक्षा झाली याची माहिती माननीय मंत्रीमहोदयानी द्यावी अशी विनंती आहे. आपण गुन्हे दाखल करतात परंतु पुढे काहीच कार्यवाही होत नाही हा आमचा मुख्य आक्षेप आहे.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जी माहिती विचारलेली आहे ती माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. कारवाई करण्याचा प्रश्न हा कोर्टावर अवलंबून असतो, आमच्या विभागाकडून सर्व रेकॉर्ड कोर्टाला पुरवण्यात आल होते. या ठिकाणी सन्माननी सदस्यांनी उत्पादन खर्चानुसार शेतक-यांच्या मालाला किंमत मिळाली पाहिजे असा मुद्दा उपस्थित केलेला आहे. उत्पादन खर्चानुसार शेतमालाला भाव मिळावा यासाठी मी गेल्या पाच वर्षापासून बरेच प्रयत्न केलेले आहेत. परंतु यासाठी उत्पादन खर्च कमी करावा हा सगळयात महत्वाचा भाग आहे. उत्पादन खर्च कमी करु शकलो नाही तर शेती परवडणार नाही. उत्पादन खर्चानुसार भाव मिळावा यासाठी आपण केंद्रशासनाकडे आग्रह सुध्दा धरलेला आहे. मागील वर्षी आपण कपाशीला 3000 रुपये क्विंटल भाव दिला होता, गव्हाच्या किमतीच्या दरात सुध्दा वाढ केली होती तसेच सोयाबीनच्या आधारभूत किमती सुध्दा वाढविल्या आहेत.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात.....

आपण जर उत्पादकता वाढवली तर शेती परवडणारी होऊ शकेल ही वस्तुस्थिती आहे त्यामुळे खर्च कमी करुन उत्पादकता वाढविण्याचा शासनाने प्रयत्न केलेला आहे. शेतक-याची शेती ही परवडणारी कशी होऊ शकते आणि त्याकरता नेमके काय केले पाहिजे हा महत्वाचा मुद्दा आहे. त्याकरता आधारभूत किंमत हा एक भाग आहे. शेतकरी परवडणारी शेती कशी करु शकेल या संदर्भात राज्य सरकार एक समिती गठीत करीत आहे. आज मी कृषी मंत्री आहे परंतु जे कोणी कृषी मंत्री असतील ते या समितीचे अध्यक्ष राहणार आहेत. परवडणा-या शेतीच्या संदर्भात लवकरच अशा प्रकारची समिती गठीत करण्यात येणार असून त्यामध्ये सन्माननीय सदस्यांच्या सूचनांचा निश्चितपणे उपयोग करुन घेण्यात येणार आहे एवढेच या निमित्ताने सांगून मी माझे भाषण संपवितो.

श्री.सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय, गावामध्ये भरपूर माणसे आहेत परंतु ती माणसे शेतीच्या कामावर येत नाहीत. तेव्हा अशी परिस्थिती का निर्माण होते याचा देखील विचार केला पाहिजे. उत्पादन खर्चाशी संबंधित या बाबी आहेत. गावात माणसे असतांना ती शेतावर काम करण्याकरिता का येत नाहीत, गावातील माणसे संपली आहेत काय ?. गावात भरपूर माणसे आहेत ती पानपट्टीजवळ बसतात परंतु शेतात कामासाठी येत नाहीत. तेव्हा त्याची कारणे कोणती आहेत हे शोधून त्यावर उपाय केले पाहिजेत. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी मघाशी बैलाच्या किंमतीचा विषय मांडला होता . आज बैलाची किंमत 60 ते 70 हजार रुपये एवढी आहे. त्यामुळे बैल ठेवणे शेतक-याला परवडत नसल्यामुळे बैलाची संख्या कमी होत आहे. शेती मालाचा उत्पादन खर्च काढत असतांना जर ज्वारीचा उत्पादन खर्च काढावयाचा असेल तर त्यामध्ये वर्षभर बैलाच्या चा-याचा खर्च करुनसुध्दा बैलाची मजुरी फक्त 13 दिवस धरुन जर ज्वारीचा भाव काढला जात असेल तर बैल ठेवणे शेतक-याला परवडणार नाही. परवडणारी शेती कशी असावी , किंवा शेतीवरील खर्च कसा कमी होईल या गोष्टी वेगळया आहेत. सभापती महोदय, कृषी महाविद्यालयाने काढलेले पिकांचे भाव, चार कृषी विद्यापीठाने मिळून ठरविलेले भाव विचारात घेऊन केन्द्र सरकारकडे शिफारस केली जाते त्यामध्ये आणि केन्द्र सरकारने जाहीर केलेले भाव

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल...

यामध्ये गोंधळ होत आहे. या कडे शासनाने अत्यंत बारकाईने पाहण्याची गरज आहे तेव्हा शासन या गोष्टीकडे बारकाईने पाहणार आहे काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अत्यंत महत्वाचा प्रश्न उपस्थित केलेला आहे.आधारभूत किंमत काढण्याचे काम राज्य सरकारकडून केले जाते परंतु आधारभूत किमत जाहीर करण्याचा अधिकार केन्द्र सरकारचा आहे. ज्यावेळी राज्य शासन हया किंमती ठरविण्यास बसते त्यावेळी राज्य शासनाच्या ज्या सूचना असतात त्या सुध्दा केन्द्र सरकारला कळविण्यात येत असतात. बैलाला 365 दिवस चारा धालावा लागतो परंतु त्याचे काम फक्त 13 दिवस धरले जाते. असा मुद्दा सन्माननीय सदस्यांनी मांडला आहे.याबाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की ,हे सर्व निकष केन्द्र सरकारने ठरवून दिलेले आहेत. त्यांचे असे म्हणणे आहे की, या बैलांकडून इतरही कामे करुन घेतली जात असतात . या व्यतिरिक्त राज्य शासनाचेसुध्दा काही मुद्दे आहेत ते एकत्रितपणे केन्द्र सरकारला या पूर्वी कळविलेले आहेत. आपल्याकडील शेतीचा भाग हा पावसावर आधारित असून तो हलक्या मातीचा आहे .येथे उत्पादकता कमी असल्यामुळे या राज्याकरिता वेगळा झोन असावा व वेगळी आधारभूत किंमत असावी असे केन्द्र सरकारला कळविलेले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीपराव देशमुख (पुनर्वसन व मदत कार्य मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री पांडुरंग फुंडकर यांनी नियम 260 अन्वये प्रस्ताव मांडला असून सन्माननीय सदस्य सर्वश्री. दिवाकर रावते,पाशा पटेल, सुरेश जेथलिया, केशवराव मानकर,भगवान साळुंखे यांनी शेतक-याच्या संदर्भात अत्यंत महत्वाच्या विषयावर चर्चा घडवून आणली आहे. शेतक-यांना लागणारे बी बियाणे आणि खताच्या तुटवडयाबद्दल , त्याच्या विक्रीबद्दल तसेच त्यामध्ये कोणत्या प्रकारची दुरुस्ती करणे आवश्यक आहे यासबंधी त्यांनी अत्यंत मौलिक सूचना शासनाला केलेल्या आहेत त्याचबरोबर वादळी पावसामुळे आणि गारपीटीमुळे शेती पिकाचे आणि फळबागाचे नुकसान झाले आहे, काही जणांचा अपघाती मृत्यू झालेला आहे,जनावरांचे,शेळया मेंढयाचे मृत्यू झालेले आहेत त्याबाबतीत त्यांना कशा प्रकारे शासनाने मदत करावी यासबंधी चांगली चर्चा घडवून आणली आहे. विरोधी पक्षाकडून चांगल्या प्रकारच्याा सूचना केल्या जाव्यात असे शासनाचे नेहमी म्हणणे असते. सत्ताधारी पक्ष नेहमीच चागले काम करण्याचा प्रयत्न करीत असतो, माहिती गोळा करण्याचा प्रयत्न करीत असतो, प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करीत असतो परंतु शासन सगळया ठिकाणी पोहोचू शकत नाही किंवा शासनाकडे खरी माहिती येऊ शकत नाही. अशा वेळी विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य विरोधी पक्षाची भूमिका निभावत असतात. .....

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप देशमुख .....

त्यांचा संपर्क दांडगा असतो आणि ज्या गोष्टी आमच्यापर्यंत येत नाहीत वा येऊ शकत नाहीत त्या त्यांच्यापर्यंत येत असतात आणि या सभागृहाच्या माध्यमातून त्यांना वाचा फुटते आणि त्यावर चर्चा होते. त्यातून शासनाला काम करण्यास मदत होत असते. म्हणूनच त्यांच्या सूचना गांभीर्याने घेऊन प्रश्न सोडविण्याचे काम शासन करीत असते. त्या दृष्टिकोनातून माननीय कृषी मंत्र्यांनी या बाबतीत सगळ्या गोंष्टींची नोंद घेऊन आपली बाजू मांडण्याचा येथे प्रयत्न केलेला आहे. सभापती महोदय, मी या निमित्ताने आमच्या विरोधी मित्रांचे अभिनंदन करीन. जशा त्यांनी चांगल्या सूचना येथे केल्या आहेत तसेच आमच्या कृषी मंत्र्यांनी देखील शासनाची बाजू मांडण्याचे आणि शासन कारभारात, यंत्रणेत ज्या काही त्रुटी असतील त्या सुधारण्याचे मान्य केलेले आहे. सभापती महोदय, माझ्याकडे मदत व पुनर्वसन विभाग असल्याने साधारणत: आपल्या सगळ्या आशिया खंडामध्ये आणि त्यातल्या त्यात भारतामध्ये नैऋत्य मान्सूनपूर्व अशा प्रकारचे वादळी वारे येत असतात. निसर्गाची ही एक सायकल आहे. अशा प्रकारे नैऋत्य मान्सूनपूर्व वाऱ्यांना वेग आल्याशिवाय त्याच्या पाठीमागे पाऊस येत नाही. म्हणूनच साधारणत: मार्च, एप्रिल, मे आणि जूनच्या पहिल्या आठवड्यात निसर्गामध्ये अशा प्रकारचे बदल होत असतात. त्याचा परिणाम पाऊस येण्याच्या दृष्टीने चांगला असला तरी काही शेतकऱ्यांच्या बाबतीत मात्र ते दुर्दैवाचे ठरत असते. त्यामुळे ज्यांच्या बागा, फळबागा आहेत अशाचे मोठे नुकसान होते. अशाच वेळी आपल्या राज्यातील जनतेला, शेतकऱ्यांना मदत करणे हे शासनाचे कर्तव्य ठरते. अशा वादळी वाऱ्यामध्ये दुर्दैवाने जे लोक सापडतात, त्यांचे नुकसान होते त्यांना मदत करण्याचे काम आपण करीत असतो.

सभापती महोदय, आपल्या राज्यात साधारणत: 9 ते 15 मार्चच्या दरम्यान अनेक विभागात अवेळी पाऊस, वादळी पाऊस झाला. या बाबतीतील सगळी माहिती माझ्याकडे येथे आहे. पण ती वेळेअभावी येथे देता येत नसली तरी ती मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो. त्यामध्ये कोठे कोठे कशा प्रकारचे नुकसान झालेले आहे त्याची सर्व आकडेवारी आहे. परंतु त्याचा गोषवारा थोडक्यात सांगता येईल की, साधारणत: 9 ते 15 मार्च च्या दरम्यान या वादळी वाऱ्यापासून राज्यातील 12 जिल्हे बाधित झाले. त्यातील 23 तालुक्यांमध्ये त्याचा अधिक परिणाम झाल्याचे दिसून आले. त्या कालखंडात एकूण मृतांची संख्या 5 आहे तर 5 जखमी झाले आहेत. या शिवाय 10 बकऱ्या, एक बोकड, 6 बैल, 1 म्हैस, 3 गाई, 3 मेंढ्या अशी एकूण 51 जनावरे त्यात दगावली आहेत. तसेच

..... 4इ 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप देशमुख ....

प्राथमिक शाळा, घरे, गोठे अशा मालमत्तांचे जे नुकसान झाले आहे त्यात 201 वास्तू असून त्यांच्या नुकसानीचा अंदाज 9 कोटी 72 लाखाचा आहे. तसेच एकंदर शेतीसहित केळीचे झालेले नुकसान 15 कोटी 64 लाखाचे त्या कालखंडात झाले आहे. त्यानंतर सभापती महोदय, 13 व 14 मे या दोन दिवसामध्ये वादळी पाऊस होऊन जी गारपीट झाली त्यात अमरावती विभागातील अमरावती तालुका तसेच अकोला जिल्ह्याला फटका बसला आहे. त्यातील अकोला जिल्ह्यात 11 बाधित गावांतील 12 व्यक्ती जखमी झाल्या असून 292 घरे अंशत: पडली असून 54 घरे पूर्णपणे पडली आहेत. मृत जनावरे मोठी 1 आणि पिकनिहाय पद्धतीने पाहिले तर 12 हेक्टर पपई, 8 हेक्टर केळी, 12 हेक्टर कांदा, संत्री-लिंबू 6 हेक्टर असे एकंदर अकोला जिल्ह्यापुरते म्हटले तर एकंदर 38 हेक्टरचे नुकसान झालेले आहे. सभापती महोदय, अकोट तालुक्यात शेतीचे नुकसानीत एकंदरीत संत्रा-लिंबू पिकांचे 315 हेक्टर, केळीचे 554 हेक्टर, आणि इतर पिकांचे 4 हेक्टर असे एकंदर 864 हेक्टरचे नुकसान झालेले आहे. एल्हार तालुक्यात 183 हेक्टर शेतीचे नुकसान झाले आहे. बाळापूर तालुक्यात 192 हेक्टरचे नुकसान झालेले आहे. यवतमाळमध्ये शेतीचे फारसे नुकसान नाही. परंतु एक टीन पत्र्याची शेड पडल्याचे नुकसान आहे, तसेच एक गाय, एक बकरी दगावली आहे. त्यानंतर बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव-जामोद येथे 70 हेक्टर केळीचे नुकसान झालेले आहे. ....

(यानंतर श्री. सरफरे .....4एफ 1 ..

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. दिलीपराव देशमुख...

संग्रामपूर तालुक्यामध्ये 242 हेक्टरमधील केळी पिकाचे नुकसान झाले. वादळी वाऱ्यांमुळे 40 घरांवरील टीन पत्रे उडून गेले. वाशिम येथे एका गोठयाची भिंत कोसळून त्यामध्ये दोन म्हशी मरण पावल्यामुळे 30 हजाराचे नुकसान झाले. तसेच, अतिक्रमित घरांवरील पत्रे उडून गेल्यामुळे नुकसान झाले. आंब्याच्या झांडांचे देखील नुकसान झाले आहे. औरंगाबाद, बीड व लातूर जिल्हयामध्ये मोठया प्रमाणावर नुकसान झाले आहे. लातूर जिल्हयात वीज पडून एका बैलाचा मृत्यू झाला आहे. परळी येथे वीज पडून एका व्यक्तीचा मृत्यू झाला. उस्मानाबाद जिल्हयाच्या परांडा तालुक्यात 2 व्यक्ती मरण पावल्या आहेत. वाशिम तालुक्यामध्ये वीज पडून एक व्यक्ती मरण पावली आहे,व 4 व्यक्ती जखमी झाल्या आहेत. अशाप्रकारे या कालखंडामध्ये महाराष्ट्राच्या विविध भागामध्ये नुकसान झाले आहे.

सभापती महोदय, 22 मे रोजी तासगाव तालुक्यातील मांजर्डे, बेलगवडे, बसतवडे,गोरगाव, आरवले या पाच गावांमध्ये 153.3 हेक्टरमधील शेती पिकाचे 50 टक्क्यावर नुकसान झाले आहे. त्यामध्ये 439 शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. त्या नुकसानीच्या पंचनाम्याचे काम आता सुरु आहे. घरे पडल्यामुळे 396 कुटुंबे बाधित झालेली आहेत. अंशत: घरे व गोठे पडल्यामुळे 331 कुटुंबे बाधित झाली आहेत. यामध्ये 11 लाख 62 हजाराचे नुकसान झाले आहे. याठिकाणी शासनाच्या प्रचलित नियमानुसार 7 लाख 94 हजाराची मदत देण्यात आली आहे. नुकसान झालेल्या गोठयांची संख्या 65 असून त्यामध्ये 8 लाख 45 हजाराचे नुकसान झाले आहे. त्याठिकाणी शासनाच्या प्रचलित नियमानुसार 3 लाख 12 हजाराची मदत करण्यात आली आहे. अशाप्रकारे या प्रकरणामध्ये मदत करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे निराधार व निराश्रित कुटुंबांना सुध्दा सानुग्रह मदत देण्यात आली आहे. सभापती महोदय, ही मदत अतिशय तुटपुंजी आहे ही बाब शासनाच्या लक्षात आलेली आहे. दिनांक 15.9.2008 च्या शासन निर्णयानुसार अवेळी पाऊस व गारपिटीमुळे 2 हेक्टरपर्यंत नुकसान झालेल्यांना मदत देतो. त्यामध्ये कोरडवाहू शेतीसाठी प्रति हेक्टरी 2 हजार रुपये मदत करतो. ज्या ठिकाणी कायम स्वरुपी आश्वासित सिंचन आहे त्या ठिकाणी 4 हजार रुपये प्रति हेक्टरी मदत करतो. तसेच, बहुवार्षिक पिके, फळझाडे याकरिता 6 हजाराची मदत करतो. मदत करण्याबाबत मागील काळात वेगळे नियम होते. नोव्हेंबर 2006 च्या शासन निर्णयानुसार खास बाब म्हणून 10 हजार रुपये इतकी मदत करण्याचा निर्णय घेतला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ KGS/

श्री. दिलीपराव देशमुख...

होता. परंतु त्यानंतर ही रक्कम कमी करण्यात आली. त्यामुळे ही रक्कम तुटपुंजी असल्याबद्दल माननीय मुख्यमंत्र्यांसमोर भूमिका मांडण्यात आली. या मदतीमध्ये राज्य सरकार व केंद्र सरकारचा सहभाग आहे. त्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांनी मदत व पुनर्वसन विभाग, कृषी, सहकार या खात्याच्या मंत्र्यांची उपसमिती नेमण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे मदत द्यावयाच्या रकमेमध्ये आपल्याला किती वाढ करता येईल, आणि योग्य प्रकारची मदत कशी करता येईल याबाबत लवकरच निर्णय घेण्यात येईल. माननीय विरोधी पक्षनेते श्री. भाऊसाहेब फुंडकर यांनी पंचनामे लवकर होत नाहीत असे सांगितले. सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की पंचनामे हे लवकर झाले पाहिजेत. शासन निर्णयानुसार हे पंचनामे आठ दिवसात व्हावयास पाहिजेत. शेतकऱ्याची आत्महत्त्या असेल किंवा अपघाती मृत्यू असेल अशा प्रकरणात दुर्दैवी व्यक्तीच्या कुटुंबियांना 15 दिवसाच्या आत 1 लाख रुपयांची मदत देतो.तसेच, जखमींना 50 हजारांची मदत देतो. तेव्हा या कारवाईमध्ये गती आली पाहिजे. हे खाते माझ्याकडे आले असल्यामुळे मी जिल्हाधिकाऱ्यांना रोज तात्काळ मदत दिली पाहिजे असे सांगतो. मांजर्डे गावच्या शेतकऱ्याच्या आत्महत्त्येच्या प्रकरणी कालच बैठक झाली. त्याच्या कुटुंबियांना उद्या मदतीचा चेक पोहोचेल. सकाळी प्रश्नोत्तराच्या तासामध्ये एका शेतकऱ्याला मदत नाकारल्याबाबत विचारण्यात आले होते. त्यामध्ये त्या शेतकऱ्याने शेतीसाठी नसून वीट भट्टीसाठी कर्ज घेतले होते. म्हणून माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळी त्या प्रकरणाची फेरतपासणी करु असे आश्वासन दिले होते. या सरकारची मदत करण्याची भावना असल्यामुळे कदाचित पंचनाम्यामध्ये काही गोष्टी समोर आल्या नसल्यातरी जिल्हाधिकाऱ्यांना त्याबाबत सूचना देऊन फेरतपासणी करण्यास सांगितले आहे. त्यामुळे ज्यांच्यावर खरोखर अन्याय झालेला आहे, त्यांना ताबडतोब आर्थिक मदत मिळाली पाहिजे अशी शासनाची भूमिका आहे.

(यानंतर सो. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ताबडतोब मदत मिळाली पाहिजे आणि आज आम्ही जी मदत देत आहोत, त्याबाबत शासनाला, आम्हालाच समाधान नाही.त्यामुळे मदतीची रक्कम देखील वाढविली पाहिजे अशा प्रकारचा यातून प्रयत्न होणार आहे. मला हेच सांगावयाचे आहे की, ही मदत आहे, ही भरपाई नव्हे. मात्र भरपाई देणे सुध्दा गरजेचे आहे आणि ती द्यावयाची असेल तर आम्हाला कृषीविषयक धोरणाची व्याप्ती वाढवावी लागणार आहे.आज पीक कर्ज देतो, त्याबद्दल पीक विमा करीत आहोत.तो किती करावयाचा, काय करावयाचा, त्यासाठी प्रिमिअम कोणी भरावयाचा याबद्दल सातत्याने चर्चा होत असते. पण द्राक्षाचे पीक गेल्यावर इन्शुरन्स् मिळाला पाहिजे,ऊसाच्या पिकाला मिळाला पाहिजे तर यासाठी आम्हाला याची व्याप्ती वाढवावयाची आहे. या शेतकऱ्यांनी लाखो रुपये खर्च करुन जो मांडव घातलेला आहे. परंतु वादळी वाऱ्यामुळे, गारपिटीमुळे केवळ द्राक्षाच्या पिकाचे नुकसान झालेले नाही तर त्याच्या बागाच उन्मळून पडलेल्या आहेत. आपली आर्थिक परिस्थिती सुधारावी म्हणून अनेक शेतकरी प्रयत्न करीत असतात. काही शेतकऱ्यांकडे अत्यंत कमी म्हणजे दोन-अडीच एकर जमीन आहे. एका द्राक्ष बागायतदार शेतकऱ्याकडे फक्त 53-आर म्हणजे 1 एकर 13 गुंठे जमीन असलेल्या शेतकऱ्याने सुध्दा तेथे द्राक्ष लावून आपले उत्पादन वाढले पाहिजे यासाठी प्रयत्न केला. म्हणून यासाठी एवढया लहान शेतकऱ्याने बँकेकडून मोठया प्रमाणात कर्ज घेतल्यानंतर आम्ही फक्त पिकाचे जे नुकसान झालेले आहे त्याबाबत किंवा फळ-बागायत पिकांचे नुकसान झाले तर त्यासंबंधातील जे शासकीय दर आहेत, तेवढेच त्याला देऊन त्याच्या समोरील प्रश्न सुटतील असे नाही. अशा वेळी शासनाला सुध्दा आणि आम्ही देखील शेतकऱ्याची मुले आहोत, त्यामुळे आम्हाला सुध्दा असे वाटते की, या धोरणामध्ये अमुलाग्र अशा प्रकारचा बदल झाला पाहिजे आणि शासन तसे करण्याच्या दृष्टीकोनातून निश्चितपणे पावले उचलणार आहे. माझ्या विभागाच्या माध्यमातून या शेतकऱ्यांना ताबडतोब मदत देण्याचे काम होईल अशा प्रकारे आपल्या सर्वांना आश्वासन देऊन, आश्वासित करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

. . . .4 जी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी योग्य शब्द वापरला आहे की, ही मदत आहे, नुकसान भरपाई नाही. आता आपण यासंबंधात मंत्रिमंडळाची एक उप समिती नेमणार आहात ही चांगली गोष्ट आहे. माझी स्पेसिफिक अशी सूचना आहे. आपण नुकसान भरपाई देत नाही आणि ती परिस्थितीही नसते. तर त्या शेतकऱ्याने जिवंत रहावे यासाठी, निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे तात्पुरती मदत देत असतो. तुमच्या विभागाकडे आत्महत्येचा विषय आहे की नाही हे मला माहिती नाही. कारण मला असे वाटते की, तो महसूल विभागाचा विषय आहे. कारण आपण या सदनामध्ये असे सांगितले होते आणि आज मी देखील ठामपणे सांगत आहे की, शेतकऱ्यांनी कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या झालेल्या असतानाही पंचनामा करीत असताना, त्याच्या घरातील लोकांना असे विचारण्यात आले की, "ही व्यक्ती दारु पित होती काय ?" आपल्याला ग्रामीण भागातील माहिती आहे. मग त्या शेतकऱ्याची पत्नी पटकन उत्तर देते की,"होय", ते कधी घेत होते. मग हा शेतकरी दारु पित होता असे पंचनाम्यामध्ये लिहीले जाते आणि शेतकऱ्याच्या कुटुंबियांना मिळणारी मदत नाकारली जाते. अशा घटनांच्या बाबतीत पुनर्विचार करु, पुन्हा छाननी करु असे सांगण्यात आले होते. यासंबंधातील विषय अधिवेशनापूर्वी होणाऱ्या चहा-पानाच्या कार्यक्रमाच्या वेळी काढला होता. त्याचे काय झाले ? मला याचे उत्तर आजपर्यंत मिळालेले नाही. माझी एक सूचना आहे की, ज्या शेतकऱ्याचे नैसर्गिक आपत्तीमध्ये नुकसान झाले असेल तर त्याच्या कर्ज वसुलीस ताबडतोब स्थगिती द्यावयाची आणि त्यावेळे पासून त्या कर्जावरील व्याज आकारणी ही किमान एक वर्षाकरता, नवीन पीक येईपर्यंत होऊ नये. मग हे व्याज कोणी भरावयाचे ? कसे भरावयाचे ? याबाबत माननीय मंत्री महोदयांकडे चर्चा होईल. पण त्या शेतकऱ्याला जर ताबडतोब रिलीफ मिळत असेल तर त्याच्या कर्ज वसुलीला स्थगिती मिळाली पाहिजे, त्याला नवीन कर्ज मिळाले पाहिजे आणि जुन्या कर्जावरील व्याज एक वर्षाकरता किंवा दोन वर्षाकरता किंवा जे काही असेल ते, पूर्णपणे शुन्य असले पाहिजे. अशा प्रकारे आपण ठोस मदत दिली पाहिजे. आपण शेतकऱ्याला तात्पुरती मदत देतो, परंतु त्याचे जे नुकसान झालेले आहे, त्यातून तो उभा रहाण्यासाठी त्याला कुठेतरी मदत केली तर त्याला आधार मिळेल अशी माझी माननीय मंत्री महोदयांना एक सूचना आहे.

श्री.दिलीपराव देशमुख : सभापती महोदय, जेव्हा नवीन समितीमध्ये या गोष्टींची चर्चा होईल, तेव्हा सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेबांनी ज्या सूचना केलेल्या आहेत, त्याचा जरुर विचार केला जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी याठिकाणी नवीन समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतलेला आहे.माझी आपल्याला अशी विनंती आहे की, राज्यातील शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे आणि त्याचे पंचनामे झालेले नाहीत. खरे म्हणजे हे पंचनामे लवकर केले पाहिजेत. कारण जोपर्यंत पंचनामे होत नाहीत तोपर्यंत शेतामध्ये पडलेली झाडे उचलली जात नाहीत, त्यामुळे पंचनामे लवकर करुन तसेच या उप समितीची बैठक लवकर घेऊन किमान एक महिन्याच्या आत मदत दिली जाईल काय ? अन्यथा जर उप समितीची बैठक झाली नाही आणि जर ही मदत मिळण्यास दोन-चार महिन्याचा वेळ लागला तर त्याचा काही उपयोग होणार नाही.

यानंतर कु.थोरात . .. .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर.....

काही ठिकाणी मार्च महिन्यात नुकसान झालेले आहे तर काही ठिकाणी पंधरा दिवसापूर्वी नुकसान झालेले आहे. तेव्हा त्या शेतकऱ्यांना ताबडतोबीने किमान एक महिन्याच्या आत मदत देण्यात येईल काय?

तालिका सभापती (श्री. सुरेश जेथलिया) : मला या ठिकाणी माननीय मंत्रिमहोदयांना एक सूचना करावयाची आहे. शेतकरी कडब्याचे वर्षभराचे नियोजन करुन ठेवतो. एप्रिल व मे महिन्याच्या दरम्यान वादळ-वाऱ्यामध्ये शेतकऱ्यांच्या कडब्याच्या गंज्या जळून जातात असा थोडया वेळापूर्वी याठिकाणी उल्लेख करण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांची घरेसुध्दा जळतात. याबाबतीतील मदतीच्या संदर्भात तहसीलदारकडे विचारणा केल्यावर "याबातीत कुठल्याही प्रकारचे नियोजन करण्यात आलेले नसल्यामुळे शेतकऱ्यांना रु 500 ते रु.1000 पेक्षा जास्त मदत देता येत नाही", असे सांगण्यात येते. शेतकऱ्यांनी वर्षभर लागणाऱ्या कडब्याचे नियोजन केलेले असते. अशा वेळी त्यांना जास्तीत जास्त 500 रुपये मदत देण्यात येते. तसेच शेतकऱ्यांची घरे जळाल्यानंतरही त्यांना कुठल्याच प्रकारची मदत देण्यात येत नाही. तेव्हा याबाबतीत देखील शेतकऱ्यांना मदत देण्याच्या संदर्भात शासनाने विचार करावा.

श्री. दिलीपराव देशमुख : सभापती महोदय, या प्रश्नाचे दोन भाग आहेत. सध्या जी मदत दिली पाहिजे ती प्रचतिल धोरणा प्रमाणे ताबडतोबीने मदत दिली पाहिजे. यासाठी मंत्रिमंडळाच्या उप समितीच्या निर्णयाची वाट पहाण्याची गरज नाही. मंत्रिमंडळाची उप समिती नवीन धोरण तयार करीत असताना दरासंबंधी फेर विचार करण्याच्या बाबतीत आहे. सभापती महोदयांनी आणि सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितल्याप्रमाणे शेतकऱ्यांन शेतीच्या संदर्भात मदत देत असताना पूर्वी काही बाबी राहून गेलेल्या आहेत. ग्रामीा भागात कडब्याच्या गंजीला आग लागण्याचे किंवा गोठे जळण्याचे प्रकार मोठया प्रमाणात होतात. तेव्हा याबाबीचा समावेश यामध्ये कसा करावयाचा याबाबतचा विचार करताना जरुर आपल्या सूचनाचा विचार करण्यात येईल. शासनाला सुध्दा असे वाटते की, सध्याचे दर तुटपुंजे आहेत त्याची व्याप्ती कशी वाढेल याबद्दलचा विचार करण्यासाठी एक उप समिती आहे. याठिकाणी जी मागणी करण्यात आलेली आहे त्यासंदर्भात माननीय कृषी मंत्र्यांनी उत्तर दिलेले आहे. कृषी विभागाच्या आणि महसूल विभागाच्या माध्यमातून ताबडतोबीने

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीपराव देशमुख...

पंचनामे करुन ती मदत लवकरात लवकर मिळेल या दृष्टीकोनातून शासन प्रयत्न करील.

श्री. पांडुरुग फुंडकर : सभापती महोदय, एका महिन्याच्या आत मदत देण्यात येईल अशा प्रकारचे आश्वासन या ठिकाणी देण्यात यावे.

श्री. दिलीपराव देशमुख : आत्महत्या आणि अपघाती मृत्यूच्या संदर्भात पंधरा दिवसात बैठक होऊन संबंधितांच्या कुटुंबियांना मदत द्यावयास पाहिजे, अशा प्रकारचा कायदा आहे आणि त्याची अंमलबजावणी होत आहे. पण मोठा शिवार असतो तेव्हा त्याचे पंचनामे करण्यासठी त्या टीमला प्रत्येक शेतावर फिजिकली जावे लागते,अशा वेळी थोडासा विलंब होतो, ही गोष्ट मी मान्य करतो. त्यासंदर्भातील मदत लवकरात लवकर मिळण्याच्या बाबतीत मी एका महिन्याच्या आत मिळेल असे या ठिकाणी आश्वासन दिले आणि 31 ते 32 दिवस झाल्यानंतर लगेच माननीय मंत्रिमहोदयांनी दिलेले आश्वासन पाळले गेले नाही असा मुद्दा उपस्थित केला जातो. एका महिन्यात मदत मिळाली पाहिजे अशी सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांची मागणी आहे. ही मदत लवकर मिळाली पाहिजे अशी त्यांची भावना आहे. म्हणून एक महिन्याच्या जवळपास लवकर होईल, थोडेसे मागे-पुढे होईल अशा पध्दतीने पण त्याचे दोन महिने होणार नाहीत, अशा दृष्टीकोनातून प्रयत्न करण्यात येतील. जे पात्र आहेत त्यांना एका महिन्याच्या जवळपास पण दोन महिन्यापेक्षा अधिक नाही, या कालावधीत शेतीच्या बाबतीतील मदत दिली जाईल पण आत्महत्येच्या संदर्भात पंधरा दिवसाचा नियम आह. त्याप्रमाणे त्या ठिकाणी ताबडतोब मदत मिळाली पाहिजे. पण एखाद्या घटनेच्या संबंधात काही शंका मांडण्यात आल्या असतील तर त्याबाबतीत फेर तपासणी करुन फेर विचार करण्याची शासनाची भूमिका आहे.

तालिका सभापती : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशासकीय कामकाजाबाबत

तालिका सभापती : आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेवर अनुक्रमांक नऊवर दाखविण्यात आलेले अशासकीय ठराव वेळे अभावी पुढे ढकलण्यात आलेले आहेत.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन सोमवार, दिनांक 8 जून, 2009 रोजी सकाळी 11.00 ते 11.55 या वेळेत सभागृहाची विशेष बैठक घेण्यात येईल. या बैठकीमध्ये अल्पकालीन चर्चा घेण्यात येईल. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 5 वाजून 58 मिनिटांनी सोमवार, दिनांक 8 जून, 2009 रोजीच्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही